गृहिणी विद्यालय

गृहस्वास्थ्य केन्द्र-वाचनालय

सप्रेम भेंट

प्रफुल्ल देवकुंवर

# त्री-शक्तीचा साक्षात्कार

## नीय लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर

## ीवन : कार्य

卐

लेखक :

दिनकर पुरुषोत्तम केळकर

बी. ए., एल्एल्. बी., बी. जे.

सेविका प्रकाशन, वर्धा.

मुद्रक :
अं. पु. तापस
श्याम ब्रदर्स, रामबाग रोड,
गणेशपेठ, नागपूर.

प्रकाशक :
सौ. सविता देशपांडे,
संचालिका, सेविका प्रकाशन, वर्धा.

# प्रस्तावना

राष्ट्र-सेविका समितीच्या संस्थापिका आणि आद्य सर-संचालिका वंदनीय मावशी यांच्या या चरित्र-ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचे काम माझ्यावर सोपविण्यात आले आहे. वास्तविक वंदनीय मावशींच्या या चरित्र-ग्रंथाची प्रस्तावना ही संघटन कार्यातल्या तेवढ्याच तोलामोलाच्या व्यक्तीने लिहिली असती तर त्यामुळे या ग्रंथाला अधिक वजन प्राप्त झाले असते. संघटनशास्त्राला उपकारक अशी वंदनीय मावशींच्या चरित्रातील मर्मस्थळे अशा प्रस्तावनेत अधिक उठावदारपणे दर्शविली गेली असती. माझ्या संबंधात म्हटले तर 'क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः' अशासारखीच माझी मनोवस्था काहीशी संभ्रमित झाली आहे हे खरे. वंदनीय मावशींना समितीच्या कार्याची स्फूर्ती, प्रेरणा व प्रत्यक्ष मार्गदर्शन ज्यांच्याकडून मिळाले ते हिंदु संघटनेचे मंत्रद्रष्टे प्रणेते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सर-संघचालक, परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार यांच्या सहवासाच्या आणि अनुशासनाच्या परिसस्पर्शाने माझ्याही आयुष्यावर परिणाम घडवून आणला या एकाच दुव्याच्या आधाराने मी ही प्रस्तावना लिहिण्यास उद्युक्त झालो आहे.

आज आपल्यासमोर अखिल भारतीय किर्तीच्या, राष्ट्र–सेविका समितीच्या संस्थापिका व आद्य–सरसंचालिका श्रीमती लक्ष्मीबाई केळकर तथा वंदनीय मावशी यांचे जीवनचरित्र आहे. माझ्या दृष्टीने या चरित्राची दोन सुंदर लक्षणीय वैशिष्ट्ये आहेत. पहिले वैशिष्ट्य म्हणजे हे चरित्र वंदनीय मावशींच्याच सुपुत्राने लिहिले आहे. आतापर्यंतची पुष्कळशी चरित्रे ही त्या त्या चरित्रनायकांच्या संबंधितांनी किंवा निष्ठावन्तांनी लिहिलेली नसून ती दुसऱ्या कोणी तरी, कालसापेक्ष असे बाह्य हेतू मनात धरून लिहिलेली आहेत. अशा चरित्रांचे लेखक जर साक्षेपी आणि निर्मळ नसतील तर कित्येकदा घटनांना वेगवेगळे रंग चढून चरित्रनायक मुळापासून अगदी भिन्न अशा स्वरूपात वाचकांच्या पुढे उभा राहिलेला आपणास दिसून येतो. कर्तृत्ववान व्यक्ती या विरळा, हे जितके खरे तितकेच कर्तृत्वान व्यक्तींचे चरित्र यथातथ्य स्वरूपात रंगविणारे चरित्रलेखक हे त्याहूनही दुर्मिळ असतात. एकंदरीने 'Johnsons are rare, but Boswells are rarer' असेच म्हणावयाची पाळी सध्या येऊ लागली आहे खरी पण या चरित्राच्या विषयात आईचे चरित्र पुत्राने वर्णन केलेले आहे. मातापुत्रांच्या हृदयात वास करणाऱ्या आंतरहेतूमुळे, त्यात वास्तवतेला

बाध न येता शिवाय त्यात रसभावही भरून राहिलेला दिसतो. या चरित्राचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ते वंदनीय मावशींच्या नजरेसमोर लिहिले गेले आहे. सर्वसाधारण चरित्रे ही वर्ण्य व्यक्तींच्या माघारी, कित्येकदा त्या व्यक्तींच्या मागून कित्येक वर्षांनी लिहिल्या जातात. व्यक्ती हयात असतांना वा ती गेल्यानंतर लगेच तिचे चरित्र लिहिले गेले असे क्वचितच आढळते. त्यामुळे ज्या व्यक्तीचे चरित्र लिहावयाचे त्याची माहिती लेखकांना निरनिराळ्या ठिकाणाहून मिळवावी लागते. लेखकापुढे ही मोठीच अडचण निर्माण होते. व कित्येक वेळा त्याला चुकीची माहितीही मिळण्याचा संभव असतो.

प्रस्तुत चरित्राच्या संदर्भात चरित्रलेखक हे वंदनीय मावशींच्या सहवासात बालपणापासून वावरत असल्यामुळे त्यांना मावशींच्या जीवनाची बारीकसारीक तपशीलासह माहिती आहे. शिवाय आपण लिहिलेल्या तपशीलाबद्दल वंदनीय मावशींना दाखवून तो बरोबर असल्याची खात्री करून घेणे त्यांना शक्य झाले आहे.

वंदनीय मावशी या जन्मतःच समाज नि राष्ट्र या संबंधीच्या आत्मीयतेच्या भावना आपल्यासमोर घेऊन आलेल्या आहेत, हें त्यांच्या लहानपणीच्या हकीगतीवरून आपल्याला दिसून येईल. त्यांच्या काळी कोणाही स्त्रीला अगदी उघडपणे समाजकार्यात अगर राष्ट्रीय चळवळीत भाग घेता येत नसे तरी देखील काही वेळा धाडस करून वंदनीय मावशींनी काही चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. वंदनीय मावशींनी आपल्या गृहस्थाश्रमी जीवनात देखील आपला संसार उत्तमपणे संभाळून, आपल्या कुटुंबियांना संतुष्ट ठेवून सामाजिक चळवळीत भाग घेण्याचे आपले कार्य चालूच ठेवले होते. सुरुवातीस लोकमान्य टिळकांचा त्यांच्यावर खूपच प्रभाव पडला होता. पुढे लोकमान्य टिळक दिवंगत झाल्यावर महात्मा गांधींची तत्कालीन राजकीय क्षितिजावर प्रमुखपणे वावरावयास सुरवात झाली होती त्यांचा आश्रम वर्धा येथे स्थापन झाला होता. मावशींचे कुटुंबही वर्ध्यासच स्थायिक होते. महात्माजींच्या संपर्काने वर्धा हे हळूहळू भारतीय राजकारणाचे प्रमुख केंद्र बनले. त्यामुळे समाजकार्याभिमुख अशा वंदनीय मावशींचा महात्माजींच्या राजकारणाशी व प्रत्यक्ष कार्याशी खूप परिचय झाला व त्यातही त्यांनी भाग घेण्यास सुरुवात केली.

हे सर्व करीत असतांना वंदनीय मावशींना अपरिहार्यपणे जनसामान्यात मिसळावे लागत होते. जनताजनार्दनाचे त्यांना समीपदर्शन घडत होते. त्यांना असे आढळून आले की सध्या समाजात काही नवीन अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. ‘ इंग्रजांचे परकीय राज्य हिंदुस्थानातून घालवून तेथे आपले स्वराज्य प्रस्थापित करावे, आपला देश स्वतंत्र करावा असे पुष्कळ लोकांना मनापासून वाटत आहे व त्याकरिता लोक वाटेल तो स्वार्थत्याग करावयास सिद्ध आहेत. परन्तु या पुरुषप्रधान समाजात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र बुरसटलेला आहे. स्त्रिया ह्या अबला असून त्या पुरुषांवर सर्वस्वी अवलंबून आहेत. एक कस्पटासमान उपभोग्य वस्तू म्हणूनच बहुसंख्य समाज स्त्रीकडे पहातो आहे, ’ हे विदारक

सत्य वंदनीय मावशींना त्याकाळी अतिशय तीव्रतेने जाणवत होते. त्यावेळी वर्ध्याला मुलींकरिता जी माध्यमिक शाळा सुरु झाली होती त्यातील मुलींना जाता येता जो त्रास होत असे तो तर मावशी प्रत्यक्षच बघत होत्या. याचवेळी बंगालमध्ये एक जोडपे फिरावयास गेले असता तेथील गुंडांनी त्या जोडप्यातील स्त्रीला तिच्या पतीपासून जबरदस्तीने पळवून नेल्याचे वृत्त मावशींनी वृत्तपत्रातून वाचले. सभोवताली घडत असणाऱ्या या घटनांचा मावशींच्या संवेदनशील मनावर मोठा परिणाम झाला.

वंदनीय मावशींना या प्रसंगांतून जाणवत राहिले की, अद्यापि समाजात स्त्री ही स्वतःचे संरक्षण स्वतः करू शकत नाही. व स्त्रीचे संरक्षण करण्यास पुरुष देखील पुरेसे समर्थ नाहीत. मावशींचे मन हे चिंतनशील असल्यामुळे स्त्रियांच्या संरक्षणासंबंधीचा हा विचार त्यांच्या मनात कित्येक दिवसपर्यंत घोळत होता. याच वेळी महात्माजींच्या सायंप्रार्थनेच्या वेळी झालेला एक संवाद मावशींनी ऐकला त्यात एका युवतीने महात्माजींना विचारलेल्या प्रश्नाला महात्माजींनी उत्तर दिले होते, ' तुम्ही समाजात ' सीता ' निर्माण करू शकलात तर स्त्रियांचे संरक्षण करणारे ' राम ' समाजात आपोआप निर्माण होतील.' हे उत्तर ऐकताच ' अशा सीता आपल्याला घडविता येतील का ? ' या विचाराचे चक्र मावशींच्या मनात सुरू झाले. या वेळपर्यंत त्यांच्या मनात एक गोष्ट ठामपणाने ठसून राहिली होती की, काही झाले तरी आपल्या स्त्रियांची सध्याची स्थिती सुधारण्याकरिता आपण काही तरी अवश्य करावयास हवे.

वास्तविक स्त्रियांची परिस्थिती सुधारावयास हवी असे म्हणणाऱ्या मावशी काही पहिल्या किंवा एकट्याच नव्हत्या. इंग्रजी राजवटीच्या आगमनाबरोबरच ज्या असंख्य सामाजिक सुधारणांची लाट महाराष्ट्रात आणि हिंदुस्थानात उसळली त्यात स्त्रियांच्या उद्धाराच्या कार्याला वाहून घेणारे कितीतरी महाभाग होते. स्त्री-सुधारणेच्या चळवळीचा अगदी स्थूलपणे मागोवा घेतला तर आपणास आढळून येते की, ' पुरुषांच्या गुलामगिरीतून स्त्रीला सोडविण्याकरिता तिला स्वावलंबी बनावयास हवे, तिला आर्थिक दृष्ट्या संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून द्यावयास हवे, स्त्रीचे चूल नि मूल हे अत्यंत संकुचित असे जे क्षेत्र आहे त्यातून स्त्रीला बाहेर काढून समाजाच्या सर्व क्षेत्रात तिला मुक्त वावर नि समान संधी उपलब्ध करून द्यावयास हवी, ' अशा वेगवेगळ्या दृष्टीकोनातून स्त्री-मुक्तीचे प्रयत्न गेले शतकभर चालू आहेत.

स्त्रियांच्या उद्धाराच्या या सर्व चळवळी आता बऱ्याच अंशांनी फलद्रूप झालेल्या आपणास दिसताहेत. बहुसंख्य भारतीय स्त्रिया या स्वतंत्र आचारविचाराच्या, बुद्धिजीवि आणि आधुनिक, अद्यावत् अशा झालेल्या आपण पहातो आहोत. पण समाजनिष्ठ प्रागतिक विचारांच्या सन्दर्भात आधुनिक आणि सुधारित स्त्री–जीवनाकडे पाहिले तर ते पूर्वापेक्षा फारसे स्पृहणीय आहे असे म्हणता यावयाचे नाही. स्त्री स्वतंत्र झाली म्हणजे नेमके कोणते

परिवर्तन तिच्यात घडले ? लौकिकार्थाने समाजाच्या सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने तिच्या कर्तृत्वास वाव व मानसन्मान मिळू लागले हे खरे, पण खऱ्या अर्थाने ज्ञानाबरोबर व कर्तृत्वाबरोबर जीवनाकडे पाहण्याचा जो एक डोळसपणा प्राप्त होत असतो तो भारतीय स्त्रीला लाभला आहे काय ? की पौर्वात्य झापडे जाऊन पाश्चिमात्य रूढींची झापडे डोळ्यावर आली एवढाच फरक म्हणजे स्त्री सुधारली ?

इब्सेनच्या नोराने कुटुंबाचे दार एकदा आमच्या आधुनिक स्त्रीला उघडून दिल्याबरोबर स्त्रीचे पाऊल आता घराबाहेर संपूर्णतया पडले आहे. पण आमच्या स्त्रिया नोकऱ्या करावयास लागून समाजरचनेचा मूळ पाया असलेले जे कुटुंब, ते उघडे पडून हा पायाच आता ढासळावयास लागला आहे. तसेच स्त्री ही नोकरी करावयास लागून आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र झाल्याबरोबर ती समाजातील कोणालाही विचारीनाशी झाली व तिच्यातले स्त्रीपण नाहीसे होऊन ती पुरुषी होऊ लागली आहे. सध्या अनेक कुटुंबांची अवस्था, त्यामधील स्त्री ही घराबाहेर पडल्यामुळे, 'गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ' अशी झाली आहे. स्त्रीचे लक्ष घरातून बाहेर उडले की, घरातील मुलांवर जे संस्कार लहानपणी व्हावयाचे ते न झाल्यामुळे ही मुले संस्कारहीन बनली आहेत व त्याचेही परिणाम समाजात आज आपण पहातच आहोत. त्याचप्रमाणे स्त्री ही घरातून अगर कुटुंबातून वावरत होती त्यावेळी तिला एकदोन पुरुषांची गुलामगिरी पत्करली की भागत असे. आता तीच स्त्री नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडल्यावर अनेक पुरुषांची भक्ष्य बनलेलीही आपण भोवताली पहातो आहोत. खरे पाहिले तर आजच्या आधुनिक स्त्रीची ' ना घरची ना दारची ' अशी अवस्था झालेली आहे.

मावशींच्या स्वभावात धर्म, संस्कृति, शील नि सचोटी यांच्यासंबंधी जन्मजात आदर असल्यामुळे त्यांनी हे सर्व सद्‌गुण समितीच्या द्वारा स्त्रियांमध्ये निर्माण करण्याचे प्रामुख्याने ठरविले. अर्थात् कोणाही व्यक्तीमध्ये सद्‌गुण निर्माण करण्याचे काम फार खडतर असते. त्याकरिता नुसत्या सभा, संमेलने, ठराव, चर्चा, एवढ्याने भागत नाही तर स्वत: आपण सद्‌गुणी आचरण ठेवून लोकांच्या पुढे एक जागता आदर्श सतत उभा ठेवावा लागतो. लिहिण्याबोलण्याइतके तत्त्वनिष्ठ आचरण सोपे नसते. ते एक खडतर शिवव्रत असते व हे व्रत नेत्याने स्वतः घ्यावे लागते. एकदा समितीमधून स्त्रियांमध्ये कोणते सद्‌गुण निर्माण करावयाचे हे ठरविल्यानंतर वंदनीय मावशींनी आपले जीवन तशा प्रकारे घडविण्याचा प्रयत्न केला व त्या तसे जीवन जगूही लागल्या. समितीसारख्या संघटनेच्या नेत्यामध्ये धाक, आदर व प्रेम अशा तीन गुणांचे मिश्रण असावे लागते. यातील एखादा गुण नसेल अगर या गुणांचे प्रमाण जरी कमीजास्त होईल तरी संघटन यशस्वी होऊ शकणार नाही. वंदनीय मावशींच्या अंगी हे तीनही गुण योग्य प्रमाणात आहेत हे त्यांनी आजवर केलेल्या संघटनेच्या कुशल संचालनाच्या योगाने सिद्ध झालेले आहे.

वंदनीय मावशी या खरोखरीच थोर असे दुर्मिळ व्यक्तिमत्व लाभलेल्या अशा आहेत. 'वज्रादपि कठोराणी मृदूनि कुसुमादपि' असाच त्यांचा स्वभाव आहे. तत्त्व व शिस्त या दोन गोष्टींबाबत त्या अत्यंत कठोर असतात तर आपल्या स्वयंसेविकांच्या संबंधात त्या अत्यंत हळुवार असतात, हे आता सर्वांना माहिती झाले आहे. मावशींच्या चेहेऱ्यावर दिसणारे सात्त्विक तेज पाहून साहजिकच त्यांच्यासंबंधी एक प्रकारचा आदर पाहणाऱ्याच्या मनात निर्माण होतो. सत्तरीच्या वयात देखील त्या ज्या तडफेने समितीकरिता कष्ट घेतात ते पाहिले म्हणजे मन आश्चर्याने थक्क होते. मावशींसारख्या व्यक्ती ज्या कार्याचे प्रमुखत्व स्वीकारतील ते कार्य निश्चितपणे यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाही.

सर्व जगातील समाज आज घसरगुंडीला लागलेले आहेत. ही घसरण जर अशीच आणखी काही काळ चालेल तर जगातील समाजव्यवस्थेचा सत्यानाश झाल्याविना रहाणार नाही हे सर्व विचारवंत समाजधुरीणांना पटलेले आहे. हिंदू तत्त्वज्ञान तरी समाजाची ही घसरगुंडी थांबवून समाजाला शाश्वत स्थैर्य प्राप्त करून देईल का म्हणून पाश्चिमात्य राष्ट्रे हिंदू तत्त्वज्ञानाचा कसून अभ्यास करीत आहेत. या वेळी हिंदू तत्त्वज्ञानाने भारलेले तरुण नि तरुणी सात्त्विक तेजाने रसरसून जाऊन जग जिंकण्याच्या आत्मविश्वासाने उभे ठाकतील आणि कोणाच्याही दहशतीला भिऊन दबून न जाता गुंडांचे पारिपत्य करून दहशतवादी गुंडशाहीचा समूळ उच्छेद करणारे लक्षावधी नागरिक संघ आणि समिती यांमधून निर्माण होत रहातील तर 'परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम्' असे धर्मसंस्थापनेसाठी अवतीर्ण झालेले हिंदू तत्त्वज्ञान म्हणजे काय हे सर्व राष्ट्रांना कळून सर्व जग हे हिंदू तत्त्वज्ञान आत्मसात करण्याकरिता पुढे येईल यात मुळीच संशय नाही.

हिंदू समाज आजपर्यंत वेगवेगळ्या लोकांकडून पराभूत होऊन कित्येक शतकेपर्यंत गुलामगिरीत खितपत पडला होता हे खरे आहे. परंतु आता हिंदूंना जाग आल्याची लक्षणे दिसताहेत. असे वाटते आहे की यापुढे तो कोणालाही हार जाणार नाही. तत्त्वज्ञानापासून पोशाखाख्या आचारापर्यंत आज आपण परकीयांची जी आंधळी उसनवारी करीत आहोत ती थांबवून माझे स्वतःचे असे या जगात काही तरी आहे व त्याची छाप मी सदैव इतरांवर पाडीत राहीन या दुर्दम्य आत्मविश्वासाने 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही जयिष्णु घोषणा आता प्रत्येक हिंदूच्या मुखातून उठली पाहिजे व ती कृतीत उतरण्याकरिता हिंदू स्त्रीपुरुषांनी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. कारण हिंदू समाजाने जगाला तत्त्वज्ञान देण्याचे आपले कार्य न केल्यामुळे व आपल्या तत्त्वज्ञानाचे प्रात्यक्षिक समर्थ राष्ट्रस्वरूपात जगाला न दाखविल्यामुळे आज संबंध जग भ्रांत विचारसरणीत गोते खात आहे. त्याला पुन्हा योग्य मार्गावर आणण्याचे कार्य फक्त हिंदू समाजच करू शकेल यात कोणालाही शंका नाही.

हिंदुसमाजाला शक्तिसंपन्न करून त्याला वैभवाकडे नेण्यासाठी कोणत्या तत्त्वज्ञानाची

व कार्याची कास धरली पाहिजे याची जाणीव इतरांना करून देण्याचे दायित्व आपणावरच आहे. अवधी फार थोडका आहे. या वेळी प्रत्येकाने शर्थ करून समाजात इष्ट तो बदल घडविण्याकरिता सतत कष्ट करावयास हवेत. वंदनीय मावशींच्या या जीवनचरित्रापासून असे कार्य करण्याची अक्षय स्फूर्ती सेविकांना मिळत राहो व त्यांना कार्यरत ठेवण्यासाठी वंदनीय मावशींना दीर्घायुरारोग्य लाभो अशी परमेश्वरापाशी माझी प्रार्थना आहे.

वंदनीय मावशींचे सुपुत्र श्री. दिनकरराव केळकर यांनी आपल्या स्वनामधन्य मातोश्रींचे चरित्र लिहून आपल्या समाजाची फार मोठी सेवा केली आहे. अशा प्रकारची चरित्रेच आज समाजापुढे यावयास हवी आहेत. श्री. दिनकरराव यांची भाषा ओघवती व प्रसादपूर्ण आहे. नि म्हणून वंदनीय मावशींचे हे चरित्र एकदा वाचावयास घेतले म्हणजे संपूर्ण वाचल्याशिवाय सोडवत नाही.

अशा प्रकारची चरित्रे जास्तीत जास्त आबालवृद्धांच्या हातांत जावयास पाहिजेत. म्हणून श्री दिनकरराव यांना माझी अशी विनंती आहे की त्यांनी हे समग्र चरित्र एकाच भागात छापण्याऐवजी दोन भागांत छापून प्रत्येक भागाची किंमत सामान्य माणसांना परवडेल इतकी माफक ठेवावी. चरित्राच्या दुसऱ्या भागात परिशिष्ट म्हणून वंदनीय मावशींसंबंधीच्या समितीच्या निरनिराळ्या कार्यकर्त्यांच्या आठवणी व त्यांचे मावशीं संबंधीचे लेख समाविष्ट करावेत म्हणजे या चरित्राला पूर्णत्व येईल. अर्थात् यापैकी काय शक्य आहे ते श्री. दिनकररावांनी ठरवावे व त्याप्रमाणे करावे.

वंदनीय मावशींनी आजपर्यंत अत्यंत कष्ट सोसून हिंदू स्त्रियांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याबद्दल मला अत्यंत आदर आहे म्हणून त्यांना माझे प्रणाम अर्पण करून माझी ही लांबलेली प्रस्तावना पुरी करतो.

लेखनावधी !

भास्कर निवास, सांगली
अधिक ज्येष्ठ वद्य एकादशी शके १८९७

**का. भा. लिमये**

# पुरस्कार

आपण पाठविलेली हस्तलिखिते आपाततः पाहिली. वंदनीय मावशींचे चरित्र प्रकाशित करणारे लोक धन्यवादाला पात्र आहेत. कराल कलिकालामध्ये ज्या वेळेला मानवता पडलेली दिसते, चारित्र्य झडलेले दिसते, नीतिमत्ता खंगलेली दिसते, अशा ह्या काळामध्ये मावशींसारख्यांची महान व कर्तृत्ववान चरित्रे जर डोळ्यापुढे आली तर ती जीवन-संग्रामात झुंजत असलेल्या व जीवन-प्रवाहात तरंगत असलेल्या जीवांना दीपगृहासारखी मार्गदर्शक होतील.

या चरित्र कथनाने एक शक्तिशाली स्त्री-जीवन समाजापुढे येते. स्त्री तेजस्विनी व शक्तिशाली बनली तर जग सुधारू शकते. म्हणून प्रथमतः स्त्रीवर संस्कार करण्याची अत्यंत आवश्यकता असते. भगवान श्रीकृष्णांनी हे फार लवकर ओळखले होते. ज्या वेळेला गैर-समज होण्याचा संभव नव्हता अशा वयात- बाळपणात त्यांनी हा प्रयोग गोकुळात करून दाखविला व संपूर्ण गोकुळ बदलून दाखविले. मावशींनी श्रीकृष्णाचा हा मानव्य-रक्षक प्रयोग अव्याहत सुरु ठेवलेला आहे. तो यथार्थ असल्यामुळे अंतिम यश त्यांचे आहे.

आजची स्त्री शिक्षणामुळे थोडीशी पुरुषी बनली आहे की काय अशी शंका निर्माण होऊ लागली आहे. अशा स्त्रीच्या समोर विनयी, नम्र, संस्कारी पण तेवते जीवन या चरित्रामुळे ठेवले जात आहे, असे हे चरित्र वाचताना वाटते. त्यामुळे मावशींचे चरित्र हा आजच्या सुधारलेल्या, हक्काची जाणीव झालेल्या, तेजस्वी जीवन जगू पाहणाऱ्या, सुशिक्षित स्त्रीला फार मोठा आदर्श आहे. आजच्या स्त्रीने मावशींच्या चरित्राकडे पाहात पाहात जगायचे ठरविले तरी खूप आहे.

आपण सुशिक्षित नाही असे सिद्ध करण्याचा मावशींनी प्रयत्न केला आहे असे हे चरित्र वाचताना वाटते. पण शिक्षण म्हणजे काय याची खऱ्या अर्थाने ज्यांना कल्पना आहे व त्या शिक्षणाचे परिणाम जीवनावर कोणते दिसावयास पाहिजेत याची ज्यांना कल्पना आहे

त्यांना मावशी फार सुशिक्षित आहेत असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही. गीतेत श्रीकृष्णांनी ज्ञानाचे जीवनावर कोणते परिणाम होतात ते सांगितले आहे. ते म्हणतात—

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ।।

हे महत्वाचे गुण माणसात असले पाहिजेत. निर्भयता, सत्त्वसंशुद्धि हे गुण येत नसतील तर शिक्षणाला अर्थ नाही. हे गुण ज्यांच्यात असतील ती माणसे डिग्री नसली तरी सुशिक्षितच आहेत.

कुटुंबाची उपेक्षा न करता पण स्वतःच्या ध्येयानुसार जीवन घडवण्याची धडपड या चरित्रात दिसते. समाजाला याहून उत्तम शिक्षण दुसरे कोणते हवे आहे ? काही स्त्रिया कुटुंबातच खिचपत पडलेल्या दिसतात तर काही स्त्रिया ध्येयार्थ कुटुंबाची उपेक्षा करून वेगळे जीवन जगणाऱ्या आढळून येतात. या चरित्रात मात्र या दोहोंचा समन्वय आढळून येतो. कुटुंब व ध्येय यांचा संगम दिसतो. भारतीय संस्कृति संगमाचे महत्त्व मानते. तिने संगमाला अतिशय पवित्र मानले आहे, तीर्थ मानले आहे.

स्त्री निष्प्रभ होता कामा नये. तशीच ती पुरुषी बनता कामा नये. ती स्वसंरक्षणक्षम बनावी याकरिता अविश्रांत जगत असलेले असे हे चरित्र दिसते. स्त्री ही स्त्रीच असली पाहिजे. मानवी जीवनातील स्त्री-गुणांची तिने जोपासना केली पाहिजे हे मावशींकडे पाहिले की लक्षात यायला वेळ लागत नाही.

मावशींना कार्य सुरू करताना काय काय अडचणी आल्या असतील याची थोडी बहुत कल्पना मी करू शकतो. चाकोरीतच वावरणाऱ्या माणसांना चाकोरीतून बाहेर काढून दुसरे विश्व दाखविणे फारच कठीण काम आहे. त्याचे प्रात्यक्षिक या चरित्रात दिसते. वंदनीय मावशींना सुरुवातीच्या काळात दारोदार जाऊन मुली मागाव्या लागल्या आहेत ही घटना या बाबत बोलकी आहे.

ठाणे
दिनांक २५।१०।७५

पांडुरंगशास्त्री आठवले

## हृद्‌गत :

राष्ट्र-सेविका समितीच्या संस्थापिका, वंदनीय मातोश्री लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर यांचे हे चरित्र समस्त भारतीय स्त्री-पुरुष बांधवांना सादर करताना अत्यानंद होत आहे.

पुत्र या नात्याने आम्हास वंदनीय मावशींचे जीवन आणि कार्य अति निकट अंतरावरून अवलोकन करण्याची सुसन्धी लाभली हे स्पष्ट आहे. तथापि हा अनुभव देखील अपरिचित नाही की; आपण किती श्रेष्ठ व्यक्तीच्या सान्निध्यात आहोत, या संबंधी कधीकधी निकट-वर्तियांनाही नीटशी कल्पना नसते. अशा परिस्थितीत जी डोळस वृत्ती असावी लागते ती आमच्यात असावी म्हणूनच की काय मातोश्री मावशींच्या असाधारण व्यक्तिमत्वाचा या ग्रंथाद्वारे परिचय करून देण्यास आम्ही प्रेरित झालो.

केळकर कुटुंबातील मावशींचे नेतृत्व जरी आम्हास सहज आकलन होण्यासारखे असले तरी त्यांनी मिळविलेल्या सामाजिक नेतृत्वानेही प्रभावित होण्यास काहीसा उशीरच झाला याची स्पष्ट कबूली दिलीच पाहिजे. निरनिराळ्या प्रकारच्या अनेक जबाबदाऱ्यांनी परिपूर्ण अशा आमच्या मोठ्या कुटुंबाचे नेतृत्व एखाद्या कर्तबगार कर्त्याच्या कुशलतेने वयाच्या फक्त तिशीतच करीत असता, त्यांनी राष्ट्र-सेविका समितीच्या राष्ट्रव्यापी स्त्री-संघटनेची मुहुर्तमेढ रोवली.

पदरी शालेय शिक्षण फक्त मराठी ४ वर्ग ! वक्तृत्वाची संवय नाही !! परन्तु हेच खरे की, ज्याचेजवळ प्रबल इच्छा आणि ती कृतीत आणण्यासाठी आवश्यक असे अविश्रांत परिश्रम, हे भांडवल आहे त्याचे कोणत्याही प्रकारच्या जीवन-व्यापारातील यश निश्चित असते. म्हणूनच समिती कार्यारंभानंतर जसजसा काळ लोटत चालला तसतसे निरनिराळ्या प्रकारच्या संकटांना मागे टाकत वंदनीय मावशींचे सामाजिक व्यक्तिमत्त्व व त्याहीपेक्षा त्यांचे कार्य उजळून उठावदार होत असल्याचा आम्हास प्रत्यय आला. सांगण्याचे तात्पर्य हेच की, केवळ आम्हा उभयतातील निकटतम नातेसंबंधामुळेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आमच्यावर प्रभाव पडला असे नव्हे, तर त्यांचे आणि त्यांच्या कार्याचे जवळून निरीक्षण करण्याचा सुयोग प्राप्त झाल्याने त्यांचे जीवन समाजासमोर, विशेषतः स्त्री-समाजासमोर सादर करणे अगत्याचे आहे अशी खात्री झाली.

वंदनीय मावशींना ' स्त्री-शक्तीचा साक्षात्कार ' झाल्याने खरे शक्तिशाली स्त्री-जीवन त्यांच्याद्वारे वर्तले जात आहे. आणि म्हणूनच त्यांच्या समितीकार्यातील कित्येक भगिनी जेव्हा निर्भयपणे आणि आत्मविश्वासाने समाज-कार्यात वावरताना दिसतात तेव्हा कमालीचे समाधान वाटते.

उपरनिर्दिष्ट अनुभव-आधारित पार्श्वभूमिमुळेच त्यांचे जीवन-कार्य समाजासमोर ठेवण्याची आम्हास प्रेरणा झाली. ती त्यांच्या सहवासातील कुणालाही होण्यासारखी आहे. फक्त योगायोगामुळेच आम्ही आघाडीचे ठरणार एवढेच.

प्रस्तुत ग्रंथास हिंदूसंघटन कुशल आणि अनुभवी अशा माननीय काशीनाथपंत तथा काकासाहेब लिमये यांची प्रस्तावना आणि साधुतुल्य पं. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे आशिर्वाद लाभले हे आम्ही आमचे महद्भाग्य समजतो.

प्रस्तुत चरित्र लिहिताना फक्त वंदनीय मावशींचा वेळ घेऊन काम भागण्यासारखं नव्हते. कारण त्यांचे चरित्र म्हणजे त्यांच्या वैयक्तिक जीवनाप्रमाणेच त्यांनी आरंभिलेल्या देशव्यापी संघटनेचा इतिहासही होय! या इतिहासाचे नेतृत्व मावशींनी केले आणि तो घडविण्यानिमित्त कित्येक माता-भगिनी त्यांच्या सोबत चालल्या; चालत आहेत. त्यापैकी प्रमुख अशा जास्तीत जास्त व्यक्तींना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भेटणे आवश्यक होते. देशभर विखुरलेल्या अशा ज्या अनेक भगिनींशी प्रत्यक्ष व पत्ररूपाने संपर्क साधून आवश्यक माहिती विचारली तेव्हा त्वरेने आणि आपुलकीने त्यांनी योग्य असा प्रतिसाद दिला. या सर्वांच्या सहकार्याशिवाय माझे लेखन आहे त्यापेक्षाही अपूर्ण राहिले असते. अशा भगिनींची यादी फार मोठी आहे त्यामुळे इच्छा असूनही त्यांचा नामोल्लेख टाळावा लागत आहे. याबद्दल त्या उदारतेने क्षमा करतील अशी आशा आहे.

प्रस्तुत चरित्रग्रंथ लिहिण्याची इच्छा अगदी प्रथम मी आमची ज्येष्ठ भगिनी सौ. वत्सलाताई चोळकर व पत्नी सौ. कुमुदिनी केळकर या दोघांजवळ व्यक्त केली. या दोघींनाही ही कल्पना पसंत पडली एवढेच नव्हे तर त्यांनी मला सर्व प्रकारे प्रोत्साहित करून मी नेटाने हे कार्य पूर्ण करीनच ही काळजी वाहिली. यामुळे या दोघींचाही उल्लेख करणे आवश्यक वाटते.

राष्ट्र-सेविका समितीच्या बौद्धिक प्रमुख, प्राध्यापिका सौ. कुसुमताई साठे यांनी मुद्रणापूर्वी हस्तलिखित वाचून आवश्यक सूचना केल्या या बद्दल त्यांचाही नामोल्लेख करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत लेखक नावाजलेला साहित्यकार नाही. श्रद्धा आणि कर्तव्यभावना यापोटी जे उतरले ते आपणासमोर ठेवले आहे. म्हणूनच काही कमतरता जाणवली तरीही वाचक गोड मानून घेतील असा विश्वास वाटतो.

नागपूर
दिनांक २५-१०-७५

**दिनकर पुरुषोत्तम केळकर**

# प्रकाशिकेचे दोन शब्द

वंदनीय मावशी तथा लक्ष्मीबाई केळकर! राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका !! डोळ्यासमोर एक प्रसन्न, लोभस व्यक्तिमत्व उभं राहतं. अन्तःकरणाचा सात्विक भाव दर्शविणारा सौजन्ययुक्त, निर्व्याज, प्रसन्न चेहरा; अंगी मोठेपण असून सुद्धा लीनता दर्शविणारी अंगकाठी; बोलण्यात पदोपदी आढळणारा नम्रभाव–म्हणजेच आमच्या वंदनीय मावशी! रामायण प्रवचनांच्या माध्यमातून तरुण पिढीला सुसंस्कारित करण्याचं असिधारा व्रत घेतलेलं! त्यांच्या मोहमयी रसाळ वाणीतून रामचंद्राच्या गुणसंकीर्तनाचा अखंड वाहणारा गंगाप्रवाह–कोणीही यावं अन् त्यात अवगाहन करावं, मनसोक्त डुंबावं पण तृप्ती होत नाही. रामनामाची गोडी अवीट तर खरीच, पण त्यांच्या मुखातून ऐकण्याची गोडी काही औरच!

त्यांच्या रसाळ प्रवचनांचा लाभ खेड्यापाड्यातील जनतेला व्हावा ह्या सद्‌हेतूने पांचसहा वर्षांपूर्वी ती सेविका प्रकाशनतर्फे अक्षरबद्ध करण्यात आली; आणि आता दुसरी आवृत्ति काढण्याचा विचार करीत आहोत ह्यापेक्षा अधिक गौरव तो कोणता! नुसती रामायणावरील प्रवचनेच त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देण्यास समर्थ आहेत.

वंदनीय मावशींचे जीवन म्हणजे तीव्र लढा! ऐन तारुण्यात वैधव्य आलेलं, घरातला कर्ता पुरुष अकस्मात मृत्युमुखी पडलेला, मुलं सर्व अज्ञान, प्रपंचाचा व्याप तर फार मोठा, पण वंदनीय मावशींनी मोठ्या धैर्यानं व संयमानं प्राप्त परिस्थितीला तोंड दिलं. सोनं भट्टीतून तावून सुलाखून बाहेर पडलं म्हणजेच शुद्ध होतं. वंदनीय मावशींचं जीवनही असच आहे.

हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' आहे. स्त्री ही समाजाची पुरुषा इतकीच महत्वाची घटक असल्यामुळे तिच्या सर्वांगीण उन्नतिसाठी युनोतर्फे विविध स्तरांवर कार्यक्रम चालू आहेत. आपला भारतही त्यात सहभागी झाला आहे. पण युनो ह्या जागतिक संस्थेला सुद्धा फार उशीरा जाग आली. स्त्री राष्ट्राची आधारशक्ति आहे. तिच्यात राष्ट्राला उन्नतीप्रत नेण्याचं सामर्थ्य आहे. वंदनीय मावशींना हा "स्त्री–शक्तीचा साक्षात्कार" ३०–४० वर्षा-

पूर्वीच झाला. त्यातूनच राष्ट्रसेविका समितीचा जन्म झाला. स्त्रियांना-पर्यायानं भावी पिढीला-सुसंघटित, सुसंस्कारित करण्याचं कार्य अविरत चालू आहे. भ्रष्टाचार व चारित्र्य-हीनता ही वैशिष्ट्ये असलेल्या आजच्या युगात वंदनीय मावशींचं कार्य निसंःशय महत्तम आहे.

ह्या 'जागतिक महिला वर्षातच' वंदनीय मावशींचे जीवनकार्य प्रकाशित करण्याचा सुयोग–सुभाग्य-सेविका प्रकाशनला लाभलं ! त्यांची प्रवचने प्रकाशित करताना 'मनीचे स्वप्न साकार झाल्यामुळे' धन्यता वाटली. काही वर्षांच्या अवधींतच "स्त्रीशक्तीचा साक्षात्कार" घडविण्याचे परमभाग्यही सेविका प्रकाशनाला लाभले, हा एक ईश्वरी संकेतच आहे. वंदनीय मावशींच्या यशाचं रहस्य यातच आहे. 'चळवळीला भगवंताचं अधिष्ठान असलं' म्हणजे यशाची पाऊलवाट लीलया आक्रमिता येते. वंदनीय मावशींचे सुपुत्र श्री. दिनकरराव केळकर यांनी लिहिलेल्या त्यांच्या या चरित्रग्रंथाद्वारे वाचकांना 'स्त्री–शक्तिचे' महत्व आणि उपयोगिता या संबंधी आकर्षण आणि आशा निर्माण होईल असा विश्वास वाटतो.

शेवटी परंतु महत्वाचे असे एक कार्य म्हणजे प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनार्थ उत्तम सहकार्य दिलेल्या काही बंधु-भगिनींचा नामोल्लेख. ग्रंथाचे मुद्रक नागपूर येथील श्याम प्रदर्शचे संचालक-द्वय श्री. दादासाहेब व श्री. नानासाहेब तापस या दोघांनीही केवळ व्यवसायिक दृष्टिकोणातून न पाहता अत्यंत आपुलकीने मुद्रणाचे कार्य केले त्या बद्दल त्यांचे आभार मानणे आवश्यक वाटते.

श्रीमती सुनंदा खापरे यांनी हस्तलिखिते आपल्या सुबक हस्ताक्षरात लिहून आमचे मुद्रणाचे काम सुलभ केल्याबद्दल त्यांचेही आभार मानणे जरूर आहे

समस्त वाचक बंधु–भगिनी या ग्रंथाचे अपेक्षेनुसार स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**सौ. सविता देशपांडे**

वर्धा
दि. २५–१०–७५

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रेरक स्त्री-जीवनशास्त्र | १ |
| संस्कार प्रसंग | ८ |
| पहिल्या महायुद्धाचा काळ आणि नंतर | १५ |
| श्वशुर-गृही पदार्पण | २१ |
| वैवाहिक-जीवन | २८ |
| कुटुंब-प्रमुख मावशी | ४३ |
| स्त्री-शक्तीचा साक्षात्कार | ५० |
| समितीचा शुभारंभ | ५५ |
| समितीची आरंभीची वर्षे | ६० |
| समितीची वैचारिक भूमिका-कार्यक्रम | ७४ |
| समिती-कार्याचा प्रसार | ८० |
| वादळ शमल्यानंतर | १०० |
| मावशी आणि आम्ही | १०६ |
| भारतीय स्त्री-जीवन विकास परिषद | ११४ |
| श्रीरामायणाचा गंगौघ | १३० |
| भारतीय स्त्री-रत्नांची स्मारके | १४२ |
| कौटुंबिक जीवनाचा एक अध्याय | १५० |
| समितीचे २५ वे वर्ष आणि तदनंतर | १५५ |
| ध्येय-मार्गावरील आगेकूच | १६८ |
| राष्ट्र-सेविका समिती : स्त्री-धर्माची कार्यशाळा | १७६ |



वं. श्रीमती लक्ष्मीबाई उपाख्य मावशी केळकर

# प्रेरक स्त्री-जीवनशास्त्र : १

मातोश्री मावशी केळकर आपल्या प्रवचनात दृष्टान्तादाखल ज्या एका बोधकथेचा उल्लेख करतात ती अशी :

" आश्विन आरंभीच्या एका रम्य सकाळी नेहमीप्रमाणेच गंगामाईचे अथांग पात्र सूर्य-नारायणाच्या सहस्त्र किरणांनी उजळून निघाले होते. त्याचवेळी अंगावर निःसंकोचपणे नाचणाऱ्या आपल्या बालिकेचे कौतुक करणाऱ्या प्रेमळ पित्यासमान, आसमंतातील निसर्ग त्या तरंगिणीच्या तीर्थाटनात तल्लीन झाला होता.

अशा प्रसन्न वेळी पैलतीरी जाऊ इच्छिणाऱ्या एका आकर्षक व्यक्तिमत्वाचे त्या ठिकाणी आगमन झाले. पवित्र गंगामाईच्या परिसरात पंडितांना काय तोटा ? त्यांच्या पांडित्याचा चांगलाच लौकिक होता.

किनारीचा नावाडी जरी निरक्षर असला तरी सुबुद्ध आणि आपल्या कामात निष्णात होता. गिऱ्हाईकाच्या यथोचित स्वागतानंतर तत्परतेने तो होडी हाकारता झाला. संभाषणप्रिय पंडितजींना नावाड्याचे मौन अस्वस्थ करणारे ठरल्यामुळेच बहुधा ते त्यास प्रश्न करते झाले:

"कारे बाबा, नीतिशास्त्रासंबंधी तुला काही माहिती आहे काय ? ते अवगत असण्याची अतिशय आवश्यकता आहे."

विस्मयाने त्यांजकडे नजर किंचित वळवून, मानेनेच नावाडी नकार देता झाला.

"अरे बाबा, मग तुझा पाव जन्म फुकट गेला हे लक्षात घे. निदान समाजशास्त्रासंबंधी तरी तुला काही कल्पना आहे काय ?"

या वेळीही पहिल्या प्रकारच्या नकाराचीच पुनरावृत्ती झाली.

" मग तुझा अर्धा जन्म फुकट गेला हे समज, " लगोलग पंडितजी बोलून गेले.

आपल्या कामातील एकाग्रता विचलित न होऊ देता नावाड्याने वल्हयावरील आपला निष्णात हात तसाच चालू ठेवला......आता नाव पात्राच्या मध्यापर्यंत आलेली होती.

" बरे, अर्थशास्त्र तरी......?"

......आणि या सुमारास काही ऐकण्याच्या मनःस्थितीतहि तो राहिला नव्हता. उलट अचानकपणे अुसळून येत असलेली पुराची लाट अंतरावरूनच लक्षात आल्याने पंडितजींनाच तो प्रश्न करता झाला :

" महाराज जरा तिकडे नजर वळवा. अनपेक्षित आपत्ती उसळया मारीत आपल्याकडे येत आहे म्हणून विचारतो, निदान कामचलाऊ जलतरण तरी आपणास अवगत आहे काय ? "

हे ऐकताच पंडित महाशयांच्या गांभीर्याचा किल्ला कोसळला. अशा वेळी असत्य उत्तर देणे किती मूर्खपणाचे ठरेल हे जाणण्या इतपत ते खचित शहाणे होते. नाही म्हणण्याचीच देर, की नावाडी त्यांस बोलून गेला :

"महाराज, मला याच क्षणी पाण्यात उडी टाकून पैलतीर गाठता येणे शक्य आहे. पण आपणास हे अशक्यच असेल तर आपला मात्र संपूर्णच जन्म फुकट जाण्याचा क्षण जवळ येऊन ठेपला आहे."

जीवन विकासाची एक आवश्यकता म्हणून कला आणि शास्त्रे यांचा अभ्यास महत्वाचा आहे. परन्तु या अभ्यासामुळे स्वतःच्या व्यक्तिगत विकासासोबतच समाजाचा विकास साधण्याच्या महत्कार्याकडे प्रवृत्त होण्याची कितपत प्रेरणा मिळते हा प्रश्नच आहे. भारतातच काय परन्तु बहुतेक प्रगत पाश्चिमात्य देशांत सुद्धा ज्याला केवळ माहितीपर ' पुस्तकी ज्ञान ' म्हणून संबोधतात त्या पलिकडे जाण्याची प्रवृत्ति विशेष प्रमाणात नसल्याचे आढळते. कोणत्याही समाजाचे एकसंध अशा प्रबल शक्तीत परिवर्तन करावयाचे असेल, तर निरक्षरालाही सहजगत्या अवगत होऊ शकणाऱ्या ' जीवनशास्त्रास ' दुर्लक्षिणे आत्मघातकी ठरते. उपरनिर्दिष्ट बोधकथेतील नावाडी निरक्षर असूनही जीवनशास्त्र त्याचे स्वभाव-अंग बनले होते तर त्याच्या अघोर अवहेलनेमुळे प्राणांतिक संकटाच्या भोवऱ्यात सापडण्याची पंडीतजींवर पाळी आली होती.

जीवनमंचावर वेगवेगळ्या व्यक्तीस वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका वठवावयाच्या असतात हे जरी खरे असले तरी एकंदर प्रयोगाचे दृष्टीनेच नव्हे तर व्यक्तिगत यशाचे दृष्टीनेही मिळालेली भूमिका चित्त ओतून करणे, तसेच सान्निध्यातील सह-कलाकारांशी पूरेपूर सहकार्य करणे या गोष्टींचे प्रत्येकानेच महत्व जाणणे आवश्यक ठरते.

मातोश्री मावशी केळकरांच्या जीवनाचे निरीक्षण केले तर, अतिशयोक्तीचा दोष लावला जाण्याची शक्यता लक्षात येऊनहि म्हणावेसे वाटते की ' शक्तिशाली स्त्री-जीवन ' त्या प्रत्यक्ष जगत आहेत. भारताच्या पडत्या काळात ' अबला ' हे स्त्रीसमाजाला बहाल केले गेलेले दुर्बलत्व निदर्शक विशेषण पुसून टाकण्याठीच की काय ' स्त्री-शक्तीचा ' त्यांना साक्षात्कार होऊन स्त्री-जीवनाचे शास्त्र कोणते हे जाणण्याची त्यांना प्रेरणा झाली. आणि

या प्रेरणेचे प्रत्यक्ष–प्रमाण म्हणजे १९३६ साली राष्ट्र-सेविका-समिती या अखिल भारतीय स्त्री-संघटनेचे त्यांनी केलेले बीजारोपण होय.

जीवनशास्त्राचे मावशींना वाटत असलेले महत्व त्यांच्याच एका लेखात स्पष्टपणे दिसून येते. ‘ राष्ट्रसेविके’ तील आपल्या लेखात त्या म्हणतात :

‘आज आपल्या राष्ट्रात सर्व शास्त्रे प्रगति-पथावर आहेत पण जीवनशास्त्राकडे आमचे लक्ष जात नाही. समितीला हे जीवनाचेच शास्त्र शिकावयाचे असल्याने आज २५ वर्षे सातत्याने हे काम चालू आहे. ह्या कार्याची राष्ट्राला सदैव गरज आहे. ईश्वराजवळ नम्र प्रार्थना आहे की त्याने आम्हा सेविकांना हे करावयास लागणारे सामर्थ्य द्यावे ’.

## जन्म : बालपण

६ जुलै इ. स. १९०५ रोजी, आषाढ शुद्ध दशमीला, मावशींचा ज्या कुटुंबात जन्म झाला ते दाते कुटुंब मूळचे सातारा जिल्ह्यातील बावधनचे. तथापि त्यांचे आजोबा रामचंद्रपंत दाते, छत्रपति शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास ज्याच्या शिवारात घडला, त्या महाबळेश्वर मुक्कामी वैद्यक व्यवसायास्तव स्थायिक झाले होते. दाते कुटुंबाची परंपरा आपल्या नावास साजेशीच होती. मावशींच्या आजी सौ. सीताबाई, पूर्वाश्रमीच्या गाडगीळ घराण्याच्या. वैद्यकशास्त्रातील कुशलतेमुळे अन् सेवाभावाची परिपाठी चालत आलेली असल्याने डॉ. रामचद्रपंत दाते यांचा त्या परिसरात त्या काळी चांगलाच नांवलौकीक होता. सन १९४७ पर्यंत दाते कुटुंबाचे घर व बागजमीन बावधन येथे होती. डॉ. दाते यांना ३ अपत्ये होती. बळवंत आणि भास्कर हे दोन पुत्र आणि अंबुताई नामक कन्या. पैकी कनिष्ठ चिरंजीव भास्करराव दाते यांच्या ‘ मावशी ’ ज्येष्ठ कन्या होत. भास्कररावांचे कुटुंब म्हणजे मावशींच्या आई यशोदाबाई या मिरजच्या गोखले घराण्यातील. मावशींचे मातामह बळवंत गोपाळ उर्फ नानासाहेब गोखले हे नोकरीनिमित्त वऱ्हाडात आले.

नानासाहेब गोखले नागपूर स्थित अकाऊंटंट जनरलच्या कार्यालयात अधिकारी होते. हिशोब खात्याला आवश्यक अशी टापटीप, चोखपणा, कुशाग्रबुद्धि आणि असंदिग्धता त्यांच्या स्वभावात भरपूर प्रमाणात होती. त्यांच्या स्वभाव–वैशिष्ट्याचा एक पैलू असा होता की वयाच्या सत्तरीनंतरही आपल्या बालपणी प्राथमिक शाळेत वापरलेली लेखन–पाटी आणि भुजळगीचे पुस्तक नानांनी नीट जपून ठेवले होते. त्यांच्या बोलण्यात, चालण्यात आणि सर्वच वागण्यात एक आगळीच खुमारी होती. भोजन प्रसंगी पत्नीने जर त्यांना विचारले, “ भाजी कशी काय झाली आहे ?”– आणि समजा त्यावेळी ती खरोखरच पाहिजे तशी चांगली शिजवली गेली नसेल तर – उत्तरादाखल नाना लगोलग बोलून जातील – “वा! इतकी चविष्ट झाली आहे की पहिली वाढ संपविण्याची इच्छाच होत नाही. ”

नानांच्या मार्मिकतेबद्दल बऱ्याच आठवणी आहेत. त्यांच्या पत्नी सरस्वतिबाई गोखले-मावशींच्या मातृवंशीय आजी - करारी होत्या. रामायण, महाभारतातील कथा ती आम्हा पतवंडांना सांगे. तिला आम्ही 'मोठी आई' म्हणून संबोधित असू.

मावशींचे पितृवंशीय आजोबा जरी महाबळेश्वरला असत, तरी त्यांचे वडील भास्करराव उर्फ अण्णासाहेब दाते नोकरीनिमित्त नागपुरास आले. योगायोग असा की ज्या अकौंटंट जनरलच्या कार्यालयात नाना (मातृवंशीय आजोबा) होते तेथेच अण्णा कामावर रूजू झाले. एकाच कार्यालयात असल्याने अण्णांची जावई म्हणून नानांनी निवड केली. नानांची ही कन्या, म्हणजेच मावशींची माता, यशोदाबाई दाते होत. यांना आम्ही 'आई' या नावाने संबोधित असू. आणि ओघानेच आले म्हणून सांगावयाचे म्हणजे आम्ही - त्यांची मुले-मावशींना 'वहिनी' या नांवाने संबोधतो.

भास्करराव व यशोदाबाई दाते हे कुटुंब प्रथम नागपूरच्या भोसलेकालीन 'महाल' नामक विभागातील राममंदिराच्या बोळात, बापटांच्या वाड्यात राहत असे. कालांतराने ते बर्डीवरील श्रीमंत गोपाळराव बुटी यांच्या 'बुटीमहाल' नामक वास्तूच्या परिसरात राहू लागले. आरंभी भास्करराव दाते यांच्या कुटुंबात मुलांव्यतिरिक्त त्यांची आई, थोरली बहीण आणि भावजय या तीन विधवा स्त्रिया होत्या. पैकी बहीण आणि भावजय यातर बाल-विधवा होत्या. त्याकाळी घरोघर बालविधवा दिसत. अण्णांची आई आणि बहीण या लवकरच निधन पावल्या. तथापि त्यांची भावजय, म्हणजेच मावशींची काकू, लक्ष्मीबाई उर्फ 'दाई' दाते या सन १९६१ पर्यंत हयात होत्या. मावशींचे बालमन सुसंस्कारित होण्यात माता-पित्या व्यतिरिक्त दाईचा मोठा वाटा आहे, हे नमूद करण्यासारखे आहे.

मावशी आई-अण्णांचे दुसरे अपत्य. वडील भाऊ महादेव उर्फ दादा गुजराथेत सुरत येथे नगरपरिषदेच्या अग्निशामक विभागात होते. ते अकाली देवरूप झाले. त्यामुळे दाते भावंडांत 'अक्का' म्हणजेच मावशी वडील राहिल्या. मावशींच्या पाठीवर आणखी पांच भाऊ व दोन बहिणी. नीळकंठराव उर्फ तात्या हे नागपुरातच असत. म. गांधींच्या असह-काराच्या आव्हानाने प्रेरित होऊन यांनी मधूनच शिक्षणाचा निरोप घेतला. वडील सरकारी नोकर असतानाही त्यांनी प्रथम टिळकांच्या राष्ट्रीय शिक्षण चळवळीत आणि नंतर बॅ. मोरू-भाऊ अभ्यंकर आणि डॉ. ना. भा. खरे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसच्या चळवळीत भाग घेतला. प्रथम मुळशीपेठा धरणाबाबत सेनापती बापट यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कॉंग्रेस-प्रणीत सत्याग्रहात भाग घेऊन त्यांनी १९२२ साली, वयाच्या १५ व्या वर्षी, कारावास पत्करला. अण्णांना पुत्राच्या या उपक्रमांमुळे बराच त्रास झाला. तथापि अण्णा व आई ही दोघेहि आपल्या देशविषयक कर्तव्याबद्दल जागरूक असल्याने त्यांनी हा त्रास सहजपणे सोसला. मावशींच्या बालमनावर या घटनांचा यथायोग्य परिणाम झाला. नीळकंठराव नुकतेच म्हणजे १९७० साली निवर्तले. त्यांच्यानंतर पाठीवर एक बहीण यमुनाबाई सहस्त्रबुद्धे यांचा अकाली मृत्यु झाला. मागोमाग दोन भाऊ. पुरुषोत्तम उर्फ बंडू आणि वामन.

संसारिक जबाबदाऱ्या लक्षात घेता बंडूनेहि वडील भावाचे अनुकरण करून देशसेवेचे व्रत घेऊ नये या विचाराने अण्णांनी बंडूला नोकरीस्तव बिहारात जमशेटपूर येथे पाठविले. टाटांच्या कारखान्यातून तो सेवानिवृत्त होऊन तेथेच स्थायिक झाला आहे. नंतरचा भाऊ डॉ. वामन दाते. दाते कुटुंबात शालेय शिक्षणानंतर विश्वविद्यालयीन शिक्षण देण्याचा आरंभ याच्यापासून झाला. नागपूर विद्यापीठातील कृषिशास्त्राची पदवी त्याने प्रथम श्रेणीत प्रथम येऊन मिळविली. पुढे उच्च शिक्षणासाठी तो अमेरिकेत गेला. सध्या तो उत्तरप्रदेश सरकारच्या कृषि विभागात मोठ्या पदावर आहे.

यानंतर आणखी एक भगिनी–मैनावती उर्फ सौ. मनोरमाबाई गोखले, इंदूरच्या प्रसिद्ध गोखले घराण्यातील अॅडव्होकेट विश्वनाथ रामचंद्र गोखले यांच्या पत्नी. मावशींनी १९३६ साली राष्ट्र–सेविका–समितीच्या कार्यास प्रारंभ केल्यापासून १९४० साली विवाह होऊन नागपुराहून इंदूरला स्थानांतर केल्यानंतर आजतागायत त्या मावशींच्या कार्यात सक्रिय रीत्या आहेत. यांचे विश्वविद्यालयीन शिक्षण झाले असून आपल्या भगिनीप्रमाणेच संघटना–कौशल्य आणि वक्तृत्व या गुणांची त्यांनी जोपासना केलेली आहे.

यानंतर आणखी दोन भाऊ, अनुक्रमे मधुकर व प्रभाकर. पैकी सर्वात धाकटा प्रभाकर हा तीक्ष्ण बुद्धीचा असून एकपाठी होता. तथापि, दुर्दैवाने वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी त्याचे देहावसान झाले. मधुकर इंजिनिअर असून जमशेटपूर येथे टाटांच्या कारखान्यात आहे.

भास्करराव दाते सरकारी अधिकारी होते. तथापि महाराष्ट्रातील इतर अनेक कुटुंबांप्रमाणे दाते कुटुंबही लोकमान्य टिळकांच्या प्रभावाने भारले गेलेले होते. लोकमान्यांचा 'केसरी' वाचणे म्हणजे राजद्रोह हे त्याकाळचे समीकरण होते, हे सर्वश्रुत आहे. तथापि अनेकांप्रमाणेच भास्कररावही आपल्या पत्नीच्या नावावर नियमितपणे केसरी मागवीत. मावशींच्या आईंनी आळीतील स्त्रियांच्या सहकार्याने एक 'समाज' स्थापन केला होता. येथेच सर्व स्त्रिया दुपारी एकत्र जमत. लोकमान्यांचा फोटो देव्हाऱ्यात ठेवून त्यासमोर केसरीचे वाचन होई. त्याकाळी साक्षरता कमी असलेल्या स्त्री वर्गात लोकमान्यांचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने ही योजना किती समर्पक होती बरे! या कार्यात यशोदाबाई दाते यांचे सोबत उमाबाई परांजपे, उमाबाई पाठक, आणि लक्ष्मीबाई परांजपे ह्या अग्रेसर असत. लक्ष्मीबाई परांजपे तर टिळकांचे आख्यान घेऊन कीर्तनही करीत. लहानगी कमल दाते (मावशींचे माहेरचे नांव) मधून मधून या कार्यक्रमाचे ठिकाणी जाई तेव्हा टिळकांच्या गोष्टी तिच्या कानावर पडत. त्या ऐकण्यात ती रममाण होई.

इतर सर्व–साधारण जनांप्रमाणे भास्करराव दाते केवळ ऑफीस आणि घर या ठरीव चाकोरीत चालणारे नव्हते. समाजातील लोकांच्या अडीअडचणीस धावून जाणे, तसेच ते कुशल हिशेब–तपासनीस असल्यामुळे, सामाजिक संस्थांना हिशेब–विषयक कार्यात सक्रिय

सहकार्य देणे असे त्यांचे कार्यक्रम चालत. त्याकाळी प्लेगसारख्या साथीच्या रोगामुळे कधी-कधी आजूबाजूच्या वेटाळात दिवसाकाठी ३/४ किंवा त्याहीपेक्षा जास्त मृत्यू होत. अशा वेळी अण्णा सुटी काढून मदतीला धावून जात. एखादे वेळी पहिले मृतकर्म आटोपून आंघोळ उरकत नाही तोच दुसऱ्या घरचा निरोप यावा आणि अण्णांनी अन्नाचा घास दूर सारून तसेच्या तसेच दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी बाहेर पडावे, असे घडे. कांही लोक तर विनोदाने म्हणत, "अण्णांना दुसऱ्यांना पोहोचविण्याची हौसच आहे."

नाटकात, विशेषतः ऐतिहासिक वा राजकीय पार्श्वभूमि असलेल्या नाटकात भूमिका करणे हा अण्णांचा आवडता छंद होता. कै. कृ. प्र. खाडीलकर आणि देवल हे अण्णांचे आवडते नाटककार होते. अण्णा आणि त्यांचे एक मावस बंधू कृष्णाजीपंत गाडगीळ यांनी मित्रमंडळींच्या सहकार्याने 'महाल ॲमॅच्यूर क्लब' नांवाची नाट्यसंस्थाहि चालविली होती.

बालवयातच वैधव्याच्या कुठाराघात झालेल्या आपल्या भावजयीला–लक्ष्मीबाई (दाई) दाते यांना–अण्णांनी सूतिकाशास्त्राचे प्रशिक्षण देवविले. लहानपणीच संकटांना तोंड देण्याचे नशीबी आल्याने दाईच्या स्वभावात धीटपणा, धडाडी व कामसूवृत्ति या गुणांचा प्रादुर्भाव झाला होता. मिळालेल्या प्रशिक्षणाच्या आधारे तिला एखाद्या सरकारी रुग्णालयात त्यावेळी सहज नोकरी मिळू शकली असती. परन्तु धोपटमार्ग न स्वीकारता दाईने खाजगी-रीत्या आपला सेवा–व्यवसाय आरंभिला. सूतिकाशास्त्रातील कुशलतेप्रमाणेच तिच्या जवळील 'आजीबाईचा बटवा' विशेष गुणकारी होता. आबालवृद्धांपैकी जो कोणी विश्वा-साने तिच्याकडे जाई त्याचेसाठी विनामूल्य तो उघडला जाई. प्रस्तुत लेखकानेही तिच्या बटव्याचा अनेकदा फायदा घेतला आहे. फक्त प्रसूतिकामाचा मात्र ती आवश्यकतेपुरताच मोबदला घेई. अशाप्रकारे संसाराचा सारीपाट अचानक उधळून गेल्यामुळे मुळूमुळू आसवे ढाळीत न बसता समस्त समाज हाच संसार समजून, प्राप्त परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणे यातच स्त्रीजीवनाचे स्वारस्य आहे याचे दाईने आपल्या आचरणाद्वारे उत्तम दर्शन घडविले. भावी काळात कमलवर अशाच प्रकारचे संकट येऊन कोसळताच तिने ज्या धीरोदात्त प्रकारे परिस्थितीला तोंड दिले आणि एक प्रकारे अधिक श्रेयस्कर अशा वेगळ्याच संसारात पदा-र्पण केले तेव्हा दाईच्या उदाहरणाचा आधार तिला मिळालाच असेल!

कमलच्या–मावशींच्या–जन्माचे वेळी प्रसूति करण्याची जबाबदारी दाईनेच उचलली होती. आवरणात्मक पिशवीसकटच मावशींचा जन्म झाला हे काहींच्या मते 'सुलक्षण' असल्याने त्यांचे नांव 'कमल' ठेवण्यात आले.

अण्णा, आई आणि दाई या वडीलधाऱ्या त्रयीच्या देखरेखीखाली कमल लहानाची मोठी होऊं लागली. परन्तु वयाची ५ वर्षे पूर्ण होत नाहीत तोच तिला देवीच्या आजाराने

ग्रासले. सर्व शरीरभर देवी उमटल्या. कमल हातची जाते असे काही काल वाटले. पण विधिलिखित वेगळे होते. विधात्याला कमलकडून बरेच कार्य करून घ्यावयाचे होते. हिंदु महासभेचे पुढारी डॉ. ल. वा. परांजपे त्यावेळी दाते कुटुंबाच्या शेजारी राहत. त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून कमलला मृत्यूच्या जबड्याबाहेर काढले. ती पूर्णतः बरी झाली. या घटनेतही असामान्यत्व आढळण्याचे कारण हे की ज्याप्रमाणे खऱ्या सुवर्णास लाल प्रखर भट्टीतून काढताच ते अधिक तेजोमय होते, त्या प्रमाणेच मावशींचेही बाबतीत घडले. वस्तुतः देवीचा आजार म्हणजे कुरूपतेला निमंत्रण, असे समीकरण आहे. परन्तु मावशींचे बाबतीत ते चूक ठरले. देवीच्या आजारातून त्या बऱ्या झाल्या एवढेच नव्हे तर त्यानंतर त्यांचे सौंदर्य उजळून निघाले.

• • •

## राजे पंचम जॉर्ज ह्यांची नागपूर भेट :

अण्णा, आई अन् दाई या वडीलधाऱ्या त्रयीच्या प्रेमछत्राखाली कमलची प्रगती होत असता १९११ च्या जुलै महिन्यात महाल विभागात वॉकर रोडवर असलेल्या शासकीय प्राथमिक शाळेत शिक्षणाचा श्रीगणेश होऊन ६ महिने पूर्ण होत नाहीत तोच तिच्या जीवनात बाह्यांगी अनिष्ट भासणारा परन्तु वस्तुतः इष्ट परिणामकारी असा जो प्रसंग घडला तो असा :

त्यावर्षी डिसेंबर महिन्यात नुकतेच ब्रिटनच्या राजसिंहासनावर अधिष्ठित झालेले 'भारताचे सम्राट' ह्या उपाधीने मिरविणारे राजे पंचम जॉर्ज ह्यांची भारत-भेट निश्चित झाली. ठरल्याप्रमाणे त्या महिन्याच्या दिनांक ११ ला दिल्लीत ब्रिटिश सम्राटाने मोठा दरबार भरविला. समारंभाला अनेक एतद्देशीय राजे-रजवाडे आणि श्रीमंत मानकरी जातीने उपस्थित झाले एवढेच नव्हे तर परकीय नृपतीचे ते दासानुदास त्याचे समोर निःसंकोचपणे नतमस्तकही झाले. त्यावेळी भारतीय जीवनात प्रविष्ट झालेला दास्यवृत्तीचा ज्वर पराकोटीला पोहोचला होता हेच खरे !

दिल्ली दरबार आटोपल्यानंतर पंचम जॉर्ज कलकत्ता भेटीस गेले. तेथील मुक्कामानंतर त्यांची स्वारी खास गाडीने नागपूर मार्गे मुंबईस प्रस्थान करणार होती. ही संधी वाया दवडू नये या भावनेने नागपूरस्थ प्रतिष्ठितांनी सम्राटांना शहरवासीयांच्या स्वागताचा स्वीकार करण्यासाठी जाता जाता काही काल नागपुरास थांबण्याची अर्जी सादर केली होती. एकनिष्ठ प्रजेचे प्रणाम स्वीकारण्याच्या प्रमुख हेतूनेच भारतभूवर पदन्यास केलेल्या राज्यकर्त्याकडून नकार मिळण्यासारखे काहीच नव्हते. एकेकाळी भोसल्यांच्या शस्त्र-पराक्रमाने प्रसिद्धी पावलेल्या नागपूर नगरीस सम्राटांनी धूळभेट देण्याचा कार्यक्रम निश्चित झाला. काहीशा गडबडीनेच कार्यक्रमाची रूपरेखा आखावी लागली. रेल्वेस्थानकासमोर क्षणांच्याच अंतरावर असलेल्या ऐतिहासिक सीताबर्डी किल्ल्याच्या पायथ्याशी स्वागत समारंभाचे आयोजन झाले. कदाचित् बाल विद्यार्थ्यांकडूनही विरोध होईल या रास्त भीतीने अगदी आरंभीच्या शिश-

वर्गातील अन् तेही विद्यार्थिनींकडून सम्राटाच्या स्तुतिपाठाचे गायन उरकविण्याचा कार्यक्रम त्यांच्या पालकांना पत्ता लागू न देता ठरविण्यात आला. वडील सरकारी अधिकारी आहेत, शिशुवय आहे, दिसायला चुणचुणीत आहे, अन् आवाजही गोड आहे हे मुद्दे लक्षात घेऊन पंचम जॉर्जच्या स्तुतिपर गीत गाणाऱ्या पथकात वर सांगितल्याप्रमाणे 'कमल दाते' ची निवड झाली, अन् त्या प्रसंगी अगदी अजाणतेपणी शिशु अवस्थेतील मावशींच्या तोंडून खालील गीत गायले गेले—

भो पंचम जॉर्ज, एडवर्ड भूप धन्य,
विबुध मान्य सार्वभौम भूवरा
नय धुरंधरा बहुत काल तूचि पाल
ही वसुंधरा ····

दिनांक १ जानेवारी १९१२ रोजी झालेल्या त्या प्रसंगावेळीचा झगझगाट आणि मन-सोक्त मिठाईचे पुडे यांचा त्या शिशु-मनावर मौज-भावने व्यतिरिक्त कोणता परिणाम होणार? परन्तु काही दिवसांनी या प्रसंगासंबंधी बोलताना घरातील वडीलधारी माणसे आणि शाळेतील शिक्षक जेव्हा 'तो आपला राजा नव्हे, परकीय आहे, त्याच्या स्वागत समारंभावर बहिष्कार घालणेच इष्ट ठरले असते' असे विचार बोलू लागले तेव्हा काही तरी चूक झाली असे लहानग्या कमलला वाटू लागले आणि हा अनिष्ट प्रसंग 'दडलेले वरदान' ठरला. परकीय सत्तेसंबंधी कमलच्या मनात लहान वयातच तिरस्काराचा बीजांकुर फुटला.

प्राथमिक ३ वर्गाचे शिक्षण कमलने ह्याच सरकारी शाळेत पूर्ण केले. येथे श्रीमती अंबूताई मुळे या मुख्याध्यापिका आणि श्रीमती भागीरथीबाई धाराशिवकर ह्या शिक्षिका होत्या. या दोघीही इतक्या आपलेपणाने व मन लावून शिकवीत, की त्यांची स्मृती साठ वर्षांच्या कालावधिनंतरही ताजी आहे असे मावशी सांगतात.

मावशींच्या शालेय मैत्रिणीत हरणी देशपांडे (कै. लक्ष्मीबाई तथा ताई करोडे, वर्धा) गोदू नाफडे (कै. पाध्ये, नागपूर) श्यामा जोगळेकर (श्रीमती माई विंझे, भोपाळ) या प्रमुख होत्या. पैकी पहिल्या कै. ताई करोडे मावशींप्रमाणेच विवाहानंतर वर्धेस स्थायिक झाल्याने त्यांचा अन् मावशींचा दृढ स्नेहसंबंध, ताई १९७३ मधे देवरूप होईपर्यंत, घनिष्ट राहिला. यामुळे आम्हा मावशींच्या मुलांना त्या कोणी परक्या आहेत असे कधीच वाटले नाही. सख्ख्या मावशीसदृश ममता आम्हास त्यांच्याकडून मिळाली. आपल्या मैत्रिणीलाही मावशींनी समिति-कार्यात गुंतविले होते. वैशिष्ट्य हे की इतर वेळी 'कमल' या एकेरी नावाने संबोधून वारंवार हास्याचे फवारे उडविणाऱ्या अन् दणकट नागपुरी भाषेत त्यांच्याशी बोलणाऱ्या ताई करोडे समिति-स्थानावर मात्र पूर्ण बदलून जात. समितीच्या शिस्तीनुसार अधिकारी-सेविका हे नाते समिति स्थानावर त्या इतके चोखपणे बजावीत की त्या उभयतांच्या घनिष्ट वैयक्तिक संबंधाचा कुणाला पत्ताहि लागू नये. या प्रकाराचे श्रेय कुणाला? ताईंना की मावशींना? दोघींनाही हेच खरे! इतर मैत्रिणीत (उल्लेखित) फक्त श्रीमती माई विंझे

विद्यमान असून या वयातहि त्या आपल्या शक्तिअनुसार समिति – कार्यात सहभागी होत असतात.

इ. स. १९१४ च्या सत्रारंभी कमलने पहिली शाळा सोडून महाल विभागातील ख्रिश्चन मिशनच्या शाळेत ४ थ्या वर्गात प्रवेश घेतला. या शाळेची शिस्त आणि शिक्षणासंबंधी एकंदर दर्जा जरी उच्च प्रतीचा असला तरी काही दिवसांतच कमलची शाळेबद्दलची आपुलकी कमी होऊ लागली. कारण आता कमल मोठी झाली होती. घरी राम-कृष्ण आदि देवादिकांच्या गोष्टींचे संस्कार होत होते. शाळेत मात्र रोज येशू ख्रिस्ताचे स्तवन करावे लागे. परन्तु बालवयापासूनच भारतीयांच्या मनात आपला धर्म बिंबविण्याचा राज्यकर्त्यांचा कुटिल हेतू पुन्हा एकदा वरदान ठरला. कारण या प्रसंगामुळे स्वकीय–परकीय हा भेद तिच्या नीट लक्षात येऊ लागला. आता ती मैत्रिणीत येशू–स्तवनाबद्दल आपली नापसंती व्यक्त करू लागली. अशा प्रकारे स्वकीय, स्वराज्य ही भावना अंकुरत असतानाच तिची मुळे वाढीस लागण्यास कारणीभूत ठरणारा एक प्रसंग घडला. येशू–प्रार्थना डोळे मिटून म्हणावयाची असा शाळेचा नियम होता. परंतु कमलच्या दृष्टीने त्यात काही तथ्य राहिले नसल्यामुळे ती डोळे उघडे ठेवून फक्त तोंडाची हालचाल करी. शिक्षिकेच्या हे लक्षात येताच तिने कमलला छडीचा प्रसाद दिला व असाच क्रम चालू राहिल्यास शाळेतून काढून टाकण्याची ताकीदही दिली. हा प्रसंग तिला फारच अपमानास्पद वाटला. शाळा सोडण्याचा विचार तिच्या मनात घर करू लागला. परन्तु त्या काळी मुलींसाठी स्वतंत्र अशा खाजगी शाळा नसत, ही अडचण होती. दैवयोगाने ही अडचण दूर झाली. जणू काही देवच कमलच्या मदतीस धावून गेला.

१९१४ सालचे शालेय सत्र आरंभ झाल्यानंतर १।२ महिन्यातच आता नावारूपास आलेल्या ‘ दादीबाई देशमुख हिंदु मुलींची शाळा ’ या संस्थेची स्थापना झाली. नागपूरच्या दैनिक महाराष्ट्राचे संस्थापक आणि आद्य संपादक कै. गोपाळराव ओगले ह्यांनी पुढाकार घेऊन या शाळेची स्थापना केली. या शाळेत प्रवेश घेण्याचे हेतूने कमलने अर्ध्यातच मिशनच्या शाळेचा निरोप घेतला.

महाल विभागातील रुक्मिणी मंदिरासमोरच्या डॉ. गद्रे यांच्या घरात शाळेचे वर्ग सुरू झाले. स्वतः गोपाळराव ओगले वेळ काढून येथे शिकविण्यास येत त्यांचेशिवाय नारायणराव पंढरपूरकर आणि भुस्कुटे हे आणखी दोन शिक्षक होते. नंतर काही कालाने श्रीमती सुंदराबाई साने या शिक्षिका म्हणून तेथे अत्यल्प वेतनावर कार्य करू लागल्या. ‘ श्रीमती सुंदराबाई साने यांनी हिंदु मुलींच्या शाळेची प्रगति आणि विकास यासाठी ज्या प्रकारे अविश्रांत आणि तळमळीने कार्य केले ते मला नेहमीच प्रेरक राहिले ’ असे मावशी सांगतात.

हिंदु मुलींच्या शाळेत मावशींचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले खरे, पण त्यानंतर मात्र त्या कोणत्याही शाळेत गेल्या नाहीत. लिहिता वाचता येण्यापुरतेच मुलींनी शिक्षण घ्यावे

अशी त्या काळी प्रथा होती. बारा-तेरा वर्षांच्या सुमारासच त्यांच्या गृहस्थाश्रमास आरंभ होई. जर काही कारणास्तव यापेक्षा उशीर झाला तर अजून मुलीचे लग्न का झाले नाही असा प्रश्न विचारला जाई. म्हणूनच प्राथमिक शिक्षणासोबतच कमलच्या शिक्षणास पूर्ण-विराम मिळाला.

अल्प शिक्षण ही बाब सर्वसामान्यांसाठी अडचण ठरते, परन्तु मावशींना मात्र तिचा विशेष त्रास कधीच झाला नाही. अंगिकारलेल्या कार्याबद्दल कळकळ व त्यासाठीं अवि-श्रांत श्रम करण्याची ज्याची तयारी असते त्याच्या प्रगतीच्या मार्गात कोणतीच गोष्ट आडवी येऊ शकत नाही !

मावशींचे संघटनाकौशल्य, निपुण नेतृत्व आणि विशेषतः रसाळ, ओजस्वी वक्तृत्वाने प्रभावित झालेल्या एका नवपरिचित सुविद्य भगिनीस, त्या स्नातक नसून फक्त प्राथमिक शिक्षणापुरतीच शाळेची पायरी चढल्या आहेत ही गोष्ट काही केल्या विश्वासार्ह वाटेना. त्यांना कसे पटवावे हे मावशींच्याहि लक्षात येईना. शेवटी, काही विचारानंतर त्या ह्या भगि-नीस म्हणाल्या, "ज्याअर्थी पूर्वी किंवा सध्या मी एखाद्या मुलींच्या विद्यालयाची मुख्या-ध्यापिका, प्राध्यापिका किंवा शाळा निरीक्षिका नव्हते वा नाही त्याअर्थी या पदासाठी आव-श्यक अशी शैक्षणिक पात्रता मजपाशी नाही हे तर आपणास पटू शकेल ?"

ह्या प्रश्नाने बाई पुन्हा कोड्यात पडल्या. तेव्हा स्पष्टीकरणादाखल मावशी त्यांना म्हणाल्या, " मला असे वाटते की, आपल्या विचाराप्रमाणे शब्दशः अर्थानुसार जर मी सुशिक्षित असते तर संसाराशिवायही आणखी काही करावयाचे ह्या इच्छेपोटी कदाचित सर्वसामान्य कृतीप्रमाणे एखाद्या नोकरीच्या जाळ्यात अडकण्यास प्रवृत्त झाले असते अन् वाढत वाढत त्या संस्थेचे प्रमुख पदही मिळविले असते. परन्तु अल्पशिक्षणामुळे ती रूढ चाकोरी बंद झाली होती, हे एका अर्थी बरेच झाले. कारण तसे घडते तर ज्या भव्य स्वरू-पाची समाजसेवा माझ्याकडून होते आहे ती न होती. नियतीचीच तशी इच्छा असल्याने उच्च शिक्षणाच्या दालनापासून दूर राहणे नशींबी आले असावे असे मी मानते. केवळ माझ्यापुरताच असा विचार मनात येतो. दोष कालपरिस्थितीचा आहे, उच्च शिक्षणाचा नाही. म्हणूनच भगिनींनी हे लक्षात घेतले पाहिजे की उच्च विचार आणि उदात्त आकांक्षा ह्यांच्या साधनेआड शैक्षणिक दर्जा येत नाही हे जर खरे आहे तर खरोखरच ज्यांना उच्च शिक्षणाची सुसंधी प्राप्त झाली आहे त्यांच्यासाठी ठरीवपेक्षा किती तरी विशाल असे कार्यक्षेत्र खुले आहे." आता मात्र मावशींचे म्हणणे त्यांना पटले. एवढेच नव्हे तर आपल्या ज्ञानात थोडी भर पडल्याचाही त्यांना प्रत्यय आला.

१९१५ साली शिक्षण संपल्यानंतर कमलचा विवाह करण्याचे दृष्टीने वर-संशोधन सुरू झाले पण गोत्र, पत्रिका आणि विशेषतः हुंडा ह्या गोष्टी आड येत गेल्यामुळे उद्देश-सिद्धी लवकर झाली नाही.

आता कमलला प्रामुख्याने घरकाम आणि फावल्या वेळात मनसोक्त खेळणे हे दोनच उद्योग राहिले होते. कमलच्या बरोबरीचे असे दोन्ही भाऊच असल्यामुळे ते आणि त्यांचे मित्र हेच तिचे खेळगडी राहिले. पर्यायाने प्रामुख्याने मुलांचे खेळ खेळण्याचाच प्रसंग अधिक आला. मुलांच्या खेळात धावणे, उड्या मारणे, प्रसंगी मारामारी करणे, असले प्रकार जास्त. म्हणूनच त्यात पडणे किंवा शरीराला इजा होणे असले प्रसंग वारंवार घडतात. पण त्यामुळेच धैर्य, चपळाई, चिवटपणा, सहनशक्ति, आदि गुण मुलांत अधिक प्रमाणात दिसून येतात. मावशींमधील ह्या गुणांच्या प्रादुर्भावाची पूर्वपीठिका ही असावी असे वाटते.

कित्येक माता लागेल ह्या भीतीने आपल्या मुलांना इतर मुलात खेळण्यापासून परावृत्त करीत असतात असा अनुभव आहे. पण मावशींनी आम्हा मुलांना ह्या बाबतीत कधीच परावृत्त केले नाही. मारामाऱ्या, पडणे वा लागणे हे प्रकार तर नित्यच होत असत. पण केवळ यास्तवच त्यांनी आम्हास खेळण्यास कधीच मज्जाव केला नाही. ‘ पडे धडे माल बढे ’ हे स्वानुभवावरून पटलेले सत्यच या मागे असावे.

## घर : एक प्राथमिक जबाबदारी

एक वेळ खेळात प्राविण्य न मिळविले तरी मुलींना चालण्यासारखे असते, परन्तु घरकाम आणि स्वयंपाक या बाबतीत मात्र तसे नाही. चूल आणि मूल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र आहे, हे अत्यंत अतिरेकी विधान सोडून दिले तरीही स्वयंपाक आणि घर-व्यवस्था या बाबतीत स्त्रीची विशिष्ट प्रकारची महत्वाची जबाबदारी असते हे कोणी नाकबूल करेल असे वाटत नाही. वरील बाबतीत उत्तम अनुभवी स्त्रीच घर-गडी किंवा स्वयंपाकी यांचेकडून उत्तम दर्जाचे काम करवून घेऊ शकते.

लेखक स्वतः मावशींचा मुलगा असल्यामुळे ‘ स्वयंपाक आणि गृहव्यवस्था ’ या बाबतीत त्यांची निपुणता उत्तम प्रकारे जाणतो. या दोहोत प्राविण्य मिळवून आपला संसार यशस्वी करण्याच्या प्रमुख उद्देशास मोठा हातभार लावावयाचा असेल तर त्या कामा-संबंधी आवड, अंगमेहनत करण्याची वृत्ती, स्वच्छता आणि टापटीप, समयसूचकता आणि चपळता तसेच नवीन शिकण्याची इच्छा इतके गुण आवश्यक आहेत, ह्याचा मावशींच्या उदाहरणावरून आम्हास प्रत्यय आला आहे. अत्यंत थोडक्या वेळात, कोणत्याही प्रकारचा अव्यवस्थितपणा घडू न देता, उत्तम स्वयंपाक करता येणे ही त्यांची विशेषता आहे यात शंकाच नाही. आमच्या विद्यार्थीदशा कालात म्हणजे सुमारे २५–३० वर्षापूर्वी संध्या-काळचा स्वयंपाक मावशीच करीत. परन्तु सायंकाळी ६ ते ७ हा त्यांचा वेळ समिती-स्थाना-वरच जाई. त्यामुळे घरी परत आल्यानंतर सर्व काम लवकर उरकणे आवश्यक होई. हे काम त्या इतक्या थोड्या वेळात आणि कोणत्याही प्रकारची हेळसांड न होऊ देता करीत की संघस्थानी खेळण्याने दमून आल्यानंतर आम्हा मुलांना जेवणासाठी कधीच तिष्ठत बसावे लागल्याचे स्मरत नाही.

घरातील स्वच्छता आणि टापटीप या बाबतीतही त्यांचे नियम विशेष कडक आहेत. त्यामुळे अजूनही आम्हा कुटुंबियांची, त्या आपल्या घरी येणार आहेत हे वृत्त कळताच, तशीच परिस्थिति होते की जशी जुन्या-काळच्या शाळा मास्तरची इन्सपेक्टर साहेब शाळेला भेट देणार असल्याचे वृत्त कळताच होई. हे सांगण्याचे कारण एवढेच की राष्ट्र सेविका समिति सारख्या एका मोठ्या संघटनेच्या व्यापात सदैव गुंतलेल्या असताही या महत्त्वाच्या बाबी त्यांच्याकडून यत्किंचितही दुर्लक्षिल्या गेल्या नाहीत.

इतर सर्व अपेक्षांची पूर्तता होत असता फक्त हुंड्याची अट आड येऊन लग्न लांबणीवर पडत आहे याचा कमलच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. शिवाय त्याच सुमारास बंगालमधील ' स्नेहलता प्रकरणास ' बरीच प्रसिद्धी मिळाली. ठरलेले लग्न हुंड्याच्या कारणावरून मोडले म्हणून स्नेहलता नामक स्वाभिमानि बंगाली युवतीने स्वतःला जाळून घेतले. कमलला लहानपणापासून वृत्तपत्र वाचण्याची गोडी असल्याने या प्रकरणासंबंधी विस्तृत वृत्तपत्रीय चर्चा तिच्या वाचनात आली. आणि हुंडा पद्धतीबाबत विरोधाची भावना निर्माण होण्यास ही कारणे घडली.

## ' लोकमान्य ' पुरस्कृत कार्यक्रम

दोन वर्षांच्या काळात कमलच्या जीवनात महत्त्वाचा असा कोणताही बदल झाला नाही. मात्र १९१७ साली प्लेगच्या प्रादुर्भावामुळे दाते कुटुंब गजबजलेला महाल विभाग सोडून त्या काळी वस्तीबाहेर असलेल्या, वर्धा मार्गावरील, गोरक्षण संस्थेच्या परिसरात राहावयास आल्याने ज काय परिवर्तन घडले असेल तेवढेच. योगायोग असा की वर्धामार्गावर राहावयास जाणे हे एक प्रकारे कमलच्या जीवन-प्रवाहाची पुढील दिशा कोणती हे दाखविणारे ठरले. असे म्हणण्याचे कारण म्हणजे अर्थातच पुढे थोड्याच कालात तिला वर्धेचेच सासर मिळाले हे सूचित करणे होय.

भास्करराव दाते फावल्या वेळात गोरक्षण संस्थेच्या हिशेब तपासणीची जबाबदारी पार पाडीत असल्याने त्यांचा संस्थेशी संबंध होताच. आता संस्थेच्या परिसरात राहावयास गेल्यामुळे तो अधिकच घनिष्ठ झाला. गोभक्त चौंडे महाराज संस्थेस वारंवार भेटी देत असत. त्यामुळे समस्त दाते कुटुंबास गोसेवेसंबंधी विशेष आत्मीयता वाटू लागली होती. याची आमच्या लहानपणी जी खूण आमच्या निदर्शनास आली व जी सुमारे ३५ ते ४० वर्षांच्या कालावधीनंतरही आज स्मरते ती म्हणजे ' हरणी ' होय. हरणीबद्दल दाते कुटुंबियांत विशेष प्रेम असे. ती एक उत्तम दर्जाची, देखणी अशी पांढरी शुभ्र गाय होती. आप्तांपैकीच एक असल्यागत तिला आपुलकीची वागणूक दिली जाई. अण्णा किंवा दाई जेव्हा दुरूनच तिला बोलावीत तेव्हा ज्या पद्धतीचा प्रतिसादात्मक हुंकार तिच्याकडून मिळे त्यावरून त्या परस्परांतील जिव्हाळ्याचे एक आगळेच दर्शन घडे.

याच सुमारास श्रीसंत चौंडे महाराज ह्यांनी लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली नागपुरास गोरक्षण सम्मेलन आमंत्रित केले होते. ज्यांना जनता 'भगवान' या संबोधनाने आदर करी त्या लोकमान्यांना अगदी जवळून पाहण्याची व त्यांची भाषणे ऐकण्याची सुसंधी या सम्मेलनामुळे कमलला प्राप्त झाली. हा योग म्हणजे तिला पर्वणीच वाटली. ती फारच प्रभावित झाली. यानंतर लोकमान्य पुरस्कृत स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि लोक-जागृति व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीप्रमाणेच इतरही कार्यक्रमाबद्दल तिला विशेष आत्मीयता वाटू लागली.

गोसेवेच्या उद्देशाने घरोघरी भिक्षांदेहि करून धान्यादि वस्तू एकत्रित करण्याचा एक कार्यक्रम चौंडे महाराजांनी आरंभिला होता. त्यानुसार लक्ष्मीबाई (दाई) दाते घरोघरी जात. पूर्वी कमल या कार्यक्रमासंबंधी विशेष उत्सुक नसे. लोकमान्यांनी आपली हार्दिक संमती बोलून दाखविल्यानंतर मात्र या कार्यक्रमाबद्दल कमलला आकर्षण वाटू लागले. आता ती दाई सोबत नित्य घरोघरी जाऊन भिक्षा मागू लागली.

याच काळात दाते कुटुंबाच्या शेजारी आणखी एका महान लोकसेवेचे कार्य घडत होते. कै. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांनी १९०५ साली देशसेवेच्या उद्देशाने आरंभिलेल्या 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीची' नागपूर शाखा गोरक्षण संस्थेच्या शेजारीच सुरू करण्यात आली होती. संस्थेने अंगिकारलेल्या इतर कार्यक्रमाबरोबर लोकजागृतीच्या उद्देशानेच सुरू केलेल्या 'हितवाद' वृत्तपत्राचे प्रकाशनही सुरू झालेले होते. त्यातील अग्रलेखांवर अण्णांच्या मित्रमंडळीत होणारी चर्चा कमलच्या कानावर पडे. त्यावेळी या संस्थेचा व्याप कै. नटेश आप्पाजी द्रवीड मोठ्या कर्तबगारीने चालवीत. त्यांच्या सुविद्य पत्नी कै. मथुराताई द्रवीड या देखील तितक्याच धडाधडीच्या व कर्तबगार असल्याने द्रवीड कुटुंबाची समाजावर विशेष स्वरूपाची छाप होती. हे कुटुंब संस्थेतच राहत असल्याने दात्यांचे शेजारी होते. कमल बरेचदा द्रवीडांकडे जाई. त्यांचेकडे सामाजिक कार्यकर्त्यांची वर्दळ असे. त्यांची सामाजिक बाबींवर चालणारी चर्चा कमलच्या चौकस बुद्धीतून निसटत असावी असे म्हणता येणे कठीण आहे. अशा प्रकारे शालेय जीवनात शिक्षक या नात्याने 'महाराष्ट्र' कार गोपाळराव ओगले आणि शेजारी ह्या नात्याने 'हितवाद' चे नटेश आप्पाजी द्रवीड ह्या नागपूरच्या आद्य वृत्तपत्रकारांचे मावशींना सान्निध्य लाभले.

● ●

# पहिल्या महायुद्धाचा काळ आणि नंतर : ३

२८ जुलै १९१४ रोजी पहिल्या महायुद्धाच्या वणव्याने पेट घेतला. भारत ब्रिटिश साम्राज्याचा भाग असल्याने, स्वाभाविकच त्यात ओढला गेला. प्रत्यक्ष युद्धक्षेत्र जरी युरोपात दूर असले तरी भारताचे अफाट मनुष्यबळ आणि साधनसंपत्ति यांचा राज्यकर्त्यांनी जास्तीत-जास्त उपयोग करून घेण्याचे ठरविल्याने तो बराच पोळला. दहा लक्षाचे वर जे भारतीय जवान दोस्त राष्ट्रांतर्फे लढण्यासाठी लष्करात भरती करण्यात आले होते त्यापैकी कित्येक मृत्युमुखी पडले, जायबंदी झाले अथवा शत्रुकैदी बनले. १० कोटी पौंड ( सुमारे १५० कोटी रुपये ) इतकी नगद रकम ' युद्ध प्रयत्नाला देणगी ' म्हणून भारताच्या खजिन्यातून खर्ची पडली. कापूस, कोळसा, लोखंड, लाकूड, मँगनीज आदि कच्चा माल तिकड किती प्रमाणावर निर्यात केला गेला याची तर मोजदादच नाही.

युद्धे केवळ सैन्याच्या भरवशावर लढली जात नसतात. अन्नधान्ये आणि साधन–संपत्तीचा अखंड प्रवाह चालू राहिला तरच दीर्घकाळ लढणे शक्य होते. व्यापारी वृत्तीच्या ब्रिटिशांनी भारतीय उत्पादकांना जास्त भावाचे आमिष दाखवून या बाबतीत आपला कार्यभाग चांगलाच साधला होता हे सांगावयास नकोच. स्वातंत्र्याची कल्पना त्यावेळी ठराविक वर्गापुरतीच मर्यादित होती. त्यामुळे विरोध न होता राज्यकर्त्यांचा उद्देश सफल झाला.

यावेळी राज्यकर्त्यांचे संपूर्ण लक्ष युद्धात गुंतलेले असल्यामुळे भारताच्या भविष्या-संबंधी विचार करण्यास त्यांना सवड सापडणे दुष्कर होते. मात्र आपल्या मार्गात अडचणी आणल्या गेल्या तर उपाय योजना असावी यासंबंधी काळजी घ्यावयास मात्र ते विसरले नाहीत. वेळीच त्यांनी भारत संरक्षण कायदा (डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्ट) पास करून घेतला. याच वेळी देशातील हजारचे वर संस्थानिक, जहागिरदार अन् मानकरी ब्रिटिश सरकारला सर्वतोपरी मदत करून लांगूलचालनाचे उत्तम आविष्करण करण्यात दंग झाले होते.

सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीने ब्रिटिश राज्यकर्त्यांना काही देऊन मोबदल्यात काही मिळण्यासारखे नसल्याने, शिवाय जर्मन राष्ट्राशी त्यांचे कोणत्याही प्रकारचे भांडण नसल्याने

तिची सहानुभूती मात्र जर्मनीकडे झुकत होती. त्यातच ब्रिटनने तुर्कस्थान या मुस्लीम राष्ट्रावर हल्ला केल्याने भारतीय मुस्लीमांचे माथे भडकले. परिणामतः मुस्लीमांचे पुढारी बॅ. महंमदअली जीना हे १९१६ च्या लखनौ काँग्रेसला हजर राहिले. काँग्रेस आणि मुस्लीम लीग ह्या दोघांनी एकत्र येऊन ब्रिटिश सरकारशी सामना द्यावा हा विचार त्यांनी उचलून धरला. या त्यांच्या आविर्भावावर प्रसन्न होऊन काँग्रेसने कायदे मंडळात मुस्लीमांसाठी राखीव जागा ठेवण्याचे तत्व ( Communal Award ) मान्य केले.

या पूर्वीच म्हणजे १९१५ सालच्या जानेवारीत महात्माजी आपले आफ्रिकेतील वास्तव्य संपवून भारतात परत आले होते. ते लखनौ काँग्रेसला हजर होते.

लखनौ येथील काँग्रेसचे अधिवेशन आटोपून परतताना लोकमान्य टिळकांनी नागपुरास मुक्काम केला. दिनांक ६ जानेवारी १९१७ रोजी सर बिपिनचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे चिटणीस पार्कात व्याख्यान झाले. त्यांनी ‘ होम-रूल लीग ’ ची कल्पना जनतेला समजावून सांगितली. त्यानुसार नागपुरात लीगची शाखा स्थापन झाली. त्यावेळी डॉ. बा. शि. मुंजे व नारायणराव वैद्य ह्या दोघांनी पुढाकार घेऊन लीगची सदस्य संख्या बरीच वाढविली.

अशा प्रकारे लोकमान्यांच्या प्रेरणेने नागपूर प्रांतात राष्ट्रीय चळवळीचे वारे जोमाने वाहू लागले. त्याचे लोण युवकातही पोहोचल्याशिवाय राहिले नाही. विद्यार्थ्यांनी राजकरणात लक्ष घालू नये म्हणून या प्रांतात रिस्ले साहेबांनी एक पत्र प्रसारित केले. परन्तु ‘ रिस्ले सर्क्युलर ’ मुळे विद्यार्थ्यांत अधिकच खळबळ माजली. त्याचा अपेक्षेपेक्षा उलट परिणाम होऊन युवकांनीही देशासाठी झटण्याची गरज आहे ही गोष्ट तेव्हापासून त्यांना अधिक तीव्रतेने जाणवू लागली, असे मावशी सांगतात.

१९१७ सालचे कलकत्ता येथील काँग्रेसचे अधिवेशन आटोपून परततांना लोकमान्य पुनः नागपुरास उतरले. कीर्तनकारांनी राष्ट्रीय दृष्टिकोनातून कीर्तने करावीत, अर्थात राष्ट्रीय वृत्तीचा कीर्तनातून प्रामुख्याने प्रचार व्हावा ह्या हेतूला चालना देण्यासाठी लोकमान्यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरास एक ‘ कीर्तन सम्मेलन ’ आयोजित करण्यात आले होते. त्याकाळचे नागपुरातील एक उदयोन्मुख कीर्तनकार दादाशास्त्री कायरकर ह्यांनी या कामी पुढाकार घेतला होता. लोकमान्यांसमोर त्यांनी कीर्तन केले. त्यांच्या कीर्तनाने ते प्रभावित झाले. टिळकांनी कायरकरांना ‘ राष्ट्रीय कीर्तनकार ’ ही उपाधी बहाल केली. हे सम्मेलन धंतोली विभागातील पाध्ये यांच्या आवारात भरविण्यात आले होते. अर्थात ह्या सर्व कार्यक्रमांना कमल दाते हजर राहिल्याने तिच्या मनावर त्यांचा अपेक्षित परिणाम झाला.

१९१८ च्या आरंभी महिन्याभराच्यात्र अंतराने लोकमान्य नागपूर प्रांतात होमरूलच्या प्रचारार्थ पुन्हा आले. त्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी परिषदा भरविल्या. त्यामुळे ठिकठिकाणी होमरूल लीगच्या शाखा स्थापन झाल्या. लोकमान्यांच्या हाकेला त्यावेळी

नागपूर खालोखाल वर्ध्याने प्रतिसाद दिला. त्यावेळी या दोन ठिकाणी अनुक्रमे १४०७ व ८३६ सदस्य या कार्याला मिळाले.

या सुमारास ब्रिटिश आणि त्यांच्या मित्र राष्ट्रांना अनुकूल प्रकारे महायुद्ध निर्णायक अवस्थेप्रत येऊन पोहोचले होते. या पूर्वीच म्हणजे १७ ऑगस्ट १९१७ रोजी ब्रिटनच्या मंत्रीमंडळातील भारत- विषयक कारभाराचे मंत्री (Secretary of State for India) मि. एडविन मॉंटेग्यू यांच्या राजकीय सुधारणांचा जाहीरनामा प्रसिद्ध झालेला होता. भारताचा प्रत्यक्ष राज्यकारभार, पायरी पायरीने, भारतीयांच्याच हातात सोपविण्याच्या उद्देशाची घोषणा त्यात होती. त्या दृष्टीने पहिली पायरी म्हणून घटक राज्यांत द्विदल राज्य-पद्धतीची (Diarcby) योजना करण्यात आली होती. त्यानुसार मध्यवर्ती सरकार मधील व्हाईसरॉयला सल्ला देणारे दुय्यम खात्यांचे सदस्य (Members of Viceroy's Executive Council) आणि राज्यात तेथील सर्वाधिकारी अशा ब्रिटिश गव्हर्नरांच्या छायेत कार्य करणारी मंत्रीमंडळे एवढेच राज्यकारभाराचे भारतीकरण करण्याची त्यात योजना होती. भारतीयांच्या मनातील ब्रिटिश-विरोधाच्या धारेची वाढती तीक्ष्णता बोथट करण्याचा तो एक वृथा प्रयत्न होता.

परन्तु केवळ घोषणांनी काम भागण्यासारखे नव्हते, कारण लखनौ कॉंग्रेसने 'स्वराज्याची घोषणा' केली होती आणि मॉंट–फोर्ड जाहीरनाम्यात तर स्वराज्याचे अगदीच अस्पष्ट प्रतिबिंब होते. त्यामुळे राष्ट्रीय पुढाऱ्यांनी आपला लढा नेटाने चालूच ठेवला. याचवेळी महात्मा गांधींचा देशाच्या राजकीय क्षितीजावर उदय होत होता. १९१७ सालीच त्यांनी चंपारण (बिहार) मधील नीळीच्या युरोपीय मळे-धारकांविरुद्ध आणि गुजराथच्या खेडा विभागातील शेतमजुरांसाठी यशस्वी लढे दिले होते.

याच वेळी होमरूलच्या प्रचाराने नागपूर प्रांती राष्ट्रीय चळवळीचे बीज पक्के रुजले. डॉ. बा. शि. मुंजे, डॉ. मो. रा. चोळकर, नरकेसरी बॅ. अभ्यंकर, डॉ. के. ब. हेडगेवार, डॉ. ल. वा. परांजपे, डॉ. ना. भा. खरे, जमनालालजी बजाज, डॉ. तु. ज. केदार, डॉ. भवानीशंकर नियोगी, ॲडव्होकेट बळवंतराव देशमुख आदि अनेक धडाडीचे आणि कर्तबगार पुढारी हा प्रांत गाजवू लागले. राष्ट्रीय चळवळीच्या प्रसारार्थ 'महाराष्ट्र', 'हितवाद' आणि डॉ. मुंजे ह्यांनी सुरू केलेल्या 'संकल्प' या वृत्तपत्रांनी महत्वाची कामगिरी केली.

१९१८ च्या शेवटी (११ नोव्हेंबर) महायुद्ध संपले. ब्रिटन जिंकले. जर्मन राष्ट्र पराभूत झाले. मांडलिक भारतात आपला विजय–नगारा पिटल्याशिवाय ब्रिटिश राज्य-कर्त्यांना स्वस्थ कसे बसवेल ? सर्वदूर विजय-सोहळा साजरा करण्याचा संकल्प जाहीर

झाला. लहान मुलांसाठी खाऊचे वाटप, नेत्रदीपक दारू-काम, शिवाय शुक्रवार तलावातील (गांधीसागर) बेटावर जर्मन कैसरचा पुतळा जाळणे हे कार्यक्रम त्या सोहळ्यात कटाक्षाने ठेवण्यात आले होते. कारण, उदयोन्मुख पिढीवरच आपणास पाहिजे तसे संस्कार करण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न करावयाचा हे ब्रिटिश राज्यकर्त्यांचे दूरदृष्टि धोरण होते. अर्थात् भारताने ते सफल होऊ नाही दिले हा भाग वेगळा. त्यावेळी बरीच मुले हा सोहळा पाहण्यासाठी शुक्रवार तलावाकडे गेली. परन्तु कमल दाते आणि तिच्या मैत्रिणी मात्र गेल्या नाहीत.

१९१९ साल उजाडले. दुतोंडी ब्रिटिश कूटनीतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण मासला या वर्षी पाहावयास मिळाला. एकीकडे १९२१ मधे, म्हणजे पास झाल्यानंतर २ वर्षांच्या कालावधीनंतर अंमलात येणारा मॉंटेग्यू–चेम्सफोर्ड कायदा पास करण्यात आला; तर दुसरीकडे जनतेच्या विरोधाची पर्वा न करता भारतीयांच्या संचार आणि संभाषणस्वातंत्र्यावर कुठाराघात घालणाऱ्या रौलट बिलांना दिनांक ६ एप्रिल १९१९ रोजी कायद्याचा दर्जा देण्यात आला. देशातील वृत्तपत्रांच्या लेखन-स्वातंत्र्यावर कडक बंधने घालून सरकारविरोधी लिखाण वा भाषणे हा राजद्रोह ठरविला. त्याबद्दल न्यायालयीन चौकशी शिवाय कारावास किंवा हद्दपारीची शिक्षा देण्याचे या कायद्यान्वये सरकारला अधिकार देण्यात आले.

हा कायदा पास झाल्यानंतर काही कालाने नागपूरच्या दोन प्रमुख पुढाऱ्यांवर सरकारने चालविलेल्या राजद्रोहाच्या खटल्यामुळे या प्रांतातील बाल-वृद्ध स्त्री-पुरुषांच्या मनात सरकारविषयी आक्रम निर्माण होण्यास मदतच झाली. नागपूर होमरूल कमेटीचे सेक्रेटरी नारायणराव वैद्य वकील आणि डॉ. चोळकर हे ते दोन पुढारी होत. आपल्या सोयीप्रमाणे राष्ट्रद्रोहाचा अर्थ लावून जनतेच्या पुढाऱ्यांना तुरुंगात डांबणे हाच उद्देश असल्याने सरकारवरील कोणत्याही स्वरूपाची टीका हा राजद्रोह ठरत असे. ही मुस्कटदाबी हाणून पाडण्यासाठी केवळ 'गुन्हेगारांचा' बचाव करून काम भागण्यासारखे नव्हते. तर बचाव अशा प्रकारे करणे जरूर होते की ज्या भाषणाबद्दल राजद्रोहाचा खटला लादण्यात आला, त्यातील टीका करण्याचा जनतेचा हक्क सिद्ध व्हावा. हे काम फारच जबाबदारीचे व कठीण होते. दोन्ही वेळी नरकेसरी बॅ. अभ्यंकरांनी हे काम विनावेतन केले एवढेच नव्हे तर अत्यंत कुशलतेनेही केले. वैद्यांना खालच्या कोर्टात शिक्षा झाली. या शिक्षेविरुद्ध वरील कोर्टात अपील झाले. त्यात भाष्य करण्यासाठी कलकत्त्याहून देशबंधू बॅ. चित्तरंजन दास विनावेतन आले होते. अपीलात वैद्य दोषमुक्त ठरले.

डॉ. चोळकरांवरील खटल्यात दोषारोपाशिवायच ते सुटले. त्यामुळे स्वयंनिर्णयाच्या

हक्काबद्दल भाषण करणे, आणि अयोग्य कृत्यांबद्दल सरकारवर टीका करणे जनतेचा हक्कच आहे हे तत्त्व प्रस्थापित करण्यात नरकेसरी अभ्यंकर बरेच यशस्वी ठरले. हे खटले त्यावेळी इतके गाजले की त्यामुळे या प्रांतात जनजागृति होण्यास बहुमोल मदत झाली.

'रौलट बिल' विरोधी चळवळी निमित्ताने महात्मा गांधी भारतीय जनतेसमोर प्रथम प्रकर्षाने पुढे आले. दिनांक ६ एप्रिल १९१९ हा 'सत्याग्रह दिवस' म्हणून जाहीर करून त्यांनी देशाला सत्याग्रह या नवीन शस्त्राचा प्रथम परिचय करून दिला. या प्रसंगापासूनच गावोगावी हरताळ पाळण्याची प्रथा सुरू झाली. गांधीप्रणीत सत्याग्रह, हरताळ आदि कार्यक्रमाचे वैशिष्ट्य हे सांगता येईल की स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर राहिलेली सर्वसाधारण जनता यामुळे प्रथमच तिच्या निकट संपर्कात आली. थोडक्यात, आता समस्त जनता स्वातंत्र्याच्या राजकारणात उत्साहाने भाग घेण्यास प्रवृत्त झाली.

रौलट बिलांच्या आगीत तेल ओतणारी एक चित्तथरारक घटना लगोलग म्हणजे दिनांक १३ एप्रिल १९१९ रोजी पंजाबात घडली. सरकारने गांधीजींना दिल्लीत प्रवेश करण्याची बंदी केल्याने उत्तर हिंदुस्थानात आणि विशेषतः पंजाबमध्ये बरेच दंगे झाले. त्या संबंधांत डॉ. किचलू आणि डॉ. सत्यपाल या पंजाबातील पुढाऱ्यांना अटक करण्यात आली. यामुळे चिडून जाऊन जनतेने अनेक गोऱ्या लोकांवर हल्ले केले. म्हणून सरकारने पंजाबभर 'मार्शल लॉ' जाहीर केला. या संबंधी विरोध प्रदर्शित करण्यासाठी अमृतसर येथे चोहोबाजूंनी बंदिस्त असलेल्या जालीयनवालाबाग मध्ये जनतेची एक सभा चालू होती. सूडाने पेटलेल्या जनरल डायर नामक गोऱ्या अधिकाऱ्याला ही सुसंधीच चालून आल्यासारखे वाटले. त्याने गोऱ्या सोजिरांचे एक पथक बरोबर घेतले. नंतर बागेचे सर्व मार्ग बंद करून आतील निःशस्त्र समुदायावर एखाद्या पिसाटाप्रमाणे अविरत गोळीबार चालू केला. प्रसंगाचे केवळ वर्णनही काळीज फाटण्यास पुरेसे व्हावे, एवढा अमानुष प्रकार त्या दिवशी घडला.

अधिकृत माहितीनुसार त्या दिवशी जालीयनवालाबागेत एकंदर १६५० फैरी झाडण्यात आल्या. शेकडो मारले गेले, तर हजारो जखमी झाले. या प्रसंगानंतर इंग्लंडच्या वरिष्ठ कायदे मंडळात जनरल डायरची स्तुती करण्यात आली. परंतु भारतभर संतापाची लाट पसरली. आता समस्त जनतेप्रमाणे राजदरबारी सन्मानाने वावरणाऱ्या उच्चभ्रू भारतीयांच्याही डोळ्यासमोरील भ्रमपलट दूर सारले गेले. आणि यापूर्वी न झालेल्या घटना आता घडू लागल्या. त्यापैकी काही म्हणजे या घटनेच्या निषेधार्थ त्यावेळी व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असलेले सर शंकरन् नायर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. भारतभूषण रवीन्द्रनाथ टागोर ह्यांनीही सरकारने बहाल केलेला

उच्चतम ' सर ' हा किताब परत केला.

अशा प्रकारे महायुद्ध आणि तदनंतरच्या काळात भारतीय वातावरणात महत्वाच्या राजकीय घटनांचे जे अनेक वारे, एका पाठोपाठ एक, अति शीघ्रगतीने वाहिले त्यांचा संस्कारक्षम वयोगटात असलेल्या मावशींच्या मनावर यथोचित परिणाम झाला.

देशासंबंधीच्या कर्तव्याची स्पष्ट जाणीव त्यांना याच परिस्थितीने करून दिली. आणि अशा या पार्श्वभूमिवरच जीवनाच्या नवीन आणि महत्वाच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. जालीयनवालाबाग घटनेनंतर केवळ दोन महिन्यांनीच मावशींचा विवाह होऊन त्यांनी वर्धा येथील केळकर कुटुंबात प्रवेश केला.

• •

## श्वशुर-गृही पदार्पण : ४

### केळकर घराणे

केळकर घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील गव्हे गांवचे. आमचे पणजोबा वामनराव हे एक शांत, सच्छील अन् धोपटमार्गी गृहस्थ होते. त्यांना गणेश, हरि, नारायण आणि चिंतामण हे चार पुत्र होते. पैकी क्रमांक दोनचे, हरिभाऊ हें आमचे आजोबा, म्हणजेच मावशींचे श्वशुर होत. कोकणात हरिभाऊंचे आरंभीचे शिक्षण चालू असताच एक प्रसंग घडला. वामनरावांनी हिशेब लिहिण्यात केलेल्या क्षुल्लक चुकीवरून, ज्या श्रीमंत गृहस्थाकडे ते नोकरीस होते त्याने, त्यांच्या श्रीमुखात दिली. कर्मधर्मसंयोगाने हा प्रसंग हरिभाऊंच्या समोरच घडला. हरिभाऊंचा स्वभाव मानी आणि निश्चयी ! यामुळे त्यांना बराच मनस्ताप झाला. घरी येताच त्यांनी आपला निश्चय जाहीर केला की 'मी कधीच दुसऱ्याची चाकरी करणार नाही, आणि केळकर कुटुंबाला भरभराटीप्रत नेल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.' त्यानुसार पहिली संधी साधून पुढील शिक्षणासाठी ते मुंबईत दाखल झाले. नातेवाईकांचा केवळ अंग टेकण्यासाठीच त्यांनी आश्रय घेतला. अभ्यासासाठी त्यांनाही रस्त्यावरील म्युनिसिपालीटीच्या दिव्याचाच आधार घ्यावा लागला.

अत्यंत बिकट परिस्थितीला तोंड देत देत हरिभाऊ बी. ए. एल् एल्. बी. झाले. त्यानंतर लगेच वकिलीच्या व्यवसायाप्रीत्यर्थ ते खानदेशात धुळे येथे गेले. तेथे ते सुमारे वर्ष दीड वर्षच राहिले. कारण तेथील प्रगती त्यांना समाधानकारक वाटेना. एक दिवस कामानिमित्त मुंबईस जात असता गाडीत त्यांची वर्धा येथील केशवराव कावळे यांच्याशी ओळख झाली. श्री कावळे हे वर्धा मुकामी वकील होते. त्यावेळी वर्धेस आणखी दोघे तिघे वकील होते. परंतु त्यापैकी कोणीच पदवीधर नसून, ते सर्व मराठीतून काम चालविणारे 'ॲडव्होकेटस्' होते. "आपण वर्ध्यास या. तेथे इंग्रजी वकील कोणीच नाही." अशी कावळ्यांनी त्यावेळी इच्छा व्यक्त केली. यानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे १८८६

साली, वर्धा जिल्ह्याच्या निर्मितीनंतर सुमारे दोन वर्षांनी, तेथील 'पहिले इंग्रजी वकील' म्हणून हरिभाऊ वर्धेस राहावयास गेले.

अल्पकाळातच हरिभाऊंचा वर्धा येथे चांगला जम बसला. त्यांना आता अमाप पैसा मिळू लागला. आपल्या इतर बंधूंना त्यांनी विदर्भात आणले. बंधूपैकी नारायणराव चांदा येथे जंगलची ठेकेदारी करीत. गणेश आणि चिंतामण या दोघांकडे त्यांनी स्वतःच्या मालगुजारी गावांच्या शेतीची व्यवस्था पाहण्याचा कार्यभार सोपविला. केवळ नातेवाई-कांनाच हरिभाऊंनी आश्रय दिला असे नव्हे तर इतर बरीच मंडळीहि त्यांच्या आश्रयाने विदर्भात आली. त्यावेळी आमचे कुटुंबात नातेवाईक आणि इतर मिळून ५०-६० माणसे नेहमी असत. म्हणून १८९२ मध्ये त्यांनी स्वतःची भव्य अशी एक वास्तु वर्धा मुक्कामी बांधली.

हरिभाऊ दरवर्षी उन्हाळ्यात जेव्हा कोकणात जात तेव्हा गांवची मंदिरे, शिक्षण संस्था व विद्यार्थी यांना न चुकता आर्थिक सहाय्य करीत. सांगण्याचे तात्पर्य हे की, केलेला निश्चय त्यांनी अत्यंत योग्य प्रकारे यशस्वी करून दाखविला.

व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदारी पार पाडीत असताच हरिभाऊंनी सामाजिक जबाबदारीकडे दुर्लक्ष केले नाही. १८८५ साली इंडीयन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना होऊन तिची शाखा वर्धेस निघाल्यानंतर ते कॉंग्रेसच्या कामात लक्ष घालू लागले. त्यावेळी ठिकठिका-णाहून कॉंग्रेस अधिवेशनासाठी निवडून दिलेले सदस्य प्रतिनिधी म्हणून जात. दि. ८-१२-८९ च्या सभेत हरिभाऊंची निवड झाली. त्यानंतर दरवर्षी ते कॉंग्रेसच्या अधिवेशनास जात. १८९९ च्या लखनौ कॉंग्रेसमध्ये घटना दुरुस्तीच्या ठरावास त्यांनी जोरदार पाठिंबा दिला. त्यामुळे घटना दुरुस्ती संमत होऊन भारतीय कॉंग्रेस कमेटीवर मध्यप्रदेश-वऱ्हाडला जादा प्रतिनिधित्व मिळाले. याच वेळी वऱ्हाडचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली. १९०१ च्या कलकत्ता कॉंग्रेसमध्ये डॉ. सर हरिसिंग गौर आणि रा. ब. नारायणस्वामी नायडू यांच्या सहकार्याने न्यायपालिका आणि कार्यपालिका विभक्त करण्याची सरकारकडे मागणी करणारा ठराव मांडून तो संमत करून घेण्यात त्यांनी पुढाकार घेतला. कॉंग्रेसच्या राजका-रणाव्यतिरिक्त स्थानिक कार्यातही ते लक्ष घालीत. बराच काल ते वर्धा नगरपालिकेचे अध्यक्ष होते.

हरिभाऊ केळकरांना अनुक्रमे सदाशिव, पुरुषोत्तम, लक्ष्मण आणि यशवंत हे चार मुलगे आणि कुशामाई, रमा व वेणू अशा तीन कन्या होत्या. पैकी थोरले सदाशिवराव हे वकिली व्यवसायास आरंभ केल्यानंतर केवळ १॥-२ वर्षातच, १९११ च्या प्लेगच्या साथीत, अचानकपणे मृत्यु पावले. अत्यंत हुशार अशा थोरल्या मुलाचा आधारस्तंभ

एकाएकी निखळून पडल्यामुळे हरिभाऊंना धक्काच बसला. दुसरेच दिवशीपासून त्यांनी कोर्टात जाणे जे बंद केले ते अगदी अखेरपर्यंत ! नेहमीच्या काही पक्षकारांनी त्यांना गळ घालून पाहिली. परन्तु हजारो रुपये प्राप्तीच्या मोहाला बळी न पडता त्यांनी आपला निश्चय शेवटपर्यंत कायम ठेवला.

आमचे थोरले काका सदाशिवराव हे अत्यंत देखणे, हुशार आणि कर्तबगार होते. आपल्या अत्यंत अल्पकालीन जीवनातही ते आकाशातील विद्युल्लतेप्रमाणे चमकून गेले. वरवर ते शांत दिसत. परन्तु अंतर्यामी स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्यासामुळे क्रांतिकारी विचार धगधगत होते. म्हणूनच प्रसिद्ध क्रांतिवीर डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे हे शेजारी वा वर्गमित्र या दोहोंपेक्षाही समवैचारिकतेच्या सूत्रामुळे त्यांच्या फार निकट होते. देशासाठी कोणत्याही स्वरूपाचा संघर्ष करण्याचा निर्धार करण्यासंबंधी त्या दोघांनीहि विद्यार्थीदशेतच एकत्र शपथा घेतल्या होत्या. परन्तु विधीलिखित काही वेगळेच होते. काही विविक्षित परिस्थितीमुळे खानखोजांना अनपेक्षितपणे परांगदा व्हावे लागले. सदाशिवराव मागे राहिले व थोड्याच काळाने अल्पयात त्यांचा मृत्यू झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपली ४० वर्षांची परांगदा अवस्था संपवून डॉ. खानखोजे जेव्हा वर्धेस आले तेव्हा प्रथम आमचे घरी आले. त्यावेळी त्यांचे स्वागत करण्याचे प्रस्तुत लेखकाला भाग्य लाभले. आणि इतक्या दीर्घकालावधिनंतरही आपल्या मित्राच्या आठवणीने जेव्हा तो वयोवृद्ध क्रांतिवीर आसवे ढाळू लागला, तेव्हा मित्रप्रेमाचे एक आगळेच दृश्य दिसले. डॉ. खानखोजांनी सांगेपर्यंत सदाशिवकाकांच्या वैचारिक बैठकीसंबंधी आम्हास पुरेशी कल्पना नव्हती. त्या दोघात गुप्तपणे पत्रव्यवहार चालू होता ही माहिती त्यांनीच आम्हास दिली.

सदाशिव काकांचा विवाह धुळे येथील प्रसिद्ध वकील भास्करराव साठे यांची ज्येष्ठ कन्या गंगा (उमाबाई) हिचेशी झाला होता. सदाशिव काकांनी अल्पावधीतच केळकर कुटुंबाचा निरोप घेतला. परन्तु असे करताना समस्त कुटुंबाची काळजी वाहील, सर्वांवर प्रेमाची पाखर धरील अशी आपली पत्नी जणू प्रतिनिधी म्हणून ते ठेवून गेले.

पुष्प बहरण्यापूर्वीच संसार-वेल खुडून गेलेली, अशा अवस्थेतही जुन्या वळणानेच वाटचाल करण्यासाठी उमाकाकूंनी सासरीच राहणे पत्करले. या नंतर त्या माउलीचे समग्र जीवन ' गंगा ' हे आपले नांव सार्थ करणारे ठरले. आपपर भाव न ठेवता तीरावरील कोणत्याही व्यक्तीच्या उपयोगी पडणाऱ्या सरितेप्रमाणे त्यागाचे ते एक अनुपम उदाहरण राहिले.

इतरांच्या आनंदातच त्यांनी स्वतःचा आनंद पाहिला. केळकर कुटुंबासाठी त्यांनी सर्व

प्रकारचा त्याग केला. मावशींनी १९३६ साली समिती-कार्यास जेव्हा आरंभ केला, तेव्हा वस्तुतः संसाराची फार मोठी जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यावेळी आम्ही सर्व मावंडे (६ भाऊ, १ बहीण) लहान होतो, व नुकतेच आम्ही व आमचे चुलते यांच्यात सामायिक घरे-दारे व शेती-भाती यांची वाटणी होऊन आम्ही वेगळे झालो होतो. उमाकाकूंनी आमच्याच सोबत राहणे पत्करले. त्यामुळे घरात फक्त मावशी आणि काकू एवढीच काय ती सज्ञान माणसे. मध्यंतरीच्या काळात आमच्या वडिलांच्या आजारपणामुळे घरेदारे व शेतीकडे दुर्लक्ष झाल्याने उत्पन्नाची बाजू लंगडी पडलेली, मुलांची शिक्षणे, लग्ने या जबाबदाऱ्या समोर होत्याच. अशाही परिस्थितीत मावशींना समितीच्या कार्याची धुरा सांभाळण्याचे धाष्टर्य जर कुणाच्या पाठबळामुळे झाले असेल तर ते काकूंच्याच. घरची बाजू ठामपणे सांभाळून घेणारी त्यांच्यासारखी पाठराखीण जर मावशींना न मिळती तर तो कदाचित लष्करच्या भाकरी भाजण्याचाच प्रकार ठरता. म्हणूनच प्रत्येक वेळी मावशींनी एखादे कार्य हाती घेण्याचे ठरवून त्याचे काकूंजवळ सूतोवाच करावे व ज्येष्ठ भगिनी साजेशा पद्धतीने काकूंनी लगेच कौतुकपूर्वक त्याला सम्मती द्यावी, हा क्रम अखेरपर्यंत चालू होता.

१९६१ च्या नोव्हेंबर मध्ये राष्ट्रसेविका समितीच्या कार्यास २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल समिति कार्यकर्त्यांचा अखिल भारतीय मेळावा वर्धेस सुरू होण्यापूर्वी काही दिवस काकू आजारी झाल्या. त्यांची प्रकृती चांगलीच ढासळली. काही केल्या आराम पडेना. अर्थात मेळाव्याच्या कार्यक्रमास हजर राहणे त्यांना अशक्यच होते. दूरदूरच्या इतक्या भगिनी एकत्र आल्या असता आपणास मात्र खाटेवर पडून राहावे लागत आहे, याची त्यांना फार खंत वाटली. हा भाव तशाही अवस्थेत त्यांनी प्रस्तुत लेखकाजवळ बोलून दाखविला. ठिकठिकाणच्या सेविका येऊन त्यांची प्रकृती पाहून जात होत्या. दिनांक १४ नोव्हेंबर रोजी समिति-मेळाव्यात पू. गुरुजी गोळवलकरांच्या बौद्धिकाचा कार्यक्रम होता. त्यासाठी ते वर्धेस आलेले होते. परन्तु तो दिवस उजाडण्यापूर्वीच काकूंची प्राणज्योत कायमची मालवली गेली. उजाडताच जेव्हा ही बातमी सर्वदूर पसरली, तेव्हा गावातील स्त्री-पुरुष आणि मेळाव्याप्रीत्यर्थ भारताच्या निरनिराळ्या भागांतून आलेल्या समिती सेविकांची रीघ लागली. काकूंचे अंत्यदर्शन घेऊन त्यांना आपली श्रद्धांजली वाहण्यासाठी ! गुरुजी गोळवलकरही येऊन श्रद्धांजली वाहून गेले. अप्रत्यक्षरीत्या का होईना पण ज्यांच्याकडून समिती-कार्याची बरीच मूकसेवा घडली होती त्या काकूंच्या आत्म्याला कृतज्ञतापूर्वक मानवंदना देण्यासाठी केवळ वर्धेच्याच नव्हे तर गावोगावच्याही अनेक समिति सेविका उपस्थित राहण्याऱ्या योगामागे ईश्वरी योजनेशिवाय दुसरे काय असू शकेल !

आमचे वडील पुरुषोत्तमराव हे हरीभाऊंचे द्वितीय चिरंजीव. थोरले बंधू सदाशिवराव ह्यांचा १९११ मध्ये अचानक मृत्यु झाल्या नंतर वडिलांनी वकीलीचा त्याग केल्यामुळे केळकर

कुटुंबाचा भार त्यांच्यावर पडणार ही गोष्ट पुरुषोत्तमरावांच्या विद्यार्थीदशेतच स्पष्ट झाली. वस्तुतः बी. एस् सी. झाल्यानंतर बार ॲट लॉ साठी इंग्लंडला जावे ही त्यांच्या वडिलांची इच्छा ! परन्तु आपली जबाबदारी ओळखून त्यांनी इकडेच कॉलेज शिक्षण चालू ठेवले व वडिलांच्या आग्रहास्तव ते विवाहबद्धही झाले. त्यांचा प्रथम विवाह नागपूर येथील ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट विष्णुपंत गाडगीळ ह्यांची कन्या सुंदराताई हिच्याशी झाला होता. आमची ज्येष्ठ भगिनी सौ. वत्सला चोळकर त्यांचीच द्वितीय कन्या. पहिली कन्या शांता हिचा १९३४ मधे अल्पवयातच मृत्यु झाला. सौ. वत्सलाच्या आई ( यांचे नांव लक्ष्मीबाई होते म्हणून नंतर मावशींचेही तेच नाव ठेवण्यात आले. ) लग्नानंतर केवळ ९ वर्षांनी स्वर्गवासी झाल्या.

१९१४ साली त्यांच्या वडिलांच्या मृत्यूमुळे आमच्या वडिलांनी शिक्षण मध्येच सोडून दिले. कारण आमचे एकत्र कुटुंब मोठे होते. शिवाय मालगुजारी गावे व शेतीवाडी बरीच होती. तिच्याकडे मध्यंतरीच्या काळात दुर्लक्ष झाले होते. अर्थात् काळाची गरज लक्षात घेऊन इस्टेटीची नीट व्यवस्था लावण्याकडेच आपले लक्ष केंद्रीभूत करावयाचे असे त्यांनी ठरविले.

ज्यांच्या जन्माच्या सोबतीस्तव मावशींनी केळकर कुटुंबात प्रवेश केला ते आमचे वडील स्वभावाने करारी, कर्तव्यनिष्ठ, न्यायी, परन्तु काहीसे एकांतप्रिय (Reserved) आणि तापट होते. त्यांचे सर्वच स्वभावपैलू परिस्थितिनिर्मित होते. लहानपण श्रीमंतीत गेलेले असल्याने राहणीत थाट व नीटनेटकेपणा यांचा सुरेख संगम झालेला होता. तापट असले तरी न्यायी प्रवृत्ति आणि कर्तव्यनिष्ठा सदैव सचेत असल्याने सर्वच प्रकारची उदारता भरपूर प्रमाणात होती. इतकी की त्यांचे मित्र त्यांना 'सरदार' या संबोधनाने हाक मारीत. विदर्भाच्या मातीचा गुण असेल कदाचित् ! तथापि त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर मोठ्या एकत्र कुटुंबाची पुनर्रचना करताना न्यायनिष्ठुर होण्याचे पत्करल्यावरून आमच्या काही आप्तांकडून जेव्हा त्यांना दूषणाचा अहेर मिळाला तेव्हा त्यांच्यासारख्या धीरगंभीरालाही इतका मनस्ताप झाला की त्याचा त्यांच्या प्रकृतीवर खोलवर परिणाम झाला. वस्तुतः आपल्या विद्यार्थीदशेपासूनच शरीरसंवर्धनाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले होते. आखाड्यात जाऊन ते कुस्तीही खेळत. वर्धा येथील कॉंग्रेसचे मान्यवर पुढारी सेठ जमनालाल बजाज हे त्यांचे आखाडा-मित्र होते. विद्यार्थीदशेनंतरही नियमाने ते टेनिस खेळत असत. परन्तु शारीरिक सुदृढतेचा भक्कम बांधही मनस्तापाच्या लोंढ्यासमोर टिकाव धरू शकत नाही हेच खरे !

अशातच १९१९ च्या आरंभी त्यांच्यावर पत्नीवियोगाचा प्रसंग आला. त्यावेळी

आमच्या आजी हयात होत्या. त्यांनी आमच्या वडिलांना कमालीचा आग्रह करून द्वितीय विवाहास राजी करून घेतले.

नरकेसरी बॅ. मोरूभाऊ अभ्यंकर आणि डॉ. ना. मा. खरे हे दोघेही केळकरांचे जवळचे आप्त आणि त्यांचा भास्करराव दाते यांचेशीही स्नेह होता. शिवाय गोविंदराव छत्रे वकील यांचा तर दोन्ही कुटुंबाशी घनिष्ट संबंध होता. त्यांनीच पुढाकार घेऊन मावशींचा विवाह निश्चित केला. विवाह १९१९ च्या जून महिन्यात पार पडला. त्या वेळच्या कालपरिस्थिति प्रमाणे विवाह समारंभ ३ दिवस चालला व थाटात पार पडला. पाठवणी समारंभ प्रसंगी नागपूरकर भोसले ह्यांनी आपला हत्ती पाठविला होता.

मावशींना दोन धाकटे दीर आणि तीन नणंदा होत्या. अनुक्रमे लक्ष्मणराव व यशवंतराव हे दीर. नणंदात सर्वात मोठ्या कुशामाई. या जळगांव येथील वकील अनंतराव ओक यांच्या पत्नी. नंतर रमाबाई. या बॅ. नरकेसरी अभ्यंकर ह्यांच्या पत्नी. सर्वात धाकट्या वेणूताई. या मध्यप्रदेशातील टिमारणी येथील शेतीतज्ञ माधवराव गद्रे यांच्या पत्नी.

लक्ष्मण काका यांच्या पत्नी सावित्रीबाई या धुळे येथील प्रसिद्ध समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव यांच्या कन्या. धाकटे काका यशवंतराव यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई इंदूर येथील केतकर घराण्याच्या !

उल्लेखित केळकर कुटुंबाच्या परिचयावरून हे लक्षात येण्यासारखे आहे की मावशींनी गृहलक्ष्मी म्हणून जेथे प्रवेश केला ते आमचे कुटुंब सुशिक्षित, सुप्रतिष्ठित, सधन आणि सामाजिक कर्तव्यांची जाणीव बाळगणारे होते. परन्तु तत्कालीन पद्धतिनुसार अशा कुटुंबातील स्त्रिया त्या काळी क्वचितच् अमर्याद अशा समाजाकडे वळत असत. फार काय तर समाजकार्यासाठी समाजात स्त्रीने वावरणे हे केवळ कर्मीपणाचे लक्षण नव्हे तर अमर्याद वागणुकीतही जमा होत असे. त्यांचा समाज आपल्या प्रतिष्ठेस साजेल अशा निवडक स्त्रियांपुरताच मर्यादित असे. एक प्रकारे मावशींचे आरंभीचे जीवनसुद्धा अशाच चाकोरीतून चालले. नियतीची तशीच इच्छा असती तर कदाचित अखेरपर्यंत ते तसेच मार्गक्रमण करते. परन्तु विधात्याची वेगळीच योजना होती. त्याला त्यांच्याकडून स्त्री-समाजाची सेवा करवून घ्यायची होती. परन्तु हे घडावे कसे ? सपाट भूमीवरून वाहत राहिल्यास प्रवाह एका ठराविक दिशेनेच वाहत जातो. परन्तु त्यास वेगळे वळण मिळण्यासाठी मार्गात डोंगर पर्वतादि अडथळे यावे लागतात, हा निसर्गनियम आहे.

मावशींच्या जीवनप्रवाहाचे बाबतीतही असेच घडले. संसारास आरंभ होऊन काही काल लोटत नाही तोच दुःख-संकटांचे डोंगर मार्गात आले आणि त्यास वेगळी

दिशा मिळाली. भारतीय परंपरेतील स्त्रीच्या सहजप्रवृत्तिनुसार प्रथम त्या सर्वशक्तिमान ईश्वराकडे वळल्या. त्याच्या आराधनेमुळे प्रज्ञा स्थिरावण्यास मदत झाली. नंतर आवश्यकतेच्या अनुभूतीतून जेव्हा समस्त स्त्री–समाजाकडे त्या वळल्या, तेव्हा आवश्यक असे सर्व धैर्य प्राप्त होऊन त्यांचे व्यक्तिमत्व अधिकाधिक प्रभावशाली बनत गेले. पुढील परिच्छेदातून या संबंधीचा साद्यंतपणे येणार असलेला इतिहास केवळ रोचकच नव्हे तर स्त्रीसमाजास मार्गदर्शक ठरण्यासारखा आहे यात शंकाच नाही.

• • •

मावशींनी केळकर कुटुंबात प्रवेश केला तेव्हा आमच्या दोन सावत्र बहिणी—शांता आणि वत्सला, वृद्ध आजी, उमाकाकू, लक्ष्मणकाका आणि सौ. अन्नपूर्णाबाई, शिवाय शेतीवाडीची कामे पाहत ते आमच्या आजोबांचे एक चुलत बंधू केशवराव केळकर इतकी माणसे होती. परन्तु मावशींच्या लग्नानंतर आमच्या आजी केवळ ४ महिन्यांनी परलोकवासी झाल्या. मावशी यावेळी फक्त १४ वर्षांच्या होत्या. अर्थात हे सहज लक्षात येण्यासारखे आहे की इतक्या लहान वयात त्यांच्यावर किती मोठी कौटुंबिक जबाबदारी येऊन पडली होती !

आमच्या कुटुंबात एकामागून एक अल्पवयीन मृत्यु होण्याची जी मालिका १९११ साली आमच्या थोरल्या काकांपासून आरंभ झाली होती ती या वेळपर्यंतही संपलेली नव्हती. कारण १९२० च्या आरंभी धाकटे काका लक्ष्मणराव कायद्याचा अभ्यास पूर्ण होत नाही तोच दोन वर्षांच्या आत, कावीळीचे आजाराने अचानकपणे मृत्यु पावले. ईश्वरी योग असा की त्यांच्या मृत्यूनंतर काही महिन्यातच त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांचाही पाठोपाठ मृत्यु झाला. सावित्रीबाई हुशार आणि उत्तम कवयित्री होत्या. त्यांचे साधुतुल्य वडील प्रसिद्ध समर्थभक्त कै. शंकर श्रीकृष्ण देव हे त्यांच्या मुलीच्या मृत्यूनंतरही आपल्या समर्थ सत्कार्योत्तेजक मंडळाचे कामानिमित्त वर्धेस आमचेकडे येत. त्यांचे संबंधीची जी एक आठवण अविस्मरणीय आहे ती अशी :

मुलगी आणि जावयाच्या मृत्यूनंतर बरेच वर्षांनी, अल्पकाळासाठी वर्धेस वास्तव्यास आलेले, सुप्रसिद्ध हरिभक्त ल. रा. पांगारकर देवांच्या भेटीस्तव आमचेकडे आले असता प्रस्तुत लेखकाची 'नातू' म्हणून त्यांनी पांगारकरांना ओळख करून दिली. तेव्हा अनपेक्षितपणे 'आपली कन्या व जांवई यांची ओळख करून द्या' अशी पांगारकरांनी पृच्छा करताच निर्माण झालेली सद्गदितता क्षणार्धात बाजूस सारून अगदी शांतपणे ते बोलून गेले, "पांगारकर ! आमचा तो समग्र ग्रंथ केव्हाच आटोपला". त्यावेळी

त्यांच्या तोंडून जणू स्थितप्रज्ञताच बोलली असे वाटले. सावित्रीबाई आणि मावशी यांचा अल्पकाळच संबंध आला परन्तु त्यांच्या स्वभावाचा मावशींच्या मनावर कायमचा ठसा कोरला गेला.

पहिले वर्ष केळकरांच्याकडील सर्व शिस्ती व आवडनिवडींचे आकलन करण्यात गेले. आमच्या वडिलांचा स्वभाव तापट असून जेवणाखाण्याच्या आवडीनिवडीही फार होत्या. स्त्रियांनी स्वतःच स्वयंपाक केला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. त्यामुळे इतर घरकामास गडी-मोलकरीण असले तरी स्वयंपाकघराची सर्वच जबाबदारी घरच्या बाईकडेच असे. आजतागायत तीच प्रथा आहे. घरच्या स्त्रियांना त्यामुळे जबरदस्त असे स्वयंपाकाचे काम असे. वर उल्लेखिलेल्या प्रमाणे कुटुंब मोठे, शिवाय आमच्या शेतांच्या खेड्यांवरून माणसे यायची. त्यांच्यासाठी भाकऱ्या घरच्या बाईलाच कराव्या लागत. याचा त्यांना फार त्रास होई. खेड्यावरची गडीमाणसे आली की ' आले आमचे जांवई ' असे मोठ्या काकू थट्टेने म्हणत. पुढे मावशींनी त्यांना शिधा देण्याची पद्धती सुरु केली.

आमच्या कुटुंबातील एकंदर वळण ' जुने ' या सदरात मोडणारेच होते. त्यात आधुनिकतेच्या हव्यासाचा अभाव असला तरी जुन्यातील जुनाटपणाला चिकटून राहण्याची प्रवृत्ति मुळीच नव्हती. घरातील स्त्रीचा शब्द ओसरीत ऐकू जाता कामा नये, त्यांनी कधीही एकटे बाहेर जाता कामा नये, आणि सहसा वेण्या-गजरे यांचा वापर टाळावा, अशा काही समजुती कटाक्षाने पाळल्या जात. परिचयाच्या किंवा आप्तांतील भगिनींकडे सुखसंवादासाठी जाणे या प्रकाराचे प्रमाण माफक असावे असाही कल होता. अर्थात लग्नप्रसंग, हळदीकुंकू आदि सामाजिक समारंभात मात्र हौसेने भाग घेऊन एकमेकींना सर्व प्रकारे सहकार्य करणे हा आवडीचा विषय होता. वस्तुतः विवाहप्रसंग आणि हळदीकुंकू हे दोन्ही एकप्रकारे कौटुंबिक प्रसंगच. परन्तु दोन्ही प्रसंगी जवळजवळ समस्त गावालाच आमंत्रण असे. आणि कमालीच्या हौसेने, पदर खोचून बहुतेक स्त्रिया त्यात सहभागी होत. यामुळे खऱ्या अर्थी ते सामाजिक समारंभच वाटत. त्यावेळी गरीब-श्रीमंत, साधारण-प्रतिष्ठित, लहान-मोठा हा भेद आड येत नसल्याने अशा प्रसंगी संकोचाचे कारणच नसे. एकंदरीत स्त्रियांतील सामाजिक सहजीवनासंबंधी आस्था या प्रसंगांनी नीट टिकवून ठेवलेली होती.

वरील स्वरूपाच्या कौटुंबिक-सामाजिक वातावरणाशी समरस होत असता १९२० सालच्या उत्तरार्धात मावशींच्या व्यक्तिगत तसेच आजूबाजूच्या जीवनात काही महत्त्वपूर्ण घटना घडल्या. १० ऑक्टोबर १९२० रोजी नागपूर मुक्कामी आमचा थोरला भाऊ मनोहर याचा जन्म झाला. कै. हरिभाऊंचा पहिला नातू ! त्यातून गोरा व देखणा ! !

त्यामुळे कुटुंबातील सर्वांनाच त्याचे आगमन अत्यधिक आनंदप्रद झाले. मावशी तर त्याची जन्मदात्री माताच होत्या. त्यांना विशेष सुख होणे स्वाभाविकच होते.

मनोहरचा जन्म आजोळी नागपुरास झाल्याने त्याच्या जन्मानंतर दीड दोन महिन्यांच्या अंतरानेच आमच्या आजोळ घरच्या साधारण शेजारीच धंतोली विभागात, सध्या जेथे सुरेन्द्र देव उद्यान आहे तेथे, अखिल भारतीय कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाची पर्वणी चडून आली. २६ डिसेंबर रोजी सी. विजयराघवाचारियर यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरास कॉंग्रेसचे भव्य अधिवेशन सुरु झाले. वर्धेचे सेठ जमनलाल बजाज हे स्वागताध्यक्ष असून त्याला महात्मा गांधींशिवाय देशगौरव चित्तरंजन दास, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, पं. मोतीलाल नेहरू आदि त्या काळचे मान्यवर पुढारी हजर होते. या सुमारास महात्माजींनी पुरस्कारिलेल्या धोरणामुळे मौलाना महंमद अली यांज व्यतिरिक्त बॅ. जीनाही ह्या अधिवेशनाला हजर होते. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर कॉंग्रेसच्या नागपूर अधिवेशनात प्रथमच महात्मा गांधींच्याकडे प्रत्यक्ष रीत्या कॉंग्रेसची आणि पर्यायाने देशाच्या राजकारणाची सूत्रे आली. त्या दृष्टीने हे अधिवेशन महत्वाचे ठरले. या अधिवेशनात अहिंसेवर अधिष्ठित सत्याग्रहाच्या गांधीप्रणीत मार्गाने स्वराज्य प्राप्त करण्याचे ध्येय असंदिग्ध रीत्या प्रथमच स्वीकारण्यात आले. त्यासाठी सरकारी शिक्षण संस्था, नोकऱ्या आदींवर बहिष्कार, स्वदेशीचा प्रचार, दारुबंदी व अस्पृश्योद्धार आदि कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले. ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध असहयोगाचा प्रयोग अंमलात आणण्यासाठी देशव्यापी कार्यक्रम आखण्यात आला. याचाच एक महत्वाचा भाग म्हणून, जमनालालजी बजाज यांच्या सूचनेवरून, गांधीजींनी लगेच वर्धेस सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली व आचार्य विनोबा भावे यांस त्याचे प्रमुख नेमले. अशा प्रकारे नागपूर अधिवेशनानंतर लगेच वर्धा हे देशाच्या राजकारणाचे एक महत्वाचे केंद्र बनले.

नागपूर कॉंग्रेस नंतर गांधीजी जेव्हा प्रथम वर्धेस आले तेव्हा त्यांचे जमनालाल बजाज यांच्या लक्ष्मीनारायण मंदिरातील चौकात ( पुढे यालाच गांधी चौक हे नांव देण्यात आले ) भाषण झाले. भाषणाला मोठ्या संख्येत स्त्री-पुरुषांची गर्दी झाली. या सभेस मावशी व अन्नपूर्णाकाकू हजर होत्या. गांधीजींचे फारच प्रभावी भाषण झाले. राष्ट्राच्या स्वास्थ्यावरच व्यक्तिगत स्वास्थ्य अवलंबून आहे, हा त्यांनी प्रथमच मांडलेला मुद्दा मावशींना फारच परिणामकारक वाटला. राष्ट्रकार्यासाठी उभारण्यात आलेल्या टिळक स्वराज्य फंडास सर्वांनी सर्वतोपरि हातभार लावणे आवश्यक असल्याचे जेव्हा त्यांनी सांगितले तेव्हा स्वयंस्फूर्तीने मावशी व काकूंनी आपल्या गळ्यातील सोन्याच्या एकदाण्या काढून दान केल्या. इतर उपस्थित स्त्री-पुरुषांनीही यथाशक्ती निधी त्यावेळी अर्पण केला.

एकंदर एक लाखाचे वर निधी त्यावेळी वर्धेतून जमा झाला. अशा प्रकारे विदर्भात नागपूरचे बरोबरीने वर्धा शहर राजकीय क्षेत्रात अहमहमिकेने भाग घेऊ लागले.

याच सुमारास वर्धेस आणखी दोन महत्वाच्या घटना घडल्या. त्या पैकी एक म्हणजे कै. जमनालाल बजाज यांनी आपले लक्ष्मीनारायण मंदिर हरिजनांसाठी खुले करून या गांधी-प्रणीत कार्यक्रमाचा श्रीगणेशा केला. तसेच तेथे त्यांनीच स्थापलेल्या मारवाडी विद्यालयात सर्वस्वी राष्ट्रीय शिक्षणाचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.

या सर्व घटना मावशींनी अगदी जवळून पाहिल्या. तथापि, या सुमारापर्यंत स्त्रियांनीही राजकारणात पडावे अशी फारशी अपेक्षा नव्हती. स्त्रियांना पुरुषांसारखेच शिक्षण मिळावे या संबंधात मात्र विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात, महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी जोमाने कार्यारंभ केलेला असल्यामुळे काही प्रमाणात मुली इंग्रजी शिकू लागल्या होत्या. पण त्यांच्यासाठी वेगळ्या संस्थांची सोय नसल्याने हे प्रमाण फार अल्प होते.

आमच्या वडिलांवर फार मोठी कौटुंबिक जबाबदारी येऊन पडलेली असल्याने ते त्यातच गुंतले. शिवाय पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्यांचा विशिष्ट स्वरुपाचा स्वभाव बनल्यामुळे राजकारण किंवा समाजकारणात प्रत्यक्ष पडण्यापेक्षा दुरूनच त्याचे अवलोकन करणे त्यांना अधिक श्रेयस्कर वाटले असावे. त्यांचा कल काहीही असो, परंतु या वस्तुस्थितीमुळे कुटुंबातील इतरांवर मात्र याबाबतीत मर्यादा घातली गेली. म्हणूनच वर्धेस सत्याग्रह आश्रमाची स्थापना होऊन गांधीप्रणीत कार्यक्रमांना जोरदार चालना मिळाल्यानंतर श्रीमती जानकीबाई बजाज ( जमनालालजींच्या धर्मपत्नी ) कमलाबाई लेले, मालतीबाई थत्ते आणि शरयूताई धोत्रे, या मावशींच्या परिचित जेव्हा त्यात सहभागी होऊ लागल्या तेव्हा प्रथम अगदी मर्यादित स्वरूपात मावशी त्यात भाग घेऊ शकल्या.

१९२१ मध्ये आमच्या कुटुंबात आणखी एक अल्पवयीन मृत्यु झाला. तो म्हणजे आमच्या धाकट्या काकू ( यशवंतरावांच्या पत्नी ) अन्नपूर्णाबाई यांचा. त्या, मावशी आणि उमाकाकू यांचे परस्परातील संबंध बहिणी-बहिणींप्रमाणे अत्यंत जिव्हाळ्याचे होते. अन्नपूर्णाकाकू दिसावयास अत्यंत देखण्या असून त्यांचा स्वभाव लाघवी होता. मौजेने हंसत खेळत सर्वांशी सलोखा निर्माण करून सासरचे माहेर-गृहात परिवर्तन करण्याची कला त्यांचेपासून शिकण्यासारखी होती, असे मावशी सांगतात. म्हणूनच प्रसूतीकालात जेव्हा त्यांचा मृत्यु झाला, तेव्हा मावशी व काकूंना बहीण गेल्या इतके दुःख झाले.

अन्नपूर्णाबाईच्या मृत्यूनंतर यशवंत काकांनी त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे दुसरे लग्न केले. मावशींच्या या नवीन जाऊबाई धुळे येथील प्रसिद्ध वकील महादेवराव आपटे यांच्या

कन्या शांताबाई. शांताकाकू इंग्रजी शिक्षण घेतलेली, त्या पिढीतील पहिली सून. पुण्या-मुंबईस वास्तव्य झालेले असल्याने त्यांच्या प्रवेशाने आमच्या कुटुंबाला काही प्रमाणात नवी दिशा मिळाली. शिकलेल्या असल्या तरी सुप्रतिष्ठित घराण्यातील असल्यामुळे आमच्या कुटुंबाशी त्या लवकरच समरस झाल्या.

१९२२ साली जानकीबाई बजाज यांनी आपल्या वाड्यात आपल्या मैत्रिणींना व परिचितांना एकत्र जमवून सूतकताईचा कार्यक्रम सुरू केला. मावशीही या 'समाजात' जाऊन सूतकताई करू लागल्या. याच वेळी आमच्या घरी परदेशी कपडा, साखर आणि इतर वस्तू मावशींनी बंद करविल्या. स्वतः मावशींनी चहा किंवा कॉफी पीणेही सोडून दिले. हा नियम पुष्कळ वर्षे टिकला. कारण मध्यंतरी प्रकृतिकारणास्तव त्यांनी चहा घेणे सुरु केले होते. आता त्याच कारणास्तव पुन्हा चहा-कॉफी घेणे बंद केले आहे.

१९२३ च्या मार्च मध्ये आमचे द्वितीय बंधू पद्माकरपंत यांचा जन्म झाला. जन्मतःच त्याचा वरचा ओंठ कापलेला होता. त्यामुळे मावशींना एक काळजीच होती. तथापि ३।४ महिन्यांनी त्याला पुण्यास नेऊन तेथील प्रसिद्ध सर्जन व्ही. श्री. गोखले यांचेकडून ऑपरे-शन करवून घेतले. ही काळजी दूर होत नाही तोच आमच्या वडिलांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. त्याकाळी अपेंडिक्सचा आजार भयंकर समजला जाई. त्याचे ऑपरेशन करणारे निष्णात असे सर्जन नागपूर-वऱ्हाडात नव्हतेच. मुंबईचे प्रसिद्ध सर्जन डॉ. गोपाळ-राव देशमुख हे मूळचे वर्धा जिल्ह्यातील वाढोण्याचे. त्यामुळे त्यांचा आणि आमचा परिचय होताच. त्यांचेकडून ऑपरेशन करवून घेण्याचे ठरले. डॉ. देशमुखांनी यशस्वी शस्त्र-क्रिया केल्याने आमच्या वडिलांची प्रकृति सुधारली हे जरी खरे असले तरी पूर्वीइतकी सुदृढता पुढे कधीच राहिली नाही.

आजारातून उठल्यानंतर कालांतराने आमच्या वडिलांनी पुन्हा शेतीवाडीकडे लक्ष द्यावयास आरंभ केला. शिवाय तेथील 'सोशल क्लब'च्या कार्यात ते अधिक लक्ष घालू लागले. त्या कालात बरीच वर्षे क्लबचे कार्यवाह म्हणून त्यांनी कार्य केले. त्यांच्या कार्य-कालात क्लबची बरीच भरभराट झाली. बिलियर्डस् ह्या अत्यंत महागड्या खेळासाठी त्यांनी खटपट करून वर्गणी जमविली, व क्लबसाठी उत्तम टेबलची व्यवस्था करविली. याच सुमारास प्रांतातील उत्तम खेळाडूंना पाचारण करून त्यांनी टेनीस व ब्रिजचे सामने भरविले.

सोशल क्लबच्या वरील कार्यात मग्न असतानाच त्यांनी व्यक्तिगत असा एक मोठा कार्यक्रम हाती घेतला. वर्धा गावाला लागूनच आमचा बगीचा आणि शेती होती. तेथे 'केळकर वाडी' नामक वर्धेतील पहिली खाजगी वसाहत निर्माण करण्याची योजना त्यांनी आखली. शेतीच्या जागेत प्लॉटस् व रस्ते तयार करण्यात आले. बगीच्याला भक्कम असे

नवीन कुंपण घालून आत वसाहतीच्या लोकांना पोहण्यासाठी एक तलाव खोदण्याचेही कार्य सुरु केले. परन्तु निरनिराळ्या अडचणींमुळे हे त्यांचे कार्य अर्धवटच राहिले. 'केळकरवाडी' वसविताना योग्य असेल तेथे हप्त्यांनी प्लॉटस् विकण्याची प्रथाही त्यांनी अवलंबिली होती. या वसाहतीच्या विकासासंबंधी त्यांच्या बऱ्याच कल्पना होत्या. परन्तु पुढे आजारामुळे त्यापैकी काहींना मूर्तस्वरूप येऊ शकले नाही.

उल्लेखित कालात अर्थातच मावशींना उत्तम मनस्वास्थ्य लाभले. त्यांनी रमाबाई केदार ( नागपूर विद्यापीठाचे उपकुलगुरु कै. नानासाहेब केदार यांच्या पत्नी ) यांच्या सह-कार्याने एक भगिनी मंडळ स्थापन केले. सौ. सुशीलाबाई मोहनी आणि विमलाबाई बेहेरे त्यावेळी वर्धेसच असल्याने या दोघीही या मंडळात येत असत. पत्त्याचा बिझिक हा खेळ त्या मंडळाचा प्रमुख कार्यक्रम होता. या शिवाय अल्प प्रमाणात पुस्तकांचे वाचनही होई. त्या काळी सुखवस्तू कुटुंबातील स्त्रियांची अथवा शिक्षित महिलांची मजल बहुधा इथपर्यंतच जात असे. या नियमास मावशीही अपवाद राहिल्या नाहीत. परन्तु ही परिस्थिती नेहमीसाठी टिकणारी नव्हती.

प्रस्तुत लेखकाचा जन्म ४ ऑगस्ट १९२५ रोजी रक्षाबंधनाचे दिवशी झाला. या-पूर्वी २ मुलगे असल्यामुळे माझ्या जन्माचे अगोदर उमाकाकू मावशींना बोलून गेल्या होत्या की 'आता जर तिसरा मुलगाच झाला तर तो माझा.' मावशींनी अर्थातच होका-रार्थी उत्तर दिले होते. त्यामुळे माझ्या जन्मानंतर मी 'काकूंचा मुलगा' असे मानले जाई.

लहानपणी प्रस्तुत लेखक अतिशय बंड होता. त्यामुळे त्यास मावशींच्या हातचा भरपूर ' प्रसाद ' मिळालेला आहे. आमच्या वडिलांच्या मृत्यूनंतर आम्हा आठ भावं-डांची जबाबदारी मावशींवर होती. अर्थात अक्का आणि ताई यांचा फारसा प्रश्न नव्हता. कारण एक तर आमच्या मानाने त्या मोठ्या होत्या, शिवाय स्त्री–जाती स्वभावानुसार त्या तशा त्रासदायक नव्हत्या. परन्तु आम्हा ६ जणांना काबूत ठेवून योग्य मार्गाने जाव-यास लावणे तितके सरळ काम नव्हते. मावशींनी या बाबतीत आमच्या वडिलांची जागा उत्तम प्रकारे भरून काढली. एखाद्या कडक शिस्तीच्या पित्या इतकाच आम्हा मुलांना त्यांचा वचक असे. इतका की, स्वाभाविक असा त्याचा इष्ट प्रमाणातील अवशेष आम्ही आजही अनुभवतो. अशा प्रकारे, पित्याची उणीव तर मावशींनी भरून काढली; मग त्यांची मातेची भूमिका कोण वठविणार ? आमचे अक्षम्य अपराधही मातेच्या ममतेने पोटात घालण्याचे काम कोणते स्त्रीहृदय करणार ? उमाकाकूंनी, केवळ प्रस्तुत लेखकालाच नव्हे तर आम्हा सर्वांना मनापासून आपली मुले मानून ती भूमिका वठविली. म्हणूनच विट्टी-दांडू तयार करून घेण्यासाठी पैसे मागण्याचा प्रसंग असो अथवा एखाद वेळी परीक्षा जवळ आल्या असताही सिनेमा पाहण्याची परवानगी मागण्याचा किंवा सुट्टीच्या दिवशी मित्रांसमवेत वर्धेशेजारच्या हनुमान टेकडीवर लुटुपुटुच्या लढाईचा खेळ खेळण्यास्तव संपूर्ण

दिवस घालविण्याची परवानगी असो, सहजासहजी मावशींकडे जाण्याची हिंमत होत नसे. काही कारणास्तव काकूंनी आपला निश्चित निर्णय दिला नाही, तरच मावशींच्या 'हाय-कोर्टात' जाण्याचा प्रसंग येई. तथापि, काकूंच्या 'कोर्टात' मनाजोगा निर्णय मिळाला नाही असे क्वचितच घडले असेल.

या सुमारापर्यंत एकीकडे गांधीप्रणीत राजकारणाची बीजे भारताच्या भूमीत रुजू लागल्याची चिन्हे दिसत असतानाच, दुसरीकडे मात्र त्यांचे मुसलमान-जातिविषयक धोरण चुकीचे असल्याचा प्रत्यय येऊ लागला होता. कारण १९२४ ते २७ या कालखंडात सर्वसाधारणपणे देशभर आणि विशेषतः नागपूर प्रांती मुसलमानांनी सरकारवर राजकीय दडपण आणण्यासाठी व हिंदू समाजाला दहशत बसविण्यासाठी कुरापती काढून ठिक-ठिकाणी दंगे घडवून आणले. विदर्भात नागपूर, कामठी, आर्वी आणि अकोट येथे एक किंवा जास्त वेळा दंगे होऊन बरेच लोक मृत्युमुखी पडले. मशिदी समोरील वाद्यवादना-वरून भांडणे उकरून काढणे, गोहत्या व विशेषतः हिंदु स्त्रियांचे अपहरण आणि बलात्कार या कुरापती हेतुपुरस्सर काढल्या जाऊ लागल्या. यावेळी हिंदु पुरुष-समाजच असंघटित-पणामुळे जिथे दौर्बल्य अनुभवित होता तिथे 'अबला' म्हणून गणल्या गेलेल्या स्त्रियांची काय कथा ? म्हणूनच ठराविक वेळेपेक्षा जास्त घराबाहेर राहता कामा नये, किंवा गावच्या ठराविक वस्तीतूनच वावरावे अशा स्वरूपाची त्या काळी स्त्रियांवर बंधने असत. आजची स्त्री या बाबतीत कितीतरी अधिक प्रमाणात 'स्वतंत्र' आहे.

याविरुद्ध परिस्थिती मुसलमान समाजाची होती. खिलाफत चळवळी प्रीत्यर्थ एकदा जागृत आणि संघटित झालेला मुसलमान समाज, पुढे त्या चळवळीचा मूळ उद्देशच संपु-ष्टात आल्याने, कदाचित वैफल्यग्रस्त होऊन असंघटित होईल, म्हणून त्या वेळच्या मुसल-मान पुढाऱ्यांनी धूर्तपणे दुबळ्या मनोवृत्तीच्या हिंदूविरुद्ध आपल्या बांधवांना भडकवून 'पॅन इस्लामचा' झेंडा फडकत ठेवला. १९२४ पासून देशभर उद्‌भवलेले हिंदुमुस्लीम दंगे हा अर्थात् याच धोरणाचा परिपाक होय !

अशातच कुत्र्याच्या शेपटीप्रमाणे कधीही सरळ होऊ न शकणारी मुस्लीम मनोवृत्ती लक्षात घेऊन ज्यांनी अगदी प्रथम हिंदुसंघटनेचा मंत्र दिला त्या स्वामी श्रद्धानंदांवर अब्दुल रशीद नामक धर्मांध मुस्लीमाने अत्यंत भ्याडपणे हल्ला चढवून दिनांक २३ डिसेंबर १९२६ रोजी त्यांचा खून केला. त्या विवक्षित परिस्थितीतील स्वामीजींच्या अंताची घटना मनावर कायमची कोरली गेली असे मावशी सांगतात.

स्वामी श्रद्धानंदांच्या दुःखद मृत्यूनंतर जरी प्रथमच बऱ्याच तत्कालीन काँग्रेस जनांचे डोळे उघडले गेले, तरी खुद्द नागपुरातील एक व्यक्ति मात्र यापेक्षा कितीतरी पूर्वी हिंदुच्या शारिरिक आणि मानसिक दौर्बल्याने दुःखी होऊन त्यावर उपाय योजण्यात गर्क झाली होती. काँग्रेसच्या राजकारणात संपूर्णपणे गढून गेल्यानंतरही जेव्हा हिंदुस्थानच्या उज्ज्वल

भवितव्याविषयी त्या व्यक्तीच्या मनात विचार येत तेव्हा गांधीजींनी देशाच्या राजकारणात हिंदुमुस्लीमांच्या ऐक्याला ज्या प्रकारचे महत्त्व दिले होते ते अनाठायी आहे असे त्या व्यक्तीस वाटे. ती व्यक्ति म्हणजे दुसरीतिसरी कोणी नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक प. पू. केशव बळीराम हेडगेवार ही होय. मुस्लीम धार्जिणेपणाच्या कोलाहलात एकाकीच का होईना परन्तु एक वेगळा निनाद उमटविण्याची त्यांना नितांत आवश्यकता भासली. त्याप्रमाणे, आज ना उद्या शेकडो सहकारी मिळतील या दुर्दम्य आशेने, १९२५ सालच्या विजयादशमीच्या मुहूर्तावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, या हिंदू संघटनेची नागपूर मुक्कामी त्यांनी मुहूर्तमेढ केली.

१९२८ साली मावशींना गंभीर स्वरूपाचा आजार आला. त्यावेळी आमचे आप्त, नागपूरचे डॉ. ना. भा.खरे यांचेकडून योग्य वेळी वैद्यकीय उपचार झाल्याने त्यांच्या जिवावरचे संकट टळले. घटना अशी घडली की आमचा धाकटा भाऊ रत्नाकर याच्या जन्माआधी दोन दिवस आमच्या वडिलांचे परमस्नेही गंगाधरपंत कावळे वकील यांच्या पत्नी, मावशींच्या जिव्हाळयाच्या सौ. उमाबाई कावळे या एकाएकी प्रसूतावस्थेतच कालवश झाल्याची वार्ता त्यांच्या कानी आली. या घटनेचा त्या नाजूक अवस्थेत मावशींच्या मनावर इतका जबरदस्त आघात झाला की त्या फार आजारी झाल्या. आजारातच त्यांना धनुर्वाताचा झटका आला. त्यातून त्या वाचतील असे कोणासही वाटले नव्हते. परन्तु डॉ. खरे यांनी अचूक निदान करून योग्य औषधयोजना केल्याने त्यांचे प्राण वाचले. त्यावेळी बरेच दिवस मावशींना बिछान्यातच काढावे लागले होत.

रत्नाकरला पहिल्या १० दिवसांतच आईपासून दूर राहावे लागले. या संबंधीची आठवण सांगताना उमाकाकू म्हणायच्या, “ रत्नाकरला पहिल्या दिवशीपासून जो आई जवळून उचलला तो दीड महिन्यानंतर सुखरूपणे त्यांचा स्वाधीन करताना मला अतिशय आनंद झाला ”

प्रस्तुत परिस्थितीमुळे बाल्यावस्थेत रत्नाकरची प्रकृति फारच नाजूक राहिली. आयुष्यभर हा असाच दुखणेकरी राहणार की काय अशी काळजीही मावशींना कित्येक दिवस लागून राहिली होती. परन्तु वयाचे १४ वे वर्षी जेव्हा तो व्यापारी नौदल अधिकारी-प्रशिक्षणाच्या ‘डफरीन’ ( नवीन नामकरणानुसार ‘राजेंद्रप्रसाद’ ) बोटीसाठीच्या शारीरिक आणि इतर चाचणी परीक्षात उत्तम प्रकारे पास होऊन तीन वर्षाच्या प्रशिक्षणानंतर अंतिम परिक्षेत चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाला तेव्हा कोठे मावशींची त्याच्या संबंधीची काळजी खऱ्या अर्थी दूर झाली.

सर्व स्तरांतील योग्य व कामसू व्यक्तींना जोडणे हे मावशींमधील वैशिष्ट्य फार पूर्वीपासून दिसून येते. शिवाय त्यांनी एकदा जोडलेली व्यक्ती सहसा दुरावत नाही, असेही आढळते. आमच्याकडे आजोबांच्या वेळेपासून चंद्राबाई कोंडेवार नांवाच्या तेलंगी समाजाच्या

बाई प्रथम दळणकांडणासाठी म्हणून होत्या. बाई अत्यंत कामसू आणि भरंवशाच्या असल्यामुळे मावशींचा त्यांच्यावर फार विश्वास. रत्नाकरच्या आजाराचे काळात त्यांनी त्याची व मावशींची बरीच सेवा केली.

चंद्राबाईंना दोन मुले आहेत. नारायण व यमुना. ती दोघेही शिकली व जीवनात यशस्वी झाली. यमुना लहानपणापासून आमचेकडे वत्सलाताईची मैत्रीण म्हणून जात-येत असे. आमच्या घरी तिच्यावर जे संस्कार झाले होते, त्या पोटी तिने मोठ्या खंबीरपणे आणि विवक्षित ध्येयवादास चिकटून आपले जीवन व्यतीत केले आहे. या मायलेकीतील पारस्पारिक जिव्हाळा तर स्वाभाविकच आहे, परन्तु त्या दोघी आणि मावशी यांमधील आजतागायत चालत आलेला सद्भाव जरी अतर्क्य नसला तरी असाधारण मात्र खास आहे.

मावशी आजारातून बऱ्या होत नाहीत तोच देशात 'सायमन कमिशन' विरोधाचा डोंब उसळला. भारतीय जनतेकडेच क्रमाक्रमाने राज्यकारभार सोपविण्याच्या उद्देशाने पुढची पायरी म्हणून आणखी अधिकार सोपविण्याचे ठरविल्यास ते कितपत योग्य होईल या संबंधी चौकशी करण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली, भारतीयांचे प्रतिनिधित्व नसलेले, ब्रिटिश सदस्यांचे एक मंडळ इंग्रज सरकारने भारतात पाठविले. सर्वच राजकीय पक्षांनी एक-मताने त्याला विरोध करण्याचे ठरविले. त्यानुसार 'Simon go back' हे घोषवाक्य त्यावेळी भारतात घरोघरी उच्चारले जाऊ लागले. भारतीय जनतेचा विरोध दडपून टाकण्याचा सरकारने पुरेपूर प्रयत्न केला. दडपशाहीच्या वाम्तूवर तेव्हा कळस चढला, की जेव्हा ३० ऑक्टोबर १९२८ रोजी लाहोर स्टेशन समोर सायमनविरोधी मोर्चाचे नेतृत्व करीत असलेल्या देशभक्त लाला लजपतराय यांच्या छातीवर गोऱ्या सोजिरांनी बुटाच्या टोकरा मारल्याने त्यांचा १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मृत्यु झाला. समस्त भारतीय जनता या घटनेमुळे खवळून उठली. परिणामतः सायमन विरोधाचे वारे अधिक जोराने वाहू लागले.

१९२९ च्या १४ मार्चला सायमन कमिशन नागपूरला येणार होते. त्या दिवशी नागपूर आणि मध्यप्रांतात ठिकठिकाणी हरताळ पाळण्यात आला. आरंभापासूनच राजकीय चळवळीच्या क्षेत्रात बहुधा नागपूरच्या खालोखाल आणि कधी कधी नागपूरचे वरचढही वर्धा नगरीने कार्य केले आहे. त्यामुळे कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या वर्धेस वारंवार भेटी घडून येत. या सुमारास नरकेसरी अभ्यंकर हे नागपूर-वऱ्हाडचे अग्रगण्य कॉंग्रेस पुढारी होते. जवळचे आप्त म्हणून वर्धेस त्यांचा मुक्काम नेहमी आमचेकडेच असे. वस्तुतः आप्तांमधील पारस्परिक शिष्टाचाराच्या रूढ संकेतां-बद्दल 'नरकेसरींना' वावडे होते. तरीही मावशी आणि आम्हा वेळकर कुटुंबियांना त्यांच्या सार्वजनिक कर्तृत्वासंबंधी आदर असल्याने त्यांनी अंगिकारलेल्या कार्यास शक्य तितके सहाय्य-भूत होण्याचा प्रयत्न असे. म्हणूनच सायमन विरोधी एका मिरवणुकीत सहभागी होऊन मावशी प्रथमच अशा स्वरूपात घराबाहेर पडल्या.

१९२९ च्या डिसेंबरात पं. जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली लाहोरला झालेले

काँग्रेसचे अधिवेशन हे १९३० च्या ऐतिहासिक स्वातंत्र्य चळवळीचे 'मंगलाचरण' म्हणून फारच गाजले. २६ जानेवारी हा 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळण्याचा निर्णय याच अधिवेशनात घेण्यात आला. १२ मार्च रोजी गांधीजींची मिठाच्या सत्याग्रहासाठी योजलेली 'दांडी यात्रा' सुरु झाली. २४१ मैलांचे अंतर २४ दिवसात चालून ते ५ एप्रिल १९३० रोजी दांडीला पोहोचले. दुसरे दिवशी सत्याग्रह करून त्यांनी कायदेभंगाचे शिंग फुंकले.

सायमन कमिशन विरोधी चळवळ नागपूर-वर्धा क्षेत्रात विशेष तीव्र स्वरूपाची झाल्याने भावी स्वातंत्र्यसंग्रामासाठी हे क्षेत्र पुरेसे तयार झाले होते. या संबंधी १९३५ साली झालेल्या काँग्रेस रौप्य महोत्सवानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या नागपूर प्रांताच्या अधिकृत इतिहासात जी माहिती देण्यात आली आहे, ती अशी :

"नागपुरातील सायमन कमिशनवरील बहिष्काराची प्रचंड चळवळ व त्यावेळी नागपूरच्या जनतेने दाखविलेला अपूर्व उत्साह ह्याचे वर्णन पूर्वी येऊन गेलेले आहे. सायमनची प्रतिमा जाळण्याची बेगुमान वृत्ति व सायमनला दिलेल्या पार्टीच्या वेळी नागपूरच्या लोकांनी दाखविलेला बेदरकारपणा हिंदुस्थानभर दुसरीकडे दाखविला गेला असेल की काय याची शंकाच आहे. सायमन बहिष्काराच्या वेळी नागपूरच्या जनतेस सरकारशी झुंजण्याचे जे शिक्षण मिळाले तिचेच परिणत स्वरुप १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत दिसून आले."

स्त्रियांनी राजकीय चळवळीत मोठ्या प्रमाणावर भाग घेण्याची सुरवात निदान या प्रांतात तरी १९३० च्या चळवळीपासूनच झाली. या संबंधी काँग्रेसच्या इतिहासात खालीलप्रमाणे वर्णन आहे :

"श्री शेरलेकरानंतर सौ. अनसूयाबाई काळे ह्या अध्यक्ष झाल्या. नागपुरात युध्द-मंडळाची अध्यक्ष एक स्त्री निवडली जाणे ही एक वैशिष्ट्यपूर्ण घटना होती. परन्तु ह्या वर्षी स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळीस व कायदेभंगाच्या वातावरणास जो सक्रिय व स्वार्थत्यागपूर्वक पाठिंबा दिला त्यामुळे स्त्रियादेखील सविनय कायदेभंगाच्या चळवळीत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सरकारशी लढू शकतात हे सिध्द झाले. १९३० साली महात्मा गांधींनी स्त्रियांच्या दृष्टिकोनात मोठीच क्रांती घडवून आणली. ज्या बायकांचे नख देखील लोकांस दिसावयाचे नाही अशा पडदानशीन बायका देखील मिठाच्या सत्याग्रहापासून कायदेभंगाच्या राष्ट्रीय चळवळीत सामील झाल्या. देशसेविका संघ व सूत कमिट्या स्थापन झाल्या. प्रभात-फेऱ्यात तर विशेषेकरून स्त्रियाच भाग घेऊ लागल्या".

यापूर्वी एकदा उल्लेख केल्याप्रमाणे नागपूरप्रमाणे वर्धाही राजकीय चळवळीत नेहमीच अग्रेसर राहिल्याने तेथील स्त्रियाही या चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी होऊ लागल्या. आमचे वडील फारसे अनुकूल नसताही या सुमारास मावशी प्रभातफेऱ्या, पिकेटिंग आदि कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होऊ लागल्या. आमच्या हिंगणघाट (जि. वर्धा) निवासी

काकू कैलासवासी रमाबाई केळकर यांनी तर सत्याग्रहात प्रत्यक्ष भाग घेऊन कारावासही पत्करला.

मावशी काँग्रेसच्या चळवळीत शिरल्या, पण मर्यादित प्रमाणात. नियतीची तशी इच्छा असती तर त्यातच अधिकाधिक गुंतून आज कदाचित त्या काँग्रेस वर्तुळात ठळकपणे दिसत्या. पण असे घडावयाचे नव्हते. त्यास जी कारणे घडली ती पुढे विस्ताराने येणारच आहेत.

एप्रीलमधील दांडीयात्रेनंतर देशभर चळवळीचे स्वरूप तीव्र झाले. विदर्भात वर्धा, नागपूर, भंडारा जिल्ह्यांतील अनेक स्त्री-पुरुष या चळवळीत सहभागी होऊन त्यांनी कारावास पत्करला. ४ मे रोजी गांधीजींनाही अटक करण्यात आली. त्यांना पुण्याजवळील येरवडा तुरुंगात स्थानबध्द करण्यात आले. ही सर्व धामधूम चालू असतानाच ५ मे १९३० रोजी आमचा धाकटा भाऊ कमलाकर याचा जन्म झाला. अर्थात अशा परिस्थितीत, इच्छा असली तरी, कोणत्याही स्वरूपात चळवळीत सहभागी होणे मावशींना अशक्य होते, हे स्पष्ट आहे.

१९३० च्या यशस्वी चळवळीमुळे ब्रिटिश सरकारला निदान वरकरणी का होईना परन्तु समेटाचा पवित्रा घ्यावा लागला. त्यानुसार १९३० ची अखेर ते १९३२ अखेर, ह्या कालखंडात प्रामुख्याने वाटाघाटींचेच वारे वाहिले. गांधी आणि व्हाईसरॉय लॉर्ड इर्विन यांच्यातील करार आणि तदनंतर लंडनमध्ये घेण्यात आलेल्या तीन 'गोलमेज परिषदा' ह्या त्या कालखंडातील प्रमुख घटना होत. एकप्रकारे या कालात राजकीय क्षेत्रात प्रशान्तावस्थाच राहिली. शिवाय १९३० च्या आरंभापासूनच संबंध जगभर आर्थिक मंदीची लाट पसरू लागल्याने भारतापर्यंत तिची झळ पोहोचली.

१९३० ते १९३२ हा कालखंड मावशींच्या व्यक्तिगत जीवनाचे संबंधातही एक प्रकारे प्रशान्तावस्थेचाच काल होय. कारण १९३२ च्या एप्रील मधील आमचा सर्वात धाकटा भाऊ आनंद यांच्या जन्माच्या सुखद घटनेची रुपेरी कडा सोडली तर उर्वरीत सर्व काल काळजीच्या काळ्याकुट्ट ढगांनी झाकाळलेलाच राहिला. १९३० च्या सुरवातीच्या भागात आमचे वडील विषमज्वराने बरेच आजारी झाले. त्यातून ते लवकर बरे झाले नाहीत. नागपुराहून डॉ. खरे आले होते. ते प्रकृति तपासून गेले. त्यांनी संपूर्ण दात काढून टाकण्याचा सल्ला दिला. त्यानुसार सर्व दात काढून टाकले. पण जो बारीक ताप येत होता तो लवकर हटला नाही. १९३१ च्या मध्यात काही काल प्रकृती नीट राहिली. परन्तु पुन्हा ताप येणे सुरु झाले. आता हे दुखणे क्षयावर जाते की काय अशी जी भीति निर्माण झाली होती तीच अखेर खरी ठरली !

क्षयाची बाधा होणे म्हणजे मृत्यूलाच आमंत्रण, ही त्या काळची परिस्थितीजन्य अटकळ असल्याने मावशींच्या मनाची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाही करणे कठीण आहे. आयुष्याच्या ऐन उमेदीत अशा स्वरूपाचा आघात होणे या सारखा ईश्वरी परीक्षेचा कठीण प्रकार दुसरा कोणता असू शकेल ! अर्थात् एकीकडे सर्व प्रकारच्या वैद्यकीय उपचारास

आणि दुसरीकडे सर्वशक्तिमान विधात्याला शरण जाऊन त्याची करुणा भाकण्यानिमित्त रूढ असलेल्या जपतप व्रतवैकल्यादि उपायांस आरंभ झाला. १६ वर्षे 'मंगळागौरीचे व्रत', कडक 'चतुर्थी व्रत' 'वट सावित्री व्रत'; या शिवाय मंत्र-स्तोत्रादिकांचे पठण यांचा त्यात अंतर्भाव होता.

वरील परिस्थितीत मनुष्याच्या मनाची फारच नाजूक अवस्था असते. आणि मजा ही की अशा वेळी परिस्थितीचा प्रत्यक्ष प्रहार झालेली व्यक्ति तर सोडूनच द्या पण आजूबाजूच्या आप्त परिचितांतही भीति आणि शंका यांचे काहूर माजते. साहजिकच मावशींचे बाबतीतही असेच घडले. कुणाला काही शंका यावी व त्याने उपाय सांगावा, आणि मावशींनी तो करून पहावा हा क्रम अखंड रीत्या चालू होता. जसे कुणाला शंका आली की आमचे थोरले काका सदाशिवराव अचानकपणे प्लेगच्या साथीत वयाच्या केवळ २४व्या वर्षी वारले, तर मधले काका लक्ष्मणराव यांचाहि काविळीचे आजाराने अल्पवयीन मृत्यु झाला. आणि अशा अगदी तरुणावस्थेतील मृत्यूंच्या मालिकेस 'कुटुंबातील कुणीतरी औदुंबराचा वृक्ष तोडला' असण्याची शक्यता कारणीभूत असावी. झाले ! अशा प्रकारची घटना प्रत्यक्षात घडली किंवा नाही या संबंधी फारशी चौकशी न करता मावशींनी औदुंबराला कोटि प्रदक्षिणा घालण्याचे व्रत आरंभले.

दैवी उपायांनी दैवगतीत बदल घडवून आणता येतो की नाही ? या प्रश्नाचे निश्चित उत्तर देता येणे कठीण आहे. तथापि, निदान प्राप्त परिस्थितीस खंबीरपणे तोंड देण्यासाठी प्राथमिकपणे आवश्यक अशा मनोधैर्याची मात्र त्यामुळे प्राप्ती होऊ शकते, ह्या सत्याची मावशींच्या उदाहरणावरून प्रचीति येण्यासारखी आहे.

उत्तम वैद्यकीय उपचार आणि कठीण अशा व्रतवैकल्यांच्या उपासनेनंतरही आमच्या वडिलांच्या प्रकृतीत फारशी सुधारणा होत नाही असे दिसताच त्याकाळी देशात प्रख्यात गणल्या जाणाऱ्या मद्रास जवळील मदनपल्लीच्या सॅनिटोरियममध्ये उपचारार्थ त्यांना ठेवण्यात आले. तेथे डॉ. डेव्हिड नांवाचा प्रख्यात डॉक्टर प्रमुख होता. मदनपल्लीला वडिलांचे सोबतीस प्रथम मावशी आणि थोरली भगिनी वत्सलाताई आणि नंतर, मावशी वर्धेस परतल्यामुळे, उमाकाकू होत्या. तेथे प्रथम महिनाभर त्यांना बरे वाटले, परंतु वास्तविक प्रकृतीत फारशी सुधारणा झालीच नाही.

मदनपल्लीहून परतताना मावशींच्या समोर काळजीचा एक मोठा डोंगरच होता. प्रयत्नांच्या पराकाष्ठेनंतरही यश दृष्टिपथात येत नव्हते. दुखण्याचा जोर वाढतच गेल्याने वडिलांनी परत वर्धेस जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे जूनच्या मध्यात परतण्याचा दिवस नक्की ठरला. निघण्याचे आदले दिवशी उमाकाकूंना खुणेनेच जवळ बोलावून अश्रुपूर्ण नेत्रांनी ते त्याना म्हणाले :

" उमावहिनी, आता आम्ण वर्धेस परतणार. त्यानंतर तेथे सांगावयास सवड मिळेल की नाही सांगता येत नाही, कारण मी आता अगदी थोडया दिवसांचाच सोबती आहे, असे माझी मनोदेवता सांगत आहे. तरी माझ्या पश्चात् लक्ष्मी (मावशी) आणि मुलांना तुम्हीच संभाळा अशी माझी विनंती आहे."

हे शब्द ऐकून उमाकाकूंच्या मनात चर्रर् झाले. क्षणभर त्या अवाक् झाल्या. परन्तु सारे धैर्य एकवटून त्या बोलून गेल्याः

" भावजी, तुम्ही शांत रहा ! मुळीच काळजी करू नका !! दुर्दैवाने असा प्रसंग आलाच तर माझ्यातील सर्व शक्तिनिशी सोपविलेली जबाबदारी मी पार पाडीन."

हे एकून भाऊसाहेबांना इतके बरे वाटले की वर्धेस परतताना प्रवासाचा शीण त्यांना फारसा जाणवला नाही, असे काकू सांगत.

वर्धेस आल्यानंतर भाऊसाहेबांच्या प्रकृतीत सुधारणा झालीच नाही. परन्तु आपला शेवट समीप आलेला आहे याची चाहूल लागल्यानंतरही ते आता पूर्वी इतके सचिंत कधीच वाटले नाहीत. एकतर मावशींच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना खात्री होती, आणि दुसरे म्हणजे उमाकाकूंनी दिलेल्या शब्दामुळे तर जणू ते निश्चिंत झाले होते. त्यावेळी जरी प्रस्तुत लेखक केवळ ७ वर्षांचा होता तरी काकूंच्या वर उल्लेखित माहितीस त्याच्या त्या वेळच्या एका आठवणीने जो दुजोरा मिळतो तो असा :

अगदी शेवटच्या काही दिवसांत भाऊसाहेबांचे एक मित्र ( हे गृहस्थ वर्धेस न्यायाधीश होते) त्यांच्या समाचारासाठी आले होते. भाऊसाहेबांसाठी जी खोली होती तिकडे जाण्यास आम्हा मुलांना मज्जाव असे. तथापि कुतुहलाने त्या खोली जवळून जाताजाता आत डोकावण्याचा चाळा केल्याशिवाय मला स्वस्थ बसवत नसे. ते गृहस्थ आले असताना असाच मी तिथून जाऊ लागलो, तेव्हा भाऊसाहेबांनीच खुणेने बोलावल्यावरून मी आत शिरलो. तेव्हा ते आपल्या मित्रास म्हणाले :

"यही तो है तुम्हारा दोस्त, 'चलने दो लडाई कहने वाला." त्यानंतर माझी थट्टा करण्यासाठी त्यांनी ( भाऊसाहेबांच्या मित्राने ) नेहमीचे खालील कडवे म्हटले तेव्हा तशाही अवस्थेत भाऊसाहेबांना मनापासून हसू आले. ते कडवे असे :

" पद्माकर, दिनकर दोनो भाई
आपसमे करते लड़ाई ।
पद्माकर बोलता मत करो भाई
दिनकर बोलता चलने दो लड़ाई ॥ "

त्यानंतर जेवढा वेळ मी तेथे उभा होतो तेवढा वेळ ज्या वातावरणात त्यांचे संभाषण चालले, त्यावरून उमाकाकूंच्या म्हणण्यातील तथ्याला दुजोरा मिळतो.

या नंतर दोनतीन दिवसांनीच म्हणजे बुधवार दिनांक ६ जुलै १९३२ रोजी भाऊसाहेबांची प्राणज्योत कायमची लुप्त झाली.

स्त्रीवर येऊ शकणारी सर्वात कठीण आपत्ति म्हणजे अकाली वैधव्य. आणि तीच मावशींच्या जीवनातही आली. अशी भयंकर स्वरूपाची आपत्ती अगदी अनपेक्षितपणे येणे एकप्रकारे बरे. कारण अपेक्षित संकटाचे वेळी मनाची तयारी करण्यास कालावधी मिळतो हे जरी खरे असले तरी संकटाची मुसर आ वासून समोर ठाकली असता मनाच्या तयारीपेक्षा मनाची ससेहोलपटच अधिक संभवनीय वाटते. आणि संकटाचा प्रत्यक्ष आघात झाल्यानंतर तर दोन्ही प्रकारात काहीच अंतर उरत नाही. मावशींवर आलेले संकट पहिल्या प्रकारचे, म्हणजे संभवनीय या सदरात मोडणारे होते. परन्तु असे असले तरी त्या मात्र माझ्या वरील विधानाला अपवाद ठरल्या, असेच म्हणावे लागेल. संकट अटळ आहे हे लक्षात येताच मनाची अस्थिरता वाढू न देता त्यांनी येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा विचार केला व खंबीरपणे त्या पार पाडण्याचा निर्धार केला.

पतिनिधनाच्या संकटाचा अनुभव कमी होईल असे विधात्याला वाटले म्हणूनच की काय न कळे, परन्तु भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर लगेच आणखी एक मोठी काळजी मावशींच्या समोर निर्माण झाली. काही दिवसांतच आमची ज्येष्ठ भगिनी शांता उर्फ अक्का हिची प्रकृति ठीक राहीनाशी झाली. तिला एकसारखा बारीक ताप येऊ लागला. वैद्यकीय उपचारांचे बाबतीत त्या काळी असलेली त्रोटकता हेच बहुधा याचे कारण. तसे नसते तर स्वतःची पर्वा न करता आपल्या आजारी पित्याची अविश्रांत सेवा करण्याचे तिला असे असे फळ न मिळते. वस्तुतः इतरांनीही भाऊसाहेबांची तितकीच सेवा केली होती. परन्तु नियमबद्ध प्रकारे घटना घडल्या असत्या तर 'एखाद्याचा दैवयोग' हा वाक्प्रचार तरी रूढ कां होता ? आणि म्हणूनच की काय न कळे 'Those, whom God loves, die young' ही दुःखी मनाची समजूत काढण्याचा प्रयत्न असलेली म्हण रूढ झाली असावी.

अक्का एक हुशार, नाकी–डोळी नीटस आणि करारी मुलगी होती. मुलींच्या शाळा नव्हत्या व वडील वसतीगृहात ठेवण्याच्या विरुद्ध होते यामुळे त्याकाळच्या अमरावती येथील मुलींच्या एकमेव शाळेत अक्काला आणि सौ. वत्सलाताईला न पाठविता घरीच मास्तरांची शिकवणी ठेऊन मॅट्रिक करावयाचे, असे ठरले होते. गणित हा अक्काचा आवडता विषय होता, अन् त्यात ती हुशार होती. परन्तु दोघींचीच ती 'शाळा' फार कंटाळवाणी होई. त्यामुळे गणिताचा अभ्यास सुरु झाला की अक्का मात्र, मास्तरांच्या नकळत, आपल्या दुसऱ्या आवडत्या विषयाच्या–चित्रकलेच्या–अभ्यासात रंगून जाई. असे असले तरी ती मॅट्रिक उत्तम प्रकारे पास झाली. खाजगी रीत्या अभ्यास करून मॅट्रिक पास होणारी ती वर्षेतील पहिली विद्यार्थिनी होय. तिच्या आजारात प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही यश आले नाही. ७ जानेवारी १९३४ रोजी नागपूर मुक्कामी तिचा मृत्यु झाला.

इतक्या हुशार मुलीचा दैवयोग मात्र असा खेदजनक असावा याचा मावशींच्या मनावर फारच परिणाम झाला. तथापि थोड्याच कालावधिपूर्वी झालेल्या भयंकर आघातामुळे हा धक्का त्यांनी सहज सोसला असेल, तर नवल कोणते ? यानंतर मुलगी म्हणून त्यांचे सर्व लक्ष आमची दुसरी बहीण वत्सला हिच्यात केंद्रीभूत झाले. १९३५ मधे मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांनी तिला विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी नागपुरास धाडले

सौ. वत्सला ही मावशींची सावत्र कन्या हा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. जेथे सावत्र नाते असते, तेथे स्त्री-सहजप्रवृत्तिनुसार आपपर भावाचे प्राबल्य होऊन एकंदर वातावरण कलहदूषित बनते, असा जो सर्वसाधारण अनुभव, तो आमच्या वाड्याला मात्र कधीच आला नाही हे नमूद करताना विशेष समाधान वाटते. स्त्री-मनोदौर्बल्याच्या या प्रकारापासून अलिप्त राहून किंवा प्रयत्नपूर्वक त्यावर विजय मिळवून मावशींनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे असे म्हणावयास हरकत वाटत नाही. विरोधजन्य शक्तिपेक्षा आपल्यातील सुप्त क्रियाशील शक्ती जागृत करण्याच्या दिशेने जर प्रयत्न झाला तर स्त्री अधिक सुखी होऊन तिच्याकडून अधिक प्रभावशाली कार्य घडू शकते याचा प्रत्यय यावरून येण्यासारखा आहे.

• • •

# कुटुम्ब-प्रमुख मावशी : ६

१९३५ साल उजाडल्यानंतर कालांतराने मावशींच्या मानसिक आणि प्रापंचिक वातावरणातील अस्थिरता निवळू लागली. त्यावर्षींच जुलैच्या आरंभी आम्ही आणि आमचे चुलते यशवंतराव यांच्यात सामायिक इस्टेटीची वाटणी होऊन वेगळे राहू लागलो. आता मावशीच आमच्या कुटुंबाच्या प्रमुख झाल्या. प्रापंचिक जबाबदारी नीट तऱ्हेने पार पाडण्यासाठी अर्थोत्पादनाचे प्रमुख साधन असलेल्या शेतीवाडीकडे आणि घरादारांकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक झाले होते. कारण मध्यंतरीच्या काळात याकडे दुर्लक्ष झाल्याने घरे मोडकळीस आली होती व शेतीचे उत्पन्न बरेच कमी झाले होते. फक्त आमच्या वाटणीस आलेले राहते मोठे घर बऱ्या अवस्थेत होते. अशा स्थितीत दैनंदिन खर्च नीट प्रकारे भागविण्यासाठी दरमहाच्या नगदी उत्पन्नात वाढ होईल अशी व्यवस्था करणे ही प्रथम गरज होती.

कुटुंब-प्रमुख या नात्याने वरील अडचणी दूर करणे ही जबाबदारी मावशींचीच होती. त्या वेळी आम्हा मुलांची मदत होणे शक्य नव्हते. कारण आम्ही सर्वच शाळकरी मुले होतो. म्हणून मावशींनी बाहेरून मदत घेण्याचे ठरविले. आमची शेती तीन ठिकाणी होती. पैकी एक ठिकाण तर वर्ध्यापासून बरेच दूर यवतमाळ जिल्ह्यात-म्हणजे सुमारे ५० मैल अंतरावर होते. शेती पाहण्याची व्यवस्था मावशींनी आपले बंधू नीळकंठराव यांचेवर सोपविली. त्याशिवाय नुकतेच वर्ध्यास आपल्या बंधूकडे शिक्षणाच्या निमित्ताने आलेल्या दत्तात्रय वैशंपायन या होतकरू विद्यार्थ्यास त्यांनी आमचेकडेच राहावयास बोलावून घेतले. उद्देश हा की शिक्षणासोबतच शेतीची कामेही त्याने शिकावी. त्याप्रमाणे दत्तू वैशंपायनचे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण आणि नंतर लग्न आदि आमचेकडेच झाले. तेव्हापासून आमच्या शेतीची जबाबदारी त्याचेकडेच असून आजतागायत ती तो उत्तम प्रकारे पार पाडीत आहे. ठराविक कामासाठी ठराविक प्रकारच्या व्यक्तींची योजना करणे यासंबंधी मावशींची कुशलता यानून दिसून येते.

शेतीची व्यवस्था तर नीट झाली. आता दरमहा नगदी उत्पन्नात वाढ करण्यासाठी मावशींनी जी योजना कार्यान्वित केली, ती अशी :

पूर्वी राहत्या घरात घरमालकाने आपल्या शेजारीच भाडेकरू ठेवणे हे प्रतिष्ठेला बाध आणणारे समजले जाई. प्रतिष्ठेचे हे खोटे लक्षण आहे, हे लक्षात घेऊन मावशींनी आमच्या राहत्या आणि इतर घरांत आवश्यक असे बदल करण्याचे ठरविले. परन्तु यासाठी नगदी पैसा नव्हता. त्याकाळी बँकेकडून अशा कामासाठी कर्ज मिळण्याचीही सोय नव्हती. काही जमीन विकून पैसा उभा करता आला असता. पण त्यांनी हे कटाक्षाने टाळले. मग योजना यशस्वी व्हावी कशी ? त्यासाठी त्यांनी एक वेगळाच मार्ग स्वीकारला. स्त्री-धन म्हणून त्यांच्या वाट्याला जे सोने आले होते ते विकून पैसा उभारण्याचे त्यांनी ठरविले. हा त्यांचा विचार कळल्यानंतर एक दिवस एक परिचित आमचेकडे आले व त्यांना म्हणाले:

"लक्ष्मीबाई, स्त्रीधन विकून तुम्ही घरात भाडकरूंची सोय करीत आहात. परन्तु केळकरांच्या प्रतिष्ठेला त्यामुळे कमीपणा येईल. म्हणून हा विचार तुम्ही सोडून द्यावा."

मावशींनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले व कोणतेही निर्णयात्मक उत्तर न देता त्यांना तसेच जाऊ दिले. अर्थात त्यांचा निर्णय पक्का असल्याने तो त्यांनी अमलातही आणला. सोने विकून त्याकाळी दरमहा चारशे रुपये इतक्या घरभाड्याच्या जादा उत्पन्नाची सोय केली. शिवाय शेतीसाठीही काही पैसा गुंतविला. या योजनेमुळे कुटुंबाच्या दैनंदिन खर्चाचा भार हलका होऊन सर्वांनाच मानसिक स्वास्थ्य लाभले.

प्रस्तुत लेखक समान स्त्री-हक्काच्या मुळीच विरोधी नाही. परन्तु सर्वसाधारणपणे असाच अनुभव येतो की कुटुंबात काय किंवा समाजात काय स्त्रीवर जेव्हा पुरुषासमान जबाबदारी-युक्त महत्त्वाची भूमिका वठविण्याचा प्रसंग येतो तेव्हा कदाचित् समान हक्कासंबंधी अत्यंत जागरूक असलेल्या स्त्रीलाही भोवऱ्यात सापडल्याप्रमाणे होते. प्रामुख्याने स्वतःच्या भरंवशा-वर क्वचितच् ती त्यातून बाहेर पडू शकते. वस्तुतः स्त्रियांनी या स्वरूपाच्याच कमतरतेवर मात करावयाची आहे. म्हणूनच देवी अहिल्याबाई, राजमाता जिजाबाई आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या थोर चरित्रांचे या दृष्टिकोनातून परिशीलन होणे आवश्यक आहे.

वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी कुटुंब प्रमुख पुरुषासमान भूमिका वठविण्याची माव-शींवर जी जबाबदारी आली ती त्यांनी कर्तृत्ववान पुरुषास साजेशा कुशलतेने पार पाडली. घरची काही जबाबदारी नसल्यामुळे भरपूर वेळ आहे व पैशाचीही चणचण नाही अशा परिस्थितितील स्त्रियाच प्रामुख्याने समाजकार्याकडे वळतात असा आजतागायतचा अनुभव आहे. अर्थात् फावला वेळ सत्कारणी लावावा, शिवाय नाव झाले तर ते वेगळेच, अशा प्रकारचाच विचार असण्याची शक्यता जास्त. मावशींचे बाबतीत मात्र अगदी भिन्न परिस्थिती होती हे लक्षात घेण्यासारखे आहे.

कुटुंबाच्या विविध स्वरूपाच्या अनेक जबाबदाऱ्या असताही केवळ त्यांच्यात गुरफटून न जाता समस्त हिंदू स्त्री-समाज संघटित करण्यासाठी त्या बध्दपरिकर झाल्या.

कुटुंब-प्रमुख या नात्याने त्यांना निरनिराळ्या प्रसंगाना तोंड द्यावे लागले. या संबंधात एखाददुसरा प्रसंग येथे देण्यासारखा आहे.

दुसऱ्या महायुध्दाचे वेळी ब्रिटिश सरकारने मालगुजार आणि मोठे शेतकरी यांचेकडून 'युध्द-सहाय्य निधी' (War fund) एकत्र करण्याचे सत्र आरंभिले. सरकारी गोटात आपला उदोउदो व्हावा या स्वार्थी हेतूने तेव्हा काही अधिकारी शेतकऱ्यांवर दडपण आणून जास्तीत जास्त निधी काढण्याचा प्रयत्न करीत. वर्धा जिल्ह्यात सावली नामक गावी आमची शेती व मालगुजारी होती. हे गांव ज्या तहसिलदाराच्या अधिकारकक्षेत येत होते, तो वर सांगितलेल्या वर्गात मोडणारा अधिकारी होता, आणि मावशींनी तर सक्तिपोटी एक पैहि युध्दनिधी देऊ नका अशी सूचना देऊन ठेवली होती. त्यामुळे जेव्हा उल्लेखित अधिकारी आपला हेतू पूर्ण करण्यासाठी आमच्या खेडेगावी आला, तेव्हा त्याच्या दृष्टिने अगदी अनपेक्षित असा अनुभव त्याला मिळाला.

पण या प्रसंगाने तो फार चिडून गेला. हा प्रसंग लक्षात ठेवून आम्हास त्रास देण्याच्या संधीची तो वाट पाहू लागला.

त्याकाळी गावातील कास्तकारांनी आपला सारा मालगुजाराकडे द्यावयाचा व त्याने त्यातील आपला हिस्सा काढून घेऊन उरलेला सरकारी खजिन्यात जमा करायचा अशी पद्धती असे. त्यानुसार आमचेकडून वेळच्या वेळी सारा सरकारी खजिन्यात जमा केला जाई. परन्तु एकदा काही कारणास्तव वेळ लागला. आम्हास त्रास देण्यास ही वस्तुस्थिती पुरेशी होती. त्या तहसिलदाराच्या ही गोष्ट लक्षात येताच त्याने लगेच आम्हास त्रास देण्याची योजना आखली. मालगुजाराने वेळेवर सारा पटविला नाही तर त्याच्या वसूलीसाठी माल–गुजाराच्या बैलांचा अथवा पिकाचा लिलाव करून तो वसूल केला जाई. वस्तुतः एक–दोन सूचना देऊनही जर मालगुजार सारा पटवू शकला नाही तरच लिलावाची कारवाई केली जाई. या वेळेस पूर्वसूचनेचा प्रश्नच नव्हता, कारण त्याला आमच्यावर सूड उगवायचा होता. त्या काळी तहसिलदार हा तहसिलीचा राजाच समजला जाई. त्यामुळे त्याचा रोष होणे म्हणजे फारच कठीण प्रसंग, असे मानले जाई.

आता आम्हाला अशाच कठीण प्रसंगाला तोंड द्यावयाचे होते. हिंगणघाट कचेरीत तहसिलदाराने आमच्या विरुद्ध लिलावाच्या कारवाईला तातडीने सुरवात करताच तेथेच काम करणाऱ्या आमच्या एका हितचिंतकाच्या ही गोष्ट लक्षात आली. वेळ वाया जाऊ न देता त्याने या संबंधीचा निरोप वर्धेस पाठविला. अशा परिस्थितीत त्या तहसिलदाराचा हेतु सिद्धीस जाता कामा नये असा मावशींनी निश्चय केला. मावशी एक स्त्री आहेत, तेव्हा त्यांचेकडून

इतक्या तातडीने उपाययोजना होईल असे त्या सत्तांध अधिकाऱ्याच्या स्वप्नांतहि आले नाही. शिवाय आम्हाला पूर्वसूचना नाही, अशी चुकीची समजूत असल्याने तो निश्चिंत होता.

दुसरे दिवशी तहसिलदाराचा बेलीफ जप्तीचा हुकूमनामा घेऊन आमचे गावी जाणार होता. म्हणून अधल्या दिवशीच मावशी स्वतः जिल्हाधीशांकडे जाऊन आल्या. त्यांनी सर्व परिस्थिती त्यांना समजावून सांगून सारा भरण्यासाठी मुदतवाढीच्या अर्जावर मंजुरी मिळविली. ती मंजुरी सोबत घेऊनच दत्तात्रय वैशंपायनला त्या रात्री त्यांनी हिंगणघाट येथे पाठविले होते. दुसरे दिवशी सकाळी बंगल्यावर जाताच तहसिलदार त्याच्यावर खवळून उठला

" अभीके अभी पूरा पैसा भरो नही तो १० बजे जप्तीका वारंट लेकर मेरा आदमी सावली के लिये रवाना कर दिया जायगा। तहसिलदारसे दुश्मनी करनेसे कहींके न रहोगे, मालूम है।"

काही न बोलता वैशंपायनने शांतपणे जिल्हाधीशांच्या मंजुरीचा कागद खिशातून काढून तहसिलदाराच्या पुढ्यात टाकला. उकळून वर येत असलेल्या दुधाखालील उष्णतेचा स्रोत काढून घेताच ज्याप्रमाणे ते सू ऽ ऽ असा आवाज करीत संथपणे खाली जाते तद्वतच रागाने उभा राहिलेला तहसिलदार पुन्हा खुर्चीत बसला.

अच्छा तुम जा सकते हो। एवढेच त्यावर तो बोलला. जास्त काय बोलणार ! वैशंपायननेही लगेच तेथून प्रस्थान केले. या नंतर हा तहसिलदार पुन्हा कधी आमच्या वाटेस गेला नाही.

प्रस्तुत लेखकाची आणखी एक आठवण येथे देण्यासारखी आहे, ती अशी—

मी नवव्या वर्गात असतानाची गोष्ट. आमच्या वर्गात अब्दुल नावाचा एक मगरूर आणि आक्रमक वृत्तीचा विद्यार्थी होता. तो सर्वांनाच त्रासदायक झाला होता. शिक्षकांजवळ पूर्वी तक्रारी करूनही त्याच्या कारवायांस पायबंद बसला नाही. आम्हास हे फारच तापदायक झाल्याने एक दिवस खेळण्याच्या तासात आम्ही चौघांनी मिळून त्यास मारले. त्याचे कपडे फाटले व घड्याळही फुटले. अत्यंत कडक शिस्तीबद्दल प्रसिद्ध असलेले कै. स. ना. कुळकर्णी हे त्यावेळी आमचे मुख्याध्यापक होते. त्यांजकडे तो तक्रार घेऊन गेला.

जुजबी चौकशीनंतर त्यांनी आम्हास प्रत्येकी २ रु. दंड आणि त्या विद्यार्थ्याची सार्वजनिक माफी मागेपर्यन्त वर्गात न बसण्याची शिक्षा सुनावली. हा प्रकार मावशींपासून लपवून ठेवणे अशक्य होते. प्रसंगाची पार्श्वभूमी सांगितल्यावर ' शाळेच्या कक्षेत तुम्ही असे करावयास नको होते, एवढेच त्या म्हणाल्या. दंड पटविण्याची शिक्षा पूर्ण करू पण माफी मागण्यास तीव्र विरोध असल्याचे सांगताच त्यांना ही गोष्ट एकदम पटली. प्रथम इतर

दोघांच्या पालकांची या संबंधात निश्चित अशी काही भूमिकाच नव्हती. म्हणून मावशीच पुढाकार घेऊन त्या सर्वांतर्फे मुख्याध्यापकाना भेटल्या. माफीची अट कां मंजूर नाही, हे मावशींनी सांगितल्यानंतरही जेव्हा आमचे शिस्तप्रिय मुख्याध्यापक तसूभरही मागे सरकेनात तेव्हा मावशींनी निश्चयात्मक स्वरूपात त्यांना सांगितले :

" माफी संबंधीची आमची भूमिका आपणास अमान्य असेल तर त्या मुद्यावर तडजोड करावयास आम्ही कधीच तयार होणार नाही. त्यामुळे आमच्या पाल्यांवर शाळा सोडून देण्याचा अप्रिय प्रसंगही ओढवणार असेल तरी त्याला आमची हरकत नाही. "

आता मात्र मुख्याध्यापकांना फेरविचार करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. कारण आम्ही सर्वच क्षेत्रांत बऱ्यापैकी विद्यार्थी होतो आणि त्या विवक्षित परिस्थितीत पालकांनीच आपली मुले शाळेतून काढून घेणे हे शाळेच्या प्रतिष्ठेस बाध आणणारे ठरले असते. त्यांनी माफीची अट लगोलग मागे घेतली. मावशींशी संबंधित हा प्रसंग एक प्रकारे साधारण वाटला तरी अत्यंत बोलका आहे हे निःसंशय !

कुटुंब–प्रमुखाची जबाबदारी पार पाडताना मावशींना समाजात धैर्याने, कणखरपणे व आत्मविश्वासाने वावरावे लागले. अशा स्वरूपाची जबाबदारी पार पाडण्यासाठी त्याकाळी स्त्रीला जेव्हा समाजासमोर यावे लागे तेव्हा दुर्दैवाने ती टीकेच्या विषय बनत असे. या परिस्थितीला घाबरूनच कित्येक स्त्रिया घराबाहेर पडत नसत. पण येऊन पडलेली सर्वच जबाबदारी मावशींनी त्याकाळी मोठ्या धैर्याने आणि कणखरपणे पार पाडली. मावशींना हे जमले याचे कारण त्यांच्या स्वभावातील धैर्य, निश्चय आणि करारीपणा होय !

कुटुंबाच्या गाड्याची सूत्रे हाती आल्यानंतर मावशींनी त्याला ठरीव चाकोरीतूनच नेले असे नाही. जेथे जेथे चाकोरी अयोग्य वाटली तेथे तेथे त्यांनी नवीन चाकोरी निर्माण केली. त्यांच्यामध्ये मुळातच सुधारक प्रवृत्ती दिसून येते. आणि ह्याच प्रवृत्तिपोटी त्यांनी निरनिराळी कार्ये हाती घेतली असे दिसून येते.

सुधारकप्रवृत्ती असणे म्हणजे काहीना काही प्रमाणात बंडखोर वृत्तीची उपस्थिती गृहित धरावीच लागते. वंदनीय मावशींमध्ये ही वृत्ती आरंभापासूनच होती असे दिसून येते. कारण गृहिणी सामाजिक कार्यासाठी बाहेर पडल्या तर घरातील महत्त्वाची जबाबदारी त्या नीट पार पाडू शकणार नाहीत असे मत असणाऱ्यांची गृहिणींच्या बाबतीतील अपेक्षा चोखपणे पूर्ण करूनही सामाजिक कार्यासाठी त्या वेळ काढीत. अर्थात् सांसारिक कार्ये पार पाडणे ही स्त्रीची एकमेव जबाबदारी नसते, ही सुधारणा प्रथम त्यांनीच ठळकपणे आमच्या कुटुंबात घडवून आणली व पुढे समितीच्या कार्याद्वारे इतर गृहिणींनाही त्यासाठी प्रवृत्त केले.

मावशींच्या सुधारक प्रवृत्तीची साक्ष पटविणाऱ्या कितीतरी लहानसहान घटना येथ सांगता येतील.

विधवा स्त्रियांनी, लग्न–मुंजी सारख्या कौटुंबिक जिव्हाळ्याने परिपूर्ण अशा समारंभा-तटी उघडपणे वावरू नये, आणि म्हणूनच त्यांना आमंत्रित करु नये, हा अनिष्ट प्रकार त्याकाळी होता. वर्धेत हा प्रघात मावशींनीच मोडला. स्त्री–पुरुषांसाठी, मावशी रामायणावर प्रकट प्रवचने देतात, हे सर्वांना माहीत आहेच. तथापि, व्यासपीठावर बसून प्रवचन करण्याचा स्त्रीला शास्त्रात मुळीच अधिकार नाही असे म्हणून त्यांच्यावर जेव्हा सुरवातीला टीका झाली तेव्हा यावर त्यांनी वेदपंडित सातवळेकर यांचा अभिप्राय मागविला. तो अनुकूलच होता. यावरून हे दिसून येते की त्यांनी जुन्या काळच्या कल्पनांविरूद्ध जे बंड उभारले ते 'बंडाकरिता बंड' या भूमिकेतून नव्हे. तर्काचा आधार असल्याशिवाय काहीही करणे योग्य नव्हे असे त्यांचे ठाम मत आहे.

मासिक–धर्म काळात स्त्रिया जी बंधने पाळतात त्या मागे त्यांना आवश्यक असलेली शारीरिक आणि मानसिक विश्रांती हाच प्रमुख उद्देश असल्याने 'शिवा -शिवी' किंवा स्पर्शाबाबत समाजात निर्माण झालेले अवडंबर त्यांनी त्याज्य ठरविले.

आमच्या घरी नोकर ठेवताना तो स्वच्छ राहणारा, स्वच्छ काम करणारा व अर्थातच कामसू आणि विश्वासू असावा एवढ्याच त्यांच्या अटी असत. मला वाटते, वर्धेत, वरात सर्वदूर वावरणारा हरिजन नोकर प्रथम आमच्याच घरी होता. एखाद्या नियमामागील खरे तत्त्व कोणते हे शोधून, त्याप्रमाणे स्वतः प्रथम वागून, मग सभोवतालच्या इतरांना तसे वागण्यास प्रवृत्त करणे, हे त्यांच्यातील सुधारक प्रवृत्तीचे द्योतक आहे. म्हणूनच स्वच्छ हरिजन नोकर जरी मावशींना चाले तरी अस्वच्छ सोवळे नेसून आलेल्या पुरोहितास आपल्या घरी शक्यतो पुन्हा बोलावू नका अशी त्यांची आम्हास सूचना असे. आमच्या घरी पुनर्विवाहितेस सवाष्ण म्हणून बोलावण्याची प्रथा मावशींनीच पाडली.

सन १९३२ पर्यंत वर्धा निवासी हरी कृष्ण उर्फ आप्पाजी जोशी यांच्या संघटन-कुशलतेमुळे वर्धा शहर आणि जिल्ह्यातील युवकांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल विशेष आकर्षण निर्माण झाले होते. तरुण, उत्साही कार्यकर्त्यांची एक मालिकाच आप्पाजींनी निर्माण केली होती. त्यापैकी एक कार्यकर्ते श्री. शंकरराव पतकी यांचा व आमचा कौटुं-बिक घरोबा असल्याने त्यांच्या म्हणण्यावरून आम्ही सर्वच बंधू क्रमाक्रमाने संघात जाऊ लागलो व कालांतराने संघकार्यात समरस झालो.

शाळेव्यतिरिक्त वेळात आम्ही मुले काय करतो इकडे मावशींचे बारीक लक्ष असे. त्यामुळे जेव्हा त्यांच्या हे लक्षात आले की संघात मुलांवर उत्तम संस्कार घडत आहेत,

तेव्हा त्यांची काळजी दूर झाली. म्हणूनच प्रारंभी एखादे दिवशी आमचे पैकी कोणी संघात गेला नाही व हे त्यांना कळले तर, संघ शिक्षकापूर्वी त्यांचेकडूनच याबद्दल आम्हाला जाब विचारला जाई. अशा प्रकारे आम्हांस मावशींकडून प्रोत्साहन मिळत राहिल्याने आमचे घर संघ स्वयंसेवकांचे वर्धेतील एक प्रमुख केंद्र बनले. आमचे घर मध्यवर्ती व मोठे असल्यामुळे आवश्यक वाटल्यास मर्यादित स्वरूपातील बैठकींचे कार्यक्रमही पुष्कळदा आमचे घरी होत.

१९३५ च्या मध्यापर्यंत मावशींवरील निरनिराळ्या जबाबदाऱ्यांची सोय लागली. शिवाय आम्ही सर्वच मावंडे दरवर्षी नीट पास होत गेल्याने आमच्या संबंधीही त्यांना विशेष काळजी राहिली नाही. आता स्वतःच्या पुढील जीवनासंबंधी विचार करावयास त्यांना सवड मिळाली. फावल्या वेळात इंग्रजीचा अभ्यास करावयाचा असे त्यांनी ठरविले. त्या वेळेपर्यंत वर्धेस स्त्रियांसाठी वेगळी अशी हायस्कूलची सोय नव्हती, म्हणून हे शिक्षण घरीच सुरू झाले. ' इंग्लीश टीचर ' हे पुस्तक मागवून त्यांनी स्व-शिक्षणाचा कार्यक्रम आरंभ केला. काही अडचण भासली तरच त्या आमचे कडील दत्तात्रय वैशंपायनला अथवा आम्हांस विचारीत.

इंग्रजी शिक्षणासोबतच मावशींनी ग्रंथवाचनासही सुरवात केली. प्रथम प्रामुख्याने स्वामी विवेकानंदांच्या साहित्याचे त्यांनी वाचन केले. हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, तसेच शिवाजी आणि पेशवाईवरील समग्र ग्रंथ संचांचेही त्यांनी वाचन केले.

१९३५ साली स्त्रियांसाठी पोहणे शिकविण्याचा वर्ग वर्धेस प्रथमच सुरू झाला. ह्या संधीचा फायदा घेऊन मावशी पोहणे शिकल्या. याच काळात त्या सायकल चालविणे सुद्धा शिकल्या.

याच वर्षीच्या शैक्षणिक सत्रापासून वर्धेचे पहिले कॉलेज आरंभ झाले. त्याचा आरंभ करण्यात आमचेशी कौटुंबिक स्नेह असलेले कै. श्रीधर दामोदर उर्फ बाबुराव खरे आणि आमचे काका कै. यशवंतराव केळकर यांनी पुढाकार घेतला होता. वर्षाचे शेवटी याच मंडळींनी, विशेषतः आमच्या काकू कै. शांताबाई केळकर यांच्या आग्रहास्तव, वर्धेतील मुलींचे पहिले माध्यमिक विद्यालय आरंभ करण्याची योजना आंखली. १९३६ च्या जुलैत प्रत्यक्ष कार्यारंभ करण्यात आला. साहजिकच मावशींनीही या योजनेस पुरेपूर पाठिंबा दिला. आरंभीच्या काळात शांताकाकूंनी या संस्थेसाठी बरेच कष्ट घेतले. परन्तु त्यांचा अकाली मृत्यु झाला. कालांतराने मावशींनी या संस्थेच्या कार्यकारी मंडळात यावे म्हणून त्यांना आग्रह करण्यात आला. तो त्यांनी मान्य केला. त्यानंतर आजतागायत त्या प्रस्तुत संस्थेच्या उपाध्यक्षपदी आहेत.

• • •

# स्त्री-शक्तीचा साक्षात्कार : ७

१९३० नंतरच्या काळात विदर्भात विशेषतः नागपूर आणि वर्धा या क्षेत्रात, गांधीजींच्या सान्निध्यामुळे स्त्रियाही मोठ्या प्रमाणावर राजकीय चळवळीच्या कार्यक्रमाकडे आकृष्ट झाल्या, हा इतिहास मागील प्रकरणी आलेलाच आहे. येथील स्त्रियांच्या इतर क्षेत्रांतील जागृती बाबत काय परिस्थिती होती हे जाणण्यास, पुणे येथील दैनिक 'सकाळ' च्या दिनांक २४ ऑक्टोबर १९३२ च्या अंकात, 'स्त्रिया व स्वावलंबन' या शीर्षकाखालील अग्रलेखात, जो मजकूर आला होता त्याचा खाली दिलेला अंश पुरेसा आहे.

या अग्रलेखात संपादक म्हणतात : " स्त्रियांच्या चळवळी व त्यांच्यात दिसून येणारी जागृती या बाबतीत मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांताने इतर प्रांतापेक्षा आघाडी मारली आहे. याबद्दल आम्ही तेथील स्त्रियांचे अभिनंदन करतो. नुकतेच सौ रमाबाई तांबे यांचे अध्यक्षतेखाली ' विदर्भ स्त्री संमेलन ' झाले व ता. २० रोजी सौ. यमुनाबाई हिर्लेकर यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांतीय स्त्री-शिक्षण परिषद झाली.

स्त्री-शिक्षणाबाबत आतापर्यंत पुरुषांनीं चळवळ केली. आता त्यांच्या उन्नती संबंधी विचार करण्याचे त्यांनी स्वतःच अंगावर घेतल्याचे हे द्योतक होय. आज स्त्रियांना शिक्षण द्यावे की नाही हा वाद राहिला नाही, तसेच सर्वसामान्य स्त्रीवर्गासाठी पुरुषांच्यापेक्षा भिन्न असा शिक्षणक्रम आखला पाहिजे हेही मत आता हलके हलके मान्य होत चालले आहे.

..... आज स्त्रिया ह्या उत्तम गृहिणी राहून त्याबरोबरच त्यांना सामाजिक जीवनक्रमात योग्य ते स्थान मिळाले पाहिजे. ह्यासाठी स्त्रिया स्वावलंबी झाल्या पाहिजेत. स्त्रियांनी आवश्यक त्या सामाजिक व राजकीय सुधारणा करण्यात योग्य पुढाकार घेतला पाहिजे. सारांश, स्त्रियांस केवळ चूल आणि मूल यापुरते जीवन नसून त्यांना सामाजिक

जीवनही आहे ही गोष्टही जोराने प्रतिपादन करणे जरूर होते. या दृष्टीने सौ. हिर्लेकर यांचे विचार मननीय आहेत असे आमचे मत आहे. ”

वरील विवेचनावरून हे लक्षात येण्यासारखे आहे की १९३० नंतर राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांसंबंधी विदर्भातील महिला वर्गात पुरेशी जागृती झालेली होती. मावशींसंबंधीच बोलायचे झाल्यास स्त्री-शिक्षणाच्या क्षेत्राबाबत असे म्हणता येईल की कालौघाप्रमाणे त्यांचे स्वतःचे शालेय शिक्षण जरी अपूर्णावस्थेतच राहिले तरी शिक्षण ही स्त्री समाजाच्या उन्नतीची एक प्राथमिक स्वरूपाची आवश्यकता आहे हे जाणून त्यासाठी त्यांनी जो यथाशक्य पुढाकार घेतला तो मागील प्रकरणी आलेलाच आहे.

म. गांधी पुरस्कृत प्रभात फेऱ्या, पिकेटिंग आदि राजकीय चळवळींच्या विविध कार्यक्रमात त्या भाग घेत असत हा भागही मागील प्रकरणी आलाच आहे. या कार्यक्रमात एका ठराविक प्रमाणाबाहेर मात्र त्या तल्लीन होऊ शकल्या नाहीत. याची जी कारणे आहेत त्यापैकी नैमित्तिक कारण म्हणजे त्यांना आलेला कटु अनुभव. पिकेटिंगच्या निमित्ताने इतर स्त्रियांबरोबर बाजारपेठेत जावे लागे. तेथे विदेशी कपडा किंवा इतर माल विकणारांना आणि त्यांचेपासून तो विकत घेणारांना परावृत्त करणे, हे काम असे. या कार्यक्रमाचे वेळी सर्वसाधारण जनतेशी प्रत्यक्ष संबंध येई. तेव्हा असा अनुभव आला की सर्वसाधारण पुरुष–समाज जरी राजकीय सुधारणांबद्दल जागृत झालेला असला तरी स्त्री समाजासंबंधी त्याचा कल्पनांत मात्र बदल झालेला नाही. स्त्रीची प्रतिष्ठा, स्त्रीचे पावित्र्य या उदात्त आणि अनिवार्य कल्पना त्यांच्या अवाक्या बाहेरच्या असून स्त्री केवळ चार भिंती-आड राहणारी, पुरुष–सेवक अशीच व्यक्ती होय असा अभिप्राय त्यांच्या वर्तनातून व्यक्त होई. म्हणूनच कालपरिस्थित्यनुसार राजकीय चळवळ हा जरी त्यावेळी महत्त्वाचा कार्यक्रम असला तरी जोपर्यंत प्रत्यक्ष स्त्रीत्वाच्या आधारभूत मूल्यांबद्दल केवळ पुरुष–समाजच नव्हे तर स्वतः स्त्री समाजही उदासीन आहे, तोपर्यंत अशा कार्यक्रमांत स्त्रियांनी प्रमाणाबाहेर पडू नये असा मावशींच्या मनाचा कल झाला.

स्वानुभवाप्रमाणेच सभोवार घडत असलेल्या ज्या घटना कानी पडत अगर वाचनात येत त्यावरून भारतीय स्त्रीची असहाय आणि दुर्बल स्थिती त्यांना अधिक ठळकपणे जाणवू लागली. मध्यंतरीच्या काळात झालेल्या घोर अवहेलनेमुळे स्त्री स्वतःचा आत्मविश्वास, बल आणि कर्तृत्व गमावून बसली असल्याने या आधारभूत गोष्टींचे पुनरुज्जीवन ही प्राथमिक गरज आहे अशी या काळात मावशींची धारणा झाली. या दिशेने मावशींचा विचार–प्रवाह वाहण्यास ज्या काही घटना घडल्या त्यापैकी एक म्हणजे बंगालच्या कुसुममालेचे अपहरण. हे प्रकरण सर्व भारतभर फारच गाजले. बंगालमधील एका गांवी एक सुशिक्षित जोडपे

फिरावयास निघाले असता वाटेत, तिच्या पतीच्या विरोधाला न जुमानता, एका गुंडाने कुसुम-माला नामक युवतीचे अपहरण केले. प्रत्यक्ष पतीही आपल्या पत्नीचे रक्षण करू शकला नाही. या वस्तुस्थितीमुळे या घटनेबद्दल बरीच चर्चा झाली. नागपूर येथून त्याकाळी प्रसिद्ध होणाऱ्या 'सावधान' नामक साप्ताहिकाने 'बंगालचे करपलेले कुसुम' या शीर्षकाखाली एक जहाल लेखमाला लिहिली. तिच्या वाचनाने समस्त स्त्री समाजाच्या असहायतेची प्रकर्षाने जाणीव झाली, असे मावशी सांगतात.

या प्रकरणामुळे अपहृत स्त्रियांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर चर्चिला जाऊ लागला. प्रत्यक्ष नागपुरातही हा प्रश्न बराच जटिल झालेला होता. शहरातील संत्र्याचा मोठा व्यापार त्या काळी मुसलमान व्यापाऱ्यांच्या हातात होता. त्यांच्या जवळून गरीब महार स्त्रिया चिल्लर विक्रीसाठी संत्री घेऊन जात. दिवसभर विक्री करून आलेल्या पैशातून आपले कमिशन काढून उरलेली रक्कम त्या स्त्रिया त्या व्यापाऱ्यांना देत. अनेकदा त्यांना पुरेशी कमाई होत नसे. अशा वेळी त्या व्यापाऱ्यांकडून त्या स्त्रिया जास्तीचे पैसे व्याजाने घेत. परन्तु रोजच्या कमाईतून हे पैसे फेडणे क्वचितच शक्य होई. त्यामुळे कमी होण्याऐवजी ही रक्कम फुगतच जाई. शेवटी व्यापारी आपला खरा हेतु पुढे करी. त्यानुसार अशा स्त्रियांजवळ पैशाच्या मोबदल्यात त्यांच्या तरुण कन्यांची मागणी केली जाई. नाडल्या गेलेल्या स्त्रियांना व्यापाऱ्यांच्या मागणीस होकार दिल्याशिवाय गत्यंतर नसे. ह्या प्रश्नाला हात घालण्याचे दृष्टीने डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार आणि नागपूर येथील हिंदुमहासभेचे त्याकाळचे कार्यवाह जगन्नाथप्रसाद वर्मा यांनी पुढाकार घेऊन अशा काही मुलींची सुटका केली. परन्तु पुढे असा अनुभव आला की त्या स्त्रियांची आर्थिक अडचण दूर करणे अथवा त्या व्यापाऱ्यांपासून सुटका केलेल्या मुलींचा स्वीकार करणे याबाबतीत हिंदु समाजाकडून क्वचितच योग्य प्रतिसाद मिळे. त्यामुळे अशा मुलींना सुटका झाल्यानंतरही त्याच कुमार्गाचा पुन्हा अवलंब करावा लागे. अशाच एका मुलीने डॉ. मुंजे यांना प्रत्यक्ष बोलून दाखविले : "तुमच्या पैकी कोणी माझा स्वीकार करणार असेल तरच यातून मी वाचू शकते अन्यथा आपण या भानगडीत न पडणेच श्रेयस्कर". या अनुभवावरून जेव्हा डॉ. मुंजे यांनी अशाच एका स्त्रीला आश्रय दिला, तेव्हा समाजाने भयंकर टीकास्त्र सोडून त्यांना जीवन असह्य केले होते.

उल्लेखित परिस्थितीच्या अनुषंगाने एक स्त्री या नात्याने आपले प्राथमिक सामाजिक कर्तव्य कोणते हे जाणण्यासंबंधी मावशींच्या मनात विचारमंथन सुरु झाले. प्रारंभी मार्ग-किरण दिसेना. कारण गेल्या कित्येक वर्षापासूनची रुढि आणि सामाजिक परिस्थिती यांमुळे स्त्रीच्या परावलंबित्वाचे आणि दुर्बलतेचेच चित्र त्यांचे समोर येई. पण परावलंबी राहूनही स्त्रीचा प्रश्न सुटत नाही हे कुसुममालेच्या प्रकरणावरून त्यांच्या लक्षात

आले होते. मग 'परवलंबित्वाशिवाय स्त्रीला गत्यंतर नाही; आणि परवलंबित्व अवलंबिल्यानंतरही स्त्रीच्या समस्या सुटत नाहीत' या कोड्यातून मार्ग काढावयाचा कसा ? हे प्रश्नचिन्ह राहिलेच !

प्रस्तुत समस्येमुळे निर्माण झालेली अस्वस्थता दूर करण्यास मदत होईल या उद्देशाने मावशी म. गांधींच्या वर्धा स्थित आश्रमातील सायंप्रार्थनेस जाऊ लागल्या. प्रार्थनेनंतर एखादा विषय घेऊन गांधीजी त्यावर आपले विचार मांडत. नंतर जमलेल्यांना प्रश्नोत्तरासाठी थोडा वेळ दिला जाई. या कार्यक्रमाला ठिकठिकाणची स्त्री-पुरुष मंडळी नित्य येत. एका तरुणीने बापूजींना प्रश्न विचारला :

"आम्ही स्त्रियांनी आमच्या जीवनात कोणता आदर्श ठेवावा ?"

महात्माजी उत्तरले, "जगातील सर्व स्त्रियांनी सती सीतेचा आदर्श ठेवण्यासारखा आहे."

यावर ती तरुणी म्हणाली, "ज्या प्रमाणे आम्हा स्त्रियांना सीतेचा आदर्श ठेवावयास आपण सांगता त्या प्रमाणे बंधुवर्गाला श्रीरामाचा आदर्श ठेवावयास आपण सांगता काय ?"

महात्मा उत्तरले, "नाही".

"आमच्या प्रमाणेच बंधुवर्गालाही आदर्श ठेवण्याची गरज नाही काय ?", तरुणीने विचारले.

"माझा विश्वास आहे की जर सीता विद्यमान असेल तर राम जन्माला येईलच. मग रामासाठी वेगळा प्रयत्न करावा लागणार नाही," गांधीजी उत्तरले.

प्रस्तुत चर्चेने जरी मावशींचे पुरेपूर समाधान झाले नाही तरी त्यांच्या विचारांना चालना मात्र मिळाली. अशा प्रकारे ध्येयाचा शोध चालू असताच स्वामी विवेकानंदांच्या साहित्यात त्यांना मार्गारेट--भगिनी निवेदिता–हिच्याशी संबंधित एक प्रसंग विशेष परिणामकारी वाटला. तो असा –

एकदा जमलेल्या तरुणांना उद्देशून बोलत असता स्वामी विवेकानंद म्हणाले, "तरुणांनो, निष्ठेने जीवन समर्पण करणारे केवळ दहाही तरुण मिळतील तर 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही उक्ती प्रत्यक्षात उतरविणे फार कठीण नाही."

यावर बाजूस बसलेली मार्गारेट उभी राहिली व म्हणाली, 'या दहात मी एक तरुणी कां असू शकत नाही ?'

यावर स्वामीजी उत्तरले– 'गरूड पक्षी जरी अत्यंत बलवान असला तरी उडण्यासाठी त्याला दोन पंखांची गरज असते. केवळ एकाच्या भरवशावर त्याचे सामर्थ्य कुचकामी

ठरेल. दोहोपैकी त्याचा कोणताही एक पंख कमजोर असून चालणार नाही. याच न्यायाने भारतरूपी गरुडाचे उत्थान साधावयाचे असेल तर पुरुष आणि स्त्री हे त्याचे दोन्ही पंख सारख्या प्रमाणात सुदृढ आणि कार्यरत राहणे आवश्यकच आहे. मार्गारेट, तुझी तयारी पाहून मला समाधान वाटले.'

स्वामीजींसारख्या थोर द्रष्ट्याच्या या विचारांनी मावशींच्या मार्गशोधनाला निश्चितच मदत झाली.

गांधीजींच्या मार्गदर्शनानंतर मावशींचे रामायणाकडे लक्ष वेधले गेले होते. स्त्रियांनी सीतेचा आदर्श ठेवून त्याप्रमाणे वागावयास आरंभ केला तर समस्त समाजाचेच कल्याण साधले जाऊ शकते असा जो अभिप्राय त्यांनी व्यक्त केला होता त्याचा अर्थ रामायणातून मावशींना समजावून घ्यायचा होता.

रामायणाच्या वाचनानंतर मावशींच्या हें लक्षात आले की, तिचे विशुद्ध चारित्र्य, धीरोदात्तपणे अपहरणाच्या संकटातून पार पडण्यास उपयोगी पडलेले तिचे मनोधैर्य, कर्तव्याबद्दल तिच्यात प्रत्यही दिसून येणारी जागरुकता, परित्यागानंतरही धैर्याने संततीच्या विकासाची तिने यशस्वीरीत्या पार पाडलेली जबाबदारी, हे सीतेच्या स्वभावाचे पैलू स्त्री-समाजाला सदैव मार्गदर्शक आहेत. परन्तु वर्तमान काली, संस्कार-कार्याचा प्रमुख स्रोत असलेली स्त्री स्वतःच निष्प्रभ झालेली असल्याने तिच्याकडून आपल्या संततीवर म्हणजेच पर्यायाने समाजावर सुसंस्कार होतील आणि लवकरच समाज प्रगतीचा मार्ग आक्रमू लागेल, अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे.

आदिकवी वाल्मिकींने राम आणि सीता यांचे वर्णन साधारण मानव म्हणूनच केले, परमेश्वर किंवा देवता म्हणून नव्हे. सामान्य मानव असूनही ती दोघे देवतुल्य ठरली. म्हणूनच त्यांचा आदर्श ठेवल्यास आपण जरी सीतांची निर्मिती करू शकलो नाही, तरी तिचा अंश जास्तीत जास्त स्त्रियांत जागविण्याचा प्रयत्न करू शकतो; आणि नैतिक, शारीरिक, मानसिक आणि सांस्कृतिक मूल्यांनी परिपूर्ण असा हा अंश जर अशाप्रकारे जागविता आला तर एक प्रचंड स्त्री-शक्ति निर्माण होऊ शकेल; मग पतीला कर्तव्यमार्गापासून च्युत न होऊ देणाऱ्या आणि आपल्या संततीला लव-कुश समान सुसंस्कारित आणि सामर्थ्यवान करणाऱ्या मातांची उणीव दूर होऊन समस्त राष्ट्राचे कल्याण साधण्यास बहुमोल मदत होऊ शकेल !

स्त्री – समस्येच्या वरील चिंतनातूनच मावशींना ' स्त्री – शक्तीचा साक्षात्कार ' झाला आणि ' राष्ट्र–सेविका समिती ' या स्त्री संघटनेची निर्मिती करून त्यांनी तो साकार केला.

• • •

# समितीचा शुभारंभ : ८

१९३६ च्या जुलैत कन्या शाळेस प्रारंभ झाल्यानंतर त्याच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदीताई पाटणकर आणि आमची भगिनी सौ. वत्सलाताई हिच्या कॉलेज मैत्रिण असलेल्या व कन्या शाळेत सहाय्यक शिक्षिका म्हणून रुजू झालेल्या श्रीमती मालतीबाई कळमकर (पूर्वीच्या वेणूताई कवीश्वर) या दोघींनाही मावशींनी आमच्याच घरी बिऱ्हाडाची सोय करून दिली. या दोघींशीही जरी पूर्वपरिचय असला तरी निकट सहवासामुळे स्वाभाविकच हे संबंध अधिक घनिष्ठ झाले.

मागील प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे, या सुमारास मावशींचे सर्व लक्ष स्त्री-समस्येवर केंद्रिभूत झाले होते. सौ. कालिंदीताई आणि वेणूताई या साधारणपणे समवयस्क असलेल्या दोघींचा आता मावशींना चोवीस तासांचा सहवास लाभल्याने त्या तिघींची प्रस्तुत विषयावर चर्चा होई. परिणामतः या दोघीही मावशींच्या पहिल्या सहकारी बनल्या.

या सुमारास आम्ही सर्व भावंडे संघकार्यात उत्साहाने भाग घेऊ लागलो होतो. संघस्थानावर लेझीम, दण्ड, खड्ग, शूल आदिचे योग आणि कवायती या सर्वच कार्यक्रमात आम्हास अग्रेसरत्व मिळे. विशेषतः आमचा मधला भाऊ पद्माकर याने त्यात विशेष प्राविण्य मिळविले होते. आपले मित्र जमवून तो आमच्या घरच्या अंगणात या योगांची प्रात्यक्षिके करी. आठ ते दहा लोकांनी एकदम केलेला हल्ला एकट्याने कसा मोडून काढावयाचा हे 'हल्लाफोड' योगाचे प्रात्यक्षिक आमचे विशेष आवडते होते. या आमच्या सर्वच कार्यक्रमाचे मावशी बारकाईने निरीक्षण करीत. स्वसंरक्षणाचे दृष्टीने स्त्रियांनाही शारीरिक शिक्षणाची आवश्यकता आहे असे या निरीक्षणावरून त्यांना प्रकर्षाने वाटू लागले.

संघात दिले जाणारे शिक्षण आम्ही त्यांना–स्त्रियांना–द्यावे असे मावशींनी आम्हास सुचविले. परन्तु, 'ते शिक्षण फक्त संघस्थानावर येणाऱ्या स्वयंसेवकासाठीच आहे' असे

उत्तर आम्ही देत असू. आम्हाला जरी तशी सूचना प्रत्यक्ष संघ अधिकाऱ्यांकडून दिली गेलेली नसली, तरी त्याकाळी आमची तशी धारणा झालेली असल्याने वरील उत्तर आम्ही दिले.

१९३६ सालच्या आरंभी ताराबाई नामक महिलेने चालविलेली एक मोठ्या प्रमाणावरील सर्कस वर्धेस मुक्कामास होती. एक उत्कृष्ट सर्कस म्हणून त्याकाळी तिचा बराच लौकीक होता. एका महिलेने सर्कशीसारखा अवाढव्य पसारा मोठ्या कुशलतेने सांभाळला याचे साहजिकच कौतुक होते. म्हणूनच मावशींनी आवर्जून त्याचा प्रयोग पाहिला. सर्कशीतील शिस्त आणि लहान लहान मुलींनी केलेल्या कवायती, या गोष्टी स्त्रियांना शारीरिक शिक्षण देण्यासंबंधी मावशींच्या मनांत त्यावेळी जे विचार चालू होते त्याला पूरक होत्या.

सौ. कालिंदीताई आणि वेणूताई या दोघी रोज घरी आल्यानंतर शाळेतील अनुभव मावशींना सांगत. काल या मुलीला टारगट मुलांपासून त्रास झाला, तर आज त्या मुलीची कोणी खोडी काढली. जवळ जवळ रोज अशाच स्वरूपाच्या तक्रारी कानी पडत. खबरदारी म्हणून शाळेच्या जवळपास पोलीस राहील अशीही व्यवस्था करण्यात आली. आजकाल मुली शाळेत सर्रास उघड्या मैदानावर खेळ खेळतात. त्याचे कुणास काही वाटतही नाही. पण त्यावेळी वेगळी परिस्थिती होती. पटांगणाभोवती टिनाचे कम्पाऊंड घालून मगच मुलींच्या खेळण्याची व्यवस्था केली जाई. परन्तु या सोयी म्हणजे प्रश्न कायमचा दूर करण्याचा मार्ग नव्हे. मानसिक व शारीरिक बलाची जोपासना करून जेव्हा स्त्रिया समाजात आत्मविश्वाने वावरू लागतील, तेव्हाच हा प्रश्न सुटेल, हे मावशी जाणून होत्या.

त्याच वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात आपला पश्चिम महाराष्ट्राचा दौरा आटोपून नागपुरास परत जात असता डॉ. हेडगेवारांनी वर्धेस मुक्काम केला. त्यावेळी तेथील संघशाखेत त्यांचा बौद्धिक वर्ग ठेवण्यात आला होता. त्यासाठी स्वयंसेवकांच्या पालकांनाही निमंत्रण होते. मावशी आम्हा भावंडांच्या पालक असल्याने त्या बौद्धिक वर्गास उपस्थित राहिल्या. याचवेळी ज्या पालकांची डॉक्टरांना भेटण्याची इच्छा होती, त्यांना दुसरे दिवशी निमंत्रित करण्यात आले. डॉक्टरांना भेटण्याची संधी आयतीच चालून आली होती.

ठरल्याप्रमाणे दुसरे दिवशी ॲडव्होकेट कै. मनोहरपंत देशपांडे यांचे घरी मावशी व डॉक्टर यांची पहिली भेट झाली. ही भेट फार अल्प वेळाची होती. तीत या दोघात जे संभाषण झाले त्याचा गोषवारा खालील प्रमाणे :

**मावशी** – माझी मुले संघस्वयंसेवक आहेत. संघात ज्या प्रमाणे त्यांच्यावर संस्कार होतात व संरक्षणक्षम बनविणारे शिक्षण त्यांना मिळते, त्या प्रमाणेच संस्कार व शिक्षण

यांची भगिनींनाही आवश्यकता आहे, असे मला वाटते.

**डॉक्टर** – होय, हे खरे आहे.

**मावशी** -- मग आपण स्त्रियांना संघात प्रवेश का देत नाही ?

**डॉक्टर** -- आतापर्यंत तरुणांबद्दलच मी विचार केलेला आहे, त्यामुळे स्त्रियांना संघात प्रवेश देण्याबाबत सध्या काही विचार करणे योग्य होणार नाही.

**मावशी** – मग आपले शिक्षण मला देण्यास माझ्या मुलाला अनुमती द्या.

**डॉक्टर** -- यामुळे काय साध्य होईल ?

**मावशी** – तो मला शिकवील व मग मी गावातील स्त्रियांना शिकवीन.

**डॉक्टर** -- या प्रश्नावर विचार केलेला नाही हे मी आपणास आधीच सांगितले. त्यामुळे या प्रश्नालाही एकदम होकारार्थी उत्तर देणे कठीण आहे.

**मावशी** – मग स्त्रियांनी काय करावे ?

**डॉक्टर** – स्त्रियांसंबंधीही विचार होणे जरी आवश्यक असले तरी संघाचे कार्यक्षेत्र पुरुषवर्गासाठीच असावे असा आमचा विचार आहे.

**मावशी** – म्हणजे स्वतः स्त्रियांनीच या बाबतीत पुढाकार घ्यावा असे आपणास सुचवायचे आहे काय ?

**डॉक्टर** – होय.

साधारण अशा आशयाचे बोलणे झाल्यानंतर ही भेट आटोपली. प्रस्तुत संभाषणावरून हे दिसून येते की डॉक्टरांची भेट घेण्याचे ठरले तेव्हा स्त्रियांसाठी एखादी वेगळी संघटना असावी अशा स्वरूपाचा विचार स्पष्टपणे मावशींच्या मनात नव्हता. विद्यमान परिस्थितीत संघाचे वैचारिक अधिष्ठान आणि त्यास पूरक असलेले कार्यक्रम यांची स्त्री समाजालाही नितांत आवश्यकता असल्याने संघात दिले जाणारे शिक्षण शक्य अशा कोणत्याही माध्यमद्वारे स्त्रियांनाही मिळावे हाच प्रमुख विचार होता. डाक्टरांच्या भेटी नंतर त्यांच्या हे लक्षात आले की स्त्री–समाजाचा विचार करावयाचा असेल, तर स्वतः स्त्रियांनीच पुढाकार घेऊन हा प्रश्न हाताळावयास हवा. अर्थात आपण स्वतःच जबाबदारी स्वीकारल्यास या कार्यास मूर्त स्वरूप येऊ शकेल, ही गोष्ट त्यांना स्पष्ट झाली.

एकदा उचललेले पाऊल मागे घेण्याचा प्रश्नच नव्हता. कारण हे कार्य हाती घेण्याचा मावशींनी पूर्ण निर्धारच केलेला होता. योगायोग असा की काही कामानिमित्त थोड्याच दिवसांनी डॉक्टर हेडगेवार यांचे पुन्हा वर्धा येथे येणे झाले. नेहमी प्रमाणे त्यांचा मुक्काम श्री आप्पाजी जोशी यांच्याकडे होता. यावेळी डॉक्टर व मावशी यांची दुसरी भेट झाली. तेव्हा झालेल्या संभाषणाचा गोषवारा असा :

**मावशी** – संघात स्त्रियांना प्रवेश नसावा हा आपला विचार कळला. परन्तु केवळ स्त्री-समाजाचे दृष्टीनेच नव्हे तर पुरुष-समाजाला ठराविक वैचारिक अधिष्ठान देण्याचे आपले कार्य सुकर होण्यासाठीही घरांतील स्त्रिया त्याच विचाराच्या असावयास पाहिजेत असे मला वाटते.

**डॉक्टर** – आपला विचार योग्य आहे.

**मावशी** – मग कोणत्याही प्रकारे का होईना पण हिंदु स्त्रियांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचे हें कार्य आरंभ व्हायलाच हवे, असे मला वाटते.

**डॉक्टर** – तुम्ही म्हणता ते खरे आहे. परन्तु या संबंधात अजूनही मी काहीच विचार करु शकलेलो नाही. त्यामुळे आजच माझेकडून काही मार्गदर्शन होऊ शकणार नाही.

**मावशी**– आम्ही आमच्या जबाबदारीवर स्त्रियांना एकत्र आणू परन्तु त्यांना शारीरिक शिक्षण देण्यासाठी काही काळासाठी तरी आपली मदत मिळणे ही आमची प्राथमिक आवश्यकता आहे.

वरील स्वरूपाच्या संभाषणानंतर या संबंधी काही निर्णय घेण्यापूर्वी सविस्तर विचार करता यावा म्हणून, नागपुरास भेटीस्तव येण्यास डॉक्टरांनी मावशींना सुचविले.

उल्लेखित भेटीत अपेक्षित सहकार्याचे स्पष्ट असे आश्वासन जरी डाक्टरांनी दिले नसले तरी मनःपूर्वक त्यांनी मावशींचे विचार ऐकून घेतल्यामुळे त्या निरुत्साही झाल्या नाहीत. उलट त्यांची हीच धारणा झाली की, डॉक्टर समाजकार्यातील एक अनुभवी व्यक्ति असल्याने, आपण आपल्या विचारांबाबत किती दृढ आहेत याची ते चाचणी घेत असावेत. आणि हे खरेही होते. कारण पुढच्या काळात, म्हणजे थोड्याच दिवसांनी राष्ट्र-सेविका समितीच्या कार्यास आरंभ झाल्यापासून तो १९४० च्या जूनमध्ये डॉक्टरांचे देहावसान होईपर्यंत, ज्या तळमळीने त्यांनी समितीकार्यासंबंधी सूचना दिल्या व मार्गदर्शन केले त्यावरून हे स्पष्ट होण्यासारखे आहे.

सप्टेंबर आणि ऑक्टोबरचा पूर्वार्ध, या सुमारे दीड महिन्यांच्या कालावधीत डॉक्टर आणि मावशी यांच्या आणखी दोनतीन भेटी झाल्या. या भेटीतच राष्ट्र-सेविका समिति या स्त्री संघटनेचा आरंभ करण्याचा विचार निश्चित करण्यात आला. वैचारिक भूमिके-व्यतिरिक्त संघटनेचे नाव कोणते असावे, प्रार्थना कशी असावी, कोणकोणते शारीरिक योग स्त्रियांना शिकवावेत, कोणकोणते उत्सव साजरे करावेत आदि अनेक मुद्यावर त्यांनी चर्चा केली. तसेच त्यावेळी एक गोष्ट डॉक्टरांनी प्रामुख्याने स्पष्ट केली ती ही की, संघ आणि समिती या दोहोत वैचारिक आणि कार्यक्रमविषयक साम्य आणि यथायोग्य सहकार्य चालू राहिले तरी समिती ही संघाची स्त्री शाखा म्हणून कधीच गणली

जाणार नाही. हा त्यांचा विचार त्यांनी आगगाडीच्या रूळांचा दृष्टान्त देऊन स्पष्ट केला. ते म्हणाले "गाडीच्या रूळांप्रमाणे या दोन्ही संघटना समान्तर पण कधी एकत्र न येणाऱ्या राहतील."

वस्तुतः जेव्हा मावशींनी डॉक्टरांची प्रथम भेट घेतली तेव्हा त्यांचा विचार वर्धे-पुरताच मर्यादित होता. परन्तु वर उल्लेखिल्याप्रमाणे मावशींची कार्याबद्दलची कळकळ आणि कार्यधुरा सांभाळण्यासंबंधीची कुवत याबाबत डॉक्टरांना विश्वास वाटू लागला तेव्हा स्त्री संघटनेसंबंधी विचार करून वर्धेपुरताच विचार मर्यादित न ठेवण्यासंबंधी त्यांनी मावशींना सुचविले. स्त्रियांच्या कार्यात उद्भवू शकणाऱ्या निरनिराळ्या अडचणी आणि संघटना विषयक तपशिलावरही त्यांनी मावशींशी विस्तृत चर्चा केली. आता शारीरिक शिक्षण देण्यासाठी समितीत संघ-स्वयंसेवक पाठविण्याची डॉक्टरांकडून रीतसर परवानगी मिळाली एवढेच नव्हे, तर प्रसंगी आणखी सहकार्याची आवश्यकता निर्माण झाल्यास ते मिळेल असेही त्यांनी सुचविले.

समिति-स्थापनेचा निर्णय घेण्यात आल्यानंतर काही दिवसातच, म्हणजे दिनांक २५ ऑक्टोबर १९३६ रोजी येणाऱ्या विजयादशमीच्या मुहूर्तावर, समिती-कार्याचा शुभारंभ झाला. उद्घाटनाच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून त्या काळच्या नागपूरच्या एक सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती चंद्रभागाबाई पटवर्धन यांस पाचारण करण्यात आले होते. परन्तु ऐनवेळी त्या न येऊ शकल्याने संघाच्या दसरा महोत्सवासाठी वर्धेस आलेले बुलढाणा येथील प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. यादव माधव काळे यांच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम पार पाडण्याचे ठरले. कार्यक्रम संघाच्या दसरा महोत्सवासाठी उभारण्यात आलेल्या मंडपातच झाला. यावेळी वर्धेतील स्त्रीसमाज मोठ्या संख्येत उपस्थित होता. स्त्रियांच्या संघटनेचा शुभारंभ ही घटना नाविन्यपूर्ण होती एवढेच नव्हे तर तो स्त्रियांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने या कार्यक्रमास त्यांची विशाल संख्येतील उपस्थिति अगदी स्वाभाविकच होती.

या प्रसंगी वं. मावशींचे संक्षिप्त असे प्रारंभिक भाषण झाले. त्यानंतर श्रीमती मालतीबाई कळमकर यांनी समितीची कल्पना विस्तृतपणे समजावून सांगितली. डॉ. यादव माधव काळे यांनी आपल्या भाषणात 'समितीच्या स्थापनेमुळे हिंदू स्त्री समाजासाठी आवश्यक असलेल्या एका महत्वाच्या गरजेची पूर्ती झाली आहे' या शब्दात समिती कार्या-संबंधी आपला अभिप्राय व्यक्त करून या कार्याच्या वाढीसाठी शुभाशिर्वाद दिले.

• • •

## समितीची आरंभीची वर्षे : ९

दसऱ्याचे मुहूर्तावर समितीचे उद्घाटन झाल्यानंतर दैनंदिन कार्यास लगेच सुरवात झाली. वर्धेचे एक वकील कै. गजाननराव पाठक यांच्या घराशेजारील त्यांची मोकळी जागा सालीना २५ रुपये प्रमाणे भाड्याने घेऊन त्या भोवती तट्ट्याचे एक कम्पाऊंड घालण्यात आले. हेच पहिले समिती स्थान !

मावशींनी घरोघरी जाऊन मुलींना समितीत पाठविण्याची त्यांच्या पालकांना विनंती केली होती. शिवाय सौ कालिंदीताई पाटणकर आणि श्रीमती मालतीबाई कळमकर या दोघींनी समितीस्थानावर येण्यासंबंधी मुलींना शाळेत सूचित केले. त्यामुळे सुरवातीपासूनच सुमारे दीडशे ते दोनशे मुली समितीस्थानावर नियमितपणे येऊ लागल्या.

कु. सुशीला काणे ( सौ. दाते लखनौ ) कु. विमल कावळे ( सौ. जोशी, दिल्ली ), कु. कुसुम काणे ( सौ. कुसुम रानडे, ठाणे ), कु. नलिनी केळकर ( सौ. पारनाईक जबलपूर), कु. तारा पाठक ( सौ. देशपांडे, वर्धा ), कु. सुंदर देशपांडे ( सौ. तेलंग, वर्धा ), कु. सुमन करोडे ( सौ. तांबे, नागपूर) या आरंभीच्या कांही प्रमुख सेविका होत. अपवाद सोडले तर यापैकीं बहुतेकांना पूर्वीइतकाच समितिकार्यात भाग घेणे शक्य होत नाही असे दिसते. विवाहानंतर स्वाभाविकपणे येणारी बंधने हेच प्रामुख्याने याचे कारण आहे. तथापि ही वस्तुस्थिति जाणून जुन्या जास्तीतजास्त स्वयंसेविकांशी पत्ररूपाने संबंध कायम ठेवणे अगर त्या ज्या गावच्या रहिवासी झाल्या असतील त्या गावी गेल्यास त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा प्रयत्न करणे असा मावशींचा सुरवातीपासून कटाक्ष आहे. त्यामुळे बऱ्याच अशाही सेविका आहेत की ज्या काही कारणास्तव दैनंदिन कार्यक्रमात जरी भाग घेऊ शकत नसल्या तरी महत्वाच्या प्रसंगी समिती--कार्यासाठी पुढे येतात. याच उद्देशाने ठिकठिकाणच्या नव्या-जुन्या सेविकांना आणि परिचितांना 'मकर-संक्रांतीचा संदेश' म्हणून आपल्या स्वाक्षरीने शेकडो कार्डे त्या दरवर्षी पाठवीत असतात. त्यांनी अवलंबिलेला हा

उपक्रम समिति-कार्यास कसा फायदेशीर ठरतो हे एका जुन्या सेविकेच्या खाली दिलेल्या पत्रावरून लक्षात येण्यासारखे आहे. मावशींना लिहिलेल्या पत्रात ती म्हणते--

" पोस्टाच्या दिरंगाईमुळे यंदा आपला मकर संक्रांतीचा संदेश जरा उशीराच हाती पडला.

बाजारातून तीळ--गूळ आणण्यासंबंधीचा विषय घरात चर्चिला गेल्यानंतर एकदम विचार आला, यंदा अजून मावशींचा संदेश कसा आला नाही ?

दरवर्षी या सुमारास आपल्या संदेशाची आम्ही आतुरतेने वाट पाहत असतो. कारण त्यामुळे आम्हाला आमच्या कर्तव्याची पुनरपि जाणीव करून दिली जाते; व संसाराच्या नेहमीच्या रगाड्यामुळे जी एक प्रकारची शिथिलता आणि औदासिन्य आमच्या जीवनात आले असते ते दूर सारले जाऊन चैतन्याचा प्रत्यय येतो. माझ्या प्रमाणेच इतर सेविकांचाही असाच अनुभव असेल यात शंका नाही.

समितीने आम्हाला तरुण वयातच स्त्रीत्वाच्या खऱ्या मूल्यांची आणि समाजविषयक कर्तव्यांची जाणीव करून दिलेली आहे.

...... गेल्या वर्षी समिति-स्थानावर जास्तीत जास्त नियमितपणे उपस्थित राहण्याचा प्रयत्न आपल्या आशिर्वादाने यशस्वी झाला. परन्तु कोणतीच जबाबदारी स्वीकारली नव्हती. कारण संसाराच्या अडचणी. आजपर्यंत मुले लहान असल्याने इच्छा असूनही शक्य होत नसे. यंदा लहानशीच का होईना परन्तु ठराविक जबाबदारी स्वीकारण्याचा निश्चय केला आहे. आपल्या आशीर्वादाने तो कृतीत येईल अशी आशा आहे."

प्रारंभापासून वर्षेस समितिस्थानावर ज्या भगिनी येत, त्यापैकी काही आमच्या आप्त तर काही निकट परिचित होत्या. त्या मावशींना वेगवेगळ्या नांवाने संबोधत. आमची चुलत बहीण नलिनी केळकर ( सौ. पारनाईक ) त्यांना आमच्या घरी प्रचलित असलेल्या 'वहिनी' या नांवाने हाक मारी, बालमैत्रीण असलेल्या सौ. ताई करोडे 'कमल' या नांवाचा वापर करीत, तर आमची मावस बहीण दुर्गा काणे ( सौ. कानडे, मुंबई ) मावशी या नांवाने संबोधित असे. यामुळे सर्वसाधारणपणे त्यांना कोणत्या नांवाने संबोधावे हा प्रश्न सेविकांसमोर प्रारंभी निर्माण झाला. तथापि वरील तीन पैकी 'मावशी' हेच संबोधन सर्व दृष्ट्या समर्पक वाटल्याने तेच सर्वदूर रूढ झाले आहे.

सर्व प्रकारचे शारिरिक शिक्षण आता समिति सेविकांना मिळू लागले. त्यात लाठी, लेझीम, खड्ग आदींच्या योगांव्यतिरिक्त घोष ( Band ), ड्रिल आणि शारीरिक शिक्षणाचे (Physical Training) योग यांचाही अंतर्भाव होता.

स्त्रियांच्या दृष्टीने या कार्यक्रमांची उपयुक्तता लक्षात घेऊन, शिवाय वं. मावशींच्या कौटुंबिक पार्श्वभूमिमुळे त्यांच्याबद्दल आरंभापासूनच आदराची भावना असल्यामुळे वर्धावासियांनी त्यांच्या आव्हानाला उत्तम प्रतिसाद दिला. थोड्याच कालात समितीस्थानावरील दैनंदिन उपस्थिति वाढू लागली.

" आमच्या मुलींनी समितीत जावे अशी आमची इच्छा आहे, परन्तु समिती स्थान आमच्या ठिकाणापासून दूर आहे " ही त्या काळी गावाच्या एका बाजूला असलेल्या रामनगर विभागातील पालकांची सूचना लक्षात घेऊन त्या विभागात वर्धेची दुसरी शाखा थोड्याच कालानंतर सुरू करण्यात आली.

आरंभी समिति-स्थानावर कोणताही ध्वज नसे. झाशीच्या राणीचा फोटो ठेवून त्याला सेविका प्रणाम करीत. समितीची स्वतंत्र अशी प्रार्थनाही नव्हती. म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कवितेतील " हिंदुपणीच मज मार कराल काला . . . . . बुध्यांचि वाण धरिले करी हे सतीचे " या ओळी म्हटल्या जात. थोड्याच दिवसांनी वंदनीय मावशींनी वर्धा येथील एक प्रथितयश कवि कृष्णा रघुनंदन चव्हाण यांच्याशी समितिसाठी स्वतंत्र अशा प्रार्थनेची रचना करण्यासंबंधी चर्चा केली. थोड्याच काळात मावशींशी झालेल्या चर्चेनुसार श्री चव्हाण यांनी समितीच्या मराठीतील प्रार्थनेची रचना पूर्ण केली. १९३७ च्या सक्रांतीपासून ही प्रार्थना समिति-स्थानावर म्हटली जाऊ लागली. या प्रार्थनेच्या ओळी अशा आहेत—

हे मातृभूमि प्रिय पावन पुण्यभूमि
हे आर्यभूमि तुज वंदन धर्मभूमि
सर्वस्व अर्पण असो तुझियाच कामी
व्हावे कृतार्थ करुनी तुज धन्य आम्ही ॥

हे ईश्वरा सच्चिदानंद रामा
अम्हा शील, चारित्र्य द्या उज्ज्वल
व्हावे सती सद्‌गुणी धीर अम्ही
असे द्या अम्हा शक्ति, बुद्धि, बल ॥

देशार्थ धर्मार्थ काया झिजावी
वसो अंतरी पूर्ण हिंदूपण
सीता सती पद्मीनी वीर लक्ष्मी
तसे प्राप्त होवो अम्हा जीवन ॥

—भारतमाता की जय—

राष्ट्र-सेविका समितीचा जन्म ज्या सुमारास झाला त्या सुमारास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वृक्ष महाराष्ट्राच्या भूमिवर चौफेर पसरलेला होता एवढेच नव्हे तर आता त्याच्या शाखा महाराष्ट्राबाहेरही वाढू लागल्या होत्या. डॉक्टर हेडगेवारांच्या विचारांची तर्क-शुद्धता, त्यांच्यातील आत्मीयता, स्वभावाचा साधेपणा, त्यांचे विशुद्ध चारित्र्य आणि संघटनेच्या वाढीसाठी त्यांनी घेतलेले अविश्रांत परिश्रम यामुळे निदान महाराष्ट्रातील बहुतांश मध्यमवर्गीय लोक प्रभावित झाले. पुरुष आणि तरुणांप्रमाणेच स्त्रियांच्या मनावरही याचा परिणामकारी ठसा उमटला. या मागे जी कारणे आहेत त्यात हिंदू स्त्रियांवर अखंड-रीत्या होत राहिलेल्या अत्याचारामुळे महात्माजीप्रणित हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या मुलभूत धोरणाला वारंवार पडलेले तडे, हे एक कारण तर होतेच,परन्तु याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघात शरीर-संवर्धन, चारित्र्य, शिस्त आणि राष्ट्रीय कर्तव्यांसंबंधी जागरुकता यांच्या संस्कारांची जशी नियमबद्ध योजना आहे तशी कॉंग्रेसप्रणित कार्यक्रमात ती नव्हती, हेही एक प्रमुख कारण होते. गांधीजींनी आरंभिलेली सामूहिक चळवळ (Mass movement) असल्याने त्यात इतकी शिस्त किंवा शुद्धता असणे शक्यही नव्हते. परन्तु त्यामुळेच प्रथम आपल्या संततीच्या विविध विकासाची चिंता वाहणाऱ्या स्त्री–समाजाचा शिस्तबद्ध आणि सुसंस्कारक संघटनेकडे कल झुकणे अगदी स्वाभाविक होते.

परिणामतः काही ठिकाणच्या स्त्रियांनी स्थानीय बंधुवर्गाच्या सहकार्याने अथवा स्वतंत्ररीत्या तरुण मुलींसाठी समिति-सदृश कार्य या पूर्वीही आरंभिले होते. विशेषतः विदर्भात भंडारा येथील श्री बाबासाहेब कोलते यांच्या पत्नी श्रीमती नानीबाई कोलते आणि पश्चिम महाराष्ट्रात सातारा येथे श्रीमती उमाताई मोकाशी यांनी अनुक्रमे राष्ट्रीय स्वयंसेविका संघ व हिंदुधर्म भगिनी मंडळ या नावाखाली असे कार्य चालू केलेले होते.

१९३६ च्या डिसेंबर मध्ये भंडारा येथून श्रीमती नानीबाई कोलते यांनी मावशींना पत्र पाठवून कळविले की "भंडारा येथे सुरू केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेविका संघासंबंधी आम्ही डॉक्टर हेडगेवारांची भेट घेतली असता त्यांनी आम्हांस तुमच्याविषयी व समिति-विषयी माहिती देऊन असे सुचविले की, आम्ही आपली वेगळी संस्था न ठेवता आपल्या संस्थेतच तिचे विलीनीकरण करावे. यावर विचार केल्यानंतर त्यांची सूचना योग्य वाट-ल्याने आपणास लिहीत आहे. तरी सोयीनुसार आपण एकदा येथे यावे व आम्हांस मार्गदर्शन करावे किंवा आमच्यापैकी कोणी वर्धेस येऊन यासंबंधी विचार करू. तरी आपण काय ठरविता हे कळवावे."

याच सुमारास मावशींच्याच प्रेरणेने त्यांच्या नागपूर निवासी भगिनी सौ. मैनाताई गोखले (दाते) आणि आर्वीच्या सौ. कमलताई देशपांडे (अगस्ती) या दोघींच्या

मनात त्यांच्या गांवी समिति शाखा सुरू करण्याची कल्पना दृढ होऊ लागली होती.

या शिवाय आणखी काही ठिकाणच्या भगिनींनी अशा स्वरूपाचे कार्य सुरू करण्याची इच्छा डॉक्टर हेडगेवारांजवळ प्रदर्शित केली तेव्हा त्यांनी मार्गदर्शनार्थ मावशींकडेच अंगुलिनिर्देश केला. एका ठिकाणी तर उच्चपदस्थ संघाधिकाऱ्याच्या सुविद्य पत्नीनेच डॉक्टरांजवळ अशी इच्छा प्रदर्शित केली होती. त्यांनाही वंदनीय मावशींशीच पत्रव्यवहार करण्यास सांगण्यात आले.

वस्तुतः थोड्याच काळापूर्वीपर्यंत, म्हणजे समिती सुरू करण्यासंबंधी वंदनीय मावशींची त्यांचेशी चर्चा होइपर्यंत, स्त्रियांना अशा स्वरूपाच्या कार्याची आवश्यकता आहे किंवा नाही या संबंधी प. पू. डॉक्टरांनी फारसा विचारही केलेला नव्हता परन्तु स्त्रियांच्या संघटनेचे, त्यांच्या शारिरिक व मानसिक बलोन्नतीचे कार्य मावशींनी सुरू केल्यानंतर मात्र लावलेले हे रोप मर्यादित राहू नये, त्याच्याही शाखा वाढाव्यात आणि त्यासाठी वंदनीय मावशींनीच पुढाकार घ्यावा असा प. पू. डॉक्टरांच्या मनाचा कल झाला, हे यावरून दिसून येते. म्हणूनच १९४० पर्यंत म्हणजे ते हयात असेपर्यंत समिती-कार्याला त्यांचेकडून अत्यंत आस्थापूर्वक सहाय्य आणि मार्गदर्शन होत राहिले.

जिच्या जाणीवेने आपण समितीकार्य सुरू करण्यास प्रेरित झालो ती परिस्थिती एखाद्या गावापुरती मर्यादित नसून सर्वदूर तशीच परिस्थिती असल्याने ठिकठिकाणच्या भगिनींना साहजिकच अशा स्वरूपाच्या कार्याची गरज भासत आहे, अर्थात समस्त हिंदु स्त्री समाजाचाच विचार होणे जरूर आहे, अशी मावशींच्या मनाची खात्री झाल्यानंतर प्राप्त परिस्थितीला सामोरे जाऊन येणाऱ्या जबाबदारीचा सहर्ष स्वीकार करणे हा योग्य असा एकच पर्याय आहे, असा त्यांच्या मनाने निर्वाळा दिला. एकदा निश्चय होऊन समितीच्या देशव्यापी कार्यास त्यांनी स्वतःला वाहून घेतल्यानंतर गेली ३८ वर्षे-सत्तरीच्या उंबरठ्यावर उभे असताही-त्याच विश्वासाने, चिकाटीने आणि सातत्याने त्यांचे कार्य चालू आहे. या दीर्घ मार्गक्रमणात जसे निराशाजनक प्रसंगाचे निनाद उठले, वा मतमतांतरांची वावटळे उठली, तसेच प्रतिकूल परिस्थितीचे अनेक उंचवटेही येऊन गेले. परन्तु मोठ्या धीरगंभीरतेने या सर्वांवर मात करून कमीअधिक प्रमाणात देशाच्या सर्वच भागांत समिती कार्याचा विस्तार करण्यात त्यांनी यश मिळविले.

१९३७ च्या फेब्रुवारी मधे श्रीमती नानीबाई कोलते यांनी भंडारा येथे सुरू केलेल्या कार्याचे विलीनीकरण झाले. सौ. कुसुमताई कोलते, कु. उषा फणसे ( सौ. उषाताई चाटी, नागपूर ), कु. अंबू साठे (प्रा. नीला जोशीराव, नागपूर) या तेथील काही सुरवातीच्या सेविका होत. या नंतर आर्वी येथे नवीन शाखेची रीतसर सुरवात करण्याचे दृष्टीने

मावशींनी श्रीमती कळमकर यांना आर्वीस पाठविले. गावातील स्त्रियांची बैठक घेतल्यानंतर श्रीमती जानकीबाई अगस्ती यांनी संचालिका म्हणून काम पहावे व श्रीमती सत्यभामाबाई मोहरीर यांनी त्यांना सहाय्य करावे असे ठरले. ही योजना निश्चित केल्यानंतर लगोलग तेथे रीतसर समितीची शाखा सुरू झाली.

नागपूर येथे समिती शाखेस सुरवात करण्यासंबंधी मावशींच्या कनिष्ठ भगिनी कु. मैना दाते ( सौ. मैनाताई गोखले, इंदूर ) उत्सुक होत्याच. आपल्या भगिनीप्रमाणे त्यांच्यातही लोकसंग्राहकतेचा गुण असल्याने बऱ्याच मैत्रिणींना त्यांनी आपल्या भोवती एकत्र केले होते. परन्तु एखादी अनुभवी जबाबदार स्त्री पुढाकार घेण्यास तयार असल्याशिवाय समितीची शाखा सुरू करायची नाही असा मावशींचा सुरवातीपासून कटाक्ष असल्याने रीतसर शाखेस सुरवात करण्याची मावशींनी त्यांना लगेच परवानगी दिली नव्हती. यामागे सुरक्षिततेबद्दल मुलींच्या पालकांना जास्तीतजास्त हमी देता यावी हा हेतू होता. मुलांप्रमाणेच मुलींनीही रोज उघड्यावर खेळावयास जाणे हा उपक्रम या सुमारापर्यंत प्रचलित झालेला नव्हता. ही गोष्ट समाजाच्या अंगवळणी पडण्यास समितिकार्याने मोठा हातभार लावलेला आहे यात शंकाच नाही. समितिद्वारे समाजात घडून आलेला हा बदल सकृत्‌दर्शनी अति क्षुल्लक वाटला तरी फार महत्वाचा आहे. समिती – कार्यासंबंधी नितांत सहानुभूति बाळगणाऱ्या नागपूर येथील कॉंग्रेसच्या पुढारी श्रीमती अनसूयाबाई काळे समितीचे हे वैशिष्ट्य वंदनीय मावशींजवळ व्यक्त करीत असत. त्या म्हणत, " लक्ष्मीबाई, आपल्या मुली नियमाने समितीत पाठविण्या संबंधी ठिकठिकाणच्या पालकांचा जो विश्वास तुम्ही संपादन करू शकता तो खरोखरीच वाखाणण्यासारखा आहे. समिती–व्यतिरिक्त इतर संस्थांत हे तितके सफल होत नाही, असा माझा अनुभव आहे. समिती मुलींची उत्तम संस्कार–शाळा आहे यात शंकाच नाही."

आमच्या कुटुंबाशी पूर्वीपासून सुपरिचित असलेल्या श्रीमती सावित्रीबाई छत्रे यांनी जबाबदारी स्वीकारण्याचे स्वेच्छेने मान्य केल्यानंतर त्यांच्या धंतोली विभागातील घराशेजारी समिति शाखा सुरु करण्यात आली. मैनाताई आणि त्यांच्या मैत्रिणी बर्डीहून धंतोली विभागात शाखेत जाऊ लागल्या. परन्तु विविध प्रकारच्या वाहनांची प्रचुरता असलेल्या आजच्या काळात जरी बर्डी ते धंतोली हे अंतर घर--अंगणाप्रमाणे भासत असले तरी त्या काळी, निदान मुलींच्या दृष्टीने तरी, ' दूर ' या सदरातच मोडले जाई. त्यामुळे मैनाताईंनी बर्डी विभागासाठी वेगळी शाखा काढण्याचे ठरविले. त्यानुसार बुटी महालातील बंदिस्त आवारात त्यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत, त्यांनी शाखा सुरू केली. मैनाताई आणि साधारणपणे त्यांच्या समवयस्क असलेल्या, तारा विंझे ( सौ. विजया साने नागपूर )

सिंधु रानडे ( सौ. सिंधुताई पाटणकर, दुर्ग ) इंदुकला रानडे ( सौ. इंदुकला जोशी ) प्रभा भांडारकर ( प्रभाताई देशपांडे ) प्रमिला पाठक ( डॉ. प्रमिलाताई टोपले, अकोला ) या वर्डी शाखेच्या आरंभीच्या काही प्रमुख सेविका होत. वैशिष्ट्य हे की वरील पैकी बहुतेक आजही आपआपले संसार नीट सांभाळून समिती-कार्यात त्याच उत्साहाने मग्न झालेल्या दिसतात. धंतोली शाखेप्रमाणे वर्डी शाखेवरही श्रीमती सावित्रीबाई छत्रे यांचेच नियंत्रण चाले.

१९३७ च्या पूर्वार्धात भंडारा, आर्वी, नागपूर या व्यतिरिक्त वर्धा जिल्ह्यात सिंदी येथे सौ. सुशीलाबाई साठे आणि हिंगणघाट येथे श्रीमती अनसूयाबाई सबनीस यांनी, तर यवतमाळ जिल्ह्यात यवतमाळ येथे सौ. जानकीबाई घवाब आणि धामणगाव येथे श्रीमती जोग यांनी वंदनीय मावशींच्या प्रेरणेने समिती–कार्यास सुरवात केली.

अशा प्रकारे समिति स्थापनेनंतर एक वर्षाच्या आतच वर्धेशिवाय इतर सात ठिकाणी समितीच्या शाखा सुरू झाल्या. या सर्वच ठिकाणी मर्यादित काळपर्यंतच संघ स्वयंसेवकांची मदत घेऊ व शक्य तितक्या लवकर या बाबतीत आत्मनिर्भर होऊ असा मावशींनी डॉक्टरांना शब्द दिलेला असल्याने सर्व प्रकारच्या अडचणी असूनही ३७ च्या मे महिन्यात म्हणजे समिती स्थापनेपासून केवळ ६ महिन्यांनी, वर्धेस अधिकारी प्रशिक्षण वर्ग घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

ठरल्याप्रमाणे वर्धा येथील न्यू इंग्लीश हायस्कूलच्या प्रांगणात वर्गाच्या कार्यक्रमास आरंभ झाला. वर्गासाठी स्थानीय व बाहेरगावच्या मिळून ६० सेविका होत्या. पहिलाच उन्हाळी वर्ग असल्याने खर्चाचे प्रमाण वाढू नये म्हणून स्थानीय सेविकांच्या घरीच बाहेरच्या सेविकांची उतरण्याची व्यवस्था केली होती.

समितीचा हा पहिला उन्हाळी वर्ग अडचणी असूनही अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. या वर्गाचा आणखी एक विशेष हा की, समिती-स्थानावर भगवा ध्वज लावण्याचा निर्णय या वेळीच घेण्यात आला. त्यानुसार राणी लक्ष्मीबाईंच्या फोटोऐवजी समिती स्थानावर रोज भगवा ध्वज फडकू लागला.

ब्रिटिशांनी देऊ केलेली प्रांतिक स्वायत्तता स्वीकारून प्रांताच्या मर्यादित स्वरूपातील राज्यकारभार चालविण्यासाठी मंत्रिमंडळे स्थापन करण्याचा कॉंग्रेसने निर्णय घेतल्यामुळे १९३७ च्या पूर्वार्धात जरी कॉंग्रेसची राजवट सुरू झाली तरी डॉक्टर हेडगेवारांनी चालना दिलेल्या वैचारिक भूमिकेला उजाळा देणाऱ्या ज्या काही घटना त्यावेळी महाराष्ट्रात घडल्या त्यापैकी एक म्हणजे पुणे येथील ‘ सोन्यामारुती प्रकरण ’ निमित्त

झालेला यशस्वी सत्याग्रह; आणि दुसरी म्हणजे दीर्घकालीन स्थानबद्धतेनंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची झालेली सुटका, या प्रमुख होत. केवळ राजकीय कुटील नीतिचा परिपाक म्हणूनच मुस्लीमांच्या धर्मभावना जोपासण्याचे नाटक करणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी पुण्याच्या बुधवार चौकापासून हाकेच्या अंतरावरील, खोपटीवजा सोन्यामारुती मंदिराच्या परिसरात वाद्यबंदीचा हुकूम बजावला होता.

हा बंदी हुकूम अत्यंत अन्यायकारक असल्याने तो मान्य करणे म्हणजे निव्वळ मूर्खपणाचे ठरले असते. म्हणूनच त्याला मूठमाती देण्यासाठी साहित्यसम्राट न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर आदि पुढाऱ्यांनी सत्याग्रहाचा निर्णय घेतला. सत्याग्रहाचा आरंभ झाला त्यावेळी डॉक्टर हेडगेवार संघाच्या उन्हाळी वर्गानिमित्त पुण्यातच होते. त्यांनीही १३ मे रोजी कराड येथील महादेवशास्त्री दिवेकर यांचे समवेत कायदा मोडून सत्याग्रह केला. डॉक्टरांना दंडाची शिक्षा झाली. या घटनेमुळे डॉक्टर आणि त्यांचे कार्य यांचेकडे पश्चिम महाराष्ट्रातील जनता आपुलकीने पाहू लागली.

देशाच्या उत्कर्षासाठी असलेली तळमळ, त्यासाठी केलेला अपूर्व त्याग, सोस-लेल्या भयंकर हालअपेष्टा आदि फुलांच्या सुंदर गुच्छाप्रमाणे, समाजाचे नेतृत्व कर-ण्यास आवश्यक अशा विविध गुणांनी युक्त अशी, कुणालाही आकर्षित करणारी स्वातंत्र्यवीरांची व्यक्तिरेखा साहजिकच समाजाचे उद्दीपक स्फूर्तिकेंद्र बनली. मुक्ततेनंतर हिंदुमहासभेची धुरा सांभाळण्याचा त्यांनी निर्णय घेतल्यामुळे हिंदुत्वनिष्ठ वैचारिक भूमिके-तूनच भारताचे चिरकालीन हित साध्य होऊ शकते हा दृष्टिकोन बाळगणाऱ्या सर्वांनाच कमालीचे समाधान झाले. परिणामतः १९३७ च्या जुलै–ऑगस्टमध्ये पश्चिम महाराष्ट्रात, आणि नोव्हेंबर – डिसेंबरमध्ये विदर्भात, ठिकठिकाणी त्यांच्या स्वागताचे अभूतपूर्व समारंभ झाले. नागपूर व वर्धा या दोन्ही ठिकाणांना त्यांनी भेटी दिल्या. वर्धेच्या मुक्कामात वंदनीय मावशींनी त्यांची भेट घेऊन नुकत्याच सुरू झालेल्या समिति–कार्याची त्यांना माहिती दिली.

साहजिकच वरील परिस्थिती समितीकार्याच्या वाढीसही पूरक ठरणारी होती. म्हणू-नच या सुमारास महाराष्ट्रातील ठिकठिकाणाहून समिति शाखा सुरु करण्याबाबत मावशींना विनंतिवजा पत्रे येऊ लागली. परन्तु एखाद्या भगिनीचे पत्र आले म्हणून लगेच परवानगी देऊन तिच्यावरच शाखेची जबाबदारी टाकावयाची हा प्रकार मावशींनी शक्यतोवर टाळला. तसे जर होते तर त्या एकाच वर्षात नामधारी का होईना परन्तु अनेक शाखा महाराष्ट्रात सुरू झाल्या असत्या. अशा परिस्थितीत येणारे उत्साहाचे उधाण क्षणिक ठर-ण्याचीच अधिक शक्यता आहे, हे मावशी जाणून होत्या.

त्या वर्षीच्या डिसेंबर महिन्यात संघाचे वर्धा जिल्हा शिबीर पुलगाव येथे होते. शिबीराची रचना व उभारणी, त्यातील निरनिराळया व्यवस्था, त्यात होणारे शारीरिक व कवायती कार्यक्रम आणि शिस्त या सर्वच बाबतीत वर्धा जिल्ह्याचे शिबीर उल्लेखनीय गणले जात असे. १९३४ सालच्या वर्धा येथील शिबीराला भेट दिल्यानंतर खुद्द महात्मा गांधींनीही त्याची विशेष प्रशंसा केली होती. या शिबीराचे जवळून निरीक्षण करावे अशी मावशींची बऱ्याच दिवसांपासूनची इच्छा होती. ती त्यांनी वर्धा जिल्हा संघचालक श्री. आप्पाजी जोशी यांना बोलून दाखविली. आप्पाजींनी लगेच होकार दिला. त्यानुसार मावशी काही सेविकांसह या शिबीरात राहिल्या. त्यांच्यासाठी आप्पाजींनी खास राहुटीची व्यवस्था केली होती. डॉक्टरांनी या शिबीराला भेट दिल्याने त्यांच्याशीही समितिविषयक चर्चा करण्याची सुसंधी मिळाली.

मावशींच्या कार्य-इतिहासात १९३८ हे एका दृष्टीने महत्वाचे वर्ष होय. त्यांनी देश-व्यापी संघटनेचा प्रपंच मांडला होता. त्यासाठी निष्ठावान, धडाडीच्या आणि कुशल संघटक अशा सहकाऱ्यांचा संग्रह आवश्यक होता. अशा बऱ्याच सहकाऱ्यांची आणि सेविकांची त्यांना या वर्षात जोड मिळाली असे दिसून येते. विशेषतः नागपूर येथील कै. लक्ष्मीबाई तथा काकू परांजपे आणि त्यांच्याच कन्या कु. कुसुम परांजपे ( सौ. कुसुमताई साठे ); पुणे येथील श्रीमती सरस्वतीबाई तथा ताई आपटे, श्रीमती वहिनी अभ्यंकर आणि कु. बकुल नातु ( सौ. बकुलताई देवकुळे, मुंबई ); सोलापूर येथील श्रीमती काशीताई कुळकर्णी व श्रीमती कुमुदिनीबाई अफजुलपूरकर ( सध्या हैद्राबाद ); कराड येथील सौ. इंदिराबाई तथा ताई दिवेकर; अकोला येथील श्रीमती सिंधुताई फाटक ( सध्या दिल्ली ); चांदा येथील श्रीमती द्वारकाताई शिरास ( सध्या नागपूर ) आदिंचा या वर्षात प्रथम संबंध आल्यानंतर आजतागायत म्हणजे गेली ३६ वर्षे सातत्याने, निष्ठापूर्वक आणि पुढाकार घेऊन या सर्व समितीकार्य करीत आहेत.

१९३८ पूर्वी काही वर्षांपासून धर्मभास्कर विनायकमहाराज मसूरकर यांच्या प्रेरणने मसुर येथील त्यांच्या आश्रमाच्या महिला कार्यकर्त्यांनी पुणे, सांगली, सातारा, मिरज आणि कराड आदि काही ठिकाणी स्त्रियांसाठी सूर्यनमस्कार व लाठीकाठीचे वर्ग चालविले होते. श्रीमती उमाबाई गोगटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम चालू होता. पश्चिम महाराष्ट्रा-तील या ठिकाणच्या ज्या भगिनींनी हिंदु स्त्रियांच्या संघटनेची निकड जाणली होती, त्यांनी अशा प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या योजनेच्या अभावी साहजिकच मसूराश्रमाच्या या उपक्रमास उचलून धरले होते. याच सुमारास, म्हणजे १९३८ च्या एप्रिल अखेर, पुणेकरांनी हिंदु युवक परिषदेचे आयोजन करून डॉक्टर हेडगेवारांना तिचे अध्यक्षपद भूषविण्यासाठी पाचारण केले. तत्कालीन परिस्थितीत डॉक्टरांची निवड अत्यंत समर्पक असल्याने ही

परिषद अत्यंत यशस्वी झाली. यामुळे डॉक्टर आणि त्यांची संघटना या दोहोबद्दल महाराष्ट्राच्या त्या भागात कमालीची आपुलकी निर्माण झाली. त्यांच्या तर्कशुद्ध विचार-सरणीने उपस्थित समाज इतका प्रभावित झाला की परिषदेत ' राष्ट्रसेनापती ' असे संबोधून त्यांचा गौरव करण्यात आला.

डॉक्टर हेडगेवारांनी समोर ठेवलेल्या कार्यक्रमासंबंधी जनमानसातील वाढती सहानुभूति आणि आकर्षण लक्षात घेता महाराष्ट्राच्या त्या भागात समितिकार्याचे बीजारो-पण करण्यास योग्य काल आहे हे जाणून मावशींनी प्रथम पुण्यासंबंधी विचार चालू केला. केसरीचे माजी संपादक श्री ग. वि. केतकर यांच्या पत्नी कै. सरस्वतीबाई तथा जिजी केतकर या सौ. कालिंदीताई पाटणकर यांच्या भगिनीच असल्यामुळे वर्धेस आमचेकडे त्यांचे जाणेयेणे असे. त्यांच्याकडून मावशींनी पुण्यातील एकंदर परिस्थिती आणि तेथील कार्येच्छुक मगिनींची माहिती मिळविली. स्वतः जिजींनीही यथाशक्ति सहभागी होण्याची तयारी दर्शविली.

हिंदु युवक परिषद आटोपल्यानंतर लगेच पुढच्याच महिन्यात मावशींनी श्रीमती मालतीबाई कळमकर आणि आमच्या भगिनी सौ. वत्सलाताई यांच्यासह पुण्यास भेट दिली. समिती कार्यासाठी भ्रमणास येथूनच सुरवात झाली. त्यानंतर गेली ३६ वर्षे यानिमित्त सर्व देशभर मावशींची अखंड रीत्या भ्रमंती चालू आहे. कै. जिजी केतकर आणि श्री. आप्पाजी जोशी यांनी मावशींना जी माहिती पुरविली होती त्यावरून त्यांच्या मनाची ही खात्री झाली की श्रीमती ताई आपटे यांना जर प्रवृत्त करता आले तर पुणे आणि निकटच्या विभागात समिति कार्याची भक्कम पायाभरणी करता येईल. आणि त्यांची ही अटकळ तंतोतंत खरी ठरली, हे पुढील घटनांवरून दिसून येते.

वंदनीय मावशी आणि श्री. ताई आपटे यांची झालेली प्रथम भेट आणि त्यानंतर पुण्यास समिति-शाखेची झालेली स्थापना ही माहिती ताईच्याच शब्दात देणे श्रेयस्कर ठरेल. सेविका वार्षिकातील आपल्या एका लेखात त्या म्हणतात :

"१९३७ सालची गोष्ट. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिस्तबद्ध संघटना पाहून मनात असे आले की आपल्या महिलांची जर अशी एखादी नियमित चालणारी व शिस्तबद्ध संघटना करता आली तर किती चांगले होईल !

पुण्यातील एका सन्माननीय व्यक्तीने मला असे सांगितले की वर्धा येथे अशाच पद्धतीचे कार्य सुरू आहे. त्यांना पत्र पाठवून इकडील सर्व माहिती कळवा व तुमचे कार्य त्या केंद्राला जोडा.

ह्या बाबतीत आमचा असा विचार सुरू झाला होता तोच, मला वाटते १९३८ चा मे महिना असेल, एक दिवस संध्याकाळी ५ च्या सुमारास मध्यम वयाच्या, अंगाने सडपातळ, मध्यम उंच, शांत, प्रसन्न आणि हंसतमुख चेहरा असलेल्या एक बाई आपटे इथेच राहतात ना ? म्हणून विचारीत आमच्या घरी आल्या. त्यांचे स्वागत करून मी त्यांना बसा म्हटले व आपले नाव काय ? कोठून आलात ? वगैरे चौकशी केली. त्यांनी ओळखी-करता आपल्या बरोबर डॉ. हेडगेवार ह्यांचेकडून आणलेले पत्र मला दिले. ते वाचल्या-बरोबर ह्या बाई कोण हा प्रश्नच उरला नाही आणि पटकन् उलगडा झाला की, स्त्रियांच्या संघटनेचे कार्य करणाऱ्या श्रीमती लक्ष्मीबाई केळकर त्या ह्याच.

वंदनीय मावशींना पाहताच मला अतिशय आनंद झाला. त्यांचे ते गोड व स्नेहपूर्ण बोलणे, कामाची चौकशी करण्याची पद्धत वगैरे पाहून असे वाटले की त्यांचा व आपला पुष्कळ दिवसाचा परिचय आहे. कारण नवीन ओळख झाल्यानंतर त्यात जो एकप्रकारचा औपचारिकपणा असतो तो मला कुठेच आढळला नाही.

दुसऱ्या दिवशी मावशींनी एक बैठक घेऊन समितीची कार्यपद्धति आणि प्रार्थना कशी सांगावी, कशी म्हणावी आदि तपशीलही सांगितला. यानंतर पुणे शाखा केंद्राला जोडून तिचे काम व्यवस्थितपणे सुरू झाले. ”

श्रीमती ताई आपटे यांच्यामुळे त्यांचे पति कै. विनायकराव तथा दादासाहेब आपटे यांचा मावशींशी परिचय झाला. त्यांच्या सहकार्याने मावशींनी कराड, सातारा, मिरज, सांगली आदि ठिकाणच्या कार्यकर्त्या भगिनींशी संपर्क स्थापित केला.

कराड येथे समिति कार्यास कशी सुरवात झाली या संबंधीच्या आपल्या संस्मरणात सौ. इंदिराबाई तथा ताई दिवेकर म्हणतात.

“ राष्ट्रसेविका समितीची अधिकृत शाखा म्हणून कराड येथे १९३८ च्या ऑक्टोबर मध्ये कार्य सुरू झाले. या आधी सुमारे ७–८ महिने तरी येथील समवयस्क मुलींनी फक्त एकत्र खेळण्यास सुरवात केली होती. ही कुणकुण मसूर जवळ असल्यामुळे तेथील आश्रमवासियांना लागली. तेव्हा खेळणाऱ्या मुलींशी संपर्क साधण्याच्या प्रयत्नाला ते लागले. परन्तु मुलींनी ते टाळले. त्यावेळी ज्या सुमारे १०० मुली एकत्र येत असत, त्यात कु. अनसूया अंबर्डेकर आणि कु. इंदू पटवर्धन ( सध्या इंदूताई जोशी पुणे ) ह्या दोघी विशेष जबाबदार होत्या.

एक दिवस या दोघी येथील एक शिक्षिका श्रीमती आनंदीबाई दीक्षित यांचेसह माझेकडे आल्या व आम्ही, म्हणजे मी व सुलोचनाबाई गोखले यांनी, त्यांना पाठबळ द्यावे अशी विनंति त्यांनी केली–तेव्हा ती मान्य करून आम्ही रोज तेथे जाऊ लागलो. त्यानंतर

हिंदूधर्म भगिनी मंडळ म्हणून आम्ही कार्य करणार नाही, असे ममुराश्रमाच्या लोकांना जेव्हा स्पष्टच सांगितले, तेव्हा त्यांचे येणे बंद झाले. प्रारंभी जशी येत होती तशी लाटीकाठी मीच शिकवू लागले.

यानंतर कांही दिवसांनी पुण्याहून कै. दादासाहेब आपटे यांचेकडून राष्ट्र-सेविका समिती संबंधी सर्वच प्रकारची माहिती कळली. शिवाय वंदनीय मावशींचे पत्रही आले. तेव्हा दसऱ्यापासून भगवा ध्वज लावावयास सुरवात करून आम्ही येथे रीतसर समितीची शाखा सुरू केली.

कराड येथे शाखा सुरू झाल्यानंतरही काही दिवस मावशींची व माझी प्रत्यक्ष भेट झालेली नव्हती. सर्व गोष्टी पत्ररूपानेच चालू होत्या. संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीस प्रत्यक्ष भेटण्याची सेविकांच्या मनातील उत्सुकता स्वाभाविकच होती; परन्तु त्यांच्यापेक्षा त्यांच्या पालकांची जास्त होती. कारण आपल्या होतकरू मुली योग्य व्यक्तींच्या नजरेखाली आहेत किंवा नाही या संबधी शहानिशा करून घेणे ही निदान त्याकाळी पालकांच्या मनाची स्थिती होती. कदाचित् आज हा मागासपणा गणला जाईल.

समिती सुरू झाल्यानंतर काही महिन्यांनीच वंदनीय मावशींची कराड भेट ठरली तेव्हा स्थानिक बंधुवर्गासही आम्ही निमंत्रित केले होते. त्यावेळेस त्यांनी मावशींना जे प्रश्न विचारले ते येणे प्रमाणे :

कामाचे उद्दीष्ट काय ? सुरवात कशी झाली ? आज काम कोणत्या स्वरूपात चालू आहे ? किती ठिकाणी चालू आहे ? काम करणाऱ्या स्त्रिया कोणत्या पातळीच्या आहेत ? त्या कुटुंबवत्सल आहेत काय ? संघाचा व आपला संबंध काय ? आपण कोठे राहता ? हे आणि याच्या अनुषंगाने विचारलेले अनेक प्रश्न ऐकून मला क्षणभर चमत्कारिकच वाटले. परन्तु त्यामुळे मुळीच विचलीत न होता मावशींनी अत्यंत सहजतेने या सर्वच प्रश्नांची उत्तरे दिली. त्यावळी त्यांच्या प्रत्येक शब्दाला संयमाची, सात्विकतेची आणि विश्वासाची जी धार दिसून आली ती मी कधीच विसरणार नाही.

'मावशी म्हणजे स्त्रियांना संसारापासून परावृत्त करणारी स्त्री आहे' ही काहींच्या मनात असलेली शंका त्यामुळे दूर झाली.

कराड येथे समिती शाखा सुरु झाल्यानंतर आगेमागे सातारा येथे श्रीमती उषाताई मोकाशी, सांगली येथे श्रीमती माई गोडबोले आणि मिरज येथे श्रीमती आऊताई दिवेकर, श्रीमती वेणूताई कोल्हाटकर व कु. दुर्गा रानडे ( आता सौ. शांतादुर्गा करंदीकर पुणे )यांनी आपल्या गांवी चालू केलेले कार्य समिति-कार्यात विलीन करण्याचे कामी पुढाकार घेतला."

नागपूर येथे या पूर्वीच समितीच्या दोन शाखा सुरू झालेल्या असल्या तरी सर्व दृष्टींनी विस्तृत अशा तेथील क्षेत्राचा विचार करता अधिक धडाडीच्या नेतृत्वाची तेथे गरज आहे ही गोष्ट मावशींच्या लक्षात आली. एखाद्या योग्य व्यक्तीची निवड करण्यासंबंधी त्यांचे विचारचक्र फिरू लागले. तेथील ज्या काही भगिनांची नांवे त्याच्या समोर येत होती त्यात श्रीमती लक्ष्मीबाई तथा काकू परांजपे यांचे नाव प्रमुख होते. या बाबतीत मावशींच्या विचारामागील पार्श्वभूमि त्यांच्याच शब्दात देणे अधिक योग्य ठरेल. कै. काकू परांजपे यांना श्रद्धांजली वाहण्याच्या निमित्ताने लिहिलेल्या एका लेखात मावशी म्हणतात, "परांजपे मंडळी नागपूरची आणि माझेही माहेर नागपूरचेच. त्यामुळे माझा आणि कै. काकूंचा परिचय लहानपणापासूनच होता. पण त्यांच्या नि माझ्या वयात ७-८ वर्षांचे अंतर असल्याने (वयाने त्या वडील होत्या) जवळीक नव्हती. तथापि हळदीकुंकू, मंगळागौरी आदि प्रसंगांचे वेळी त्यांचा व माझा परिचय होत गेला. त्यावेळीच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटायला जे प्रमुख कारण झाले ते म्हणजे नागपूरच्या महाल विभागातील राममंदीर गल्लीतील विठोबाच्या देवळात त्या करीत असलेली भजने व कीर्तने. श्रीमती उमाबाई व काकू परांजपे या दोघी जावा तेथे हे कार्यक्रम घेत. त्यावेळी धीटपणाने पुढाकार घेऊन काम करण्याचा काकूंचा गुण माझ्या मनात भरला होता."

प्रथम काकू परांजपे 'सरस्वति मंदिर' नामक महिला समाजाच्या एक प्रमुख कार्यकर्त्या होत्या. परन्तु ते कार्यक्षेत्र सीमित होते. शिवाय त्यांच्या कुटुंबाची जी वैचारिक परंपरा मावशींना परिचित होती त्यावरून राष्ट्रसेविका समिती सारख्या व्यापक स्वरूपाच्या कार्यात सहभागी होण्यास त्यांना अधिक आवडेल हे हेरून त्यांचेजवळ सूतोवाच करण्याचा विचार त्यांनी पक्का केला. तशी संधि मावशींना लगेच मिळाली. १९३८ च्या डिसेंबर मध्ये नागपूर येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अध्यक्षतेखाली भव्य प्रमाणावर हिंदू-महासभेचे अधिवेशन होते. त्यासाठी मावशी वर्धेहून नागपुरास गेल्या. योगायोग असा की अधिवेशनाच्या प्रांगणातच त्यांना काकू दिसल्या. त्यांच्या सोबत कु. कुसुम परांजपे (सौ. कुसुमताई साठे) याही होत्या. अधिवेशनाचा कार्यक्रम सुरु व्हायला थोडा अवधी असल्याने या वेळेचा सदुपयोग करून घ्यावा असा विचार करून मावशींनी काकूंना व कुसुमताईना अधिवेशनाच्या मंडपात बाजूला बोलावून घेतले व आपला विचार त्यांना बोलून दाखविला. त्याच भेटीत त्यांनी काकूंजवळून होकारार्थी शब्द मिळविला.

काम करण्याचे स्वीकारल्यानंतर काकू परांजपे कामास लागल्या. १९३९ च्या आरंभी वसंतपंचमीच्या मुहूर्तावर महाल विभागातील हिंदु मुलींच्या शाळेत नागपुरातील तिसऱ्या शाखेस त्यांनी सुरवात केली. काही दिवसांतच नागपूर संचालिका म्हणून काकूंची नियुक्ति

करण्यात आली. मावशींनी काकूंची केलेली निवड अचूक ठरली. थोड्याच कालात नागपुरातील समिति शाखांची संख्या ११ पर्यंत वाढली.

सुरवातीच्या वर्षात काकूंनी ज्या काही सेविका मिळविल्या त्यात प्रामुख्याने प्रा. सौ. कुसुमताई साठे ( परांजपे ) प्रा. सौ. कुसुमताई मराठे ( केळकर ), सौ. प्रमिलाताई मुंजे ( परांजपे ), सौ. इंदुताई गोखले ( परांजपे ), कु. प्रमिलाताई, सौ. मालिनी आठवले ( जोग ), सौ. लिलाबाई टोपे, रायपूर ( दाणी ), सौ. प्रतिभा भावे ( इंदू वरदडकर ) यांचा समावेश आहे. वंदनीय मावशींनी घालून दिलेल्या परंपरेनुसार यापैकी बहुतेक आपले संसार सांभाळूनहि आजतागायत समितीचे उत्तम कार्य करीत आहेत.

समिति-कार्य करू इच्छिणाऱ्या सेविका संबंधी मावशींची निश्चित मते आहेत. संसारात न पडता समितीचे कार्य करू इच्छिणाऱ्या सेविका आज जशा त्यांना भेटायला येतात तशा पूर्वीही येत. परन्तु अशांना कटाक्षाने मावशींनी त्या विचारापासून परावृत्त केले आहे. त्यांच्या मते, स्त्री संसारात पडल्यानंतर प्रारंभीची काही वर्षे हा तिच्या सामाजिक जीवनातील प्रशांतावस्थेचा काल होय. परंन्तु ही केवळ अस्थायी अवस्था आहे, ही सतत जाणीव ठेवली तर पुढील काळात यातून सहज बाहेर पडता येते. असा प्रयत्न करणे स्त्रीचे कतर्व्यच आहे. राष्ट्र-सेविका समिती करीत असलेला हा एक महत्वाचा संस्कार होय.

अशा प्रकारे समितीच्या आरंभीच्या वर्षात प्रामुख्याने वैदर्भीय क्षेत्रात आणि काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रातही समिति-कार्याची बीजे चांगलीच रुजली. त्यापासून वृक्ष कसा फोफावत गेला हा इतिहास पुढील प्रकरणातून येणारच आहे. तत्पूर्वी जे महत्कार्य वंदनीय मावशींनी सुरु केले, त्याची आधारभूत वैचारिक भूमिका आणि त्यासाठी योजलेले दैनंदिन व इतर कार्यक्रम याचा वाचकांना सविस्तर परिचय देणे आवश्यक वाटते. त्या दृष्टीने पुढील संपूर्ण प्रकरण या साठी खर्ची घातले आहे.

• • •

## समितीची वैचारिक भूमिका-कार्यक्रम : १०

पुरुषापेक्षा कुटुंबातील स्त्री हीच अधिक परिणामकारी संस्कारक शक्ति होय. नेहमीच्या जीवनात येणारा एक अनुभव वरील विधानाची पुष्टी करणारा आहे. असे दिसून येते की, १० ते १६ या संस्कारसुलभ वयोगटातील ज्या मुलांचे मातृमुख नाहीसे होते ती बहुतेक वाईट मार्गाकडे सहज वळतात. उलट अशा पितृमुख नाहीसे झालेल्या मुलांचे बाबतीत हे प्रमाण बरेच कमी असते.

मुलांचे दृष्टीने स्त्री जशी संस्कारक शक्ती आहे तशी पुरुषांचे बाबतीत ती स्फूर्तिदायक शक्ती आहे. म्हणूनच स्फूर्तिदेवता असा वाक्प्रचार आहे.

समाजावर संस्कृतीचेच संस्कार करावयाचे असतात. म्हणूनच जी संस्कारक आहे ती संस्कृति-रक्षक शक्तीही आहे हे स्पष्ट होय. तात्पर्य, स्त्री संस्कारक, संस्कृतिरक्षक आणि स्फूर्तिदायक शक्ति होय. वस्तुतः तिच्या या गुणमहात्म्यामुळेच स्त्रीला 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' इतके आदराचे स्थान दिले गेले आहे. अर्थात यावरून हे देखील अनुमान निघते की ज्या राष्ट्रातील स्त्रियांना आपल्यातील या शक्तींचे विस्मरण होते अथवा काही कारणामुळे त्यांचा त्या उपयोग करू शकत नाहीत ते राष्ट्र संस्कारहीन, स्फूर्तिहीन म्हणजेच मृतवत् बनते.

राष्ट्रजीवनातील स्त्रीची महान जबाबदारी आणि तिच्या कार्याचे समर्पक क्षेत्र लक्षात घेता 'संस्कृती हा राष्ट्राचा आत्मा होय' या तत्वसूत्राला पायाभूत मानून आपल्या कार्याची मावशींनी योजना आखली. समाजात हे कार्य स्थायी स्वरूपात रुजावे यासाठी स्त्रियांनी संघटित होऊन एकदिलाने काम करणे हाच एकमेव पर्याय दिसल्याने राष्ट्र-सेविका समिती या संघटनेस त्यांनी सुरवात केली.

'राष्ट्रसेविका समिती'ला हिंदु स्त्रियांचे संघटन करावयाचे आहे. हिंदु हाच भारतभूवरील आद्य समाज आहे आणि अनादिकालापासून तोच तिला मातृभू आणि

पुण्यभू मानत आला आहे. म्हणून हे स्पष्ट आहे की या देशाच्या राष्ट्रीय कल्याणाचे प्रथम आणि अन्तिम उत्तरदायित्व हिंदु समाजावरच आहे.

कुटुंबाचे प्रत्यक्ष घटक आणि त्यातील पाहुणे किंवा आश्रित या दोहोमध्ये स्वाभाविकतःच जसे अंतर आहे तसेच भारतीय कुटुंबाच्या संबंधात हिंदु आणि इतर यात आहे. कुटुंबाच्या कल्याणाचा विचार याचा समर्पक अर्थ म्हणजे कुटुंबातील लहान मोठ्या सर्व घटकांच्या कल्याणाचा विचार ! पाहुणे, अनाहुत किंवा आश्रित यांचे संबंधी वेगळा विचार होण्याचा प्रश्नच उठत नाही. कारण पाहुणा किंवा आश्रित यांना सुखावह होईल असेच कुटुंबाचे धोरण असावे ही मुळातच भारतीय संस्कृतीची विशेषता आहे. मात्र हेही तितकेच खरे की कुटुंबीय घटक नीट वागत नसेल तर आत्मीयता कमी न होऊ देता त्याच्यात सुधारणा घडवून आणण्याचाच सतत प्रयत्न करावयाचा असतो. परन्तु हेच धोरण पाहुणा किंवा परका यांचे बाबतीत ठेवता येत नाही. पाहुण्यांचे बाबतीत 'नीट वागा नाही तर चालते व्हा' हे धोरणच शहाणपणाचे आहे, हे कुणालाही नाकबूल असू शकत नाही. अशा प्रकारे, भारतीय जीवनातील हिंदु समाजाचे स्थान अत्यंत तर्कसम्मत आणि सुसंगत असल्याने, उल्लेखित दृष्टिकोनात वावगे असे काहीच नाही, ही त्यांची भूमिका आहे.

स्त्रीला कुटुंबात कन्या, भगिनी, पत्नी आणि माता या चार प्रकारच्या भूमिका पार पाडावयाच्या असतात. समाजात मात्र तिने स्वयंसेविका म्हणून वावरावे अशी समितीची अपेक्षा आहे. 'स्वयंसेविका' या शब्दाचा साधारणतः जो संकुचित अर्थ लावला जातो तो समितीला मान्य नाही. स्वराष्ट्र, स्वधर्म आणि संस्कृति यांचे कल्याण आणि वैभव या संबंधीच्या तीव्र इच्छेने प्रेरित होऊन त्यासाठी स्वेच्छेने आपले व्यक्तिगत जीवन समष्टिजीवनात समर्पित करणारी, अर्थात कोणत्याही स्वार्थाची अपेक्षा न ठेवता निरपेक्षपणे समाजच्या सेवेस्तव बद्धपरिकर झालेली, स्त्री म्हणजेच 'स्वयंसेविका' ही समितीची या संबंधीची वैचारिक भूमिका होय.

कोणत्याही सत्कार्याच्या सिद्धीसाठी ईश्वरी अंश असलेल्या गुरूच्या अधिष्ठानाची गरज असते, असे भारतीय परंपरा मानते. समितीलाही हा विचार मान्य असला तरी एखाद्या व्यक्तीला गुरु मानण्याची कल्पना तिला न पटणारी आहे. कारण एकतर गुरु ही वस्तुतः व्यक्तिनिष्ठ कल्पना असण्यापेक्षा भावनिष्ठ कल्पना आहे. शिवाय व्यक्तींत दोष निर्माण होण्याचा नेहमीच संभव असतो. म्हणूनच ज्यात दोषनिर्मितीचा धोका तर नाहीच परन्तु धर्म, संस्कृति अन् राष्ट्र यांच्या ऐतिहासिक उदात्ततेचे प्रतीकात्मक स्वरूप असल्याने ज्याचेशी समाजाच्या उत्कट भावना मात्र निगडित आहेत अशा परम पवित्र

भगव्या ध्वजाला समितीने गुरुस्थानी मानले आहे. भगव्या ध्वजासंबंधी समितीची भावना खालील श्लोकात स्पष्ट होण्यासारखी आहे.

उद्यत् विभाकर समस्त तिमिरापहर्ता ।
संख्ये हुतात्महुत शोणितशोणवर्णः ॥
त्यागस्य केतनमुदीर्ण हुताशनार्चिः ।
विश्वे सदा विजयते भगवत् ध्वजोऽयम् ॥

समिती कार्य-यंत्रणेच्या प्रकारास 'एकचालकानुवर्तित्व' असे संबोधले जाते. पुष्कळदा शब्दशः अर्थ लावल्यामुळे या पद्धतीचे हुकुमशाहीशी निकट नाते जोडण्याची प्रवृत्ति दिसून येते. परन्तु हे बरोबर नव्हे, कारण समिती-सेविका म्हणजे पारस्परिक बंधुभाव, विश्वास, सामंजस्य आणि स्पष्ट व्यवहार या दात्यांनी एकमेकात नीट अडकलेली समिति-यंत्रणेची असंख्य गतिशील चक्रे होत. प्रमुख संचालिका हे प्रमुख चक्र होय. पारस्परिक संमती आणि सहकार यांच्या जोरावरच ही चक्रे फिरत रहावीत अशी योजना आहे. संघटनेच्या यंत्रणेत अनुशासनावर विशेष भर असल्याने सकृत्दर्शनी तसे वाटणे स्वाभाविक आहे. परन्तु समिती ही मुळातच राजकीय किंवा शासन संस्था ( Political Institution ) नसून सेवा संस्था ( Service Institution ) आहे. त्यामुळे त्यात हुकुमशाहीकडे झुकविणाऱ्या सत्तेच्या प्रलोभनास वाव नाही, हे स्पष्ट आहे. थोडक्यात एकचालकानुवर्तित्व ही काही शासनपद्धती नव्हे; ती एक अनुशासनपद्धति आहे. समितीच्या जवळजवळ अर्धशतकीय वाटचालीवरून उल्लेखित दोष निर्माण होण्याची शक्यता फारच कमी आहे असे दिसून येते.

स्त्री हीच राष्ट्राची प्रमुख आधारशक्ती असून ती सुसंस्कारित केली तर राष्ट्र निर्मितीचे अर्धे काम पूर्ण होण्यासारखे आहे, असे समिती मानते. म्हणूनच स्त्रीला 'सुशीलाः सुधीराः समर्थाः आणि समेताः' बनविण्याचे समितीचे कार्य आहे. संपर्कात येणाऱ्या सेविकांना सुसंस्कार देण्यासाठी अखंडरीत्या ती मार्ग क्रमीत आहे. हा गंगौघ चालू रहावा म्हणून दैनंदिन कार्यक्रमाला विशेष महत्व दिले जाते.

सुदृढ शरीरातच निरोगी अर्थात तेजस्वी मन वास करते. या दृष्टीने दैनंदिन कार्यक्रमाचा भाग म्हणून शाखास्थानावर शारीरिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली जाते. शील हा स्त्रीचा सर्वात अनमोल असा ठेवा आहे. हे पावित्र्य अखंड राखण्यासाठी स्त्री सदैव आत्मसंरक्षणक्षम असली पाहिजे. म्हणूनच समितीच्या कार्यक्रमात शारीरिक शिक्षणाला महत्वाचे स्थान आहे. वळोवेळी घेतले जाणारे बौद्धिक वर्ग सेविकेची बौद्धिक पातळी उंच राखण्यास

मदत करतात. बौद्धिक वर्गांद्वारे सेविकांना भारताच्या प्राचीन परंपरेचा परिचय दिला जातो. वर्तमानकालीन कर्तव्ये कोणती, हे ज्ञान देखील यातूनच होते. थोडक्यात चारित्र्यसंपन्न, कर्तव्यतत्पर आणि राष्ट्रहितदक्ष होण्यासाठी आवश्यक असे संस्कार या कार्यक्रमांद्वारे अखंड रीत्या चालू असतात.

ज्या स्वयंसेविका नियमित समितीस्थानावर उपस्थित राहू शकत नाहीत त्यांच्यासाठी साप्ताहिक शाखांचीही योजना आहे. साप्ताहिक शाखांत शारीरिक शिक्षणाव्यतिरिक्त हस्तकला प्रशिक्षण, कीर्तन, भजन, प्रवचन, रामायण–महाभारत कथन आणि गृहोद्योग आदि कार्यक्रमही घेण्यात येतात.

भारतीय स्त्री मातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व या तीन गुणांनी परिपूर्ण असावी हा समितीने ठेवलेला आदर्श होय. राजमाता जिजाबाई, देवी अहल्याबाई होळकर आणि झांशीची राणी लक्ष्मीबाई या अनुक्रमे वर उल्लेखिलेल्या तीन गुणांचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे या तिघींना समिती आदर्श स्त्रिया मानते. केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर समस्त भारताचे कल्याण साधण्याच्या दृष्टीने शिव छत्रपती घडविणारी जिजाबाई देशमाताच होय! मातृत्वाचे हे थोर उदाहरण समिती सेविकांनाही प्रेरित करणारे असल्यामुळे सदैव स्मृती राहण्यासाठी तिची स्मारके उभारण्याची अथवा असलेल्या स्मारकांचे पुनरुज्जीवन करण्याची योजना वं. मावशींनी उचलून धरली आहे. कर्तृत्वाचे बाबतीत देवी अहल्याबाई होळकरांचे उदाहरण अलौकिक आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवणारी स्त्री कोणत्याही परिस्थितीत मुळमुळ आसवे ढाळीत न बसता परिस्थितीशी धैर्याने तोंड देण्यास उद्युक्त होईल, असा समितीचा विश्वास आहे. राणी लक्ष्मीबाईचे शौर्य, धैर्य आणि नेतृत्व तर पुरुषांनाही मार्गदर्शक आहे. परिस्थितीची हाक ऐकून पुढे सरसावून समाजाचे नेतृत्व करीत असता आपले बलिदान करणारी ती स्वातंत्र्यदेवता धन्य होय! म्हणूनच या तिन्ही महिलांचे स्मृतिदिन समिति साजरे करते.

वरील तीन ऐतिहासिक स्त्रियांव्यतिरिक्त आपल्या धर्माने 'स्त्री–शक्तीचा' आदर्श म्हणून समोर ठेवलेल्या सिंहवाहनी अष्टभुजा देवीची उपासना करणे जरूर आहे, असे समिती मानते. लक्ष्मी, काली आणि शारदा अशा विभिन्न रूपात ही जगन्माता विश्व-कल्याणाचे कार्य करते. प्रत्येक स्त्री या शक्तिमातेचाच अंश असल्याने तिच्या उपासनेचे अत्यंत महत्व आहे, असे समिती मानते.

संस्कार करण्याच्या कार्यात राष्ट्रीय उत्सव सुद्धा महत्वाचे असतात असे समितीस वाटते. म्हणून वर्षप्रतिपदा, गुरुपौर्णिमा (आषाढ पौर्णिमा), रक्षाबन्धन, विजयादशमी आणि मकरसंक्रांत हे उत्सव समितीत साजरे केले जातात.

वर्षप्रतिपदा हा हिंदूंचा वर्षारंभदिन होय. सम्राट शालीवाहनाने परकीय शकांचा पराभव केल्यानंतर स्मृती म्हणून या दिवसापासून आपल्या नावाने नवीन वर्षाचा आरंभ केला. अर्थात स्वाभिमान जागृत करणारा इतिहास ज्या उत्सवाशी संबंधित आहे असा हा उत्सव आहे.

समिती परमपवित्र भगव्या ध्वजास गुरू मानते. म्हणूनच गुरुपूजेची योजना असलेल्या गुरुपौर्णिमा या महत्वाच्या उत्सवास समिति--कार्यक्रमात महत्वाचे स्थान आहे. या दिवशी सेविका ध्वजपूजन करतात. गुरुदक्षिणा म्हणून स्वेच्छेने शक्यतेवढी जास्तीतजास्त रक्कम ध्वजासमोर अर्पण करतात.

श्रावण पौर्णिमा अथवा रक्षाबन्धन हा तिसरा उत्सव होय. या दिवशी सेविका ध्वजाला आणि परस्परांना राखी बांधतात. ' धर्मो रक्षति रक्षितः ' या न्यायाने ध्वजाच्या सन्मानाचे रक्षण करण्यास्तव कटिबद्ध झाल्यावर ध्वजही आपले रक्षण करील या विशुद्ध भावनेने सेविका ध्वजास राखी बांधतात. शिवाय परस्परास सहकार्याचे आवाहन करण्याचे दृष्टीने त्या एकमेकींस सुद्धा राखी बांधतात.

विजयादशमी हा तर भारतीयांचा एक प्रमुख राष्ट्रीय उत्सव ! हा सीमोल्लंघनाचा दिवस होय असेही आपल्या धर्मात सांगितले आहे. अर्थात जीवनातील विविध अडचणींच्या मर्यादा पार करून जाण्याचा हा दिवस व्यक्तिशः आणि सामाजिक दृष्ट्याही फार महत्वाचा आहे. शिवाय समितीचा जन्मदिवस म्हणूनही याला आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

समिती साजरा करीत असलेला मकर संक्रमण हा आणखी एक उत्सव होय. ' तिळगुळ घ्या गोड बोला ' या संघटनेच्या मंत्राचा संदेश देणारा उत्सव समिती पारंपरिक पद्धतीने साजरा करते. समाजातील पारस्पारिक बन्धुभाव वाढीस लागून सर्वांना वाढत्या सहकार्यासाठी प्रेरित करणारा हा उत्सव होय. परस्परातील स्नेह वृद्धिंगत करणारे हळदीकुंकू आणि तिळगुळ हे कार्यक्रम घेतले जातात.

स्त्री हीच खरी संस्कारक शक्ती असल्याने राष्टजीवनात तिचे अनन्यसाधारण महत्त्व आहे हे आरंभीच स्पष्ट केले. अर्थात स्त्री हा संस्कार-स्त्रोत असून जन्माला येणारी संतति गर्भावस्थेत असल्यापासूनच संस्कार करण्याचे स्त्रीचे कार्य सुरू होत असते. श्रीकृष्णाने सुभद्रेला चक्रव्यूहाची माहिती ती गर्भावस्थेत असताना सांगितली, त्यामुळे गर्भस्थ अभिमन्यूच्या ती कानावर पडून पुढे भारतीय युद्धात चक्रव्यूहभेदाचे कामी त्याला तिचा उपयोग झाला, ही कथा आपण महाभारतात वाचतो. आधुनिक शास्त्राने सुद्धा गर्भा-

वस्थेत संस्कार घडत असतात या कल्पनेला उचलून धरलेले आहे. मूल जन्मल्यानंतर जे संस्कार कार्य स्त्री करते ते सर्वांच्याच चांगले परिचयाचे आहे. परन्तु जी संस्काराचा स्त्रोत आहे असे आपण म्हणतो ती स्त्री स्वतः उत्तम संस्कारांनी युक्त असेल तरच हे महत्कार्य योग्य प्रकारे करू शकेल. म्हणूनच स्त्री-समाजावर समर्पक मानसिक आणि शारीरिक संस्कार करीत राहणे हे समितीचे उद्दिष्ट आहे. संस्कार कार्य करण्याचे हे उद्दिष्ट निरनिराळ्या कार्यक्रमांद्वारे साधले जाते. कालपरिस्थित्यनुसार कार्यक्रमांच्या स्वरुपात बदल संभवनीय आहे. तथापि संस्काराचे कार्य अविरतपणे चालू ठेवावयाचे असते हे जाणून असे कार्यक्रम नेहमी घेतले जातात. ऐतिहासिक वा पौराणिक महत्वाच्या विषयांवरील प्रदर्शने वा प्रहसने निरनिराळ्या महत्वाच्या विषयावरील विद्वानांची व्याख्यानसत्रे, उत्तमोत्तम साहित्याचे प्रकाशन, सहली आदि दैनंदिन कार्यक्रमाव्यतिरिक्त अनेक योजना अंमलात आणण्यामागे वंदनीय मावशींचा हाच दृष्टिकोन आहे. एखादी स्त्री नियमितपणे जरी समितीत येऊ शकली नाही तरी ती समितीप्रेरित कार्यक्रमांच्या सुसंस्कारांनी भारलेली असावी या संबंधी मावशींचा असलेला कटाक्ष भारतीय स्त्रीच्या जीवन यशस्वितेबाबत विशाल दृष्टिकोनातून विचार करता किती समर्पक आहे हे लक्षात येण्यासारखे आहे.

● ●

## समिती-कार्याचा प्रसार : ११

प्रारंभीच्या वर्षात महाराष्ट्रातील वर्धा, नागपूर, पुणे आणि सातारा आदि काही प्रमुख ठिकाणी समितीच्या शाखांना नीट सुरवात झाल्यानंतर विदर्भात अकोला आणि अमरावती येथे तर पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर आणि मुंबई येथे शाखा स्थापन झाल्या.

१९३८ साली वंदनीय मावशींच्या प्रेरणेने अकोला येथील सुशिक्षित आणि सुप्रतिष्ठित भगिनी सौ. कमलाताई सोहोनी यांनी पुढाकार घेऊन तेथे समिती--कार्यास प्रारंभ केला. यावेळी मावशी आपल्या दोन प्रमुख सहकारी सौ कालिंदीताई पाटणकर आणि श्रीमती यमुताई काणे यांचे समवेत तेथे गेल्या होत्या. याच सुमारास अकोला येथे त्यावेळी इंपिरिअल बँकेमधे असलेले एक अधिकारी श्री. फाटक हे अनुकूल असल्याने त्याच्या पत्नी सिंधुताई फाटक यांचा कमलाबाई सोहोनी मार्फत मावशींशी प्रत्यक्ष संबंध आला. मावशींशी संबंध आल्यानंतर गेली कित्येक वर्षे ज्या अनेक भगिनी मोठ्या निष्ठेने आणि अडचणींना तोंड देत देत सातत्याने समिति-कार्यात गुंतलेल्या आढळतात त्यात श्रीमती सिंधुताई एक प्रमुख आहेत. अकोला येथे समिति--कार्यास प्रारंभ केल्यानंतर पतीच्या व्यवसायानिमित्त स्थानांतरे करावी लागल्याने नाशिक आणि इंदूर या ठिकाणीही त्यांनी समितीच्या कार्यास चालना देण्याचे विशेष प्रयत्न केले. पतीच्या निधनानंतर वंदनीय मावशींनी घालून दिलेल्या उदाहरणानुसार त्यांनी आपला संपूर्ण वेळ समिती कार्यासाठी दिला. त्या उत्तर हिंदुस्थानातील समितीच्या कार्य--प्रमुख असल्याने त्यांचे दिल्लीस वास्तव्य असते.

सौ. कमलाताई सोहोनी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम विदर्भात अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यात समितीचे कार्य चांगलेच फोफावले. मावशींनीही आरंभी या भागांत विस्तृत दौरा काढून ठिकठिकाणी समितीच्या शाखा स्थापन केल्या विशेषतः अमरावती येथे, सध्या उज्जैन येथे असलेल्या सौ. लक्ष्मी वाकणकर (पूर्वाश्रमीच्या कुमारी लीला तारके अमरावती ) यांनी बरीच जबाबदारी उचलली. आजही त्या मध्य-प्रदेशातील उज्जैन भागात समितीचे उत्तम कार्य करीत आहेत.

याच सुमारास पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर येथे श्रीमती कुमुदिनीबाई अफझुलपूरकर यांना स्त्रियांचे कार्य आरंभ करावे अशी प्रेरणा होऊन त्यातूनच समिती कार्याची सुरवात झाली. या संबंधीचा वृत्तांत त्यांच्याच शब्दात देण्यासारखा आहे. तो असा :

"मला कुठून तरी कळले की वर्धेस स्त्रियांसाठी एक संघटना आरंभ झाली असून त्यात दैनंदिन कार्यक्रम म्हणून निरनिराळ्या शारीरिक, बौद्धिक, राष्ट्रीय व धार्मिक कार्यक्रमांची योजना आहे. त्यावेळी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जोरदार आंदोलने चालू होतीच. आपणही समिती सारख्या कार्यक्रमात भाग घ्यावा असे विचार माझ्या मनात आले. माझे विचार मी समवयस्क भगिनींसमोर मांडले. काही भगिनींना ही गोष्ट पटली. पण जागेचा प्रश्न पडला. तथापि आमच्या गच्चीवरच वर्ग घेण्याचा निर्णय घेऊन तो आम्ही सोडविला. आमचे भोवती ८०–९० भगिनी जमा झाल्या. त्यामुळे आम्हास हुरुप आला. सात--आठ दिवस असेच गेले. परन्तु असे वाटू लागले की परवानगी न घेता आम्ही अगोदरच शाखा सुरु केली हे बरे झाले नाही. वंदनीय मावशींच्या कानावर हे घालून त्यांची परवानगी घेणे जरूर आहे. मावशी काय म्हणतील अशी शंकाही वाटू लागली. त्यावेळी माझ्या सहकारी श्रीमती काशीताई कुळकर्णी यांचे यजमान श्री. कुळकर्णी यांच्या सल्ल्याने आम्ही लगेच मावशींना पत्र लिहिले. परवानगी न घेता काम सुरू केल्यामुळे त्यांचे मुळीच उत्तर येणार नाही असे वाटत होते. मन बेचैन होते. प्रतिकूल पत्र आले तर जमत असलेल्या भगिनींना काय सांगायचे हा प्रश्न सतावीत होता. पण ६--७ दिवसानंतर खुद्द मावशींचे स्वहस्ताक्षरातील बंद पाकीट आले. मन साशंक होते म्हणून प्रथम ते देवासमोर ठेऊन मगच फोडले. ते वाचल्यानंतर मन आनंदाने भरून आले. आणि त्या क्षणापासून माझे मनात मावशींबद्दल भक्तियुक्त प्रेमच निर्माण झाले.

लगेच तेथील सरस्वती मंदिर नामक शाळेच्या पटांगणावर आम्ही रीतसर शाखेस सुरवात केली. थोड्याच दिवसांत सोलापुरात ठिकठिकाणी एकंदर ५ शाखा चालू झाल्या. त्यावेळी श्रीमती काशीताई कुळकर्णी, बाळुताई करंदीकर आणि सौ. लोहकरे या तेथील भगिनी अग्रेसर होत्या. केवळ सोलपूरपुरते कार्य मर्यादित न ठेवता जिल्ह्यातही ठिकठिकाणी आम्ही शाखा स्थापन केल्या. अजूनहि त्या चालू आहेत. हे सर्व होण्यामागे वंदनीय मावशींचे ते एकच पत्र आम्हाला फार प्रेरक ठरले.

पुढे वर्षातच खुद्द मावशी सोलापूर येथे आल्या. त्यावेळी त्यांचा निवास माझेकडेच असल्यामुळे त्यांचा जो निकटचा सहवास लाभला तो मला निरंतर जागवीत आला असे वाटते. कारण १९४७ साली सोलापूर सोडून हैद्राबाद येथे स्थानांतर केल्यानंतरही त्यांनी दिलेल्या जिव्हाळ्यामुळे मावशींची आठवण ताजी राहून, तेथेही कार्यरत राहण्याची प्रेरणा

मिळत राहिली. त्यांच्याच प्रेरणेने आता आंध्र प्रदेशातही आम्ही समितीचा व्याप वाढविलेला आहे."

१९३९ च्या शेवटपर्यंत महाराष्ट्राच्या चारही दिशांना समितीच्या शाखा पसरल्या ही गोष्ट डॉ. हेडगेवारांना फारच समाधानकारक वाटली. १९३६ साली समितीस आरंभ झाल्यापासून सुमारे तीन--साडेतीन वर्षात जरी मावशींच्या व त्यांच्या अनेक भेटी झाल्या होत्या तरी त्यांनी वर्धा येथील समिति शाखेत प्रत्यक्ष भेट अशी कधीच दिली नव्हती. समिति सेविकांच्या मनात डॉक्टरांचे विचार प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ऐकण्याची बरेच दिवसांपासूनची इच्छा होती. ती पूर्ण होण्याचा योग प्रथम १९३९ च्या शेवटी जुळून आला. डॉक्टर १९४० जानेवारीच्या शेवटी प्रकृतिस्वास्थ्याचे निमित्ताने बिहारमधील राजगीर येथे काही काळासाठी जाणार होते. त्यापूर्वी ते वर्धेस आले होते. यावेळी समितीच्या सेविकांना मार्गदर्शन करण्याची मावशींनी त्यांना आग्रहाची विनंती केली. ती मान्य करून सेविकांना उद्देशून त्यानी एक बौद्धिकवर्ग घेतला. यावेळी डॉक्टरांनी स्त्रियांना उद्देशून जो एक महत्वाचा मुद्दा मांडला तो असा :

" मुलांना निष्क्रीय बनविण्यास अनेकदा माताच कारणीभूत होतात. ' देवबाप्पा-सारखा बस ' असा त्या मुलांना उपदेश तर करतातच परन्तु जो मुलगा कुणातही न मिसळता तटस्थ बसून राहील, भांडणतंटण करणार नाही तोच त्यांच्या दृष्टीने आदर्श ! पण मातेने मुलावर असे संस्कार करणे चूक आहे. " या विचारांच्या पुष्ट्यर्थ त्यांचे प्रतिपादन हे की जगात संघर्ष ही एक अनिवार्य बाब असल्याने पुरेशी प्रतिकार-शक्ति प्रत्येकात असणे जरूर आहे. परन्तु वर उल्लेखिलेल्या मुलात अशी प्रतिकार-शक्ति राहणे कठीणच ! म्हणून मुलाला नीट वळण लावण्याच्या भरात तो जरी सर्वसामान्य अर्थाने ' बिघडला ' नाही तरी दुबळा होण्याची शक्यता अधिक हे विसरू नये. पूजनीय डॉक्टरांनी मांडलेला हा विचार सकृत्दर्शनी जरी साधा वाटला तरी मौलिक आहे यात शंकाच नाही.

याच भेटीत मावशींनी डॉक्टरांना आमची भगिनी वत्सला हिच्या दिनांक ५ जानेवारी १९४० रोजी ठरलेल्या विवाहाचे निमंत्रण दिले. डॉक्टरांनी तत्काळ होकार दिला. कारण एक तर मावशींच्या कन्येचा विवाह आणि दुसरे म्हणजे नियोजित वर श्री. बाळकृष्ण तथा बाळासाहेब चोळकर हे संघाचे नागपूर येथील आरंभीचे स्वयंसेवक, शिवाय त्यांचे वडील डॉक्टर मो. रा. चोळकर हे डॉक्टरांना मित्र आणि कॉंग्रेसमधील सहकारी या दोन्ही नात्यांनी जवळचे होते. ठरल्याप्रमाणे डॉक्टर, श्री बाबासाहेब आपटे, श्री दादा परमार्थ, श्री कृष्णराव मोहरील आदि प्रमुख सहकाऱ्यांसमवेत ते लग्न प्रसंगास उपस्थित

राहिले होते. डॉक्टरांचे आमचे घरी हे शेवटचेच आगमन ठरेल अशी शंका येण्याचे कारणच नव्हते. तथापि दैवयोजना तशीच होती.

समितीचा वाढता व्याप लक्षात घेता ठिकठिकाणच्या कार्यात एकसूत्रीपणा आणि नियमबद्धता येण्याचे दृष्टीने १९४० च्या मे महिन्यात मावशींनी ठिकठिकाणच्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक पुणे येथे आमंत्रित केली. ही बैठक पुणे येथे श्रीमती जिजी केतकर यांचेकडे झाली. तीत वंदनीय मावशींशिवाय वर्धेहून श्रीमती मालतीबाई कळमकर, नागपूरहून श्रीमती काकू परांजपे, कराडहून सौ. इंदिराबाई दिवेकर, सोलापूरहून श्रीमती काशीताई कुळकर्णी व श्रीमती अफझूलपूरकर, सांगलीहून श्रीमती माई गोडबोले आणि पुणे येथील सौ. जिजी केतकर, श्रीमती ताई आपटे आणि श्रीमती वहिनी अभ्यंकर यांनी भाग घेतला होता.

या बैठकीत जमलेल्या भगिनींनी आपले अनुभव, आलेल्या अडचणी आणि पुढील कामाचे दृष्टीने आपआपल्या सूचना केल्या. ठिकठिकाणच्या अहवालावरून स्त्रियांमध्ये भरपूर उत्साह आहे असेच आढळून आले. ठिकठिकाणाहून ' समितीच्या प्रचारासाठी कोणाला तरी पाठवा ' अशी मागणी एकसारखी होत आहे असे सांगण्यात आले. तथापि ठिकठिकाणचा अनुभव लक्षात घेता व वाढत्या व्यापाला शिस्त लागण्याचे दृष्टीने मावशींनी अशी सूचना केली की नवीन शाखा स्थापण्यात आल्या तरी एखादी शाखा किमान सहा महिनेपर्यंत व्यवस्थित चालल्याशिवाय तेथे समिती स्थानावर ध्वज लावण्याची परवानगी देऊ नये. याच वेळी ठिकठिकाणच्या कार्यवाहिकांना उपस्थिति, कार्यक्रम आणि जमाखर्च यासंबंधी नियमितपणे केंद्राला अहवाल पाठविण्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. समितिसारख्या सार्वजनिक कार्यात या अहवाला संबंधी चोखपणा बाळगणे महत्वाचे आहे हे जाणून प्रत्येकीनेच तशी नेहमी खबरदारी घ्यावी असे मावशींनी या वेळी सांगितले. तसेच समितीचा वाढता व्याप लक्षात घेता श्रीमती काकू परांजपे यांची नागपूर-विभाग प्रमुख आणि श्रीमती ताई आपटे यांची पुणे--विभाग प्रमुख म्हणून यावेळीच नियुक्ती केली. या मागील मावशींचा उद्देश सफल झाला असेच पुढे दिसून आले.

वरील बैठक पुणे येथे चालू असताच तेथे संघाचा उन्हाळी वर्ग चालू होता व त्यात डॉक्टर हेडगेवार, प्रकृति विशेष चांगली नसताही, उपस्थित होते. या वेळी मावशी व डॉक्टरांची भेट झाली. भेटीचे दिवशी सांगली येथील श्री. काशीनाथपंत लिमये यांचा एक महत्वाचा बौद्धिकवर्ग तेथे आयोजित केलेला होता. या वर्गास उपस्थित राहण्याचे डाक्टरांनी मावशींना सूचित केले. परंतु बौद्धिकवर्गाची वेळ, कार्यक्रम अगोदर ठरल्यामुळे, मावशींना सोयीची नव्हती. हे कळताच मावशींना सोयीचे व्हावे म्हणून डॉक्टरांनी श्री. लिमये यांच्या बौद्धिकवर्गाच्या वेळात बदल केला. मावशींनी बौद्धिकवर्ग ऐकला. त्यानंतर

आवश्यकता वाटल्यास समितीच्या पश्चिम महाराष्ट्रातील कामासंबंधी श्री. काका लिमये यांच्याशी सल्लामसलत करत जावी असे डॉक्टरांनी सूचित केले. जणूकाही आपल्या निर्वाणाची पूर्वसूचना मिळाल्यानेच समितिसंबंधी स्वेच्छेने स्वीकारलेल्या जबाबदारीची कटाक्षाने त्यांनी निरवानिरव केली. कारण मावशींची व डॉक्टरांची ही अखेरचीच भेट ठरली, असे दिसून येते.

पुण्याच्या संघाच्या उन्हाळी शिबिरात डॉक्टर १५ दिवस राहिले. अंगात ताप असताही त्यांनी आपले कार्यक्रम नीट चालू ठेवले. नागपूरचा उन्हाळी वर्गही चालूच होता. म्हणून दि. १५ मे रोजी ते नागपुरास परत आले. तेथेही त्यांच्या प्रकृतीत फरक पडला नाही. कारण ८ जूनला नागपूर वर्गाच्या समारोपास आत्यंतिक इच्छा असूनही डॉक्टर मंडळींच्या सल्ल्यानुसार ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्यानंतर काही दिवस त्यांना मेयो हॉसस्पिटल-मधे ठेवण्यात आले. तथापि तेथील चिकित्सा पूर्ण झाल्या नंतर 'लवकर घरी न्या' असा डॉक्टरांनी आग्रह धरल्यामुळे दि. १८ जून रोजी त्यांना तेथून नागपूर संघचालक श्रीमंत बाबासाहेब घटाटे यांच्या बंगल्यावर नेण्यात आले.

याच सुमारास नेताजी सुभाषचंद्र बोस काही कामानिमित्त नागपुरास आले होते. डॉक्टरांच्या कार्यासंबंधी त्यांना फार आदर होता. डॉक्टरांची भेट घेण्यासाठी ते श्री. घटाट्यांच्या बंगल्यावर गेले. परन्तु डॉक्टरांचा डोळा लागला असल्याने केवळ दर्शन घेऊनच ते परत गेले. यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे जूनच्या २१ तारखेला नेताजी वर्धेला आले. त्या दिवशी सकाळी ९॥ वाजता वर्धा येथील 'दुर्गा' सिनेमागृहात त्यांचे जाहीर भाषण होते. वंदनीय मावशी आणि मी त्यांच्या भाषणानिमित तेथे गेलो. परन्तु भाषणास अर्धा-पाऊण तास उशीर झाला. चौकशी करता सुभाषबाबूंना डॉक्टर हेडगेवार निवर्तल्याची वार्ता कळविण्यात आल्याचे कळले. ती ऐकून धक्काच बसला. थोड्याच वेळात सुभाषबाबूही सभास्थानी आले व प्रथम त्यांनीच ती दुःखद वार्ता खरी असल्याचे सर्वांना सांगितले. त्या दिवशी सकाळी ९-१७ ला त्यांनी अंतिम श्वास सोडला होता.

लगेच दुपारी १२ च्या गाडीने वंदनीय मावशी व आम्ही बंधू डॉक्टरांच्या अंत्य-दर्शनासाठी नागपुरास गेलो. श्री बाबासाहेब घटाटे यांच्या बंगल्यावर, ज्यांचा राष्ट्र सेविका समितीचे मार्गदर्शक म्हणून मावशी उल्लेख करतात, त्या डॉक्टर हेडगेवारांचा मृतदेह पाहून आमच्या डोळ्यांत अश्रू आले. मृतावस्थेतही शांतता आणि शुचिता त्या थोर गृहस्थाच्या चेहऱ्यावरून ढळलेल्या दिसल्या नाहीत. त्यांच्या पार्थिव देहाला प्रणाम करून आम्ही परतलो.

सुमारे १९४० मधे ठिकठिकाणी समितीच्या ज्या शाखा सुरू झाल्या त्यात महाराष्ट्रातील मुंबई, धुळे आणि जळगाव; मध्यप्रदेशातील इंदूर, जबलपूर, रायपूर आणि बिलासपूर; आणि कर्नाटकातील बेळगाव या काही प्रमुख स्थानांचा उल्लेख करण्यासारखा आहे. मुंबई

येथे तेथील संघचालकांच्या स्नुषा सौ. गुलाब गोरेगांवकर आणि कु. कृष्णा वालावलकर यांनी नायगाव मधील अहमदसेलर बिल्डिंगमधे तरुण मुलींना एकत्र जमवावयास सुरवात केली होती. पुढे पूर्वीच्या पुणे येथील सेविका कु. योगिनी जोगळेकर आणि सौ. सुशीला महाजन ( कु. साठे ) यांनी त्याला नीट स्वरूप दिले. आणखी एक दैनंदिन शाखा पालनशोजपाल ( दादर- बी. बी. ) येथे कु. लीला परळकर ( सौ. लीला शेरे ) घेत असे. त्यानंतर, म्हणजे १९४१ मध्ये विवाह होऊन पुणे येथील कु. बकुल नातु म्हणजेच सौ. बकुलताई देवकुळे ह्या मुंबई येथील निवासी झाल्यानंतर, तेथील कामाचा विकास होऊन त्याला स्थैर्य आले. बकुलताईंनी बरीच मेहनत घेऊन मुंबईच्या उपनगरांत ठिकठिकाणी समितिशाखांची स्थापना केली. त्यांची कार्यनिष्ठा आणि कर्तृत्व लक्षात घेऊन मावशींनी त्यांना मुंबई विभाग प्रमुख म्हणून नियुक्त केले. आजतागायत त्या ही जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडीत आहेत.

याच वर्षी इंदूर येथे सरलाबाई दातार, सुशीलाबाई जोशी, सुशीला मांधले आणि रमाबाई पटवर्धन आदि भगिनींनी पुढाकार घेऊन समिती-कार्यास प्रारंभ केला. याच सुमारास श्रीमती सिंधुताई फाटक या वास्तव्यास्तव इंदूरास आल्या. त्यांनी लक्ष घालून तेथील शाखेस स्थैर्य आणले. त्यानंतर १९४१ साली मावशींच्या कनिष्ठ भगिनी मैनाताई यांचा विवाह होऊन त्या इंदूरनिवासी झाल्यानंतर त्यांनीही इंदूर शाखेकडे लक्ष द्यावयास सुरवात केली.

धुळे येथे श्रीमती कमलाबाई अत्रे आणि जळगाव येथे श्रीमती लीलाताई पळशीकर आणि श्रीमती कमलाबाई चौगुले यांनी पुढाकार घेऊन समिती--कार्यास आरंभ केला. मध्यप्रदेशात जबलपूर येथे काशीताई मटंगे आणि येसूताई करंदीकर; सागर येथे लक्ष्मीबाई कानडे; रायपूर येथे कुसुमताई दाबके; आणि बिलासपूर येथे कुसुमताई दिग्रसकर या भगिनींनी समिति-कार्यास प्रारंभ केला. सध्या मध्यप्रदेशाच्या या भागात पूर्वीच्या नागपूर येथील सेविका आणि आता अनुक्रमे दुर्ग येथील सौ. सिंधुताई पाटणकर ( सिंधू रानडे ) आणि बिलासपूर येथील कु. सुमति जोशी या दोघी समिति-कार्याची धुरा सांभाळीत आहेत. याच सुमारास कर्नाटकात बेळगांव येथे श्रीमती कमलाबाई जिगजिनी तर रत्नागिरी येथे श्रीमती कमलाबाई चितळे यांनी समिती--कार्यासंबंधी पुढाकार घेतला.

समिती कार्याचा विस्तार बराच झाल्याने ठिकठिकाणी भेटी देऊन तेथील कार्याची पाहणी करणे व आवश्यक असल्यास मार्गदर्शन करणे या गोष्टींची आता निकड भासू लागली. त्यामुळे साहजिकच मावशींचा पत्रव्यवहार आणि दौरे यांचे प्रमाण बरेच वाढले. पूर्वी पत्रे लिहिणे, आवक-जावक नोंद ठेवणे आणि हिशोब ही कामे देखील मावशी स्वतःच करीत. परन्तु पुढे हे अशक्य होऊ लागले. त्यामुळे मग या साठी समितीच्या सेविकांची

त्यांनी योजना केली. या पुढे वर्धेसही त्यांचे पूर्वीइतके वास्तव्य शक्य नसल्याने वर्धा शाखेची जबाबदारी कोणातरी योग्य अशा प्रतिष्ठित भगिनीवर टाकावी असा त्यांनी विचार केला. वर्धा येथील प्रसिद्ध वकील श्री. बाबासाहेब नागले यांच्या पत्नि सौ. कमलाबाई तथा माई यांचा पूर्वी आमचेशी साधारण परिचय होता. माईंनी समितीकार्यात सहभागी व्हावे ही मावशींची इच्छा. ती पूर्ण होण्याचा योग समितीच्या एका उत्सवाचे निमित्ताने जुळून आला. मावशींनी १९४० साली माईंना राणी लक्ष्मीबाई पुण्यतिथीच्या प्रसंगा निमित्त प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित केले. माईंचा समितीशी या पूर्वी साधारण संबंध होता. यानंतर मात्र मावशींच्या विनंतिवरून यांनी वर्धा केंद्र शाखेच्या संचालिकापदाची सुत्रे हाती घेतली. त्यामुळे यापुढे मावशींचा वर्धा शाखेसंबंधी भार बराच हलका झाला. कालांतराने मावशींनी माईंवर भारतीय निधी प्रमुख म्हणून विशेष जबाबदारी टाकली. ती त्यांनी मोठ्या कुशलतेने सांभाळली. अशा प्रकारे मावशींनी आणखी एका कर्तृत्ववान सहकारिणीची जोड मिळविली.

१९४१ पासून दरवर्षी निळनिराळ्या विभागांतील प्रमुख कार्यकर्त्यांच्या वार्षिक बैटकी नियमितपणे घेण्यात येऊ लागल्या. त्या प्रमाणे १९४१ ते १९४३ या वर्षात तीन बैठकी पुणे येथे झाल्या. या बैठकीत समितीच्या दैनंदिन कार्यक्रमा व्यतिरिक्त धोरणविषयक महत्वाच्या मुद्यांवर चर्चा होऊन सर्वसंमत धोरणे निश्चित करण्यात आली. काही तरुण सेविकांनी, विवाह बंधनात न पडता, समिती-कार्यासाठी आपला संपूर्ण वेळ द्यावा असा एक विचार या पैकी एका बैठकीत विचारार्थ समोर आला. यावर साधकबाधक चर्चा होऊन असे ठरले की विवक्षित परिस्थितीत एखाद्या सेविकेने तसा निर्णय घेतला तर हरकत नाही परन्तु या बाबतीत कुणासही उत्तेजन देऊ नये. समितीच्या संचालिका पदी प्रतिष्ठित वयस्क भगिनींची नियुक्ती करावयाची ही सुरवातीची प्रथा होती. परन्तु त्यामुळे एक अडचण निर्माण होते असा विचार काही भगिनींनी प्रदर्शित केला. एक तर वयस्क भगिनींना नियमितपणे वेळ देणे शक्य होत नाही आणि दुसरे म्हणजे काम करणाऱ्या तरुण मुलींना वयस्कांच्या सोयी वा अडचणी लक्षात घेता आवश्यक असे निर्णय घेणे तितके सुलभ वाटेना. यावर विचार होऊन असे ठरले की यापुढे संचालिका हे पद रद्द करून त्या ऐवजी कार्यवाहिका आणि सहकार्यवाहिका अशा दोन स्थानाधिकारी असाव्यात. या दोघी शक्यतो नियमितपणे वेळ देऊ शकणाऱ्या असाव्यात व या दोघींनी परस्पर सहकार्याने जबाबदारी पार पाडावी.

संघटनेच्या विस्तार कार्यात मावशींच्या समोर निरनिराळ्या प्रकारची कोणती प्रश्न-चिन्हे उभी राहिली असतील याची कल्पना येण्यासाठी वरील उदाहरणे वानगी दाखल दिली आहेत. तथापि समिती ही काही विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्यांची संघटना अस-

त्यामुळे वेळोवेळी निर्माण झालेली प्रश्नचिन्हे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून सहजपणे सोडविली.

१९४१ च्या मे महिन्यात मावशींचा पश्चिम महाराष्ट्रात दौरा होता तेव्हा त्यांनी सोलापूरला भेट दिली. जवळील पंढरपूरला जाऊन श्रीपांडुरंगाचे दर्शन घेण्याची इच्छा त्यांनी काशीताई कुळकर्णी यांना बोलून दाखविली. यावेळी मावशींबरोबर प्रा. सौ. सिंधु-ताई नावलेकर (सिंधु केतकर) याही होत्या. लगेच काशीताईंनी पंढरपूरचा कार्यक्रम आखला. त्याप्रमाणे मावशी, काशीताई व सिंधुताई पंढरपूरला गेल्या. पंढरपूरला समितीची शाखा नाही अशी माहिती काशीताईंनी देताच "आपण पांडुरंगाच्या दर्शनाला जात आहोत. त्याच्या कृपेने या भेटीतच शाखा स्थापन करता आली तर पाहू" असे मावशी म्हणाल्या. ठरल्याप्रमाणे दर्शनाचा कार्यक्रम झाल्यानंतर प्रथम तेथील संघकार्यकर्ते श्री. पत्की यांना त्या भेटल्या. त्यांच्या सहकार्याने तेथील आपटे हायस्कूल मध्ये एका बैठकीची योजना झाली. तेथे मावशींनी आपले विचार जमलेल्या भगिनीं समोर मांडले. त्यावेळी प्रामुख्याने कु. इंदु साळवेकर (गीत) आणि सत्यवती लिमये या भगिनींनी जबाबदारी स्वीकारून तेथे मावशींच्या उपस्थितीतच शाखेस सुरवात केली. 'पंढरपूरचा विठोबा पावला' असे उद्‌गार त्यावेळी सर्वांच्या तोंडून बाहेर पडले.

याच वर्षी नाशिक ह्या एका प्रमुख ठिकाणी समिती-कार्यास सुरवात झाली. आरंभीच्या काळापासून आजतागायत तेथे जान्हवीबाई मोडक आणि इंदिराबाई मेहेंदळे या पुढाकार घेऊन कार्य करीत आहेत. नाशिक येथे कार्य सुरु झाल्यानंतर पुढील वर्षी मावशींनी या भागात विस्तृत दौरा करून मालेगाव, अंमळनेर, संगमनेर, मनमाड, भुसावळ, आदि ठिकाणी कार्यास रीतसर चालना दिली.

१९४२ मध्ये मध्यप्रदेशात उज्जैन येथे तेथील संघ कार्यकर्ते डॉ. हरीभाऊ वाकणकर यांच्या उत्तेजनाने त्यांच्या भगिनी कुमारी वाकणकर (सौ. लीला फळणीकर) यांनी समिती-कार्यास सुरवात केली. योगायोग असा की त्यानंतर लगेच श्रीमती सुशीला-बाई तथा ताई अंबर्डेकर या स्त्री-जागृतीसंबंधी आत्यंतिक जिव्हाळा आणि कळकळ बाळगणाऱ्या भगिनीचे समिती-कार्याने लक्ष वेधून घेतले. ताई अंबर्डेकर आज समिती क्षेत्रात आघाडीवर वावरताना दिसतात. तथापि १९४३ साली प्रथम समिती-कार्यात पडून कालांतराने त्यात अधिकाधिक कार्यरत होत असता प्रसंगी त्यांच्या मनात निर्माण झालेली निराशा वंदनीय मावशींनी कशी दूर केली व त्यांस कसे कार्यरत ठेवले या संबंधीची माहिती त्यांच्याच शब्दात देण्यासारखी आहे.

आपल्या पत्रात ताई अंबर्डेकर म्हणतात : "मी जवळजवळ ४३ सालापासून

राष्ट्र सेविका समितीची सेविका असून कार्य करीत आहे. पण प्रारंभी मानसिक समाधान होत नसे. कधीकधी असे वाटे की आपण योग्य नसून योग्यते अभावीच आपल्यास नीट काम जमत नाही. निरनिराळ्या व्यक्तींच्या भेटी घ्यायच्या पण आपलेपणाची भाषाच प्रामुख्याने आढळायची. त्यात प्रत्यक्ष कृतीचा अभाव असे. त्यामुळे मनावर आघात होत असे आणि वरील प्रकारचे विचार मनात येत. परन्तु वंदनीय मावशींना हे स्पष्ट कसे सांगावे ? कार्य बंद करावेसे वाटत नव्हते पण असमाधान तर होतेच. अशा वेळी एकदा मावशींना पत्र लिहून इतरांसमोरील प्रश्न म्हणून, माझ्या मनाची विचित्र अवस्था कथन करणारा " समितीचा व आपला संबंध कसा असावा ? " हा वस्तुतः माझाच प्रश्नही त्यांना कळविला. माझ्या प्रश्नाचे उत्तर मावशींनी एकाच वाक्यात कळविले होते.

' समितीशी आपला संबंध अपत्यवत असावा ' हे ते वाक्य होते. संबंध अपत्यवत असावा असे म्हणण्यात किती खोल अर्थ भरलेला आहे ! एकदा जन्म दिला की मातृत्व शेवटपर्यंत कधीच संपत नाही. आपल्या अपत्याकडून निराशाही पदरी पडली तरी मातेचा त्याच्यावरील लोभ कमी न होता त्याच्यात योग्य असे परिवर्तन घडवून आणण्याकडेच तिचे लक्ष केंद्रिभूत झालेले असते. निराशेपोटी ती हे कार्य सोडून देत नाही. कारण स्वाभाविकतःच हे आपले कर्तव्यच आहे असे ती मानते. समिती कार्याकडे याच कर्तव्यभावनेतून पाहिल्यास प्रसंगी निराशाही जाणवली तरी त्यातून बाहेर पडून सफलता प्राप्त करता येईल हे मावशींचे विचार नेहमीसाठीच प्रेरक झालेले आहेत "

१९४४ साली श्रीमती ताई वर्धेस उन्हाळी वर्गासाठी आल्यानंतर मावशींची व त्यांची प्रथम भेट झाली. त्यानंतर १९४५ मध्ये मावशींनी मध्यभारतात दौरा काढला तेव्हा त्यांनी उज्जैनला भेट दिली. या भेटीनंतर ताई अंबर्डेकर यांनी आपला जवळ जवळ संपूर्ण वेळ समिती कार्यासाठी देण्यास सुरवात केली. जुन्या ग्वाल्हेर संस्थानात दौरे काढून ताईंनी ठिकठिकाणी शाखा सुरु केल्या. याच सुमारास मावशींनी त्यांची मध्यभारताच्या कार्यवाहिका म्हणून नियुक्ति केली. त्यामुळे पुढच्या काळात ग्वाल्हेर व्यतिरिक्त भोपाळ, देवास, इंदूर, धार आदि मध्यभारतातील संस्थानात समिती–कार्यास उत्तम चालना मिळाली. सध्या भोपाळ विभागात सौ. प्रमिलाताई काळे आणि सौ. अहिल्याबाई देशपांडे या कार्य करीत असतात.

अशा प्रकारे या सुमारापर्यंत संपूर्ण महाराष्ट्र (विदर्भासुद्धा), जुना उर्वरित (म्हणजे विदर्भ सोडून) मध्यप्रदेश आणि मध्यभारतातील संस्थाने या प्रदेशात समिती-कार्याचा विस्तार होत असताच १९४३ साली नागपूर येथील वर्गात प्रशिक्षण घेण्यासाठी सिंध हैद्राबाद येथून कुमारी जेठी देवानी या प्रथम आल्या. तेथून परतल्यानंतर त्यांनी सिंध प्रदेशात समिती कार्यास सुरवात केली. सिंधमध्ये १० ठिकाणी समितीच्या शाखा त्यांनी

स्थापन केल्या. १९४७ साली १५ ऑगस्ट रोजी हिंदुस्थानची फाळणी होऊन वेगळ्या पाक राष्ट्राची निर्मिती होण्यापूर्वी फक्त काही दिवसच अगोदर त्यांचे वंदनीय मावशींना एक अत्यंत भावनाविवश असे पत्र आले. सारांशाने त्यातील मजकूर असा :

वंदनीय मौसीजी,

आपहीके मार्गदर्शन के कारण हिन्दुभूमि के इस अति दूरवर्ती प्रदेशकी बहनों ने 'हिंदुत्व याने राष्ट्रीयत्व' इस विशुद्ध भूमिका को समझकर हिन्दु स्त्रियोंका संघटन करनेका ध्येय सामने रखा है। और पहली बार वह सब हिंदु नारियाँ आपसमें धर्म और संस्कृति के अटूट बंधन को जाननेपर अतीव आनंद का अनुभव करने लगी हैं। पर अब दुनिया जानती है कि भारतीय स्वातंत्र्यताके महान सुखद क्षणके समयही हम सिंधवासियों पर कितनी बड़ी आपत्ति आयी है।

अब हमें सिंध छोडनाही पड़ेगा यह बात बिल्कुल स्पष्ट होते जा रही है। क्योंकि हमारी मातृभूमि अब मुसलमानोंकी भोगभूमि बन रही है। हम चाहते थे कि इसी भूमि में आश्रय मिले। पर अब वह बिलकुल असंभवसा प्रतीत होता है।

मौसीजी, सिंधकी सब सेविकाएँ चाहती हैं कि भारत वर्ष का विभाजन होने से पहिले आप एक बार हमारे बीच आ जाँय। ताकि पवित्र सिन्धु को साक्षी रखते हुओ आपकी महान उपस्थितीमें हम इस महान देशके प्रति हमारी जिम्मेदारियाँ निभाने के लिए प्रतिज्ञाबद्ध हो जाएँ। आपका यहाँ आना इसलिये जरूरी है कि बिदाई के अति कठिण समय पर आप जैसी प्रेमदायी, धैर्यदायी माता की उपस्थितीमें दुःख का बोझ हलका महसूस होगा और भविष्य के कर्तव्य की ओर निर्भयतासे बढने की प्रेरणा मिलेगी। क्या आप हमारी आरजू पूरी करेंगी?"

वरील पत्र प्रत्यक्ष लेखकाच्या उपस्थितीतच मावशींनी फोडले. त्या प्रसंगाची स्मृति आजही ताजी आहे. वाचल्यानंतर क्षणभरच त्यांनी विचार केला आणि "वेणूताईंना (श्री मालतीबाई कळमकरांना) खाली बोलावून आण" असे मला म्हणाल्या. वेणूताई येताच कु. जेठी देवानीचे ते हृदयस्पर्शी पत्र त्यांना वाचावयास देऊन मावशी म्हणाल्या :

"वेणूताई अशाही परिस्थितीत आपण कराचीला जावयासच पाहिजे असे वाटते; नव्हे जाण्याचे मी निश्चित केले आहे. माझ्याबरोबर तू (वेणूताई) आणि दिना (लेखक) दोघेही चला."

झाले आम्ही तिघांनी कराचीस जाण्याचा कार्यक्रम त्या बैठकीतच निश्चित झाला. तो ४ ऑगस्ट १९४७ हा दिवस होय. दिनांक १० ऑगस्ट रोजी सायंकाळी आम्ही तिथे मेलने निघालो. मुंबईस श्री जयवंतराव व सौ. बकुलताई देवकुळे यांचेकडे मुक्काम

होता. भारताची फाळणी होऊन एक दोन दिवसातच म्हणजे १४ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री कराचीत पाकीस्तानची पायाभरणी होणार होती. जिकडे तिकडे धामधूम सुरू झालेली होती. उर्वरित भारतातील मुसलमान, होऊ घातलेल्या पाकभूमिकडे, तर तिकडील हिंदु भारतभूमिकडे, येण्यास यापूर्वीच सुरवात झालेली होती. प्रत्यक्ष फाळणीपूर्वी तिकडून इकडे येणाऱ्या हिंन्दूपेक्षा इकडून तिकडे जाणाऱ्या मुसलमानांचे प्रमाण मोठे होते. विमाने, आगबोटी, आगगाड्या आणि मोटारी यापैकी ज्यात जागा मिळेल त्यात बसून मुसलामानांचे थवेच्या थवे जाऊ लागले. अशा परिस्थितीत मावशींनी जयंतरावांना ‘ कसेही करून कराचीची विमानाची तीन तिकीटे मिळवा ’ असे सांगितले. बऱ्याच प्रयत्नानंतर विमानाची फक्त दोनच तिकीटे मिळाली. त्यामुळे मावशी व वेणूताई या दोघींनी जावयाचे व मी मागे राहावयाचे असे ठरले.

या सुमारास आमच्या भगिनी वत्सलाताई, त्यांचे पति बाळासाहेब कराची पोर्ट ट्रस्ट मध्ये पोर्ट ऑफीसर असल्याने, कराचीतच होत्या. मावशींच्या कार्यक्रमाची त्यांनाही आगाऊ सूचना दिली होती. दि. १३ ऑगस्ट रोजी मावशी व वेणूताईंनी जुहू विमानतळावरून कराचीस प्रयाण केले. अशा वेळी दोन स्त्रिया कराचीस कशा काय जात आहेत याचे तेथील लोकांस आश्चर्यच वाटले. विमानात अहमदाबाद पर्यंत श्री जयप्रकाश नारायण आणि पुणे येथील श्री देव हे हिंदु प्रवासी होते. अहमदाबाद येथे हे सर्व उतरल्यानंतर त्यांच्या जागा मुसलमान प्रवाशांनीच घेतल्या. तेथील विमानतळावरही " खून से लिया पाकिस्तान लडके लेंगे हिन्दुस्तान " अशा घोषणा मधून मधून निनादत होत्याच. तथापि एका निर्धाराने या दोघींचे मार्गक्रमण चालू असल्याने भीति त्यांना स्पर्शही करू शकली नाही.

त्याच दिवशी मावशी कराचीस पोहोचल्या. दुसरे दिवशीच, म्हणजे हिंदुस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी एक दिवस, पाकीस्तान निर्माण होणार होते. १४ ऑगस्टचा दिवस उजाडला तेव्हा पूर्वीपेक्षाही प्रचंड प्रमाणावर धामधूम सुरू होऊन वर सांगितल्या प्रकारच्या विषारी घोषणांनी कराचीतील वातावरण भरून निघू लागले. हिंदु पुढाऱ्यांचे पुतळे काढून टाकणे, रस्त्यांच्या पूर्वीच्या पाट्या खाली ओढून त्याऐवजी मुसलमान पुढाऱ्यांची नांवे रस्त्यांना देण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर दिसून आला. स्वराज्य निर्मितीच्या आनंदाने वेड लागलेल्या त्या पाकभूमीत अशा प्रकारच्या कोलाहलाला ऊत आलेला असतानाच दिनांक १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री कराची शहरातील एका घराच्या गच्चीवर एक लहानसाच परन्तु अति महत्त्वाचा कार्यक्रम मोठ्या शांत आणि पवित्र वातावरणात चाललेला होता. वन्दनीय मावशींच्या उपस्थितीत पवित्र भगव्या ध्वजाला साक्षी ठेवून सिंधुवासी सेविका तनमनधनपूर्वक राष्ट्रसेविका समितीचे

आणि पर्यायाने भारतमातेचे कार्य करण्यास प्रतिज्ञाबद्ध होत होत्या.

वरील प्रसंगाच्या संस्मरणादाखल आपल्या लेखात एक सिंधनिवासी सेविका म्हणते :

' वह दिन मैं कभी नही भूलूंगी। १४ तारीख रातके १२ बजे जब स्वतंत्रता के नारे लगाये जा रहे थे और पाकिस्तान में अत्याचार का नंगानाच चल रहा था ठीक उसी समय हम सेविकाएँ भगवे ध्वज के सामने खडी होकर मौसीजी की आज्ञा से प्रतिज्ञा ले रही थीं।

वह रात अन्धेरी थी परन्तु सुन्दर थी। सेविकाओं का उत्साह, उनके भाव, वह दृश्य अब भी आँखों के सामने नाचता है। ये सारी बातें आज भी याद आ जाती हैं, और सारे शरीर में मानो बिजली दौड जाती है और मैं सिहर उठती हूँ।

उस प्रतिज्ञाने जादू का काम किया। हर सेविका के मनमें स्फूर्ति थी, उत्साह था। हमने ठहन ली कि जीते जी कराची नही छोडेंगी। मरेंगी तो भी यहीं पर वीरों की मौत और जीयेंगी तोभी यहीं। पर होना कुछ और ही था। वन्दनीय मौसीजी की कराची भेंट पहली और अन्तिम ठहरी। "

पाकिस्तान निर्मिती नंतर प्रथम पंजाबमध्ये आणि काही काळाने सिन्धमध्ये घडलेला दारुण इतिहास सर्वांच्या परिचयाचाच आहे. सिंध मधील सेविका ठिकठिकाणी विखुरल्या गेल्या. काहींचा तर पत्ताच नाही. उरलेल्या पैकी काही आजही यथाशक्ती समिती-कार्य करीतच आहेत.

स्वराज्यप्राप्तीपूर्वी काही वर्षे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रेरणेने हिंदुमहासभेने स्त्रियांसाठी एक वेगळी संघटना सुरु केली. यासंबंधी स्वातंत्र्यवीरांची काय भूमिका आहे हे समजून घेण्याचे दृष्टीने प्रत्यक्ष त्यांचीच भेट घेण्याचे मावशींनी ठरविले. त्याप्रमाणे पुणे येथे या दोघांची भेट झाली. त्यावेळी स्वातंत्र्यवीरांनी जो विचार मांडला तो असा :

' राष्ट्र–सेविका समितीचे कार्य म्हणजे झिमझिम पडणारा पाऊस! परन्तु त्यामुळेच जमिनीत सदैव ओलावा कायम ठेवण्याचे अति महत्वाचे कार्य साधले जाते. राजकीय दृष्टी समोर ठेवून हिंदुसभेने सुरु केलेले कार्य म्हणज वादळी सोसाट्याचा पाऊस! त्याचे कार्य इतके दूरगामी नसते. तडाख्यात येणारा प्रदेश त्यामुळे जलमय होतो हे जरी खरे असले तरी त्याचे हे कार्य क्षणिक असते. कालांतराने तो वाहून जातो. त्याची वाफ होते. म्हणूनच समितीचे कार्य हे नेहमीसाठी आवश्यक असे कार्य असल्याने माझ्या शुभेच्छा तुमच्या पाठीशी आहेत '

वीर सावरकरांसारख्या द्रष्ट्याचे हे विचार ऐकून मावशींना विशेष समाधान लाभले.

१९४० पासून समितीची वार्षिक बैठक होत असे. परन्तु १९४४ मध्ये ती झाली नाही. तथापि वर्धा, नागपूर आणि पुणे येथे उन्हाळी वर्ग नियमाने झाले. या वर्गास ठिकठिकाणच्या सेविका येत, आणि आपल्या क्षेत्रात जोमाने काम करण्यास आवश्यक अशी वैचारिक आणि प्रशिक्षणविषयक शिदोरी घेऊन परतत. खामगाव येथील सौ. कमलाताई भाटे यांनी आपल्या पत्रात लिहिलेले विचार याचे उत्तम निदर्शक आहेत. त्या म्हणतात :

" वंदनीय मावशींनी सुरू केलेल्या कार्याची ओळख प्रथम १९४० सालीच झाली होती. तथापि त्यांच्या दर्शनाचा योग आला १९४४ मध्येच. तेव्हा मी अमरावतीला होते. मी, लीला ताटके ( सौ. वाकणकर ) आणि काही सेविका वर्गाच्या सुमारास वर्धेस गेलो होतो. त्या प्रसंगी वंदनीय मावशींच्या व्यक्तीमत्वाचं एक वैशिष्ट्य मनावर ठसलं ते आज तीस वर्षे झाली तरी कायम आहे. त्यांच्या भाषणातून जेवढं शिकायला मिळतं तितकंच किंबहुना त्याहूनही जास्त त्यांच्या वागण्यातून शिकायला मिळतं, हेच ते वैशिष्ट्य होय ! १९५७ साली त्यांचा रामायणाचा कार्यक्रम खामगावात होता. त्या निमित्त त्यांचा माझेकडेच मुक्काम होता. घराघरातून सेविकांनी कसं वागावं याचा आदर्शच वंदनीय मावशींच्या आचरणातून त्यावेळी दिसून आला. "

१९४५ साली सौ. बकुळताई देवकुळे यांच्या सूचनेनुसार मावशींनी प्रथमच भारतातील ठिकठिकाणच्या प्रमुख कार्यकर्त्यांचे सम्मेलन मुंबईत आयोजित केले. हे सम्मेलन तेथील छबिलदास हायस्कूलच्या भव्य दिवाणखान्यात तीन दिवस चालले. सुमारे ५० ठिकाणच्या ३०० कार्यकर्त्या भगिनी या सम्मेलनास हजर होत्या. या प्रथम अखिल भारतीय सम्मेलनाचा विशेष हा सांगता येईल की समितीच्या दैनंदिन कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर विधायक कार्यक्रम ठिकठिकाणी सुरू करावेत या विचाराला मावशींनी येथे जोराची चालना दिली. त्यानुसार शिशुमंदिरे, संस्कारशिक्षण वर्ग, उद्योगमंदिरे आणि वसतिगृहे आदिद्वारे समाजाच्या अधिकाधिक जवळ जाऊन समाज-सेवा व्रताचे सेविकांनी पालन करावे असा त्यांनी आदेश दिला. म्हणूनच नवनव्या मार्गांचा अवलंब करण्यातील ग्रहणशीलता आणि उपक्रमशीलता ही समितीची वैशिष्ट्ये या पुढील काळात आपणास दिसून येतात. वरील संदर्भातच सांगली येथील एक कार्यकर्त्या श्रीमती अन्नपूर्णाबाई तथा काकू रानडे यांचे हस्तकलासंबंधी ज्ञान आणि कौशल्य लक्षात घेऊन मावशींनी त्यांना सर्व प्रकारचे प्रोत्साहन दिले आणि पुढील काळात समितीच्या ध्येयवादास पूरक ठरणारी भव्य प्रदर्शने त्यांच्याकडून घडवून आणली असे दिसून येते. श्रीमती काकू रानड्यांसारख्या अनुभवी आणि वयोवृद्ध भगिनीला समितिकार्यात पूर्णपणे गुंतविण्यात

मावशींनी कमालीची योजकता आणि गुणग्राहकता दाखविली असेच कोणीही म्हणेल. कारण १९४६ पासून १९६९ मध्ये त्यांचा मृत्यु होईपर्यंत काकूंनी आपला अधिकांश वेळ समिती-कार्यासाठी देऊन ठिकठिकाणी त्याला चालना देण्यासाठी बहुमोल मदत केली.

या सम्मेलनाचा आणखी एक विशेष म्हणजे या वेळेपासूनच समितीच्या केंद्रीय मंडळाची योजना झाली. या मध्यवर्ती मंडळात वंदनीय मावशींशिवाय प्रारंभी साधारणपणे खालील व्यक्तींचा समावेश होता.

निधीप्रमुख : सौ. कमलाबाई तथा माई नागले, वर्धा [नंतरच्या काळात या जागी प्रथम श्रीमती काकू रानडे, सांगली आणि त्यांच्या मृत्युनंतर १९६९ पासून निधि-कार्यवाहिका सौ. मनोरमाबाई (वहिनी) गोखले व हिशोब तपासनीस म्हणून श्री सुशीलाबाई (ताई) अंबर्डेकर, ग्वालेर या आहेत.] प्रमुख कार्यवाहिका : श्रीमती ताई आपटे पुणे आणि नंतरच्या काळात प्रमिलाताई या सहकार्यवाहिका म्हणून नियुक्त झाल्या [वन्दनीय मावशी व नागपूरचे मध्यवर्ती कार्यालय यांचा पत्रव्यवहार प्रामुख्याने ह्याच सांभाळतात]. बौद्धिक कार्यवाहिका : अगदी आरंभी श्रीमती मालतीबाई कळमकर वर्धा त्यानंतर आजतागायत प्रा. सौ. कुसुमताई साठे नागपूर आणि सौ. सुशीला महाजन मुंबई. नागपूर विभाग प्रमुखः आरंभी श्रीमती लक्ष्मीबाई तथा काकू परांजपे नागपूर त्यानंतर सौ. उषाताई चाटी. मुंबई विभाग प्रमुख : सौ. बकुल देवकुळे, मुंबई, दक्षिण विभाग प्रमुख : सौ. इंदिराबाई तथा ताई दिवेकर कराड, उत्तर विभाग प्रमुखः श्रीमती सिंधूताई फाटक दिल्ली, शारीरिक शिक्षण प्रमुखः प्रारंभी डॉ कुसुम धाणेकर सांगली (आता सौ. प्रभा देशपांडे नागपूर) गीत प्रमुखः सध्या सौ. उषा चाटी नागपूर आणि सौ. रोहिणीताई गाडगीळ बेळगाव. प्रसिद्धी प्रमुख सौ. प्रमिलाताई मुंजे नागपूर आणि काशीताई कुळकर्णी सोलापूर.

वरील अधिकाऱ्यांशिवाय ठिकठिकाणच्या प्रमुख कार्यकर्त्यांनाही आवश्यकतेनुसार केंद्रीय मंडळाच्या बैठकीस बोलावण्यात येते. त्यात प्रामुख्याने खालील व्यक्तींचा समावेश आहे.

सौ. सिंधूताई पाटणकर (दुर्ग) मध्यप्रदेश, सौ. लक्ष्मी वाकणकर (उज्जैन) मध्यभारत, सौ. मनोरमाबाई गोखले (इंदूर) मध्यभारत, सौ. कमलाताई भाटे (खामगांव) विदर्भ, सौ. इंदिराबाई मेहेंदळे (नाशिक) खानदेश, सौ. माधवी काळे (भोपाळ) विंध्यप्रदेश, कु. सिंधु रिसबूड (जबलपूर) मध्यप्रदेश, सौ. वनिता आठवले (चक्रधरपूर) बंगाल, सुदेश मलिक (जयपूर) राजस्थान, प्रफुल्ल सिन्हा (मुजफ्फरपूर) बिहार, के. रुक्मिणी (बंगलोर) कर्नाटक, सौ. निर्मलाताई गोखले (धारवाड) कर्नाटक, श्रीमती कुमुदिनीबाई अफझूलपूरकर (हैद्राबाद) आंध्र, आशा शर्मा (दिल्ली), कुसुमबेन त्रिवेदी (भावनगर), श्रीमती इंदीराबाई कापे (अहमदाबाद) गुजराथ, डॉ. विद्यावती (बरेली) उत्तरप्रदेश, विमल मांगलिक (कानपूर) उत्तरप्रदेश.

१९४५ च्या बैठकीत जे निरनिराळे विधायक कार्यक्रम सुचविण्यात आले त्यात सेविकांनी सूतकताई करावी असेहि सुचविले गेले. समितीच्या संघटनेत सेविका निर्धारित कार्यक्रम किती मन लावून आणि उत्साहाने अंमलात आणतात ही गोष्ट या संबंधातील उदाहरण देऊन सांगण्या-सारखी आहे. पुण्यास आजी दाबके नामक वृद्ध सेविका होत्या. सूतकताईचा कार्यक्रम सुचविला गेल्यानंतर आर्जीनी आपल्या घरी कापसाचे झाड लावून त्याच्या कापसाचे सूत कातून त्या पासून कापड बनवून घेऊन त्याचे ध्वज तयार करण्यास सुरवात केली. या कापडाचे बटवे, आसने आदि उपयोगी वस्तू बनवून त्या वस्तू विकून आलेली रक्कम त्या गुरुदक्षिणा म्हणून समितिकार्यास देत. १९५८ साली राष्ट्र सेविका समितीने नाशिक येथे राणी लक्ष्मीबाईंचे स्मारक केले तेव्हा याच पैशातून आर्जीनी १८०० रुपये देणगी दिली इतकेच नव्हे तर पुणे शाखेला आपल्या मृत्युनंतरही गुरुदक्षिणा मिळत राहावी म्हणून काही रक्कम श्रीमती ताई आपटे यांचेजवळ देऊन ठेवली. सालीना त्या रकमेचे व्याज सदैव समितीला मिळत राहावे ही त्यांची इच्छा ! अशा प्रकारे ही वृद्ध सेविका आपली स्मृती आणि उदाहरण मागे ठेवून गेली. अशा प्रकारच्या लहान मोठ्या बऱ्याच सेविका समितिक्षेत्रात आढळून येत असल्याने मावशींनाच काय पण इतरांनाही धन्यता वाटली तर नवल कोणते !

१९४६ साली मावशींनी सोलापूर येथे बैठक घेतली. त्यात समितीय भगिनींनी कीर्तने करण्याचा प्रयत्न करावा हा विचार सम्मत झाला. लगेच शुभारंभ म्हणून मावशींनी श्रीमती काशीताई कुळकर्णी यांना कीर्तन करावयास सांगितले. काशीताईंनी यशस्वी रीत्या शुभारंभ केला. या बैठकीस सांगलीच्या श्रीमती अन्नपूर्णाबाई रानडेही आल्या होत्या. यापुढे सर्वांनी त्यांना 'काकू' या नावाने संबोधावे असे मावशींनी सूचित केले. तेव्हापासूनच त्यांचे काकू हे नांव रूढ झाले. या बैठकीनंतरच काकू खऱ्या अर्थाने पूर्णपणे समितीच्या बनल्या.

याचवर्षी नागपूर, वर्धा याशिवाय मुंबई आणि ठाणे येथे उन्हाळ्यातील प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. मुंबई वर्गास गुजराथेतून हंसा मोदी, कुसुम त्रिवेदी, विमल काणे आदि काही सेविका आल्या होत्या. वर्गाहून परत गेल्या नंतर त्यांनी गुजराथेत समितिकार्यास चालना दिली. नंतर थोड्यांच काळात गुजराथेत अहमदाबाद, बडोदा, राजकोट, भावनगर, जामनगर, सुरत आदि प्रमुख ठिकाणी आणि इतर लहान ठिकाणी समितीच्या २० शाखा सुरू झाल्या.

१९४७ च्या नागपूर येथील उन्हाळी वर्गास प्रथमच जम्मू येथून कुमारी शक्ति व शारदा शर्मा या दोन सेविका आल्या. तेथून स्फूर्ति घेऊन त्यांनी भारतभूच्या अति दूर अशा शिरोभागी समिति कार्यास प्रारंभ केला. आजही जम्मू – काश्मीरमध्ये समितीचे कार्य समाधानकारकपणे चालू आहे. तेथील काम एक वयोवृद्ध सेविका सुशिला गनगोत्रा व प्रकाशवति या दोघींच्या मदतीने सुरू आहे. पन्जाबमधील एक

लोकप्रिय पुढारी कै. प्राध्यापक धर्मवीर यांच्या पत्नी श्रीमती सुशिलादेवी या पंजाबमध्ये कार्यवाहिका या नात्याने समितिकार्याची जोपासना करीत आहेत.

याच वर्षीच्या ऑगस्टमध्ये शेकडो वर्षांच्या गुलामगिरीनंतर भारतात स्वातंत्र्य-सूर्याचा उदय झाला. ह्या घटनेने समस्त भारतभर आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पसरले. समिति – सेविकाही या सर्वोच्च आनंदात सहभागी झाल्या नवा जोम आणि नवी आकांक्षा यामुळे या वेळेपर्यन्त महाराष्ट्र आणि त्याबाहेर मध्यप्रदेश, मध्यभारत, गुजरात, दिल्ली, कर्नाटक व आंध्र प्रदेशाच्या काही भागात पसरलेले समितीचे कार्य अधिक दृढ करता येईल व त्याचा आणखी प्रसार करणे आता सुलभ होईल असा विश्वास मावशींप्रमाणेच त्यांच्या सहकाऱ्यांनाही वाटू लागला. परिणामतः त्या वर्षीच्या डिसेंबर मध्ये सांगली येथील एक प्रमुख कार्यकर्त्या डॉ. कुसुम वाणेकर यांच्या पुढाकारामुळे मावशींनी मिरज येथे समिति - सेविकांचा अखिल भारतीय मेळावा आमंत्रित केला. तो अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. भारतातून सुमारे १२०० सेविका एकत्र आल्या होत्या. सर्वच क्षेत्रातील मंडळींचे सर्व प्रकारचे सहकार्य लाभल्यामुळे हा मेळावा अत्यंत यशस्वी झाला. त्या भागातील सांगली, मिरज, जमखिंडी या पूर्वीच्या तीन संस्थानांच्या राण्यांनी भेट देऊन समिति - कार्यासंबंधी आपली सहानुभूती आणि समाधान मावशींजवळ व्यक्त केले.

या सुमारासच वन्दनीय मावशींनी अष्टभुजा देवीचा आदर्श समोर असावा ही कल्पना मांडली. मात्र या कल्पनेला खरी चालना पुढे १९५० मधे मिळाली. कारण आरम्भी कल्पनेनुसार देवीचे एखादे छायाचित्र उपलब्ध होईल तर पहावे म्हणून त्यांनी पुष्कळ शोध केला. परन्तु ते उपलब्ध झाले नाही. कल्पना सहज आकलन होण्यासाठी आणि जनमानसात नीट रुजण्यासाठी छायाचित्राची आवश्यकता आहे हे ओळखून मावशींनी आपली कल्पना काही कलाकारांजवळ आणि विशेषतः आमचे वरोऱ्याचे व सौ. बकुलताई देवकुळे यांचे कलावन्त पती श्री. जयन्तराव देवकुळे यांचे समोर मांडून त्यांचेकडून देवीचे एक चित्र तयार करवून घेतले. त्याच्या सप्तरंगातील अनेक प्रति मुद्रित करून घेऊन त्या भारतभर प्रत्येक शाखेस वितरित केल्या.

देवी अष्टभुजेचा आदर्श समोर मांडण्यामागे वन्दनीय मावशींची वैचारिक पार्श्वभूमी अशी की देश स्वतंत्र झाला तरी संघटनेची आवश्यकता पूर्वीइतकीच कायम राहते. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जशी संघटनेची आवश्यकता होती तशीच स्वातंत्र्योत्तर काळातही मिळालेले स्वातंत्र्य कायम टिकविण्यासाठी आणि स्वराज्यात सुराज्य प्रस्थापित करण्यासाठी संघटनेची आवश्यकता आहे. आणि संघटना म्हणजेच शक्ती ! अष्टभुजा ही शक्तीचीच मूर्ती होय. ती सदैव समोर राहणे आवश्यकच आहे.

पुरुषाप्रमाणेच स्त्रीनेही अष्टभुजेची, म्हणजेच शक्तीची, उपासना करणे क्रमप्राप्त आहे, हा तो विचार होय.

ही शक्तीदेवता सिंहारूढ असून हिच्या सात भुजात अनुक्रमे ( डावीकडून ) भगवा ध्वज, कमलपुष्प, घंटा, गीता आणि यज्ञकुन्ड, जप-माळ व खड्ग आहेत. हिने आपली उजवीकडील शेवटची म्हणजेच आठवी भुजा वरदहस्तदर्शक अवस्थेत उचलली आहे. चेहऱ्यावर खंबीरतायुक्त पवित्र स्मित झळकत असलेली ही मूर्ति होय! तिच्या हातातील वस्तू ही प्रेरणा प्रतीके आहेत. दुष्टवृत्तीचा आणि असुरीवृत्तीचा विनाश ही प्रेरणा महत्वाची आहे. अष्टभुजा ही अन्नपूर्णाही आहे. ती प्रेरक, तारक व मारक अशा शक्तींनी युक्त असल्याने प्रत्येक स्त्रीने या तिन्हींची जोपासना करावी अशी कल्पना आहे. कमलपुष्पासारखे पवित्र आणि सुंदर चारित्र्य असावे-धर्म, धर्मग्रंथ आणि ध्वजा यांचे संरक्षण करावे- आणि जपतपासाठी आवश्यक अशा साधुवृत्ती सोबतच वेळप्रसंगी खड्गाचाही वापर करण्याची पात्रता अंगी असावी म्हणून समाजाला सदैव जागरुक ठेवण्यासाठी आवश्यक अशी घंटाही तिने बाळगली आहे. ती सिंह-वाहनी आहे हें हिंसक वृत्तीस काबूत ठेवावे याचे द्योतक असून तिचा वरदहस्त हेच दर्शवितो की जो कोणी श्रद्धेने तिच्या सन्निध जाईल त्याला तिचे अभय प्राप्त होते. तेजस्वी परन्तु अति प्रसन्न अशा भावमुद्रेमुळे ती कोणाचेही चित्त आकर्षून घेते व आपल्या प्रभावाने त्याला नतमस्तक करते.

समिति-इतिहासात १९४७ साली आणखी एक महत्वाची घटना घडली ती म्हणजे पहिल्या मराठी प्रार्थनेऐवजी नवीन अधिक बोधप्रद अशी संस्कृतातील प्रार्थना स्वीकारण्यात आली.

महाराष्ट्राबाहेर वाढत चाललेला समितीचा विस्तार लक्षात घेता यापुढे मराठीतील प्रार्थना चालू ठेवणे योग्य ठरणार नाही ही गोष्ट लक्षात घेऊन वंदनीय मावशींनी भारतातील सर्व भाषीय भगिनींना सहज आकलन होईल अशी संस्कृतातील नवीन प्रार्थना तयार करवून घेण्याचा निर्णय घेतला. समितीच्या भारतीय बौद्धिक प्रमुख सौ. कुसुमताई साठे या कवयित्री, लेखिका असून त्यांचा व्यासंग आणि विशेषतः त्यांचे संस्कृतचे अध्यन आणि अधिकार लक्षात घेता मावशींनी त्यांच्याकडेच हे कार्य सोपविले. आपल्याला प्रिय असलेला विषय मावशींनी हेरून त्या संबंधीची महत्त्वाची जबाबदारी आपल्यावर सोपविली या भावनेने कुसुमताईंनी अत्यंत उत्साहाने, समर्पकपणे आणि अल्प वेळात ही जबाबदारी पूर्ण केली. त्यावेळी मावशींचे नागपुरास वास्तव्य होते. लगेच कुसुमताईंनी मावशींना आणि सौ. बकुलताई देवकुळेंना एक दिवस त्यांच्या घरीच राहावयास येण्याची विनंति केली. सौ. कुसुमताईंच्या मातोश्री आणि मावशींच्या एक ज्येष्ठ सहकारी कै. श्री काकू परांजपे

यांनीही तसेच सुचविल्याने मावशी व बकुलताईंनी त्या रात्री कै. काकूंच्या घरीच मुक्काम केला. त्यावेळी तयार केलेल्या संस्कृतातील नवीन प्रार्थनेचे वाचन झाले. कुसुमताईंनी जबाबदारी उत्तम प्रकारें पार पाडलेली होती. तथापी अंतिम रीत्या निश्चित करण्यापूर्वी पूजनीय गोळवलकर गुरुजी यांनाही ती अवश्य दाखवावी असे मावशींनी त्यांना सुचविले. त्यामुळे गुरुजींच्या सूचनेप्रमाणे किंचित फरक करून प्रार्थना निश्चित करण्यात आली. त्या वर्षीच्या वर्षप्रतिपदेपासून सर्वदूर समिती स्थानावर हीच प्रार्थना म्हटली जाऊ लागली.

१९३६ साली आरंभ झाल्यापासून १९४७ पर्यंतच्या अकरा वर्षात समिती-कार्याच्या भरभराटीची चढती कमान होती. परन्तु व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह यांची मधून मधून परीक्षा घ्यावयाची असा ईश्वरी संकेत असल्यामुळेच की काय १९४८ हे वर्ष उजाडले ते अग्नि-परीक्षेची परिस्थिति सवे घेऊनच! ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींचा दिल्ली येथे वध झाला.

"गांधीजींनी अवलंबिलेले धोरण भारतद्वेष्ट्या पाक पुढाऱ्यांचे लांगूलचालन करणारे आहे. ज्या धर्मवेड्यांनी भारत-विभाजनाचे सुमारास आणि तदनंतर-असंख्य भारतीय स्त्रिया आणि बांधव यांची अब्रू लुटली वा कत्तल केली, त्या नराधमांची गय कशा पायी? ज्यांनी पवित्र भारतमातेला नेहमीच अपमानास्पद वागणूक दिली एवढेच नव्हे तर तिचे लचके तोडण्याचीच नेहमी अभिलाषा बाळगली, त्यांचे विषयी प्रेमाचा पुळका! आणि ज्यांच्या आया-बहिणी लुटल्या गेल्या त्या स्वकीयांबद्दल सहानुभूतीचा निव्वळ उल्लेखही मात्र मोजूनमापूनच!" ही त्यांच्या दृष्टीकोणातून दिसणारी परिस्थिती काही अतिरेकी हिंदुत्वनिष्ठांना असह्य झाली. गांधीजी हयात असेपर्यंत या परिस्थितीत बदल होणार नाही अशी अत्यंत चुकीची समजूत करून घेऊन त्यांनी गांधीजींचा वध केला व आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली. गांधीजींनी असंख्य चुका केल्या हे जरी ग्राह्य मानले तरी 'गांधी-हत्येच्या आत्मविनाशी अपराधाचे' किंचितही समर्थन करता येणे शक्य नाही. थोडक्यात म्हणजे या घटनेने आम जनतेच्या मनात हिंदुत्वोपासक संस्थासंबंधी कमालीची अढी निर्माण होऊन त्या सरकार आणि आम जनता यांच्या क्षोभाचे केंद्र बनल्या. सर्व देशभर आणि विशेषेकरून महाराष्ट्रात या क्षोभाने बरेच उग्र रूप धारण केले. हिंदुसभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित लोकांच्या घरादारांवर हल्ले करून त्यांच्या घरांना आगी लावणे असे वेडेपणाचे प्रकार ठिकठिकाणी घडले. घडलेली घटना इतकी अनपेक्षित, आणि अतिरेकी होती की 'पेराल तसे उगवेल' या उक्तीप्रमाणे झालेली प्रतिक्रियाही तितकीच निंदनीय झाली. कारणाविना गोळवलकर गुरुजींसकट अनेक पुढाऱ्यांना पकडून जेलमध्ये टाकण्यात आले. संघ, हिंदुमहासभा आदि काही संस्थांवर कायद्याने बंदी घालण्यात आली.

वस्तुतः वधाचे कृत्य ही फक्त कांही अविवेकी लोकांचीच जबाबदारी होती. तरीही काही ठिकाणी तर वैयक्तिक हेवादावा साधण्यासाठी कोणत्याही कार्याशी संबंध नसलेल्या व्यक्तींनाही पकडण्यात आले. अकोला येथे श्रीमती कमलाबाई सोहोनी, कराड येथे सौ. ताई दिवेकर आणि बेळगांव येथे सुगंधा जोगळेकर अशा तुरळक राष्ट्र सेविका समितीच्या कार्यकर्त्यांनाही त्यावेळी पकडून मग सोडून देण्यात आले. काही ठिकाणी समिति सेविकांना त्रासही झाला.

अचानकपणे निर्माण झालेली ही अति विचित्र परिस्थिती आज जरी कदाचित इतकी गंभीर वाटली नाही तरी त्यावेळी मात्र खरोखर काय होईल हे सांगता येणे कठीण होते. विशेषतः स्त्रियांना तर ते विचित्र वातावरण अत्यंत धोकादायक असल्याने मावशींच्या समोर मोठा यक्ष प्रश्न उभा राहिला. एका तपाच्या कठीण तपस्येनंतर इतका वाढलेला कार्यवृक्ष क्षणात उन्मळून पडण्याची पाळी आली. अशा परिस्थितीत फार वेळ न घेता काही निर्णय घेणे आवश्यक होते. विचाराअन्ती मावशी याच निर्णयाप्रत पोहोचल्या की ज्याप्रमाणे रणक्षेत्रावर बिनदिक्कतपणे आगेकूच करीत असलेल्या सेनेस, अचानकपणे आलेल्या विपरीत परिस्थितीत काही काळापुरते माघारी घेणे फायद्याचेच ठरते, त्याप्रमाणे समिती-कार्यही तात्पुरते स्थगित करणे श्रेयस्कर ठरेल. आपल्या सहकाऱ्यांशी यावर विचार करून समिति कार्य स्थगनाचा निर्णय त्यांनी घोषित केला. लगेच पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना तारेने हा निर्णय कळविण्यात आला.

वावटळ शमल्यानन्तर पुन्हा पूर्ववत् मार्गक्रमण करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आलेला असल्यामुळे अनुत्साह किंवा निराशा यांना मागमूसही नव्हता. भारतभर पसरलेल्या आपल्या असंख्य सहकाऱ्यांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य मावशींनी या काळातही चालूच ठेवले होते. कार्यस्थगनानन्तर थोड्याच काळाने लेखकाचा बऱ्हाणपूर येथील हिंदुत्वनिष्ठ आणि अग्रेसर अधिवक्ते कै. बाळकृष्णपंत कासखेडीकर यांची कन्या कुमुदिनी हिचेशी विवाह ठरला. या निमित्ताने मावशींनी स्वहस्ते जी बरीच निमंत्रणे आपल्या सहकाऱ्यांना लिहिली त्यात रीतसर निमंत्रणानन्तरचा बराच भाग समिति कार्याशी संबंधित असाच होता, हे लेखकाला आजही नीट आठवते. वैयक्तिक, कौटुम्बिक जबाबदारी आणि सामाजिक कर्तव्ये या दोन्ही गोष्टी उत्तम प्रकारे पार पाडण्याचे मावशींमधील कसब खरोखरच असाधारण आहे यात शंकाच नाही.

संघावरील बंदी आणि त्याच्या नेत्यांना झालेली अटक या गोष्टीविरुध्द संघाने सत्याग्रहाचे पाऊल उचलले. देशभर संघ स्वयंसेवकांनी सत्याग्रहात भाग घेतला.

बंदी हटविण्याच्या मागणीसाठी विशेषतः महाराष्ट्राच्या मुम्बई, पुणे आणि नागपूर या प्रमुख शहरी स्त्रियांनीही मोठमोठे मोर्चे काढले. त्यावेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मुरारजी देसाई आणि जुन्या मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला यांचेकडे शिष्टमंडळे घेऊन गेल्या व बंदी उठविण्याची मागणी त्यांना सादर केली. १९४९ मध्ये अनेकांनी प्रयत्न केल्यामुळे त्या संघावरील बंदी उठली.

या काळात समिती स्थानावर जरी ध्वज लावून सेविका जमत नसत तरी कुणाच्या तरी घरी एकत्र जमून भजने, गाणी, चर्चा आदि कार्यक्रम सर्वदूर होत असत.

● ● ●

# वावटळ शमल्यानंतर : १२

गांधीवधानंतरची वावटळ शमल्यानंतर १९४९ च्या ऑगस्टमध्ये स्थगित ठेवलेल्या समिती कार्यास पुन्हा नव्या जोमाने आरंभ करण्याचा मावशींनी निर्णय घेतला. त्याप्रमाणे त्यांनी प्रमुख कार्यकर्त्यांची नागपूर मुक्कामी एक बैठक आमंत्रित केली. महाल विभागातील भोसला वेदशाळेत ही बैठक झाली. पुन्हा पूर्ववत् कार्य सुरू करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्याप्रमाणे बैठकी नंतर लगेच ठिकठिकाणी पुनः समिति शाखा भरू लागल्या.

या बैठकीत वंदनीय मावशींनी 'बदलत्या परिस्थितीत समितीने वेगळ्या स्वरूपाचे कार्यक्रम घेणे जरूर आहे' हा एक विचार प्रामुख्याने मांडला. 'शारीरिक शिक्षण, ड्रील आदि मैदानावरील कार्यक्रम जरी महत्वाचे असले तरी यापुढे अधिकाधिक भगिनींना जर समितीच्या निकट आणावयाचे असेल तर शिशु-शिक्षण, उद्योगमंदिरे, गृहिणी विद्यालये, भजनी मंडळे, कीर्तने, प्रवचने आणि अन्य विविध सांस्कृतिक कार्यक्रम ही संस्काराची व प्रचाराची प्रभावी साधने समितीने हाताळणे जरुर आहे' असे भर देऊन सांगितले.

प्रारंभी काही ज्येष्ठ सहकाऱ्यांनी मावशींच्या प्रस्तुत धोरणाला विरोध दर्शविला. यामुळे सुरवातीला हा विचार पाहिजे त्या प्रमाणात प्रत्यक्षत उतरविता आला नाही. तथापि एखादा विचार मांडल्यानंतर त्यासाठी आवश्यक अशी प्रत्यक्ष कृती करण्यासाठी स्वतःच कामास लागावयाचे अशी मावशींच्या स्वभावाची घडण असल्यामुळे या दृष्टीने त्यांनी लगेच पाऊले उचलली असे दिसून येते. प्रत्यक्ष मावशींनी पुढाकार घेऊन नवे कार्यक्रम हाती घेतल्यानंतर असाच अनुभव आला की त्यातून समितीला अनेक नव्या कार्यकर्त्यांची जोड मिळाली. प्रत्यक्ष प्रमाणानंतर मात्र आरंभी झालेल्या विरोधाची धार बोथट झाली.

दैनंदिन कार्यव्यवस्थेच्या दृष्टीने काही महत्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले. त्यात (१) प्रत्येक शाखेने आपल्या निधीतील शिलकेचा अर्धा हिस्सा व चालू वर्षीच्या गुरुदक्षिणेचा १ । १० वर्षाअखेरीस केंद्राकडे समितीकार्याच्या प्रसारार्थ लागणाऱ्या खर्चासाठी पाठवावा. (२) अधिकाऱ्यांचा संपूर्ण प्रवासखर्च यापुढे समितीने उचलावा. (३) स्थानिक अधिकाऱ्यांच्या संमतीनेच कोणताही पत्रव्यवहार करावा, हे काही प्रमुख होत.

ब्रिटिश राजवटीलाही मावशींचे संबंधात जी गोष्ट आवश्यक वाटली नाही, ती स्वकीय सरकारला मात्र आवश्यक वाटू लागली याचे आश्चर्य वाटते. या संबंधात १९४८ नन्तरच्या काळातील जो एक गमतीदार अनुभव आहे, तो असा—

मी आणि मनोहर या दोघांनीही आपआपले व्यवसाय वर्धेस सुरू केले होते. त्याचे वकीलीचे आणि माझे माझ्या मुद्रण - प्रकाशन व्यवसायाचे, अशी दोन्ही कार्यालये आमच्या मोठ्या वास्तूत एकमेकांच्या बाजूलाच होती. प्रथम एक दिवस एक साध्या वेषातील, वरवर किंचित मोळसट भासणारी, ठेंगणी परन्तु मजबूत बांध्याची व्यक्ती माझ्या ऑफीसात आली. त्या व्यक्तीला काही मुद्रित करून घ्यावयाचे नसून फक्त माझा परिचय करून घ्यावयाचा आहे हे थोड्याच संभाषणानन्तर लक्षात आले. यापूर्वीच मनोहरशी आपला परिचय झालेला आहे अशीही माहिती त्या व्यक्तीने मला दिली. पहिल्याच बैठकीत त्या संभाषणपटूने राजकारण, समाजकारण, आदि मला प्रिय असलेल्या विषयावर वार्तालाप करून आणि आमच्या कुटुम्बाची आणि विशेषतः वन्दनीय मावशींच्या कर्तृत्वाची प्रशंसा करून मला आपलेसे करून घेतले. अशाच प्रकारे मनोहरकडेही त्यांनी आपली बैठक थोड्याच काळात पक्की केली होती. जवळ जवळ न चुकता ही व्यक्ती रोज आमच्याकडे येऊ लागली. सहवासाने साहजिकच सलोखा वाढतो, तसा तो आमच्यातही निर्माण झाला. इतका की मग ही व्यक्ती का येत असावी असा विचारही काही दिवस आला नाही.

श्री. गुणवन्तराव भोरे नांवाप्रमाणेच एक कुशल सी. आय्. डी. इन्स्पेक्टर होते. मावशींची व त्यांची प्रत्यक्ष भेट क्वचितच होऊ शकत असे. तथापि त्यांचा कार्यक्रम काय आहे ? त्यांना कोण कोण भेटायला आले ? त्या समितीकार्यासाठी केव्हा आणि कोणत्या ठिकाणी दौऱ्यावर जाणार आहेत ? परत केव्हा येणार ? आदि अनेक बारीक सारीक प्रश्नांची बिनचूक उत्तरे वरिष्ठांना रोजच्यारोज पुरविणे हे वस्तुतः त्यांचे खरे काम होते; आणि वर सांगितल्याप्रमाणे आमच्याशी संबंध प्रस्थापित करून मोठ्या शिताफीने ते आपली कर्तव्यपूर्ती करू लागले. मग तर सर्वच उघड झाले होते.

प्रथम सलोखा निर्माण करावयाचा, मग आपण कोण आहोत हे कळले तरी उद्देश-पूर्तीत विशेष बाध येत नाही हा जो गुप्तचर खात्याचा सिद्धांत आहे तो मोऱ्यांनी उत्तम प्रकारे अंमलात आणून दाखविला यांत संशय नाही. काही वर्षानंतर का होईना, पण याची मुळीच गरज नाही, ही गोष्ट सरकारला उमगली तेव्हा मात्र आपोआपच मोऱ्यांच्या आमचेकडील चकरा बऱ्याच प्रमाणात कमी झाल्या.

ठिकठिकाणी समिती - कार्य पूर्ववत सुरू होऊन काही काळ लोटल्यानन्तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्तुळातून संघ - समिती यांच्या समानान्तर मार्गक्रमणातील अंतर कमी करणारा एक प्रस्ताव नागपूर नगर संघाच्या एका प्रमुख अधिकाऱ्याकरवी समितीच्या नागपूर प्रांत प्रमुख कै. काकू परांजपे यांच्या कानावर प्रथम घालण्यात आला. समिती - संघटनेच्या शिस्तीप्रमाणे काकूंनी लगेच तो मावशींना कळविला. प्रत्यक्ष वन्दनीय मावशी त्या ठरावास कितपत अनुकूल वा प्रतिकूल होत्या हा भाग तितका महत्वाचा नाही. हा प्रस्ताव कदाचित अधिकृत नसला तरी तो एका जबाबदार अधिकाऱ्यातर्फे समोर आणला गेला होता, शिवाय त्यात प्रत्यक्ष वंदनीय मावशी आणि त्यांनीच निर्मिलेले समिति - कार्य या परस्परातील विशेष संबंधाचा अतूट धागाच कमजोर करण्याची योजना होती. तरीही त्यामुळे भावनाविवश न होता तो प्रस्ताव आपल्या प्रमुख सहकाऱ्यांच्या समोर विचारार्थ ठेवण्यात मावशींच्या मनाची जी सखोलता, जो संयम, जो आत्मविश्वास, जे धैर्य आणि जी शिस्तप्रियता दिसून आली त्याला क्वचितच तोड मिळेल ! या प्रस्तावाचा काय निकाल लागला हा भाग पुढे विस्तृत रीत्या आलेलाच आहे त्यामुळे त्याची पुनरावृत्ती करीत नाही.

केवळ आपल्या सामाजिक प्रतिष्ठेला एखाद्याने आव्हान केले, म्हणून मोठमोठ्या व्यक्तीही किती तोल सोडून वागू लागतात, हा अनुभव कांही नवीन नाही. या बाबतीत मावशींनी अंगीकारलेली भूमिका असाधारण अशीच आहे. दुसरी बाजू तयार आहे किंवा नाही या विचाराला महत्व न देता असलेले संबंध जसेच्या तसेच राहतील हेच धोरण त्यांनी कटाक्षाने पाळले. ह्याबाबत काहींनी त्यांच्यावर टीकाही केली. पण त्या बाबत कांहीही मतप्रदर्शन न करता त्यांनी आपले धोरण तसेच चालू ठेवले. समर्थ रामदासांनी कल्पिलेला 'निश्चयाचा महामेरू' यापेक्षा भिन्न असू शकेल असे वाटत नाही.

याच वर्षाच्या शेवटी त्यांचे एकुलते एक चिरंजीव श्रीकृष्णपंत दिल्ली निवासी झाल्या-मुळे समितीच्या नागपूर प्रांत प्रमुख कै. काकू परांजपे नागपूर सोडून दिल्लीस गेल्या. तेथे गेल्यावरही स्वस्थ न बसता त्या समिति–कार्यच करीत राहतील ह्या मावशींच्या विश्वासानुसार काकू तेथेही कामास लागल्या.

कै. काकूंच्या दिल्ली वास्तव्यासंबंधी त्यांच्या कन्या सौ. कुसुमताई साठे लिहितात: "दिल्लीच्या महाराष्ट्रीय समाजातील वातावरण आईला मानवत नसे. चार महाराष्ट्रीय स्त्रिया एकत्र जमल्या की पंजाबी स्त्रियांच्या राहणीची, वागण्याची, पोषाखाची चेष्टा सुरु होई. समितीच्या ध्येयवादातून रुजलेली राष्ट्रीय एकात्मतेची भावना त्यामुळे दुखावली जाई. पण ही जाणीव या स्त्रियांना द्यावी कशी? दिल्लीत या दृष्टीने समितीची शाखा काढण्याचा आईने प्रयत्न केला. कार्यवाढीच्या दृष्टीकोनातूनच दिल्लीच्या आपल्या अल्प वास्तव्यात दोन सेविकांना मुद्दाम दिल्लीचीच स्थळेही पाहून दिली. यामुळे दिल्लीत कार्याचा जम बसण्यास मदत झाली."

क्षेत्र कोणतेही असो, परिस्थिती कशीही असो, परन्तु भारतीय स्त्री–शक्ति जागृतीचे कार्य समिती सेविका आणि अधिकारी पूर्वीपासूनच करीत आल्या आहेत ही गोष्ट यावरून स्पष्ट होते.

वस्तुतः दिल्लीस स्थानांतर केल्यानंतर कांही कालानेच काकूंना कॅन्सर सारख्या भयंकर रोगाने ग्रासले, पण तशाही अवस्थेत समिती–कार्याचाच विचार त्यांच्या मनात होता. १९५१ मध्ये नागपुरास परतल्यानंतर याच वर्षीच्या ऑगस्टमध्ये त्या देवरूप झाल्या. यामुळे वंदनीय मावशींना कमालीचे दुःख झाले.

१९३६ साली समिति स्थापनेपासून तो १९४९ पर्यंतच्या कालात प्रारंभी मुळीच सवय नसल्यामुळे व नंतर त्या दृष्टीने विशेष प्रयत्न करू न शकल्यामुळे वंदनीय मावशींच्या वक्तृत्त्वाचा, सर्वसाधारणपणे रूढ अर्थाने, दर्जा पाहिजे तितका समाधानकारक नव्हता. वस्तुतः समाजासमोर भाषणे देण्यापेक्षा लहान स्वरूपातील बैठकीतून अधिक प्रभावीरीत्या काम होते, असाच मावशींच्या मनाचा कल असल्यामुळे सुरवातीला या बाबतीत त्यांनी विशेष प्रयत्नही केला नाही. तथापि जसे जसे समिति–कार्य फोफावू लागले, तसे तसे त्यांचे दौरे व भाषणे यांच्या संख्येत वाढ होऊ लागली आणि पुढे १९५३ सालापासून सार्वजनिक रीत्या रामायण, महाभारतावरील प्रवचनांचा उपक्रम चालू केल्यानंतर तर वक्तृत्वकला जणू ज्यांची दासीच बनली. या संबंधात वर्धा येथील समितीच्या प्रारंभीच्या सेविका सौ. तारा देशपांडे (तारा पाठक) यांची एक आठवण देण्यासारखी आहे.

सौ. तारा देशपांडे आपल्या राष्ट्रसेविकेतील संस्मरणात्मक लेखात म्हणतात :

"१९४३ मध्ये लग्न झाल्यामुळे वर्धेहून नाशिक येथे गेल्यानंतर सुमारे १२ वर्षांनंतरची गोष्ट आहे. शेजारच्या कुसुमताई एक दिवस म्हणाल्या, "अहो वहिनी, मावशी इथे आल्या आहेत. आज पाच वाजता त्यांचे भाषण आहे. कुसुमताईंचे हे उद्गार ऐकून माझे मन जरा चलबिचल झाले. कसा तरी त्यांना निरोप दिला अन् माझ्या डोक्यात

विचारचक्र फिरू लागले. मावशींचे ! अन् भाषण !! सर्व नाशकातील स्त्रियांसाठी !!! हे भलतेच काय करीत आहेत मावशी ? वक्त्याचे नुसते आभार मानायचे तरी मनाजोगे जमत नाही, मग इतक्या स्त्रियांसमोर आज मावशींना कसे बोलता येणार ! मनात काळ्या रामाचा धावा सुरु केला. अर्थात हे विचार आत्मीयतेच्या पोटीच आले.

भाषणाची वेळ जवळ येऊ लागली तसे काळ्या रामाचा अधिकच जोरात धावा सुरु केला. बौद्धिकच्या ठिकाणी गेले. मला पाच मिनिटे उशीरच झालेला होता. मावशी बोलत होत्या. काळ्या रामाने माझ्या हाकेला ओ दिलेली होती. विद्यमान परिस्थितीत समितीची आवश्यकता हा विषय पौराणिक दाखले देऊन मावशी स्पष्ट करीत होत्या. सर्व श्रोतृवृंद त्यांच्या भाषणात तल्लीन झालेला दिसला.

भाषण संपले, बायकांची कुजबुज सुरू झाली. किती छान सांगितल हो ! विद्वान दिसतात बर का या बाई !! उगाच नाही एवढी मोठी संस्था चालवीत !!! बरच शिक्षण झालेल असेल नाही ?

श्रद्धा, निश्चय, अभ्यास, चिंतन आणि सातत्य यामुळेच हा कायापालट घडून आला होता ! वक्तृत्वाचा ओघ दुथडी भरून वाहू लागला होता.

१९५० पासून पुन्हा समितीचे उन्हाळी वर्ग भरू लागले. या वर्षी ठाणे येथे मोठ्या प्रमाणावर वर्ग घेण्यात आला. या वर्गातून स्फूर्ती घेऊन बऱ्याच सेविका आपआपल्या गांवी परत गेल्यानंतर कामाला लागल्या. अशा प्रकारे गांधी-वधानंतर सुमारे सव्वा वर्ष समिती कार्य स्थगित राहिल्यानंतर पुन्हा ते जोमाने सुरू झाले.

यानंतर लगेच म्हणजे १९५१ साली ठिकठिकाणच्या कार्याचा आढावा घेऊन पुढील मार्गदर्शन करण्यासाठी समितीच कार्यकर्त्यांचा मेळावा मावशींनी पुणे येथे आमंत्रित केला. तो तेथील आपटे यांच्या ब्राम्हण कार्यालयात यशस्वी रीत्या सम्पन्न झाला.

या बैठकीत बऱ्याच गोष्टी चर्चिल्या गेल्या. पैकी महत्वाच्या अशा ज्या नवीन मुद्यावर विचार झाला तो म्हणजे गांधी वधानंतर बदललेल्या परिस्थितीत सेविकांना मार्गदर्शन होणे आवश्यक होते.

"समिती ही राजकीय चळवळ नाही. राजकारणाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या सुतरामही संबंध नसलेली ती एक स्त्री–संघटना आहे. शिवाय स्वसंरक्षणाचा प्रसंग सोडल्यास इतर वेळी जाणूनबुजून कोणत्याही प्रकारचा हिंसाचार करण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध समितीची भूमिका असल्याने समितीवर सरकारचा रोष असण्याचे कारण नाही. म्हणूनच सरकारी

नोकरी करणारी एखादी स्त्री समितीची सेविका असल्यास कोणत्याही न्यायाधिष्ठित शासनाला हरकत घेण्याचे कारण नाही. आणि कदाचित इतर काही उद्देशामुळे तशी हरकत उपस्थित केली गेली, तरी कायदेशीर दृष्ट्याही अशा हरकतीबद्दल भीति बाळगण्याचे वस्तुतः कारण असू नये. तथापि सर्वांच्याच मनाची एकसारखी तयारी असणे कठीण असल्यामुळे मी एवढेच सांगू शकेन की फारतर तुमच्या समिती स्थानावरील प्रत्यक्ष उपस्थितीवर बंधन आणता येईल, पण समितीला तुमच्या हृदयात मिळालेले स्थान, तुमच्या इच्छेविरुद्ध कदापीही नाहीसे करता येणार नाही'', या शब्दात मावशींनी या प्रश्नासंबंधी मार्गदर्शन केले.

प्रस्तुत मार्गदर्शनाच्या वास्तविक मतितार्थात न शिरता एवढेच सांगण्यासारखे आहे की, या विवेचनामुळे बऱ्याच सेविकांना वाटणारी वैयक्तिक अडचण दूर झाली व त्या पूर्ववत कार्यरत राहिल्या.

काही नवीन कार्यक्रमासंबंधीही या बैठकीत विचार झाला. पुढे यापैकी बरेच कार्यक्रम अमलात आणले गेले. या संबंधी विस्तृत विवेचन पुढील परिच्छेदात येणारच आहे.

● ● ●

## मावशी आणि आम्ही : १३

१९४४ नंतरच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या क्षेत्रात केवळ भ्रामक समजुतीमुळे वंदनीय मावशींसंबंधी काहीसे गैरसमजाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु ते केवळ अयोग्यच नव्हे तर त्यांना अन्यायकारक सुद्धा असल्यामुळे प्रस्तुत ग्रंथात त्या विषयी थोडे विस्तृत विवेचन करून निराकरण करणे अति आवश्यक वाटते. यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांच्याशी प्रस्तुत लेखक आणि त्याचे बंधू यांचा निकटचा संबंध आहे.

१९३७ ते ४४ या कालखंडात आमचे थोरले बंधू मनोहरपंत कॉलेज शिक्षणा निमित्त वर्धेहून नागपुरास राहावयास आलेले होते. याच कालावधीत काही काल ते मध्यप्रदेशातील हर्दा व टिमारणी या क्षेत्रात संघाचे प्रचारक म्हणून गेले होते. तसेच १९३९ ते ४० या वर्षात प. पू. गोळवरकर गुरुजी आणि ते यांच्यात व्यक्तिगत संबंध स्थापित होण्याचा योग जुळून आला होता. आमचे क्रमांक दोनचे बंधू पद्माकरपंत तर बराच काल वर्धा शाखेचे प्रमुख शिक्षक असून शाखेची उपस्थिति आणि शिस्त वाढविण्याचे कामी त्यांनी बरीच मेहनत घेतलेली होती. मीही वर्धेस एका शाखेत शिक्षक असून उन्हाळ्याच्या सुट्यात नियमाने जिल्ह्यात संघ प्रचारानिमित्त दौरे काढीत असे.

सांगण्याचे तात्पर्य हे की वरील कारणास्तव, शिवाय विशेषकरून आम्ही वंदनीय मावशींची मुले असल्यामुळे संघाच्या वरिष्ठ वर्तुळातही आमचा बराच परिचय असून संघक्षेत्रात आम्ही ठळकपणे वावरत होतो. असे असूनही नंतरच्या काळात मात्र आम्ही संघाच्या दैनंदिन कार्यक्रमापासून अलिप्त झालो.

" १९४२ च्या देशव्यापी ' चलेजाव ' चळवळीपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अगदी अलिप्त राहिला. तीत संघाने प्रत्यक्षपणे भाग घ्यावयास हवा होता ", हे त्यांचे मत नंतरच्या काळात मनोहर स्पष्टपणे बोलून दाखवू लागला. या संबंधी तो संघ-स्वयंसेवकांशी

चर्चाही करू लागला. परन्तु संघ स्वयंसेवकानेच संघकार्यक्रमाबाबत वा धोरणासंबंधी प्रतिकूल मत व्यक्त करणे ही ' न रुचणारी बाब ठरते ', असा त्यास अनुभव आल्याने १९४३ च्या वर्षारंभी जेव्हा त्यावेळचे नगर कार्यवाह बाळासाहेब देवरस यांनी बर्डी शाखचे कार्यवाह पद सांभाळण्याची त्याला सूचना केली तेव्हा त्याने सविस्तर पत्र लिहून त्यांना आपली असमर्थतता प्रकट केली. त्याचे म्हणणे हे की " ज्याअर्थी संघ स्वयंसेवक अथवा संघाबाहेरील व्यक्तींशी बोलतांना मी संघ - भूमिकेचे समर्थन करू शकत नाही त्याअर्थी हे पद मी स्वीकारणे योग्य होणार नाही. "

वरील सर्व मनोहरची वैयक्तिक मते होती. यानंतर थोड्याच दिवसांनी शिक्षण पूर्ण झाल्याने तो नागपूर सोडून वकिली व्यवसायासाठी वर्ध्यास परत गेला. त्याच्या मताशी मी बराच सहमत असलो तरी दैनंदिन कार्यक्रमात भाग घेण्याचे त्याने बंद केल्यानंतरही काही काळ मात्र मी पूर्वीप्रमाणेच संघ कार्यात भाग घेत राहिलो.

संघ ही राजकीय संघटना नसल्यामुळे ' राजकीय कार्यक्रमात तिने प्रत्यक्ष भाग घ्यावा ' हे म्हणणे कदाचित अयोग्य असेल. परन्तु ती एक राष्ट्रीय आणि राष्ट्रप्रेमी संघटना असल्यामुळे आवश्यक अशा राजकीय कार्यक्रमात सुद्धा व्यक्तिशः भाग घेण्यासाठी जास्तीतजास्त संघ स्वयंसेवक प्रवृत्त व्हावेत म्हणून अनुकूल असे वातावरण संघाने कटाक्षाने निर्माण करावे ही अपेक्षा अगदी अयोग्य आहे असे कोणी म्हणेल हे संभवनीय वाटत नाही. आणि विशेषेकरून स्वातंत्र्यपूर्व काळात तर अशी अपेक्षा योग्यच होती, असे माझे व्यक्तिगत मत आहे.

१९४५ च्या जुलै - ऑगस्ट या काळात दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाली. तसेच ब्रिटनमधे भारतस्वातंत्र्य विरोधक मिस्टर विन्स्टन चर्चिल यांच्या हुजूर पक्षाचे सरकार संपुष्टात येऊन त्या जागी भारतीय स्वातंत्र्यास अनुकूल अशा मिस्टर क्लेमेंट अँटली यांच्या मजूर पक्षाचे सरकार अधिकारावर येणे या सर्वसाधारणपणे जगाच्या आणि विशेषेकरून भारताच्या दृष्टीने अति महत्वाच्या दोन घटना घडल्या. या नन्तर थोड्याच काळाने म्हणजे सप्टेंबर महिन्यात भारतीय स्वातंत्र्याची योजना निश्चित करण्यासाठी ब्रिटिश मंत्र्यांचे एक शिष्टमन्डळ आपण लवकरच भारतात पाठवीत आहोत अशी अॅटलींनी घोषणा केली. त्याप्रमाणे १९४६ च्या मार्चमध्ये ब्रिटनच्या भारतीय खात्याचे मंत्री लॉर्ड पेथिक लॉरेन्स यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमन्डळ भारतात आले आणि निरनिराळ्या भारतीय पुढाऱ्यांशी त्याने चर्चेस सुरवात केली. लगेच म्हणजे १२ ऑगस्ट १९४६ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी काँग्रेस अध्यक्षांना तात्पुरते सरकार स्थापन करण्यास आपण पाचारण करणार आहोत अशी घोषणा केली. परिणामतः २ सप्टेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या

नेतृत्वाखाली मध्यंतरीच्या काळातील तात्पुरत्या सरकारची (Interim Government) स्थापना झाली. याच वेळी आणखी एक महत्वाची पायरी म्हणून डॉ. राजेन्द्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी 'घटना समिति' निर्माण करण्यात आली.

भारतीय क्षितिजावर लवकरच स्वातंत्र्यसूर्य उदयास येणार असल्याची ग्वाही देणाऱ्या उपरनिर्दिष्ट महत्वाच्या राजकीय घटना एकामागून एक इतक्या शीघ्र गतीने घडू लागल्या की समस्त देशभर आनंदाच्या आणि उत्साहाच्या लहरी दौडू लागल्या. परन्तु यामुळेच असा एक विचार त्यावेळी मनात आल्याशिवाय राहिला नाही की ज्या संघटनेने आपल्याला व इतर असंख्य तरुणांना घडविले तिचे स्वातंत्र्यप्राप्ती-नंतर देशाच्या पटावरील स्थान कोणते असेल? माझ्या दृष्टीने तरी प्रश्नाचे विशेष आशादायी उत्तर मिळण्यासारखे नव्हते. म्हणूनच ज्या प्रमाणे एखाद्या आसाकडे, शेजारीच काही समारंभ असता, संबंध दुरविलेले असल्यामुळे, वडील मंडळींनी तेथे जाण्यास मज्जाव केल्याने, बाजूसच चाललेल्या धामधुमीत भाग घेता येत नाही हे पाहून लहान मुलांच्या मनाची ज्या प्रकारची विचित्र अवस्था संभवनीय आहे तशाच स्वरूपाची त्यावेळी माझ्या मनाची अवस्था झाली.

आमच्या मनातील विचार आम्ही वंदनीय मावशींजवळ बोलून दाखवीत असू. विशेषतः आमचा थोरला भाऊ मनोहर याचे असे म्हणणे असे की ज्याप्रमाणे संघ देशातील एकंदर घडामोडींच्या प्रवाहापासून 'अलिप्त' असा वाटतो तशीच अलिप्तता राष्ट्र सेविका समितीचे संबंधात वाटू नये आणि यासाठी अधिक 'लोकाभिमुख' असे कार्यक्रम समितीने हाती घ्यावेत. यावर मावशींचे असे म्हणणे असे की संघ आणि समिती या दोन्ही संघटनांची वैचारिक भूमिका जरी एकच असली त्या एकमेकींपासून भिन्न आहेत. भारतीय स्त्रीचे हित आणि आवश्यकता लक्षात घेऊनच समितीचे कार्यक्रम निश्चित केले जातात. या प्राथमिक महत्वाच्या दृष्टिकोनातून, बदलत्या परिस्थितीत कार्यक्रमात फेरफार किंवा नवीन कार्यक्रमाची योजना आवश्यक वाटली तर तसा विचार अवश्य होईल. संघाने आपल्या कार्यक्रमात बदल करावा की नाही हा त्या संघटनेच्या अधिकाऱ्यांचा प्रश्न आहे आणि या संबंधी ते वेळोवेळी विचार करीत असतीलच. थोडक्यात सांगायचे म्हणजे या संबंधात त्यांचे व आमचे विचार विशेष जुळत नसत. तथापि आमच्या विचारांना कमी न लेखता प्रश्नाची एक बाजू म्हणून त्या ते नीट ऐकून घेत.

१९४६ च्या शेवटी माझे एक मित्र आणि पूर्वी संघ स्वयंसेवक असलेले श्री. वा. द.

तथा बाबा धर्चे (सध्या मुंबईच्या दैनिक 'सकाळ' चे संपादक) यांनी अमरावती येथून प्रकाशन सुरु केलेल्या साप्ताहिक 'हिंदुस्थान' मध्ये 'संघातील अंतःप्रवाह' नामक एक लेखमाला योजली. त्यात इतरांप्रमाणे माझेही विचार प्रकाशित झाले. यावेळी मी नागपूर येथील कॉलेज शिक्षण संपवून पुन्हा वर्धेस राहायास आलो होतो. लेखमालेतील माझे विचार फार क्रांतिकारक होते, असे म्हणता येणार नाही. तथापि ते प्रकाशित झाल्यानंतर मात्र वर्धा येथील संघ-वर्तुळात बरीच नाराजी दिसून आली. या सुमारापर्यंत मीही संघाच्या दैनंदिन कार्यक्रमापासून अलिप्त झालो होतो. शिवाय पद्माकर हा देखील शिक्षण संपवून नोकरी निमित्त मुंबईस गेल्याने त्याचाही संघाशी संबंध तुटला. धाकटे बंधू रत्नाकर, कमलाकर आणि आनंद हे देखील साधारणपणे याच सुमारास शिक्षणानिमित्त वर्धा सोडून निरनिराळ्या गांवी गेल्याने त्यांचाही संघाशी संबंध तुटला. या घटना हेतुपूर्वक घडल्या असे समजून त्या संबंधी वेगवेगळी मते बोलली गेली. ज्याअर्थी मावशींची सर्वच मुले 'दूर गेली' आणि वर उल्लेखिल्याप्रमाणे मी आणि मनोहर या दोघांनी तर 'संघविरोधी' भूमिका प्रकट रीत्या मांडली, त्या अर्थी मावशींची या प्रकाराला सम्मती असावी अशा प्रकारच्या गैरसमाजनेही त्यावेळी मूळ धरले. परिणामतः प्रत्यक्ष मावशींनाच 'आपल्या सर्वच मुलांनी संघात जाणे बंद केले ना?' असा प्रश्न विचारण्यात येऊ लागला.

समितीच्या तात्त्विक भूमिकेशी विसंगत नसणारे परन्तु कार्यास पूरक असे नवीन कार्यक्रम घेण्यास मावशी नेहमीच अनुकूल राहिलेल्या आहेत. याच भूमिकेतून, ते निरनिराळ्या राजकीय विचारांचे असले तरी, उत्कृष्ट वक्त्यांना भारतीय स्त्रीजीवनाशी संबंधित विषयावर बौद्धिकवर्ग घेण्यासाठी पाचारण करण्याची त्यांनी सुरवात केली. प्रसिद्ध गांधीविचार-प्रणेते दादा धर्माधिकारी, प्रसिद्ध साहित्यिक वामनराव चोरघडे आदि काँग्रेसच्या तर श्री. बाळाजी हुद्दार या त्याकाळी साम्यवादी विचारांच्या विद्वानांची बौद्धिके कित्येक वर्षापूर्वीच त्यांनी घडवून आणली. याशिवाय काही राष्ट्रीय महत्वाचे कार्यक्रम अथवा सामाजिक स्वरूपाचे प्रसंग समितीबाहेरील व्यक्तींच्या सहकार्याने घडवून आणण्याची प्रथा त्यांनी बऱ्याच वर्षापूर्वी आरंभ केली. समितीच्या दैनंदिन कार्यक्रमाचा भाग नसलेले परन्तु महत्वाचे आणि सामाजिक उपयुक्तता असलेले आणखी बरेच कार्यक्रम त्यांनी योजले. रामायण महाभारतावरील प्रवचने, विद्वज्जनांच्या व्याख्यानमाला, ग्रंथ आणि नियतकालिकांचे प्रकाशन, हस्तकला प्रदर्शने, भजनी मंडळांची स्थापना, बालक मंदिरे, गृहोद्योग वर्ग, आसनांचे वर्ग, साक्षरता वर्ग, हस्तकला वर्ग, ऐतिहासिक व्यक्तींची स्मारके आदि अनेक गोष्टी प्रत्यक्ष राष्ट्र-सेविका समितीच्याच तत्वावधनाखाली करण्याचा पायंडा

त्यांनी घालून दिलेला आहे. या मागे समाजशिक्षणाच्या महत्वाच्या उद्देशाव्यतिरिक्त आणखी एक महत्वाचा उद्देश साध्य होतो अशी मावशींची धारणा आहे. समितीची वैचारिक भूमिका कित्येकांना सम्मत असते, परंतु त्यापैकी काहींना एकतर दैनंदिन कार्यक्रमासंबंधी रुचि नसते, शिवाय त्यांची स्वतःची अशी वेगळी रुचि असते. अशा स्त्रियांना समिती कार्याशी जोडून ठेवण्यात या कार्यक्रमांची बरीच मदत होते. म्हणूनच निरनिराळया सेविकांची व्यक्तिगत रुचि लक्षात घेता, विवक्षित अशा इतर कार्यक्रमांची त्यांच्यावर जबाबदारी टाकून ते त्यांच्याकडून करवून घेणे हें मावशींचे कार्य अखंड रीत्या चालू असते.

परन्तु वरील सर्व गोष्टीमुळे मावशींबद्दल काहीसा गैरसमज निर्माण झाला. या संबंधीचा प्रत्यय जसा अनेकांच्या मतप्रदर्शनातून दिसून येई तसा तो समिती-संबंधी उदासीनतेच्या धोरणातूनही व्यक्त होई. १९४८ साली सारासार विचार करून वंदनीय मावशींनी समितीचे कार्य स्थगित ठेवले होते. हा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. या घटनेनंतर "सरकारी रोषाला घाबरून समितीचे कार्य बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासंबंधी कुणाशीही चर्चा न करता हा निर्णय घेण्यात आला असल्याने तो मावशींचा वैयक्तिक निर्णय आहे," या शब्दातील टीका खुद्द जबाबदार अशा हितचिंतक समजल्या जाणाऱ्या व्यक्तींकडूनही ऐकावयास मिळाली. वस्तुतः आपल्या प्रमुख सहकाऱ्यांशी विचारविनीमय केल्यानन्तरच मावशींनी हा निर्णय घेतला होता. परन्तु टीका करणाऱ्यांचा असा रोख दिसून आला की समिती बाहेरील हितचिंतकांशीही सल्लामसलत होणे जरूर होते. परन्तु त्यावेळी अशी विचित्र परिस्थिति होती की एकतर कोणताही निर्णय तातडीने घेणे जरूर होते आणि समिती बाहेरील व्यक्तींचा सल्ला घेणे शक्यही नव्हते. ही परिस्थिती लक्षात न घेता समिती कार्याच्या अस्थायी स्थगना संबंधीच्या निर्णयावरील टीका पूर्वग्रहापोटीच झाली असावी, असे वाटते. मावशींनी घेतलेला निर्णय योग्यच होता, हे नंतरच्या घटनांवरून सिद्ध झाले.

गांधी हत्येनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर घातलेली बंदी सत्याग्रहानंतर उठविण्यात आली मावशींच्या प्रेरणेने समिती सेविकांनी बंदी उठविली जावी म्हणून जे प्रयत्न केले तो भाग इतरत्र आलेलाच आहे. बंदी उठल्यानंतर काही काळ संघ कार्यातही शिथिलतेचे वातावरण दिसून आले. पूर्वीप्रमाणेच ते जोमाने चालावे यासाठी ज्या निरनिराळया योजना विचारात घेतल्या गेल्या. त्यापैकी एक म्हणजे संघ आणि समिती या दोन संघटनांच्या एकत्रीकरणाचा विचार होय. संघवर्तुळातून या संबंधी प्रस्ताव आल्यानंतर नेहमीप्रमाणेच मावशींनी तो आपल्या सहकाऱ्यांसमोर

ठेवला. समितीच्या काही तरुण अधिकाऱ्यांनी असे मत दिले की समितीच्या वाढीच्या दृष्टीने प्रस्ताव चांचणी घेण्यायोग्य असल्याने ठरावानुकूल निर्णय व्हावा. परन्तु सर्वच ज्येष्ठ सहकाऱ्यांनी प्रस्तावासंबंधी आपली प्रतिकूलता ठामपणे मांडली. त्यांचे म्हणणे असे की "प. पू. डॉक्टर हेडगेवारांनी नेहमीसाठीच घालून दिलेल्या धोरणाप्रमाणे संघ आणि समिती या संघटना सर्व बाबतीत अलग राहणेच श्रेयस्कर ठरेल. कारण सुरवातीला काही काळ जरी चांगला परिणाम दिसून आला तरी कालांतराने मात्र दोन्हीही संघटनांचे दृष्टीने निर्णय अयोग्य आहे असाच अनुभव येईल. एकत्रीकरणात कोणकोणत्या अडचणी संभवनीय आहेत या संबंधी समिती स्थापनेच्या वेळीच विचार झालेला असल्याने बदलत्या राजकीय परिस्थितीतही प्रस्तावासंबंधी अनुकूल निर्णय देणे चुकीचे ठरेल."

ही सर्व चर्चा लक्षात घेता संघ - समिती एकत्रीकरणासंबंधीच्या प्रस्तावासंबंधी अस्वीकृती कळविण्यात आली.

वरील निर्णयामुळे ज्यांचा मावशींबद्दल अगोदरच पूर्वग्रह झालेला होता त्यांचे मन खट्टू झाले. आणि मावशींच्या हाती जोपर्यंत समितीची सुत्रे आहेत तोपर्यंत हे शक्य नाही अशा प्रकारच्या विचाराने त्यांनी समितीच्याच काही असंतुष्टांद्वारे समितीच्या नेतृत्वात बदल घडवून आणण्याचा घाट घातला. संघाच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांना मात्र यासंबंधी विशेष कल्पना नव्हती, असे वाटते. तथापि हा प्रस्ताव समोर येताच समितीच्या बहुसंख्य अधिकाऱ्यांनी त्याला इतका तीव्र विरोध केला की तो नेहमीसाठीच निकालात काढण्यात आला.

गैरसमजामुळे दूषित वातावरण कसे पसरत गेले याचा प्रत्यक्ष लेखकालाही प्रत्यय आला. ती असा. १९५९ साली दैनिक तरुणभारतासंबंधी माझ्या काही खाजगी कामानिमित्त त्यावेळी अधिकारारूढ असलेल्या संघाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा प्रसंग आला त्यावेळी ते मजजवळ स्पष्टच बोलून गेले की "तुम्ही बंधू कॉम्युनिस्ट झालेले आहात. मावशी असा विचित्रपणा तुम्हाला कसा करू देतात कळत नाही." त्यावर मी त्यांना म्हटले की, "तुम्हाला मिळालेली माहिती केवळ चूकच नव्हे तर आम्हाला आणि विशेषतः मावशींना अन्यायकारक आहे." अशा प्रकारचा गैरसमज फैलण्यामागे जी घटना असावी असे वाटते, ती अशी—

१९५८ च्या जानेवारीत म्हणजे आम्हा बंधूंपैकी फक्त मी वर्धेस राहात असता तेथील संयुक्त महाराष्ट्र समितीने आचार्य प्र. के. अत्रे आणि रिपब्लिकन पक्षाचे पुढारी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे या दोघांना आमंत्रित केले होते. आमचे वर्धा येथील घर प्रशस्त व मध्यवर्ती असल्याने आणि नीट व्यवस्था होईल या विचाराने

स्थानिक सं. म. समितीचे एक प्रमुख, क्रांतीवीर सुरेंद्रनाथ सरखेल माझ्याकडे आले. त्यावेळी वंदनीय मावशी दौऱ्यावर असल्यामुळे त्यांचा वर्धेस मुक्काम नव्हता. तथापि माझ्या समजुतीप्रमाणे त्यात काहीच अयोग्य नसल्याने मी लगेच होकार दिला. त्यानुसार आचार्य अत्रे आणि बॅ. खोब्रागडे या उभयतांचा आमचेकडे दोन दिवस मुक्काम आणि जेवणखाण झाले. या घटनेनंतर थोड्याच काळाने म्हणजे जून महिन्यात काही विशिष्ट कारणामुळे मी माझा वर्धेतील मुद्रण–प्रकाशन व्यवसाय बंद करून नागपुरास राहावयास आलो. योगायोगाने त्यावेळी आचार्य अत्रे आपल्या दैनिक 'मराठा' ची नागपूर आवृत्ती सुरु करण्याच्या प्रयत्नात तेथे आले. मला वृत्तपत्र व्यवसायाची गोडी असल्याने, शिवाय आचार्य अत्र्यांशी माझा नुकताच निकट संबंध येऊन गेलेला असल्यामुळे मी नागपूर 'मराठात' काम करु लागलो.

स्वतः आचार्य अत्रे आणि संयुक्त महाराष्ट्र समिती हे दोन्ही कम्युनिस्ट पुढारी श्रीपाद अमृत डांगे आणि त्यांची पार्टी यांचे हस्तक आहेत, असे त्याकाळी बरेच चर्चिले जात होते. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कामानिमित्त अत्रे आणि खोब्रागडे यांचे आमच्याकडे उतरणे आणि नंतर थोड्याच दिवसांनी मी दैनिक मराठात जाणे या गोष्टी गैरसमज फैलविण्यास पुरेशा झाल्या. वस्तुतः आचार्य अत्रे हे कुणाचेच बांधील नव्हते, आणि त्यांची मदत घेऊनही, कॉम्युनिस्टांचे बांधील तर नव्हतेच नव्हते हे मी त्यावेळी त्यांचेशी आलेल्या निकट संबंधावरून सहज सांगू शकतो.

सांगण्याचे तात्पर्य हे की प्रामुख्याने संघाच्या एका विवक्षित वर्तुळात आम्हा बंधूंबद्दल आणि पर्यायाने वंदनीय मावशींबद्दल जो गैरसमज निर्माण झाला त्याची मुळे अशी दूरवर पसरली होती. आणि एका ठराविक काळात वंदनीय मावशींच्या मनावर याने बराच ताण पडला. या संबंधी आम्हास त्याही वेळी जाणीव होती. परन्तु आमचा नाईलाज होता. कारण 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ' या न्यायाने एखाद्याचा एखाद्या कार्यक्रमाशी, संस्थेशी वा व्यक्तीशी मतभेद असणे ही जगावेगळी परिस्थिती नसून तो केवळ मनुष्यस्वभावाचा स्वाभाविक परिपाक आहे. आपल्या मतिनुसार त्याची वेगळी मते असली तर त्यात वावगे असे काहीच नसल्याने वस्तुतः आम्हास त्याबद्दल कुणी दोषी समजण्याचे कारण नव्हते. शिवाय मतभेद असले तरी मूळ तत्त्वाबद्दल अथवा एखाद्या विवक्षित व्यक्तीबद्दल आकस असा प्रकार नसल्याने तर या संबंधी खंत बाळगण्याचे मुळीच कारण नव्हते. तथापि त्यापासून

वंदनीय मावशींना मात्र विनाकारण जो मनस्ताप सहन करावा लागला त्याचे दु:ख होते.

त्यांना त्रास झाला तरी मावशींनी मात्र आम्हास या प्रकरणी कधीच दोषी धरले नाही, यातच आम्हास पुरेसे समाधान वाटते. तथापि वंदनीय मावशींचे दृष्टीने उद्‌भवलेल्या या कटुतेचे केव्हानाकेव्हा तरी निराकरण करावे असे आम्हास नेहमीच वाटत असे. प्रस्तुत ग्रंथाचे निमित्ताने अनायसेच तशी उत्तम संधी चालून आल्याने त्यासाठी प्रस्तुत परिच्छेद आम्ही खर्ची घातला. तसे करणे आम्हास आवश्यक वाटले. कारण अपरोक्षपणे का होईना परन्तु वंदनीय मावशींच्या मानसिक त्रासास आम्ही कारणीभूत झालो असल्याने आम्हीही अनुभवित असलेला मानसिक ताण यामुळे कमी झाल्याचे आम्हास समाधान वाटते.

## गृहिणी-विद्यालय

समिती कार्यासंबंधी सर्वसाधारण जनमानसात जी काही बरीवाईट मते निर्माण होतात ती ठिकठिकाणी समिती-स्थानांवर जे दैनंदिन कार्यक्रम नियमित रीत्या होतात त्यावरूनच. म्हणूनच समिती-स्थानावर नियमित उपस्थित राहून तेथील कार्यक्रमात सहभागी होणे हा भाग फार महत्वाचा आहे यांत शंकाच नाही. तथापि देशातील परिस्थिति बदलत असते. तसेच समिती-कार्याचा विस्तार आतापर्यंत बराच वाढल्याने त्यात अनेकविध व्यक्तिगत परिस्थितीतील, विभिन्न रुचींच्या बऱ्याच सेविका आल्या आहेत. शिवाय लग्न होऊन पतिगृही गेल्यानंतर होणारा आमूलाग्र बदल तर जवळजवळ प्रत्येकच तरुण सेविकेच्या वाट्याला येतो. म्हणूनच समिति-स्थाना व्यतिरिक्तही इतर अशी स्थाने निर्माण केली जावीत की जेथे भिन्न रुचीला मानवणारे, समितीच्याच वैचारिक भूमिकेला पोषक असे कार्यक्रम आयोजित केले जावे, या विचाराने या नंतरच्या कालात वंदनीय मावशींनी अनेक योजना हाती घेतल्या असे दिसून येते.

राष्ट्रसेविका म्हणून जसे स्त्रीचे उत्तरदायित्व आहे तसेच गृहिणी म्हणूनही तिच्यावर कुटुंबाची जबाबदारी असते. बदललेल्या सामाजिक परिस्थितीत जुन्या सामाजिक संस्था आणि मूल्ये यांच्यात आमूलाग्र बदल झाल्याने एकत्र कुटुंब पद्धती लोप पावली. त्या ऐवजी विभक्त कुटुंब पद्धति अस्तित्वात आली. शिवाय स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण बरेच वाढले. परिणामतः स्त्रियाही पुरुषांप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या व अल्प प्रमाणावर व्यवसाय करू लागल्या. यामुळे स्त्रियांच्या वैयक्तिक जबाबदारीचे प्रमाण बरेच वाढले. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना अधिक श्रम आणि अधिक वेळ खर्च करणे आवश्यक झाले. अर्थात् भारतीय स्त्री-जीवन बरेच गुंतागुंतीचे बनले.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता बदललेल्या परिस्थितीतही आदर्श गृहिणीची भारतीय परंपरा चालू राहण्यासाठी योग्य अशा संस्कारांची म्हणजेच शिक्षणाची गरज आहे असे विचार वंदनीय मावशींच्या मनात घोळू लागले. भारतीय स्त्री–जीवनाचा अखंड रीत्या विकास होत राहण्यासाठी यापुढे शालेय शिक्षणासोबतच गृहिणी–शिक्षणाचीही व्यवस्था होणे जरूर आहे हा त्यांच्या वरील विचारमंथनाचा परिपाक होय.

अगदी प्रथम सुमारे ३० वर्षांपूर्वी हा विचार मावशींनी विदर्भातील एक विदुषी कै. रमाबाई तांबे यांना बोलून दाखविला. श्रीमती तांबे ह्यांचे पति श्री. तांबे ह्यांनी ब्रिटिश कालात मध्यप्रदेशाचे गव्हर्नरपद भूषविलेले असल्याने सरकार-दरबारी त्यांना बराच मान होता. शिवाय स्वतः श्रीमती रमाबाई अखिल भारतीय महिला परिषदेच्या आघाडीच्या कार्यकर्त्या असल्यामुळेही त्यांना विशेष मान होता. मावशी त्यांना म्हणाल्या, "आजकाल मुलींना शाळेत जे शारिरिक शिक्षण दिले जाते ते मुलांच्या सारखेच असते. आपण महिला परिषदेच्या पुढारी आहात, शिवाय सरकार-दरबारी आपले वजनही आहे. तरी स्त्रीला आरोग्य, शरीरसौष्ठव प्राप्त होईल व शारीरिक शिक्षणाची आणि गृहिणी या नात्याने तिच्या संसारात उपयोगी पडेल अशा प्रायोगिक शिक्षणाची मागणी आपण सरकारकडे करावी. स्त्री-जीवनाची एक महत्त्वाची बाजू–शारिरिक व मानसिक सामर्थ्य वाढविणारे संस्कारयुक्त शिक्षण देणे–राष्ट्रसेविका समितीने सांभाळलीच आहे. गृहिणी शिक्षणाची तितकीच महत्त्वाची बाजू आपण सांभाळावी"

श्रीमती तांबे ह्याना मावशींचे विचार फारसे मानवले नाहीत. यानंतर जरी काही काळ असाच लोटला तरी हा विचार मावशींच्या मनात एकसारखा घोळतच होता. परिणामतः १९४७ मध्ये या संबंधात त्यांनी आणखी एक प्रयत्न केला. त्यावर्षी आपल्या पुणे येथील मुक्कामात तेथील एक तरुण विचारवंत लेखक अमरेंद्र गाडगीळ यांचेशी त्यांनी चर्चा केली. गृहिणी विद्यालयाची संपूर्ण अभ्यासक्रमासहित कल्पना त्यांनी श्रीयुत गाडगीळ यांचेकडून लिहवून घेतली. तिच्या अनेक प्रती तयार करवून त्या स्त्रीविषयक प्रश्नांबद्दल आस्था बाळगणाऱ्या स्त्री–पुरुष समाजधुरीणांकडे पाठविल्या. प्रामुख्याने भारतरत्न कै. अण्णासाहेब कर्वे, कै. डॉ. कृ. श्री म्हस्कर, पुणे येथील शिक्षणशास्त्रपारंगत डॉ. ग. श्री. खैर, कै. कमलाबाई देशपांडे, कै. अनसूयाबाई काळे, मुंबई अनाथ महिलाश्रमाच्या श्रीमती ताराबाई बस्तीकर, त्या काळच्या मध्यप्रदेशाच्या एक मंत्री सौ. प्रभावतीबाई जकातदार आणि दीनदयालजी गुप्ता आदिंकडे अभिप्रायार्थ प्रती पाठविल्या होत्या.

वरीलपैकी कोणाकडूनही समाधानकारक उत्तर आले नाही. डॉ. खैरांचे म्हणणे असे की "जग पुढे चालले आहे. मागे येणार नाही. अनुभवानेच भिंतीवर डोके आपटले म्हणजे ही

मंडळी माघारी येतील. विकसनशीलतेच्या हव्यासापायी जी काही चिरकाल महत्वाची जुनी मूल्ये आहेत त्यांच्याबद्दलही दुर्लक्ष, उदासीनता दिसून येते. सध्या तरी याला उपाय दिसत नाही."

कै. कमलबाई देशपांडे यांनी कळविले की, "पुण्याच्या हुजूरपागेच्या वतीने महिलांसाठी एक स्वतंत्र महाविद्यालय काढले होते. काही वर्षे तुटीत चालवून शेवटी संख्येच्या अभावी ते बंद करावे लागले." या महाविद्यालयाच्या प्राचार्या या नात्याने त्यांनी ही माहिती कळविली होती.

अशा प्रकारें जवळजवळ सर्वांनीच निराशेचा सूर काढला होता. तरीही त्यावेळी वर्धेच्या "गांधी मेमोरिअल लेप्रसी फाऊंडेशन" या संस्थेचे सूत्रधार असलेले जगद्विख्यात कुष्ठरोग तज्ञ डॉ. रा. वि. वारदेकर आणि त्यांच्या पत्नी डॉ. सौ. प्रमिला वारदेकर यांना मावशींनी आपली योजना दाखविली. उभयतांना ती फारच पसंत पडली. डॉ. वारदेकरांनी विचार करून आपले मत दिले. शिवाय त्यांनी असे सुचविले की "इतरांच्या सम्मतीची वाट पहाण्यात अर्थ नाही. तुमच्यामागे तरुण समिती सेविकांचा मोठा वर्ग आहेच. तुम्ही दरवर्षी ठिकठिकाणी महिनाभराचे उन्हाळी वर्ग आयोजित करताच. मग एखाद्या वर्षी या वर्गातच गृहिणी शिक्षणाचा प्रयोग का करून पहात नाही ?"

डॉ. वारदेकरांची कल्पना जरी मावशींना विचार करण्यायोग्य वाटली तरी गृहिणी शिक्षण योजना समाजाला अगदी नवीन असल्यामुळे प्रथम समाजाला तिचा परिचय होणे जरूर आहे असे वाटून मावशींनी एक स्त्री–जीवन विकास परिषद भरविण्याची कल्पना त्यांच्या प्रमुख सहकारी मुंबई येथील सौ. बकुल देवकुळे यांचेसमोर मांडली.

विवक्षित प्रकारच्या कार्यासाठी योग्य अशा व्यक्तीची योजना करणे ही वंदनीय मावशींची विशेषता आहे. मावशींच्या अपेक्षेप्रमाणे सौ. बकुलताईंना परिषदेची कल्पना आवडली एवढेच नव्हे तर इतरांनी व विशेषतः सौ. बकुलताईंचे पति श्री. जयन्तराव देवकुळे यांनीही ही कल्पना उचलून धरली.

मुंबई येथे राष्ट्र-सेविका समितीच्या तत्त्वावधनाखाली स्त्री-जीवन विकास परिषदेचे अधिवेशन शक्यतो लवकर आमंत्रित करण्याची संपूर्ण जबाबदारी मावशींनी सौ. बकुलताईंवर टाकली. याच परिषदेच्या सुमारास राष्ट्र-सेविका समितीची तत्त्वप्रणाली समाजासमोर ठेवण्यासाठी एखाद्या नियतकालिकाचे प्रकाशन सुरु करावे ही कल्पनाही प्रत्यक्षात उतरविण्याचे मावशींनी ठरविले.

१९५३ च्या मे महिन्यात मुंबई येथे स्त्री-जीवन विकास परिषद आणि त्याच

वेळी 'सेविका' या वर्षिकाचे (पुढे 'राष्ट्र-सेविका' असे नावात स्थित्यन्तर करण्यात आले.) प्रकाशन सुरू करावे असे ठरले. स्त्री जीवनाचा सर्वांगीण विचार व्हावा म्हणून राष्ट्रीय दृष्टी बाळगणाऱ्या असंख्य समितीय भगिनींशिवाय, स्त्री जीवन आणि शिक्षण तज्ञ महर्षी धोंडो केशव कर्वे, स्त्री स्वास्थ्यतज्ञ डॉ. वि. कृ. म्हसकर आदि विषयांशी संबंधित अशा जाणकार स्त्री-पुरुषांनी या परिषेदत एकत्र येऊन मनमोकळी चर्चा करावी व निर्णय घ्यावे अशी योजना आखली गेली.

परिषदेचे अध्यक्षस्थान अण्णासाहेब कर्वे यांनी स्वीकारावे म्हणून त्यांना विनंती करण्यासाठी मावशी व सौ. बकुलताई त्यांचेकडे गेल्या. त्यावेळी मावशी व अण्णासाहेब यांच्यात झालेल्या संभाषणाचा गोषवारा असा–

**मावशी –** परिषदेस आपले आशिर्वाद आहेतच. तथापि आपणच तिचे अध्यक्षस्थान भूषवून मार्गदर्शन करावे अशी विनंती करण्यासाठी मी आले आहे.

**अण्णासाहेब –** माझे आशिर्वाद तर आहेतच. आपण हे कार्य हाती घेतले याने कमालीचा आनंद झाला. तथापि अध्यक्षपदासाठी आपण इतर कोणत्याही व्यक्तीची निवड करावी.

**मावशी –** आपण का बरं येऊ शकणार नाही ? अडचण काय आहे ?

**अण्णासाहेब –** सध्या चालू असलेल्या माझ्या कामाकडे पाहून लोक मला यशस्वी समजतात, माझा आदर करतात आणि मला बोलावतात. परन्तु मी स्वतःला यशस्वी समजत नाही. आमच्या संस्थेचा वाढलेला व्याप, भव्य इमारती व अनेक स्त्रिया आता पदवीधर होत आहेत हे पाहून लोकांना तसे वाटते. परन्तु स्त्रियांना योग्य असा जो 'गृहितागमा' शिक्षणक्रम मी योजला त्याला पूर्णांशाने शासकीय वा जनतेची मान्यता कधीच मिळाली नाही. 'गृहितागमाला' नेहमीच बी. ए. पेक्षा कमी लेखण्यात आले, आणि नोकऱ्या-आदि क्षेत्रात त्याचा दर्जा कमी समजल्या गेला. 'गृहितागमा' पदवी प्राप्त करण्यात स्त्रियांना कमीपणा वाटू लागला. म्हणून नाइलाजाने जनतेच्या आग्रहास्तव मुंबई विश्वविद्यालयातील बी. ए चा अभ्यासक्रम माझ्या महाविद्यालयातही चालू करावा लागला.

यामुळे माझ्या मूळ विचाराला धक्का बसला आणि मी स्वतःला अयशस्वी समजू लागलो.

**मावशी –** आपला कटु अनुभव असला तरी अत्यंत मार्गदर्शक आहे. आणि आम्हाला आपल्या मार्गदर्शनाचीच आवश्यकता आहे.

**अण्णासाहेब –** आपल्या कार्यामुळे मला एक मोटे समाधान लाभले ते हे

की ५० वर्षापूर्वी स्त्रियांना कोणते शिक्षण द्यावे हे आम्हास बोलावे लागले. आता त्यांना स्वतःस याची जाणीव होऊन स्त्रियाच या कामी पुढाकार घेत आहेत.

आपला आग्रह मला मोडवत नाही. मी आपल्या निमंत्रणाचा स्वीकार करतो. ”

गुरुवर्य अण्णासाहेब कर्व्यांप्रमाणेच डॉ. कमलाबाई देशपांडे, डॉ. कृ. श्री. म्हसकर आदि तज्ज्ञ महाभागांनी मावशींच्या विनंतीचा स्वीकार केल्यानंतर सौ. बकुलताई लगेच कामास लागल्या. मुंबईच्या माटुंगा विभागातील पोद्दार कॉलेजच्या आवारात दि. २ ते ४ मे १९५३ या परिषदेच्या तारखा निश्चित करण्यात आल्या.

सौ. बकुलताईंनी परिषदेचे हेतू आणि कार्यक्रम या संबंधी एक पत्रक प्रकाशित करून त्याच्या प्रति सर्व महाराष्ट्रभर प्रसारित केल्या. ते पत्रक येणे प्रमाणे :

सविनय नमस्कार वि. वि.

येत्या २, ३ व ४ मे या दिवशी मुंबई येथे राष्ट्रसेविका समिति, (वर्धा) या संघटनेच्या विद्यमाने ‘ स्त्री-जीवन विकास परिषदेचे ’ पहिले अधिवेशन भरणार आहे. आजच्या स्त्रीला आपली कौटुंबिक आणि सामाजिक कर्तव्ये पार पाडणे सुलभ व्हावे आणि जबाबदार सामाजिक घटक या नात्याने ती अधिक कार्यक्षम व्हावी यासाठी तिच्यापुढील विविध प्रश्न आणि अडचणी यांचा परामर्ष घेणे आणि जीवनविकासाच्या दृष्टीने तिच्या शिक्षणाची योजना आखून ती हाती घेणे हा या परिषदेचा हेतु आहे. कोणातरी राजकीय पंथाच्या वा पक्षाच्या दृष्टीकोणातून प्रचलित प्रश्नांवर मतनिदर्शक ठराव करण्यापेक्षा आपली मर्यादा आखून घेऊन प्रत्यक्ष कामास प्रारंभ करावा अशी परिषदेच्या प्रवर्तकांची भूमिका आहे. या दृष्टीने परिषदेच्या कार्यकर्त्यांनी ‘ गृहिणी महाविद्यालय ’ या नावाने एक शिक्षणयोजना तयार केलेली असून या योजनेवर चर्चा व्हावी आणि तज्ज्ञांकडून तिचे अंतिम स्वरुप निश्चित व्हावे अशी अपेक्षा आहे. या शिक्षणयोजनेचा आराखडा संदर्भासाठी सोबत ठेवलेला आहे. आपण तो काळजीपूर्वक वाचून पाहावा; आणि त्याला प्रसिद्धी द्यावी, व शक्य ते उपयुक्त वैचारिक मार्गदर्शन करावे अशी विनंती आहे.

या परिषदेस आपण आपला प्रतिनिधी पाठविल्यास आम्ही आपले आभारी होऊ. स्त्री-शिक्षणाच्या क्षेत्रात सातत्याने कार्य करीत असलेल्या विचारवन्तांची व्याख्याने परिषदेच्या वतीने व्हावयाची आहेत. विशेषतः महर्षि अण्णासाहेब कर्वे, डॉ. कृ. श्री. म्हसकर, डॉ. कमलाबाई देशपांडे यांचे सहकार्य परिषदेला लाभलेले आहे. आपले सहकार्य असावे.

याशिवाय एक पत्रकार परिषद आयोजित करूनही परिषदेच्या आयोजनाला भरपूर प्रसिद्धी देण्यात आली. त्यानुसार दि. २९ एप्रिल १९५३ च्या इतर अनेक वृत्तपत्रांप्रमाणेच मुंबईच्या दैनिक नवशक्तीमध्ये जो वृत्तांत प्रकाशित झाला तो येणे प्रमाणे--

मुंबई, मंगळवार – राष्ट्र-सेविका समिती या संस्थेतर्फे ता. २ मे पासून ४ मे पर्यन्त मुंबईत पोद्दार कॉलेज समोरील मैदानात स्त्री-जीवन विकास परिषद भरणार आहे. परिषदेच्या अध्यक्षपदी श्रीमती लक्ष्मीबाई केळकर यांची नियुक्ती झाली आहे.

**हक्काबरोबर कर्तव्ये**– या परिषदेबद्दल आज वार्ताहरांना मुलाखत देताना या परिषदेच्या चिटणीस सौ. बकुलताई देवकुळे व श्रीमती इंदूताई देव यांनी सांगितले की, समाजात स्त्रियांचे नेमके स्थान काय, याबद्दल सध्या बराच गोंधळ माजला आहे. पण स्त्रीचे मुख्य कार्य उत्तम गृहिणीत्व हे आहे. या तत्त्वाचा आम्हाला प्रचार करावयाचा आहे. सध्या स्त्रियांच्या हक्काबद्दल खूप बोलले जाते, पण हक्काबरोबर कर्तव्येही येतात, याचीही आम्हाला स्त्री-वर्गाला जाणीव करून द्यावयाची आहे.

**गृहिणी विद्यापीठ**– महिला विद्यापीठ स्थापन करताना महर्षि कर्वे यांनी ठेवलेला हेतु सफल झालेला नाही असे सांगून सौ. देवकुळे म्हणाल्या की, स्त्रियांना त्यांची पुरुषांपेक्षा निराळी असलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण देण्यासाठी 'गृहिणी महाविद्यालय' नावाचे विद्यापीठ काढता येईल काय यासंबंधी या परिषदेत विचार होईल.

**प्रदर्शन**– घरची कामे करून संसाराला आर्थिक दृष्टीने हातभार लावण्यासाठी स्त्रियांना काय काय करता येईल, याचे दिग्दर्शन करणारे एक प्रदर्शनही परिषदेच्या वेळी भरविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

परिषदेचा संक्षिप्त वृत्तांत येणेप्रमाणे— स्वातंत्र्यपूर्वकालातील स्त्रियांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेऊन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांचे कार्य कसे व कोणत्या प्रकारचे असावे ह्याचा विचार करण्याकरता मुंबईस स्त्री-जीवन विकास परिषदेचे पहिले अधिवेशन बोलावण्यात आले होते. हे अधिवेशन सर्व दृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असेच झाले. उद्घाटन गुरुवर्य अण्णासाहेब कर्वे ह्यांच्या हस्ते झाले.

परिषदेबद्दल समाधान व्यक्त करताना महर्षि अण्णासाहेब कर्वे म्हणाले, "५० वर्षापूर्वीच स्त्रियांच्या शिक्षणाची जरूरी भासली. पण ते शिक्षण कोणते असावे ह्याविषयी आम्ही पुरुषच विचार, खल करीत होतो. परन्तु आज शिक्षण कोणते व कशाप्रकारे दिले जावे ह्यासंबंधी स्त्रियाच विचार करू लागल्या आहेत, ही अत्यंत आनंदाची व प्रगतीची गोष्ट आहे."

अधिवेशनाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे अधिवेशनात प्राचीन कालापासून अद्यावत कालापर्यन्तच्या अनेक कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ह्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन कु. प्रभावतीदेवी यांचे हस्ते झाले. प्रदर्शनातील कलात्मकतेचा गौरव करताना त्या म्हणाल्या, " कलात्मकता जीवनाला उपयुक्त अशी म्हणजे आर्थिक दृष्ट्या सहाय्यक व्हावी. "

ह्याच वेळी ' सेविका ' वार्षिकाच्या पहिल्या अंकाचा प्रकाशन समारंभ श्री. बाळशास्त्री हरदास ह्यांचे हस्ते झाला.

दि. ४ मे रोजी सकाळी ८ वाजता स्त्री-शिक्षणात कोणते फेरबदल व्हावे किंवा कोणत्या सुधारणा व्हाव्या ह्या दृष्टीने सर्वांगपरिपूर्ण विचार करुन श्री. लक्ष्मीबाई केळकर व श्री. अमरेन्द्र गाडगीळ ह्यांनी तयार केलेली गृहिणींना उपयुक्त अशी स्त्री-शिक्षण योजना चर्चेकरिता मांडली. ह्या चर्चेत डॉ. म्हसकर, श्री. कमलाबाई देशपांडे सौ. यमुनाबाई हिर्लेकर, श्री. जोशी, श्री. लक्ष्मीबाई केळकर, श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कु. बस्तीकर, सेविकेच्या संपादिका सौ. कुसुम साठे, सौ इंदुताई गोखले, इंदुताई अय्यर व सौ. इंदुताई गोखले इ. अनेक व्यक्तींनी भाग घेतला. ह्या चर्चेतून ही योजना अतिशय उपयुक्त व व्यवहार्य असल्याबद्दलचे प्रत्येकाने मतप्रदर्शन केले. ही योजना अंमलात आणण्याच्या दृष्टीने उन्हाळयातील सुट्टीच्या अवधीत ह्या शिक्षणाचे वर्ग सुरु करावेत आणि ह्या वर्गाच्या अनुभवातूनच पुढे निश्चित असा मार्ग आखावा असे ठरले.

त्यानंतर दि. ४ लाच दुपारी अनेक प्रस्ताव संमत करण्यात आले. ते खालील प्रमाणे –

१) गृहिणी विद्यालयाचे वर्ग सुट्टीच्या अवधीत चालवावे.

२) आमदार केसकरांनी रेडिओवरील सिनेसंगीतावर बंदी घालून शास्त्रीय संगीतास प्रोत्साहन दिल्याबद्दल अभिनंदन.

३) शाळांतून धार्मिक शिक्षण दिले जावे.

४) आपल्या देशात बरेच वेळा अचानक धर्मांतरे झालेली दिसतात. त्याची नोंद सरकारने ठेवावी म्हणजे जबरदस्तीने अगर आमिषाने होणाऱ्या धर्मान्तराला आळा बसेल.

ह्यानंतर सायंकाळी करमणुकीचे कार्यक्रम झाले. ह्या कार्यक्रमात सौ. मालती जोशी ह्यांनी लिहिलेल्या ' अहल्यादेवी ' या संगीत मूकनाट्याचा प्रयोग झाला. कल्याण येथील भगिनींच्या भजनाचा आकर्षक असा कार्यक्रम या नंतर झाला. आपले जुने खेळ

तालबद्ध व सांघिक रीत्या कसे खेळता येतात त्याचे प्रात्यक्षिक छोट्या मुलींनी अतिशय यशस्वी रितीने करून दाखविले. ह्या सर्व प्राचीन खेळांमुळे स्त्रीला लहानपणापासून सर्व अवयवांना व्यायाम कसा होऊ शकतो, हेही समजावून देण्यात आले. तसेच मोठेपणी थोड्या जागेत परन्तु शरीराला आवश्यक व उपयुक्त व्यायाम देणारी आसने सांघिक रीत्या करून दाखविण्यात आली.

दि. ५–५–५३ रोजी स्त्री-जीवन विकास परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचा समारोप वं. लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर यांनी केला.

या अधिवेशनानंतर पुढील वर्षापासून लगेच गृहिणी विद्यालयाचे ग्रीष्मकालीन वर्ग सुरु करण्यात आले. या विद्यालयाची रूपरेषा खालीलप्रमाणे आखण्यात आली.

**विद्यालयाचा उद्देश**– आज स्त्रियांना मुख्यतः शाळा–कॉलेजांमधून मिळत असलेले शिक्षण त्यांच्या भावी सौख्याच्या दृष्टीने असमाधानकारक आहे. तेव्हा स्त्रियांना आपले भावी आयुष्य यशस्वी करण्याचे दृष्टीने काही विशिष्ट विषयांचे शिक्षण देणे, हाच विद्यालयाचा उद्देश आहे.

**संयोजक मंडळ**– विद्यालयाच्या संयोजक मंडळात श्री. लक्ष्मीबाई केळकर वर्धा, सौ. इंदिराबाई दिवेकर कऱ्हाड, सौ. कमलाबाई नागले वर्धा व सौ. बकुलताई देवकुळे मुंबई, ही मंडळी योजली गेली.

व्यवस्थापक मंडळात कु. इंदुताई देव, B. A B. T., सोलापूर या प्रमुख होत्या.

**विद्यालयाचे स्वरूप**- विद्यालयाच्या पहिल्या तीन वर्षांचे स्वरूप सुट्टीतील वर्ग ( Vacational Classes ) या प्रमाणे राहिले. पहिली तीन वर्षे मे महिन्यात वर्ग घेतले गेले व पुढे दहा महिने ट्यूटोरियल्सच्या स्वरूपात विद्यार्थीनींनी आपला अभ्यास चालू ठेवला. मे महिन्यातील अभ्यास व दहा महिन्यातील ट्यूटोरियल्स या मधील प्रगतीवरून विद्यार्थिनींना प्रशस्तिपत्रक दिले गेले.

तीन वर्षातील वर्गांच्या अनुभवानंतर ही योजना नियमित विद्यालयाच्या स्वरूपात पुढे आणली गेली. विद्यालयाचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा ठरला.

शारीरिक, बौद्धिक, मानसिक व व्यावसायिक शिक्षण मिळून भावी आयुष्यात स्त्रीला यशस्वी रितीने जगता यावे, या उद्देशाने पहिल्या वर्षाकरिता खालील विषय निवडले. तसेच परिषदेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन विनामूल्य मदत करणाऱ्या परंतु त्या त्या विषयातील अधिकाधिक तज्ज्ञ अशाच शिक्षिकांची आरंभी विद्यालयाकरिता निवड करण्यात आली. त्यांची नावे येणेप्रमाणे—

आरोग्यशास्त्र- सौ. गीतादेवी केतकर, B. Sc., B. T. ( खामगांव ); बाल-मानसशास्त्र- सौ. सिंधूताई नावलेकर, M. A. B. T. ( नागपूर ); शिवण- सौ. आक्का आठवले, शिवणकला - प्रविण ( कऱ्हाड ); हिंदी- सौ. सुशिलाताई पुरोहित, कोविद-शिक्षक सनद ( मिरज ); जागतिक घडामोडी- कु. इंदुताई देव, B.A.B.T. ( सोलापूर ); व्यायाम- कु. चंदूताई साठे, D. P. Ed. (नाशिक), सौ. कुमुदताई आपटे, D. P. Ed. ( मुंबई ), सौ. इंदुताई भावे ( नागपूर ); संस्कृत- सौ. इंदुताई भावे ( नागपूर ).

**विद्यार्थिनींची शैक्षणिक लायकी**- विद्यालयात प्रवेश मिळविण्याकरिता फायनलला बसलेली व फायनल पास अगर नापास व मॅट्रिकला बसलेली व मॅट्रिक पास अगर नापास ही विद्यार्थिनींची शैक्षणिक लायकी ठरविण्यात आली.

कमीत कमी १५ वर्षे पूर्ण वय असलेल्या विद्यार्थिनीलाच विद्यालयात प्रवेश मिळतो.

**अभ्यासक्रम**:-

गृहिणी विद्यालयाचा अभ्यासक्रम सर्व भाषा भगिनींना सहजपणे परिचित व्हावा म्हणून तो हिंदीतून प्रकाशित करण्यात आला. तो जसाच्या तसा खाली देत आहे :

**विषय**:-

(१) **व्यायाम**:-विशेष रूप से स्त्रियों के लिये नियमित व्यायाम की तीव्र आवश्यकता है। आजका जमाना ऐसा है कि जिसमें हरेक स्त्री को अपने स्वास्थ्य की ओर अधिक ध्यान देना चाहिये। व्यायाम का महत्व मालूम होते हुये भी बहुतसी सुशिक्षित स्त्रियाँ नियमित व्यायाम नहीं लेती। व्यायाम का मतलब केवल व्यायाम के प्रकारों से नहीं है। आधुनिक तथा पुराने ढंग के खेलों का भी इसमें बड़ा हाथ है।

तैरना, साइकिल पर बैठना, राइफल चलाना आदि जो जो व्यायाम की कक्षा में आते हैं, उनको अपनाना हरेक स्त्री का प्रमुख काम है।

बहुधा ऐसी शिकायत पाई जाती है कि आज की परिस्थिति ही ऐसी है कि जिसमें व्यायाम आदि बातों से दूर रहना पड़ता है। एक तो जगह की कमी, दूसरी बात है अनाज की कमी तथा अनाज में जीवनसत्वों का अभाव। परन्तु जहाँ तक हो सके घर की तथा बाहर की परिस्थिति का मेल करके मार्ग निकालना और परिवार का स्वास्थ्य ठीक रखने का प्रयत्न करना चाहिये।

(२) **आहारशास्त्र**: - इस शास्त्र की पूरी जिम्मेदारी हमेशा स्त्री पर पड़ती है। अतः हरेक स्त्री को जीवनसत्व तथा खाद्यपदार्थों का महत्व मालूम होना चाहिये। आहार में बदल करना, विशेष कर के बालकों के आहार की व्यवस्था जो स्त्री जानती है

वही अपने परिवार का स्वास्थ्य ठीक रख सकेगी। परिवार का स्वास्थ्य ठीक रखने के लिये स्त्री को मामूली बीमारी के नाम तथा उपाय, मरीजों की स्वच्छता, घरेलू दवाइयाँ, होमिओपॅथिक दवाइयाँ, साथ साथ बच्चों की बीमारी तथा उनकी दवाइयाँ (सर्वसाधारण) बच्चों की योग्य देखभाल, प्रसूतीशास्त्र, संततीनियोजन आदि बातें मालूम होना परमावश्यक है।

(३) **मानसशास्त्र:**—परिवार का मानसिक स्वास्थ्य ठीक रखने की दृष्टी से स्त्री को मानसशास्त्र का ज्ञान होना जरूरी है। पुरुषों को जीवन में कठिन से कठिन मुसीबतों का सामना करना पडता है और जिससे पुरुष की मनोवृत्ति पर एक प्रकार का अनिष्ट परिणाम होता है। पुरुष हमेशा त्रस्त रहता है। ऐसी हालत में उसकी मनोवृत्ति का बारीकी से विचार करके कभी सलाहकार, कभी उपदेशक, तो कभी प्रेममूर्ति बनकर स्त्री पुरुषों का मानसिक स्वास्थ्य ठीक रखने का प्रयत्न करेगी तो बहुतसा पारिवारिक असंतोष नष्ट होगा। बाल–मानसशास्त्र के ज्ञान की तो इतनी आवश्यकता है जितनी एक बच्चे के लिये दूध की। बचपन में बालकों की स्वाभाविक प्रवृत्तियों का निरीक्षण करना, उनकी इच्छा, आकांक्षाओं को परखना तथा उनको योग्य मार्गदर्शन करके उनका भावी जीवन सुसंस्कारक्षम बनाने में सहाय्यता करना इसका माता के नाते स्त्री पर बडा उत्तरदायित्व आ पडता है। केवल माता अशिक्षित होने की वजह से बुद्धिमान तथा चालाक बालक भी बुद्धिहीन तथा मन्द हो जाते हैं। अतः प्रौढ तथा बाल मनोविज्ञान के अभ्यास की आवश्यकता है।

(४) **सौंदर्यशास्त्र:** – सौंदर्यशास्त्र पर विवेचन करने से पहले यह कहना अनुचित न होगा कि आजकल सौंदर्य की परिभाषा कुछ बदल गई है। उत्तानता से परिपूर्ण तडक भडक ऐसे सौंदर्य का प्रचार आज दिखाई देता है। सुन्दरता की पहली सीढी है शरीर-सौष्ठव और अच्छा स्वास्थ्य। अगर ये दोनो चीजें हरेक स्त्री के पास होगी तो बाहरी तथा कृत्रिम साधनों से सुन्दर बनने की आवश्यकता न पडेगी। हमारी वेषभूषा ऐसी हो कि जिसमें सादगी, हमारा आर्यत्व तथा संस्कृति का दर्शन हो। जब पारिवारिक सौंदर्य नष्ट होता है तभी पुरुष की वृत्ति बाहरी आकर्षण की ओर जाती है। अतः इस धोखे से बचना स्त्री का महत्त्वपूर्ण काम है।

थोडे में कहा जाय तो पर पुरुष की दृष्टि पवित्र रखने का सामर्थ्य जिस सौंदर्य में हो उसी सौंदर्य को अपनाना चाहिये। अतः सौंदर्यशास्त्र का अभ्यास भी होना चाहिए।

(५) **व्यावहारिक बचत:**—आजकल की महँगाई में तो बचत करना जरूरी बात है। आधुनिक स्त्री की जरूरतें इतनी बढ़ गई हैं कि वह परिवार में एक भारभूत हो बैठी है। आर्थिक स्थिति इन जरुरतों को पूरा नहीं कर पाती हैं इसलिए अविवाहित रहने की ओर ज्यादा झुकाव मालूम पड़ता है। इससे बचने के लिए स्त्रियों को चाहिए कि

वे अपना खर्चा जितना हो सके, कम करे। पति की कमाई में खर्चा चलाने के लिए घरेलू अन्दाजपत्रक बनाने का अभ्यास करना चाहिए। साथ साथ, बच्चों के कपड़े सीना, इस्त्री करना आदि काम अगर स्त्री स्वयं घर में करे तो थोड़ी प्राप्ती में भी वह अपना पारिवारिक जीवन संतोष और समाधान से व्यतीत करेगी।

(६) **दैनिक प्रश्नों से संबंध** (करंट टॉपिक्स): –दुनिया के हरेक कोने में क्या चल रहा है इसके विषय में वृत्तपत्र, मासिक पत्रिका जैसे अनेक साधनों से जानकारी प्राप्त करना आधुनिक स्त्री का पहला काम है, क्योंकि इन बातों का संबंध उसके दैनिक जीवन के साथ भी होता है। इससे समस्त परिवार में एक प्रकार का सुख निर्माण होगा। स्त्रियाँ और लोगों के साथ बौद्धिक आनन्द प्राप्त कर सकेंगी। समाज और राष्ट्र की दृष्टी से अपनी जिम्मेदारियों का ज्ञान भी इससे जरूर हो सकेगा। बालकों को शिक्षा देने की दृष्टी से दुनिया का ज्ञान होना अत्यंत जरूरी है।

(७) **पाकशास्त्र:**–बड़े बड़े शहरों में होटलों में खाने की प्रवृत्ति ज्यादा दिखाई देती है। केवल चैन के नाम पर खानेवाले लोग भी बहुत हैं। इसमें पैसे का अपव्यय होता है और बाहरकी चीजें खाने से स्वास्थ्य भी बिगड जाता है। घर के पुरुष को अगर स्वादिष्ट, पौष्टिक चीजें खाने को मिलेगी तो उसे होटल के पदार्थों से प्यार न होगा। इसमें पैसे की भी बचत होगी। इसलिए पाकशास्त्र में प्रवीणता प्राप्त करना आधुनिक नारी का पहला काम है।

पाकशास्त्र में अनुभूति का महत्त्व अधिक है। जो चीज हम बनाते हैं उसकी कृति पढ़कर हम उस चीज को नहीं बना सकते। हमें प्रयोग करके देखना चाहिये। इसलिये पाकशास्त्र में प्रत्यक्ष पद्धति (प्रॅक्टिकल) का महत्त्व अधिक है।

(८) **गृहव्यवस्था:**–गृहव्यवस्था इस विषय में अनेक विषयों का समावेश होता है। गृह या घर की परिभाषा केवल चार दिवारों तक सीमित नहीं है। घर में लोग जो जो व्यवहार करते हैं उसकी व्यवस्था ही गृहव्यवस्था कहलायी जायेगी।

घर के कमरों को सजाना तथा घर को आकर्षक बनाना गृहव्यवस्था का प्रमुख अङ्ग है। स्त्री को अपनी कला का उपयोग करने का मौका गृहव्यवस्था में अच्छी तरह मिलता है। हस्तकला, चित्रकला, घर की सभी चीजों की आकर्षक रचना गृहसौंदर्य को बढ़ाती है।

(९) **सामान्यज्ञान:**–समाज के जिन जिन भागों के साथ हमारा अधिक संबंध होता है उनके विषय में थोडीबहुत जानकारी प्राप्त करना आवश्यक है। जैसे, पोस्ट ऑफीस, टेलिग्राफ ऑफीस, रेल्वे के संबंध में, रेशनिंग के फॉर्म भरना, मनिऑर्डर करना, मंत्रीमंडल, राज्यपद्धति आदि।

(१०) **नागरिकशास्त्रः**—सामाजिक तथा राष्ट्रीय जिम्मेदारी की सीख नागरिकशास्त्र में दी जाती है अतः समाज तथा राष्ट्र के प्रती अपना क्या कर्तव्य है इसको बताने में नागरिकशास्त्र निःसंशय सहाय्यक होगा।

(११) **भाषाशास्त्रः**—राष्ट्रभाषा के नाते हिन्दी का, मातृभाषा के नाते मातृभाषा का (जो होगी) और अबतक दुनिया का बहुतसा कामकाज अंग्रेजी में चलता है इसलिए अंग्रेजी इन तीनों भाषाओं को सीखना आवश्यक है। विभिन्न भाषा के क्षेत्र में बोलते समय आनेवाली मुसीबतें इससे दूर होगी।

(१२) **कलाः**—वक्तृत्व, संगीत, नृत्य, वादन इन प्रमुख कलाओं के समावेश के साथ साथ जिस स्त्री की प्रवृत्ति जिस कला की ओर होगी उसकी शिक्षा का प्रबंध जहाँतक हो सके किया जाय।

(१३) **स्वतंत्र उद्योगः**—टंकलेखन (टाइपराइटिंग), जमाखर्च रखना, क्रयविक्रय, लघुलेखन (शॉर्टहॅंड) आदि के बारे में सामान्यज्ञान प्राप्त कर किसी एक विषय में इतनी प्रवीणता प्राप्त हो सके कि आपद्काल में स्त्री उसीके द्वारा अपना तथा परिवार का गुजारा कर सके।

उपरनिर्दिष्ट विषय सिखाने के लिए महाविद्यालय की कालमर्यादा तीन साल की रखी जाय तो स्त्रियों पर अधिक भार न पडेगा। मैट्रिक उत्तीर्ण या अनुत्तीर्ण विद्यार्थिनियों को ही इसमें प्रवेश दिया जाय।

गृहिणी विद्यालयाचा पहिला ग्रीष्मकालीन वर्ग १९५४ साली पुण्याला एस. पी. कॉलेजच्या वसतीगृहात घेतला. या सर्व वर्गाचे संचालन सौ. इंदुताई देव (कल्याणसुंदरम) यांनी केले होते.

उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून सौ. मालतीबाई बेडेकर आल्या होत्या. त्यांनी आपल्या भाषणात सुगृहिणी होण्यासाठी ज्याप्रमाणे विद्यालयाची आवश्यकता आहे त्याप्रमाणे पुरुषांनाही सद्‌गृहस्थ होण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, असे सांगितले. समारोप प्रसंगी सांगलीहून सौ. सरोजिनीबाई कमतनूरकर या आल्या होत्या.

दुसरा वर्ग मुंबई येथे हिंदु कॉलनीतील श्री. राजा छत्रपति शिवाजी विद्यालय (किंग जॉर्ज हायस्कूल) या ठिकाणी झाला. यावेळी विद्यालयाची जबाबदारी मुंबई येथील सौ. इंदूताई गोखले यांनी घेतली होती. समारोपाला यमुनाताई हिर्लेकर आल्या होत्या. तेव्हापासून त्या गृहिणी विद्यालयाच्या सल्लागार मंडळांत आहेत.

तिसरा वर्ग १९५६ साली पुण्याला हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था एरंडवणे यांच्या इमारतीत झाला याही वेळी संचालन सौ. इंदूताई गोखले यांनीच केले. सर्व विषय शिक-

विण्यासाठी एक महिना समितीच्या सेविका, वेगवेगळे काम असूनही, आपला संपूर्ण वेळ देत असत. त्यांत सौ. लीलाताई वाकणकर उज्जैन, प्रा. सिंधुताई नावलेकर नागपूर, सौ. कुमुदताई केतकर धुळे या प्रमुख होत. हस्तव्यवसाय विषय कै. काकू रानडे यांनी तिन्ही वेळी सांभाळला होता.

गृहिणी शिक्षणक्रमाचे ग्रीष्मकालीन वर्ग घेतल्यानंतर झालेल्या कार्याचा आढावा आणि पुढे चालना मिळण्याचे दृष्टीने जीवन विकास परिषदेचे दुसरे अधिवेशन १९५७ च्या मे मध्ये पुणे येथे आयोजित करण्यात आले.

या परिषदेचा मुंबईच्या' दैनिक मराठा' ने जो वृतांत प्रकाशित केला तो येणे प्रमाणे.

" हल्ली स्त्रियांकरितां स्वतंत्र विद्यापीठ असतांनाही अनेक मुली फर्ग्युसन कॉलेजमध्ये कां जातात याचा विचार होणें आवश्यक आहे," अशा आशयाचे उद्‌गार सौ. इंदिराबाई देवधर यांनी येथे काल स्त्री-जीवन विकास परिषदेच्या द्वितीय अधिवेशनाच्या उद्‌घाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना काढले. ही परिषद राष्ट्रसेविका समितीच्यातर्फे भरली असून तिला जोडून स्त्री-जीवन विषयक प्रदर्शनही भरविण्यात आलेले आहे.

रा. से. समितीच्या प्रमुख संचालिका श्रीमती लक्ष्मीबाई ऊर्फ मावशी केळकर व सौ. ताई आपटे, पुणे शाखा संचालिका, यांनी प्रास्ताविक भाषणें करून ही परिषद, हें प्रदर्शन व समितीतर्फे चालविण्यात येत असलेले गृहिणी विद्यालय यांची भूमिका विषद केली.

**प्रदर्शनाचे उद्‌घाटन**

श्रीमती केळकर आपल्या भाषणात म्हणाल्या, स्त्री-जीवनाच्या विकासासाठी राजकीय शैक्षणिक व शारीरिक दृष्ट्या विचार करणाऱ्या समित्यांनी एकत्रित येऊन विचार केला पाहिजे."

प्रदर्शनाचे उद्‌घाटन आमदार श्री. ज. श्री. टिळक यांच्या हस्ते झाले. रा. से. समितीच्या मुंबईच्या प्रमुख कार्यकर्त्या सौ. बकुळताई देवकुळे यांनी आमदार श्री. टिळक यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी भाषण करताना श्री टिळक म्हणाले की 'अशी प्रदर्शने ही मनावर योग्य ते संस्कारे घडविण्यासाठी उत्तम साधने आहेत.' हें प्रदर्शन २२ मे पर्यंत खुले राहणार आहे.

१९५८ पासून सौ. बकुलताई देवकुळे यांच्या विश्वस्ततेखाली ३ वर्षाच्या अभ्यासक्रम असलेल्या गृहिणी विद्यालयाची वर्षभराची सत्रे सुरू करण्यात आली. संस्थेच्या पुढे दिलेल्या अहवालावरून सुरवातीपासून ६६ पर्यंतच्या प्रगतीची समर्पक कल्पना येण्या-सारखी आहे.

" विद्यालयाच्या कार्यकर्त्यांनी आपली प्रगतीची वाटचाल नेटाने चालू ठेवली. त्यामुळे Teacher's Training Diploma in Home Science हा

आणखी एक वर्षाचा नवीन शिक्षणक्रम विद्यालयाने चालू केला. हाही शिक्षणक्रम सरकारमान्य असून पहिलीच पाच जणींची तुकडी १९६५-६६ च्या परीक्षेस गेली.

या शिक्षणक्रमातही एस. टी. सी. प्रमाणे शालेय विद्यार्थ्यांवर पाठ घ्यावयाचे असतात. इंडीयन एज्युकेशन सोसायटीज हायस्कूल फॉर गर्लस दादर, शारदाश्रम गर्लस् हायस्कूल व एस. एन्. डी. टी. कन्या शाळा मुंबई या तिन्ही शाळांच्या प्रमुखांनी त्यांच्या शाळेत पाठ घेण्यास विद्यालयाच्या विद्यार्थीनींना परवानगी दिली व सर्वतोपरी सहाय्य केले.

या शिक्षणक्रमातील Audio-visual Aids हा शिक्षण विभाग पुरा करण्यासाठी Department of Audio Visual Aids, या विभागाचे डेप्युटी डायरेक्टर श्री. आर. डी. बोकील यांनी फार मेहनत घेतली. या विषयावर त्यांनी स्वतः व्याख्याने दिली. शिवाय त्यांचा विभाग पाहण्यास विद्यार्थिनींना परवानगी दिल्याने त्यांना निरनिराळी साधने व त्यांचा शिक्षणासाठी उपयोग कसा करावा हे समजले.

एस. एन्. डी. टी. महाविद्यालयाचे या शिक्षणक्रमाचा अभ्यास पुरा करून घेण्यास सहकार्य मिळाले. या विद्यालयातील प्राध्यापिका सौ. प्रज्ञा वीरकर यांनीही विद्यार्थीनींना Organisation of Home Science Department विषयाबद्दल मार्गदर्शन केले.

विविध स्वरूपाचा शिक्षणक्रम चालविण्यास विद्यालयाला जागा आधीच अपुरी होती. त्यात आणखी एक नवा शिक्षणक्रम सुरू व्हावयाचा होता म्हणून १९६५-६६ चे शालेय वर्ष सुरू होताच पूर्वयोजनेप्रमाणे अधिक जागा विकत घेतली त्यामुळे एकसंघ जागेत विद्यालयाचे काम सुरू झाले. या जागेच्या खरेदीसाठी व काही सोयी करून घेण्यासाठी विद्यालयाने बँक ऑफ महाराष्ट्राकडून पन्नास हजार रुपयांचे कर्ज घेतले. मुंबई व महाराष्ट्र यातील जनतेचे औदार्य व सहकार्य यावर भरवसा ठेवूनच हे मोठे धाडस केले.

या नंतरच्या काळात गृहिणी विद्यालयाची सर्वप्रकारे प्रगति झालेली असून आता भारतीय स्त्री-जीवन विकास परिषद, मुंबई या पंजिबद्ध नवीन संस्थेच्या माताहत ते स्वतंत्र रीत्या उत्तम कार्य करीत आहे. सौ. विजया काळे आणि सौ. मोहिनी निमकर या संपादिकाद्वयांच्या मार्गदर्शनाखाली 'गृहिणी-विद्या' नामक वार्षिकाचे प्रकाशनही संस्थेमार्फत होत असते.

'गृहिणी-विद्यात' प्रकाशित झालेल्या पुढील अहवालावरून पुढील दोन वर्षातील विद्यालयाच्या प्रगतीची कल्पना येते.

सालाबादाप्रमाणे गृहिणी विद्यालय दि. १०-६-६८ रोजी सुरू झाले. यावर्षी विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी बऱ्याच विद्यार्थिनींनी गर्दी केली होती. त्यापैकी प्रवेश देता न

आल्यामुळे बऱ्याच विद्यार्थिनींची निराशा झाली. या वर्षी प्रथम वर्षासाठी ४० विद्यार्थिनी व द्वितीय वर्षासाठी १५ विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला.

या वर्षीचा गृहिणी विद्यालयाचा सरकारी परिक्षांचा निकाल फारच चांगला आहे. एप्रिल १९६८ ला परीक्षेला पाठविलेल्या विद्यार्थिनींचा प्रथम वर्ष सर्टिफिकेट कोर्सचा निकाल ८८% लागलेला आहे.

विद्यार्थिनींच्या गुणविकासाच्या दृष्टीने विद्यालयात विविध कार्यक्रम आखले जातात. तसेच सर्व राष्ट्रीय सण व उत्सवही साजरे केले जातात. या वर्षी १ ऑगस्ट, ५ सप्टेंबर, २ ऑक्टोबर, २६ जानेवारी हे दिवस साजरे केले गेले. या शिवाय वक्तृत्वस्पर्धा, शैक्षणिक सहली, एक दूरची सहल, क्रीडादिन वगैरे निरनिराळे कार्यक्रमही पार पडले.

शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्यातर्फे चालू असलेल्या सकस आहार योजनेसाठी म्हणून निवडलेल्या खेड्यांना विद्यार्थिनींनी महिन्यातून दोनदा भेटी दिल्या व त्या ठिकाणी खेडुतांना तेथे मिळणाऱ्या अन्नपदार्थांतून सकस आहार कसा बनवता येईल याचे प्रात्यक्षिक दाखविले.

या वर्षातला शेवटचा उपक्रम म्हणजे स्नेहसंमेलन व निरोप समारंभ. स्नेहसंमेलनाच्या वेळी विद्यार्थिनींचे विविध कार्यक्रम होऊन त्यांनी वर्षभरात निरनिराळ्या विषयांच्या संदर्भात तयार केलेल्या वस्तूंचे एक छोटेसे प्रदर्शन भरविण्यात आले होते. निरोप समारंभाच्या दिवशी एकत्र भोजनाचा कार्यक्रम होऊन हे शैक्षणिक वर्ष संपले.

सध्या रॅशनल आर्ट अँड प्रेस प्रायव्हेट लिमिटेड मुंबई या संस्थेच्या कामगार मंडळीकरिता गेले वर्षभर यशस्वी रीतीने सकस खाद्य पदार्थ पुरविण्याचे कार्य सकस अन्न सेवा समिती करीत आहे.

यापूर्वी सुरू झालेल्या सकस अन्न सेवा समिती विभागातर्फे जी. इ. सोसायटीज हायस्कूल फॉर गर्लस् दादर (मुलींची छबीलदास शाळा) या शाळेतील विद्यार्थिनींना मधल्या वेळचे सकस व ताजे-खाणे अत्यल्प किमतीत वर्षभर पुरवण्यात आले. लेबर वेलफेअरचे शाळेत खाणे पुरविले जात आहे. हाच उपक्रम आणखी काही शाळा व बालवाड्या यांतून करण्याचा सभासद भगिनींचा मानस आहे.

**पालक संघ**

समाजातील सर्व पाल्य व पालक यांचे पुढील अनेक समस्यांचा विचार करून त्या सोडविण्याचा दृष्टीने मार्गदर्शन करणे हे पालक संघाचे कार्यक्षेत्र आहे.

या दृष्टीने १९६५-६६ मध्ये पालक संघातर्फे कल्याणकारी समिती हॉल, हाजीअली येथे 'विद्यार्थी-पालक-शिक्षक समस्या' या विषयावर एक परिसंवाद घेण्यात आला. भावी पिढीच्या जीवनाबद्दलच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा या विषयावर श्री. पुरुषोत्तम गाडगीळ

(उपसंपादक लोकसत्ता), सौ. मोहिनी निमकर, सौ. विजया काळे, सौ. शीला लेले, सौ. मीरा काटदरे, सौ. शांता करकरे व सौ. बकुल देवकुळे यांनी आपली मते मांडली. घराघरांतून व सांस्कृतिक केंद्रांतून विद्यार्थीवर्गावर योग्य ते संस्कार व्हावेत व त्यांच्या जीवनाला योग्य दिशेने वळण लावावे असा निष्कर्ष यातून निघाला.

पालक संघाच्या कार्यकारी मंडळाच्या एक सभासद डॉ. सौ. मालती गरवारे यांनी भारत बिजली इंडस्ट्रीज येथे जाऊन तेथील कामगारांच्या लहान मुलांची शारीरिक तपासणी केली. नंतर सौ. बकुल देवकुळे यांनी कामगार पालकांना त्यांच्या मुलांना स्वस्त सोपा असा सकस आहार कसा देता येईल हे समजावून सांगितले.

**सकस आहार अन्नयोजना कार्यक्रम :**

Applied Nutrition Programme– प्रस्तुत योजनेखाली महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्याचे बारा विभाग (Blocks) पाडले असून प्रत्येक विभागातील १० खेडी निवडलेली आहेत. या खेड्यांतून या योजनेचे काम सर्वप्रथम सुरू करण्यात आलेले आहे. गृहिणी विद्यालय हे या योजनेत एक A. N. P. ट्रेनिंग सेंटर म्हणून मानलेले आहे. मुंबईजवळील वसई विभागातील पारोळ, कणेरशिरसाळ, वालीव, कामण व चंदनसार अशा पाच खेड्यांत ही योजना प्रत्यक्ष अमलात येत आहे. या पाचही खेड्यांत विद्यालयाने आपल्या कामास सुरुवात केली आहे याबद्दलचे शिक्षण घेण्यास सौ. बकुल देवकुळे व सौ. विजया शेवडे यांना विद्यालयातर्फे नागपूर येथे पाठविण्यात आले होते.

गृहिणी विद्यालयाच्या विद्यार्थिनी, शिक्षिका व सभासद-भगिनी यांनी गटागटान जाऊन या पाचही खेड्यांची सर्वसाधारण माहिती जमा केली. नंतर याच कार्यकर्त्यांनी परिप्रश्नपत्रिकेच्या सहाय्याने या खेड्यांची कुटुंबवार माहिती गोळा केली. याच वेळी महिलामंडळांतून सकस आहार योजना समजावून देण्यात आली. अधिक परिचयानंतर चौरस आहार, समतोल आहार व सकस आहार यांची कल्पना देऊन सद्यःस्थितीत आपल्या अन्नधान्यातून असा आहार कसा मिळवता येईल यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. याकरिता अनेक वेळा खेड्यांना भेटी देऊन तेथे महिलांना एकत्र जमवून कच्च्या उसळी, कोशिंबिरी, नाचणी व लाल गव्हाच्या रव्याचे पदार्थ, दुधभोपळा, केळी व वाटाण्याच्या शेंगा, त्यांच्या सालींचे पदार्थ, कुकरचा स्वयंपाक यांची प्रात्यक्षिके कार्यकर्त्यांनी करून दाखविली व या पदार्थांचे आहार-शास्त्रदृष्ट्या महत्वही समजावून सांगण्यात आले. खेड्यातील भगिनींना या गोष्टी पटत असून त्यांच्या आहाराच्या पद्धती व सवयी हळूहळू बदलत आहेत.

या नंतरच्या काळात गृहिणी विद्यालयाची सर्व प्रकारे प्रगति झालेली असून आता भारतीय स्त्री-जीवन विकास परिषद, मुंबई या नवीन पंजिबद्ध संस्थेच्या माताहत ते स्वतंत्र रीत्या उत्तम कार्य करीत आहे. सौ. विजया काळे आणि सौ. मोहिनी निमकर या संपादिका-द्वयांच्या मार्गदर्शनाखाली 'गृहिणी-विद्या' नामक वार्षिकाचे प्रकाशनही संस्थेमार्फत होत आहे.

● ● ●

" रामात आम्हाला एका आज्ञाधारक पुत्राचे, एकपत्नीव्रत धारण करणाऱ्या पतीचे, लहान भावावर सर्वतोमना प्रेम करणाऱ्या मोठ्या भावाचे, प्रजेचे रंजन करणाऱ्या राजाचे आणि एका आदर्शभूत अवतारी पुरुषाचे दर्शन होते.

अशा रामाच्या चरित्राच्या अभ्यासाने भारतीयांची चरित्रे सुधारतील यात काडीचाही संशय नाही.

रामायणावर आजपर्यंत पुष्कळसे साहित्य लिहिले गेले आहे. त्या संदर्भात मी श्रीमती लक्ष्मीबाई केळकर यांनी लिहिलेली प्रवचने पाहिली. इतके मनन करून लिहिलेले असे उत्कृष्ट साहित्य मी पहिल्यांदाच पाहिले आहे. प्रवचनांनी आकर्षित होऊन मी ती वाचली. ती खरोखर मला अत्युत्कृष्ट वाटली. "

वंदनीय मावशींच्या रामायणावरील प्रवचनावर वेदमूर्ति पंडित सातवळेकरांनी व्यक्त केलेल्या उपरोल्लेखित अभिप्रायावरून हे सहज लक्षात येण्यासारखे आहे की राष्ट्र-सेविका समिती प्रमाणेच त्यांनी योजिलेल्या रामायणावरील प्रवचनांच्या आणखी एका माध्यमाद्वारे राष्ट्र आणि समाजसेवेचे महत्कार्य मावशींकडून किती उत्तम प्रकारे घडत असेल ! प्रस्तुत लेखकाचा असा अनुभव आहे की मावशींकडून प्रवचनाद्वारे होणारी जनतेची सेवा कित्येक स्त्री-पुरुषांना अधिक मोलाची वाटते. कोणते माध्यम अधिक श्रेयस्कर हा वाद व्यर्थ वाटतो.

राष्ट्र-सेविका समितीच्या प्रचंड व्यापात गुन्तलेल्या असताही प्रथम रामायण आणि तद्नंतर महाभारतावरील प्रवचनांचा गंगौघ वंदनीय मावशींच्या जीवनात अवतरला. एका विशिष्ट दैवी प्रेरणेनेच हे घडून आले. तो प्रसंग कथन करण्यापूर्वी त्यांची श्रीरामायणाकडे आकर्षित होण्यामागील पार्श्वभूमि जाणून घेणे आवश्यक आहे. रामायणावरील प्रवचनांच्या प्रास्ताविकात मावशी म्हणतात :

बंधु भगिनींनो,

गेली १२–१५ वर्षे सभांतून रामायणावर बोलण्यास सुरवात करून ते एक धाडसच मी केले आहे असे म्हणायला हरकत नाही. धाडस हा शब्द मी मुद्दाम वापरला आहे. अजून विद्वान स्त्रिया सुद्धा रामायण–महाभारतासारख्या विषयावर बोलत नाहीत. वाल्मीकी रामायणावर पुरुषसुद्धा क्वचितच बोलतांना दिसतात. त्यात पुन्हा माझ्यासारखी शाळेत लिहिण्यावाचण्यापुरते शिक्षण झालेली, एक साधी संसारी स्त्री. बरे, सर्व सन्तांनी देवाहून श्रेष्ठ अशी ज्याची महती गायली आहे तो गुरू तरी मला लाभला का? नाही. ज्याच्यामुळे ज्ञान प्राप्त होऊन मार्गदर्शन लाभेल असा गुरुही मला लाभला नाही. अशी एक सामान्य स्त्री आपल्यापुढे रामायण सांगायला बसली आहे. माझ्याकडून आपण मोठ्या अपेक्षा करू नयेत. मी विद्वान नाही अथवा मला आधुनिक पुढारलेली शास्त्रेही अवगत नाहीत. ‘ जगण्याचे शास्त्र ’ मात्र मला जरूर समजते. आणि त्याच आधारावर रामायण सांगण्यास सुरवात केली. पण मी ते पुराण म्हणून सांगत नाही हे महत्त्वाने प्रथम आपण लक्षात घ्या.

रामायणाकडे मी कशी वळले त्याची पार्श्वभूमि मी प्रथम आपणापुढे विशद करते.

विवाहानंतर १९२० साली मी वर्ध्याची रहिवासी झाले. १९२० पासून १९३० पर्यंत मी काँग्रेसचे काम करीत असे. त्यावेळी महात्माजींचे वास्तव्य वर्ध्याला असे. त्यांनी स्त्रियांना असा उपदेश केला की, ‘ केवळ घरच्या प्रपंचाची कामे करून तुमचे कर्तव्य संपत नाही. तर देश, धर्म, समाज याबद्दलही तुमचे काही कर्तव्य आहे याची जाणीव तुम्ही ठेवली पाहिजे ! मला ते विचार फार पटले; आणि आणखी काही भगिनींबरोबर संसार संभाळून मीही त्यांच्या वेगवेगळ्या कार्यात सहभागी होऊ लागले. परन्तु, असे काही दिवस गेल्यावर १९३२ साली माझ्या जीवनात पति निधनाने जी कौटुंबिक आपत्ति आली तिच्या आघाताने मी काही काल दिङ्मूढ होऊन गेले. हिंदु स्त्रियांच्या सामाजिक असुरक्षिततेची टोचणीही मनाला अस्वस्थ करीतच होती. काही सुचेनासे झाल्याने मी महात्माजींच्या आश्रमात प्रार्थनेच्या कार्यक्रमाला जाऊ लागले. म. गांधींनी ‘ हरिजन ’ नावाचे वृत्तपत्र चालविले होते. बापूजींचा परिपाठ असा असे की, प्रार्थनेनंतर ‘ हरिजन ’ मधील मजकुरासंबंधी ते स्वतः बोलत नंतर प्रश्नोत्तरे व चर्चेसाठी काही वेळ देत असत. या कार्यक्रमाला गावोगावची मंडळी येत. अशाच एका प्रश्नोत्तराचे वेळी एका सुशिक्षित तरुणीने बापूजींना प्रश्न विचारला, “ आम्ही स्त्रियांनी आमच्या जीवनात कोणता आदर्श ठेवावा ? ”

तेव्हा महात्माजींनी उत्तर दिले, “ तुम्हीच काय पण जगातील कोणत्याही स्त्रीने सती सीतेचा आदर्श ठेवावा. ”

त्याबरोबर त्या स्त्रीने पुन्हा उठून विचारले, "ज्याप्रमाणे आम्हाला सती सीतेचा आदर्श ठेवावा म्हणून सांगता त्याप्रमाणे बंधुवर्गाला सांगता का रामाचा आदर्श ठेवा म्हणून ? "

बापूजी म्हणाले, " नाही ". तेव्हा, त्या तरुणीने पुन्हा विचारले, " जर आम्हाला सांगता, तर मग पुरुषांना का सांगत नाही ? "

" माझा असा विश्वास आहे की, सीतेच्या जीवनातून राम जन्माला येतो. राम जन्मासाठी वेगळा प्रयत्न करण्याची जरूर नाही, " असे विशेष महत्वाचे उत्तर त्यावेळी बापूजींनी दिले.

चर्चा संपली. या उत्तराने त्या तरुणीचे कितपत समाधान झाले कोण जाणे, पण माझे मात्र झाले नाही. विचारांना चालना मात्र मिळाली. तरी सुद्धा बापूजींच्या समाजचिंतनाबद्दल मला विश्वास असल्याने त्यांच्या विधानात सत्य असले पाहिजे; आपण ते रामायणाचा अभ्यास करून शोधून काढू व काही शंका राहिली तर पुन्हा त्यांना जाऊन विचारू असा निश्चय करूनच घरी परतले.

एकंदर रामायणाविषयी मला जास्त आत्मीयता व आकर्षण उत्पन्न होण्याचे आणखी एक विशेष कारण घडले ते म्हणजे वर्धेला देशाच्या निरनिराळ्या भागातून अनेक थोर पुढारी येत असत. त्यांची भाषणे ऐकण्याची संधी मी सोडत नसे. या सर्वांच्या भाषणातून एकच निष्कर्ष निघत असे की स्वराज्य मिळवून त्याचे सुराज्य करावयाचे आहे. हे सुराज्य कसे ? तर रामराज्यासारखे ! तेव्हा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आम्ही येथे 'रामराज्य' स्थापन करणार ! हेच शब्द एकसारखे कानावर पडत असल्याने हे रामाचे 'रामराज्य' होते तरी कसे ? हे जाणून घेण्याच्या उत्सुकतेने मी रामायणाकडे प्रामुख्याने आकर्षित झाले.

रामायणातील आणखी एका कथेने माझे लक्ष वाल्मीकी रामायणाकडे वेधले. ती कथा अशी. वाल्मिकींच्या रामायण या शतकोटीश्लोकी ग्रंथाची रचना अद्वितीय झाली. गोष्ट प्रत्येकाला ऐकाविशी वाटते ना ? तसे रामायण सर्वांना हवेसे वाटू लागले. तेव्हा ग्रंथरचना झाल्यावर त्या ग्रंथाच्या मालकीकरिता मानव, देव आणि दानव एकाद्या इस्टेटीकरिता भांडावे तसे भांडू लागले. मानवांचा दावा असा की, राम हा देव असला तरी मानवरूपाने अवतरला असल्याने रामायणावर आमचाच अधिकार आहे. याउलट, देवांचे प्रतिपादन असे की, मानवरूपाने अवतरला असला तरी राम विष्णूचा अंश आहे. तेव्हा रामायण संपूर्णपणे आमचेच. दानवांचे म्हणणे अगदी निराळे. ते म्हणाले की, रामायण हा मुळी दैत्यराज रावणाच्या पराक्रमाचे वर्णन करणारा ग्रंथ आहे ! तेव्हा तो फक्त आम्हा दानवांचाच असू शकतो. त्रिवर्गाच्या भांडणाला कडाक्याची सुरवात झाली. काही केल्या तंटा मिटेना. म्हणून

सर्वजण निर्णय मागण्यासाठी ब्रह्मदेवाकडे गेले. परंतु ब्रह्मदेव म्हणाले, " या वादाचा निर्णय करणे मला अशक्य आहे. तुम्ही महादेवाकडे जावे हे उत्तम ! "

तेव्हा सर्वजण महादेवाकडे गेले.

महादेव म्हणाले, " तुमचे तिघांचेही म्हणणे बरोबर आहे. तेव्हा तिघांमधे याची समान वाटणी करु या. "

मूळ रामायणात २४३३५ श्लोक असले तरी रामरक्षेच्या वगैरे रूपाने आपल्या-पुढे ' शतकोटी ' श्लोकांची कल्पना मांडलेली आहे, हे आपणा सर्वांना ठाऊक आहे. आता ही जी वाटणी महादेवांनी केली ती बरोबर समान केली. वाटणी केल्यावर प्रत्येकाला ३३३३३३३३३ ( तेहतीस कोटी तेहतीस लाख तेहतीस हजार तीनशे तेहतीस ) श्लोक वाटणीला आले.

महादेव म्हणाले, " बाबांनो, समान वाटणी झाली. आता एकच श्लोक वाटायचा राहिला आहे. त्याची अक्षरे आहेत बत्तीस. तेहतीस असती तर प्रत्ये-काला अकरा देऊन मोकळा झालो असतो. पण इथे बत्तीसच अक्षरे आहेत. तेव्हा तुम्हाला दहा दहा देतो आणि दोन मला ठेवून घेतो. "

असे म्हणून ते त्रिवर्गाकडे संमतीकरिता पाहू लागले. तिघांनाही महादेवांची कल्पना तत्काळ पसंत पडली. त्यांनी विचार केला की, " महादेवांनी निःपक्षपातीपणाने आम्हाला खूप दिले आहे. आता दोन अक्षरे म्हणजे अगदी क्षुल्लक बाब आहे. काहीच हरकत नाही तेवढी दोन अक्षरे महादेवांना द्यायला ! " आणि या त्रिवर्गाने आनंदाने महादेवांना होकार दिला. होकार मिळाल्यावर महादेवांनी काय ठेवून घेतले ? तर, त्यातील ' राम '. अशा तऱ्हेने ज्यातील ' राम ' काढून घेतलेला आहे, अशा प्रकारची रामायणे आम्ही वर्षानुवर्षे वाचली त्याची कितीही पारायणे केली तरी आमच्या जीवनात राम कसा येणार ? म्हणून तो राम शोधण्याची आज आवश्यकता आहे.

आणखी एका निमित्ताने मूळ रामायणाचा मी कसून अभ्यास केला. स्त्रियांचे अपहरण करून त्यांना भ्रष्ट केल्याच्या बातम्या प्रत्यही कानावर येत. त्याने मी अतिशय अस्वस्थ होई. अनाथ नव्हे तर रामासारख्या महापराक्रमी पुरुषाची सुद्धा पत्नी रावणाने पळविली. पण रावणासारख्याच्या बंदिशाळेत शत्रूच्या गोटात एकटी दहा महिने सापडून सुद्धा ती शुद्ध राहिली. हे कसे घडले ते मला पहावयाचे होते. ते पाहिल्यावर स्त्रीचे रक्षण स्त्री स्वतःच आत्मिक बलाच्या साह्याने करू शकते, हे माझ्या ध्यानात आले. या चिंतनातूनच समितीचा जन्म झालेला आहे.

प्रार्थनेहून निश्चय करून आले आणि लगेच रामविजय वाचायला सुरवात केली. रामायणाच्या अभ्यासाचा निश्चय केला खरा पण तो पार पाडणे तितकेसे सोपे नव्हते. मार्गात अनंत अडचणी होत्या. पाठोपाठची लहान सात मुले होती. शेतीवाडीचा व्याप होता. बरेचसे कॉंग्रेसचे कार्यकर्ते, काही निराधार मंडळी आमचे घरी उतरण्याची वहिवाट होती. त्यामुळे कामाचा व्याप बराच वाढला होता. पण या सर्वोपेक्षा महत्त्वाची अडचण ही होती की कोणते ग्रंथ वाचावेत व ते कसे मिळवावेत. त्या संबंधीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता होती आणि ते मिळणे कठीण होते. कारण ३५ वर्षांपूर्वी सप्तशती, रामायण, महाभारत इ.सारखे ग्रंथ घरात स्त्रियांनी वाचू नयेत असा रूढ दंडक होता. देवळात जाऊन पुराणिकाच्या तोंडून काही ऐकायला मिळेल तेवढेच त्यांना या ग्रंथांचे ज्ञान होई. घरात कलह माजू नये म्हणून हे कलहाचे ग्रंथ घरातून बहिष्कृत झाल्यासारखे झाले !

वास्तविक, वेदकालात, रामायण-महाभारत कालात वा त्यानंतरही स्त्रियांवर अशा-प्रकारची कोणतीच बंधने नव्हती ! गुलामगिरीच्या कालखंडात अशा तऱ्हेच्या रूढी समाजात हळूहळू वाढत चालल्या आणि अशा अमोलिक ग्रंथाच्या अभ्यासापासून स्त्रियांना वंचित ठेवले गेले. त्यामुळे त्या कालखंडात कुटुंबसंस्था भक्कम असून-सुद्धा अज्ञानामुळे या ग्रंथाद्वारे होणारे उत्तम संस्कार भावी पिढ्यांवर होऊ शकले नाहीत. या रूढीमुळे मला सहज उपलब्ध होण्यासारखा सोपा ग्रंथ म्हणजे रामविजय ! तो मी वाचला. त्यानंतर वर उल्लेख केलेली इतर रामायणेही अवलोकन केली. "

श्रीरामायणाच्या अभ्यासानंतर ओळखीच्या आणि आसपासच्या स्त्रियांना दर एकादशीला एकत्र करून जमेल तशी रामकथा सांगण्यास प्रथम ५१ साली मावशींनी सुरवात केली. या प्रसंगी पुणे येथील राष्ट्रीय कीर्तनकार वा. शि. कोल्हटकर यांच्या 'रामगीतसुधा' या ग्रंथाधारे साधारणपणे कीर्तनस्वरूपात हा कार्यक्रम चाले. पेटी वाज-विण्याचे आणि गीते म्हणण्याचे सहकार्य प्रारंभी सौ. विमलाताई देशपांडे, सौ. सुधाताई जोशी ( कु. आगाशे ) नागपूर आणि सौ. मनोरमाबाई वाकरे या वर्धा येथील समिती सेविकांपैकी एकीकडून घेतले जाई.

वरील क्रम अशाच स्वरूपात काही दिवस चालला. त्यानंतर १९५३ मध्ये जी एक घटना घडली ती अशी :

आमचे बंधु पद्माकरपंत यांचा त्यावेळी सुमारे १॥ वर्षांचा असलेला मुलगा अजित बराच आजारी झाला. नातवाच्या काळजीने मावशी मुंबईस पद्माकरकडे जाऊन राहिल्या. तेथे तुलसीकृत रामायणाच्या पठनाचा मावशींना योग आला. एक दिवस रात्री त्यांना स्वप्न पडले. कोण्या एका गावाबाहेर, निर्मनुष्य ठिकाणी, एक तळघर असून आंत पांढरी

शुभ्र लांब दाढी असलेली एक तेजःपुन्ज व्यक्ती निद्रित अवस्थेत आहे. पायऱ्या उतरून आंत जात नाही–तोच ती व्यक्ती अदृश्य होते व ' रामायण सांग ' असा कोपऱ्यातून त्रिवार ध्वनि ऐकू येतो. लगेच जाग येते.

' रामायण सांग ' हा त्रिवार उमटलेला ध्वनी म्हणजे दैवी प्रेरणा; नव्हे दैवादेशच होय अशी मावशींची भावना झाली. त्यानंतर आजपर्यंत रामायणाचा हा गंगौघ प्रामुख्याने महाराष्ट्र भूमिवर अविरतपणे संस्कार-सिंचन करीत आहे.

रामायण कथनाने वंदनीय मावशींना वैयक्तिक असा एक महत्वाचा फायदा झाला. तो म्हणजे यापूर्वी काहीशी सुप्तावस्थेत असलेली त्यांच्यातील वक्तृत्व-शक्ती अभिव्यक्त होऊन तिची अभिवृद्धि झाली. तथापि त्यामुळे त्यांनी अंगीकारलेल्या विविध कार्यांना जो अनेक प्रकारे लाभ मिळाला तो अधिक महत्वाचा आहे.

या पूर्वीच्या काळापर्यंत प्रामुख्याने फक्त वृद्ध स्त्रियांनीच, वेळ जात नाही म्हणून, दुपारी अगर संध्याकाळी एखाद्या शेजारच्या देवळात जाऊन डुलक्या देतदेत ऐकण्याचा तो विषय आहे, इतक्या क्षुल्लक अवस्थेप्रत या महत्वाच्या विषयाचे अवनतीकरण झालेले होते. पुरुषांचे बाबतीत तर या संबंधी काही न बोलणेच श्रेयस्कर ! तथापि कै. बाळशास्त्री हरदास यांची या बाबतीतील कामगिरी विशेष उल्लेखनीय वाटते. मावशींनी वृद्धांप्रमाणेच तरुण आणि बाल स्त्रीपुरुषांसही पुन्हा एकदा रामायणाकडे आकृष्ट केले.

जुन्या परंपरेला चिकटून राहणाऱ्या भारतीय सहजप्रवृत्तीनुसार प्रवचन कीर्तनादि कार्यक्रमानंतर प्रवचनकाराला स्वेच्छेने फूल ना फुलाची पाकळी द्रव्यदान करण्याचा संस्कार आजही आमच्यातून नष्ट होऊ शकलेला नाही. त्यानुसार प्रवचनाला जमलेला हजारोंचा स्त्री–पुरुष श्रोतृवृंद आरतीच्या तबकात अगर अन्य प्रकारे आपली सेवेची साद रुजू करण्यात कसूर करत नाही, असा अनुभव आहे.

देवकृपेने वंदनीय मावशींना व्यक्तिशः पैशाची आवश्यकता कधीच नव्हती, हे त्यांच्या जीवनेतिहासावरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. तथापि जे द्रव्य जमा होते त्याचा संपूर्ण विनियोग केवळ त्यांनी अंगिकारलेल्या समाज आणि देशविषयक कार्यासाठीच होतो. राष्ट्र-सेविका समिती, देवी अहल्या मंदिर नागपूर, श्री अष्टभुजादेवी मंदिर वर्धा, राणी लक्ष्मीबाई स्मारक समिती नाशिक, सेविका प्रकाशन वर्धा, जिजामाता स्मारक समिती ठाणे, गृहिणी विद्यालय मुंबई–ठाणे आदि मावशींच्या प्रेरणेने आरंभ झालेल्या प्रतिष्ठानांना, त्यांच्या आवश्यकतेनुसार, या निधीतून सहाय्य होईल अशीच योजना आहे.

श्रीरामाच्या जीवनावरील प्रवचनामुळे समाजावर संस्कार करण्याचे महत्कार्य तर घडतेच शिवाय या माध्यमाद्वारे त्यांच्या विविध कार्यासाठी अनेक उत्तम कार्यकर्ते आणि सहकार्यही मावशींना मिळविता आले असे दिसून येते.

या संबंधात नागपूर येथील एक सुप्रतिष्ठित आणि वयोवृद्ध भगिनी सौ. यमूताई सरंजामे यांचे उदाहरण देण्यासारखे आहे. सौ. सरंजामे पूर्वीपासून म्हणजे प्रथम अमरावती आणि तदनंतर नागपूर येथे निरनिराळ्या सामजिक कार्यात असत परंतु त्यांना पुरेसे समाधान वाटत नव्हते. वंदनीय मावशींचा आणि त्यांचा प्रारंभी परिचयही नव्हता. परंतु मावशींची रामायणावरील प्रवचने श्रवण करण्याचा योग आल्यानंतर मात्र त्या त्यांच्याकडे आकृष्ट झाल्या. त्यांचे पति ॲडव्होकेट सरंजामे हे देखील आता या कार्याकडे अत्यंत सहानुभूतीने पाहू लागले.

यानंतर काही काळ लोटला. तथापि इच्छा असूनही सौ. यमूताईना मावशींच्या कार्यात जातीने सहभागी होण्याचा योग १९६४ पर्यंत जुळून आला नाही. त्या वर्षी मावशींच्या षष्ठ्यब्दिपूर्तीचा कार्यक्रम नागपूरला व्हायचा होता. त्या निमित्ताने नागपूरच्या निर-निराळ्या महिला संस्थांच्या प्रतिनिधींची एक बैठक घेतली. त्यावेळी जी समिती निर्धारित करण्यात आली तिचे अध्यक्षपद सौ. यमूताईंनी सहर्ष स्वीकारून आपली मनातील इच्छा पूर्ण केली.

यानंतर लगेच देवी अहल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ जे कार्य नागपूर येथे सुरू करण्यात आले त्याची जबाबदारीही सौ. यमूताईंनी स्वेच्छेने स्वीकारली.

आरंभापासून आजतागायत 'देवी अहल्यामंदिर' प्रतिष्ठानाच्या अध्यक्षपदाचे कार्य त्या इतक्या उत्तम प्रकारे करीत आहेत की या संस्थेच्या कामासंबंधी काळजी करण्याचे मावशींना कारण उरले नाही.

सातारा येथील श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले या देखील प्रवचनाच्या माध्यमा-द्वारेच मावशींच्या कार्याकडे आकर्षित झालेल्या आहेत. ग्वाल्हेरच्या राजमाता श्रीमंत विजयाराजे शिंदे यांचे उदाहरणही याच प्रकारचे आहे.

आरंभ झाल्यापासून आजपावेतो केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर इतर प्रदेशातील अनेक ठिकाणी आणि वेळ प्रसंगी हिंदीतून असंख्य वेळा मावशींची प्रवचने झाली. प्रवचनांचे आरंभीचे आणि सध्याचे स्वरूप आणि परिणाम याबाबतीत जमीन अस्मानाइतके अन्तर दिसून येते.

अनेक ठिकाणी अनेक वेळा जरी मावशींची प्रवचने झालेली असली तरी "वर्षप्रति-पदा ते रामनवमी या कालपर्यंत संपूर्ण रामायणाचे कथन एकंदर १२ वेळा करावयाचे", असा मावशींनी जो संकल्प केलेला होता त्या प्रमाणे वर्धा, नागपूर, मुंबई, नाशिक, अमरावती, पुणे आदि ठिकाणी ठरलेल्या वेळी ही संकल्पाची १२ प्रवचने अत्यंत यशस्वी रीत्या पार पडली. या संकल्पाची सांगता १९७३ च्या रामनवमीला नागपूर येथे देवी अहल्या मंदिरात मोठ्या प्रमाणावर झाली. १९७३ हे संकल्पित उपक्रमाचे १३ वे वर्ष होते.

सांगता समारंभानिमित्त जो विविध स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला

होता त्यात रोज सकाळी काकडआरती, अध्यात्मरामायणाचे वाचन आदि कार्यक्रम होत. दुपारी भजन, कीर्तन, पोवाडे, राष्ट्रगीते आदि कार्यक्रम होत. सायंकाळी वंदनीय मावशींच्या प्रवचनाला सुरवात होण्यापूर्वी रामायणातील प्रसंगातील निवडक दृष्ये मूकअभिनय प्रकाराद्वारे दाखविण्यात येत. नागपुरातील सर्व महिला संस्थांनी हे कार्यक्रम सादर करण्यात, निधि-संकलन आणि इतरही सर्वच बाबतीत उत्तम सहकार्य दिल्याने सर्वच कार्यक्रम अत्यंत मनोवेधक आणि परिणामकारी असा झाला.

यावेळी झालेल्या वंदनीय मावशींच्या प्रवचनसत्राचे वेळी स्त्री–पुरुष श्रोतृसमुदाय प्रचंड संख्येत नियामितपणे उपस्थित राहत असे.

वंदनीय मावशींच्या संकल्पाची सांगता यज्ञयागाने झाली. यावेळी झालेल्या महायज्ञाचे प्रत्यक्ष दर्शन घेऊन मावशींना व त्यांच्या कार्याला शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी जणूं संपूर्ण नागपूर नगरीच त्यावेळी तेथे लोटली होती. प्रामुख्याने राजमाता विजयाराजे शिंदे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह श्री बाळासाहेब देवरस, योगविद्या पण्डित जनार्दन स्वामी हे देखील जातीने येऊन दर्शन घेऊन गेले.

संकल्पित रामायण–प्रवचनांच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने नागपूर येथील दैनिक तरुणभारतासाठी सौ. उमा माडखोलकर यांनी वंदनीय मावशींची जी मुलाखत घेतली होती ती नंतर प्रकाशित झाली. मुलाखतीतील सांगता समारंभ कशासाठी, रामायणाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य, रामजीवनाचे विवेचन करण्याचा वंदनीय मावशींचा दृष्टिकोन, रामचरित्रासंबंधी समाजात आढळणारा चुकीचा दृष्टीकोन व त्याचे निराकरण, भविष्यातही रामचरित्र असेच समाजासमोर येत राहण्यासाठी मावशींची योजना ह्या महत्वपूर्ण मुद्यांचा उहापोह करणारा अंश प्रश्नोत्तर रूपात जसाच्या तसा खाली देत आहे.

**जुन्या - नव्याची सांगड**

प्रश्नः– रामायणाची सांगता कशी काय होऊ शकेल ?

उत्तरः– ही मुळी रामायणाची सांगता नाही. पुष्कळ लोकांचे या बाबतीत गैरसमज होत आहेत. रामायण पूर्वीही होते आणि पुढेही अनंत काळपर्यंत राहील. त्याला सांगता नाही. ही सांगता आहे माझ्या संकल्पाची. प्रभू रामचंद्राने रामायण सांगण्याकरिता मला बुद्धि आणि शक्ति दिली, आणि लोकांनी ते ऐकण्याची इच्छा दर्शविली. एवढेच नाही, तर हा संकल्प माझ्या हातून पार पडावा, अशी काळजी घेतली म्हणूनच या संकल्पाची सांगता सार्वजनिक रितीने व्हावी अशी माझी इच्छा आहे. लोकांच्या सदिच्छा आणि सहकार्य याशिवाय माझं एकटीचं बळ कितपत पुरं पडू शकलं असतं ? हे यश माझं एकटीचं नाही.

प्रश्नः– आपण रामायणाचीच निवड आपल्या प्रवचनांसाठी का केलीत ? महाभारत हा ग्रंथ रामायणाच्या मानाने कितीतरी व्यापक असून त्यात मानवी जीवनाचे अनंत प्रकार वर्णन केलेले आहेत. असं असतांना रामायणच का निवडलं ?

उत्तरः– मानवी जीवनाच्या दृष्टीने पूर्ण मानव म्हणून रामचरित्राची महती मला वाटते. रामजीवन हे सर्वत्र बाबतीत आदर्श आहे. म्हणून समाजातल्या लोकांचे जीवन सुसंस्कारित करायचे तर रामजीवनच आदर्श आहे, असे मला वाटले. अन् मग मी त्यावर प्रवचने करायला सुरवात केली.

प्रश्नः– रामजीवनाचे विवेचन आपण कोणत्या दृष्टीने केले ?

उत्तरः– रामायण हा ग्रंथ पुराण मानला जातो. पुराण म्हणजे जुना. सध्याच्या जीवनाला त्याचा काहीच उपयोग नाही, अशी अनेकांची समजूत झालेली आहे. माझ्या मते हा पुराण ग्रंथ म्हणजे इतिहास आहे. मानवी जीवनाला इतिहासाची अतिशय आवश्यकता आहे. त्या काळात जे काही चांगल घडलं असेल त्याचे आदर्श आपण घ्यावे आणि चुका टाळाव्या असा हेतु रामायण सांगायला सुरवात करताना माझ्या मनात होता.

प्रश्नः– मग या इतिहासकथेला आपण प्रवचन हे नांव का दिलं ?

उत्तरः– माझे प्रवचन म्हणजे किर्तन आणि व्याख्यान अशा जुन्या-नव्याची सांगड आहे. ते रूढ अर्थाचे प्रवचन नाही, किंवा किर्तनही नाही. या प्रवचनाच्या निमित्ताने मला रामकथा सांगता येतात आणि त्या आदर्शानुसार समाजरचना, व्यक्ती, तिची कर्तव्ये, समाजकर्तव्ये, निरनिराळी ऋणे आणि त्यांच्या जबाबदाऱ्या यावर विवेचन करता येते. आणि म्हणून प्रवचन हेच नांव मला योग्य वाटते.

**पूर्ण मानव, आदर्श मानव :**

प्रश्नः– प्रवचनाकरिता आपण कोणत्या ग्रंथाचा आधार मानला ?

उत्तरः– मूळ ग्रंथ वाल्मीकीचा. कारण तो आदिग्रंथ आहे. रामकथा वाल्मीकींच्या डोळ्यासमोर घडलेली आहे. काही घटना तर त्यांच्या साक्षीनं घडलेल्या आहेत. म्हणूनच त्यांच्या ग्रंथात कल्पनेला वाव नाही. वाल्मीकी कवी खरे, पण त्यांचं काव्य सत्य घटनेला स्मरून स्फुरलेलं आहे. वाल्मीकी–रामायण आणि इतर रामायणात तसाच आणखी एक फरक हा आहे की, वाल्मीकींनी रामाला आदर्श मानव, मर्यादा पुरुषोत्तम, असे मानलेले आहे. देव आणि देवत्व प्राप्त झालेला मानव यामध्ये फार फरक आहे. त्या दोन्हीकडे बघण्याची आपली दृष्टीही वेगळी असते. देव म्हटला म्हणजे त्याची

पूजा करावी, त्याला भक्तीभावाने नमस्कार करावा, अशी आपली भावना असते. पण त्याच्या आदर्शाचा अंगीकार करावा अशी मुळी प्रेरणाच होत नाही. वाल्मीकींनी, रामचंद्राला पूर्ण मानव समजून हा ग्रंथ लिहिलेला असल्यामुळे, त्याची कर्तव्ये, सुख-दुःखे जवळची वाटतात. आपण त्यांच्याशी अधिक समरस होऊ शकतो. वाल्मीकींनी रामायणात, रामाच्या कोणत्याही अडचणीचे निवारण दैवी शक्तीने चुटकीसरसे झाले असे दाखविले नाही. प्रयत्न, शौर्य, इतरेजनांचे सहाय्य, निराशा, उत्सुकता, यशापयशाने झालेली मनाची आंदोलने, पत्नीप्रेम, विरह, बंधूप्रेम, प्रसंगी वाटणारा अविश्वास ही मानवी मनाची आंदोलने दाखविलेली आहेत. अन् उलगडली पण आहेत. एवढेच कशाला, पण रामाचा जो शत्रू रावण तो सुद्धा सामान्य दाखविलेला नाही. असामान्य शौर्य रामाने दाखविले तेही रावणासारख्या बलाढ्य शत्रूसमोर! रामचंद्रांना युद्धाकरिता सहाय्य तर घ्यावेच लागले आणि योजनाही आखाव्या लागल्या. हें संपूर्ण मानवी वर्णन रामकथेत वाल्मीकींनी केलेले असल्यामुळे रामचंद्र हे महामानव, महापुरुष वाटतात. त्यांच्याकडे आपण पूर्ण मानव, आदर्श मानव म्हणून बघतो. आणि केवळ नमस्कार, पूजा एवढाच आपला संबंध न राहता त्यांचे जीवन आचरण्याच्या प्रयत्नास माणूस लागतो. मानवी आदर्शाचे आचरण करण्याची इच्छा नैसर्गिक आणि स्वाभाविक आहे. पण देवाचा आदर्श ही कल्पनाच मनात येऊ शकत नाही. कारण त्याची शक्ति, सृष्टी सर्वच मानवाच्या आटोक्याबाहेरची असते. रामाला मानव मानल्याने हे सर्वच प्रश्न सुटले आहेत. आणि वाल्मीकी-रामायणाचे महत्व मूलतः यात आहे. म्हणून मी तो ग्रंथ श्रेष्ठ व प्रमाणभूत मानते.

**समष्टि श्रेष्ठ ही रामाची भूमिका :**

प्रश्नः— तेरा वर्षांच्या या संकल्पकाळात प्रवचनांविषयी काही मतभेद वगैरे झाले कां?

उत्तरः— मतभेद फारसे झालेच नाहीत. पण कोणत्याही सार्वजनिक कामात मतभेद हे होणारच. उलट मतभेद होऊन शेवटी एकमत झाले म्हणजे तेच योग्य. मी सांगते म्हणून नव्हे तर खरोखरच मनोमन पटले म्हणून मान्य करणे हे अधिक चांगले नाही का? शंकांचे निरसन करण्याची वेळ मात्र माझ्यावर अनेकदा आली. म्हाताऱ्या, मध्यमवयाच्या आणि तरुण अशा सर्व व्यक्तींनी मला पुष्कळ शंका विचारल्या. त्यांच्याशी चर्चा करताना आणि वाल्मीकी रामायणाचा आधार देवून स्पष्टीकरण करताना मलाही आनंद होतो. दंतकथा ऐकून किंवा गोष्टी वाचून शंका विचारणारे जसे माझेकडे आले, तसेच विद्वान, अभ्यासूही चर्चा करण्याकरिता आले. सहज आठवलं म्हणून सांगते. एकदा एक तरुण मुलगी माझ्याकडे आली आणि म्हणाली की, रामचरित्र सर्व पटतं, फक्त सीतात्यागाचा प्रसंग वगळून. तिथे मात्र सीतेवर फार मोठा अन्याय झाला आहे; आणि तोही

अनाठायी. रामाने केलेल्या या अन्यायासंबंधी तुमचे काही स्पष्टीकरण आहे का ? हा भाग सर्वांनाच बोचतो, हे मला मान्य आहे. पण त्यामागील रामाची भूमिका कोणीच अभ्यासत नाही. राम हा प्रथम राजा होता. त्याची कर्तव्ये प्रथमतः त्याच्या लोकानुवर्ती राज्यधर्माबाबत होती. प्रथम तो राजा होता. नंतर तो पती, बंधू किंवा पुत्र होता. या तत्त्वानुसार जर विचार केला तर सीतेबद्दल संशय घेणाऱ्यांचे राजा या नात्याने समाधान करणे आवश्यक होते. सीताशुद्धी त्याच्या समोर झालेली होती. पण जनतेचे संशय- निरसन झालेले नव्हते; याची साक्षच परीटाची घटना देत होती. सीतेलाही रामाची राजा ही भूमिका परिचित असल्यामुळे, त्याग झाल्यावर जेव्हा तिला कळले की राजा राम हा वियोगात चूर आहे, तेव्हा तिने असा निरोप पाठविला की, माझ्या वियोगाच्या दुःखामुळे राजकर्तव्याचा विसर पडू देऊ नका. आपल्याला सीतात्याग जाणवतो, पण व्यक्तीपेक्षा समष्टि श्रेष्ठ ही रामाची भूमिका समजत नाही. दशरथानेही असा उपदेश केलेला आहे की, राजाला धर्म एकच–राज्यधर्म आणि नातेही एकच ते म्हणजे प्रजेचे. किर्तनकार, पुराणिक, हरदास यांनी आजपर्यंत केवळ घटनांवर व कथांवरच भर दिलेला आहे. मूळ तत्त्वापर्यंत मात्र ते गेलेले नाहीत किंवा जाऊ शकले नाहीत. नेता हा समष्टीच्या जीवनाला अग्रक्रम देणाराच असावा लागतो, हे तत्त्व विसरून आपण या घटनेकडे बघतो. बडोद्याला सध्या रामायणावर संशोधन चालू आहे. माझे प्रवचन ऐकायला ती मंडळी आलेली होती. त्यांच्याशीही मी काही प्रक्षिप्त वाटणाऱ्या भागाबद्दल चर्चा केली. माझी प्रवचने चिकित्सक आणि अभ्यासक वृत्तीने ऐकली जात आहेत, हाच याचा अर्थ आहे; आणि मला त्याबद्दल समाधान आहे.

प्रश्न– या उत्सवात शोभायात्रेचे काय आयोजन आहे.

उत्तर– रामायणातील उत्तरकांड अतिशय दुःखी आहे. मी ते सहसा सांगत नाही. ह्या उत्सवात जनमताला आनंदी ठेवण्याकरिता रामराज्यरोहणाचा कार्यक्रम शेवटच्या दिवशी ठेवलेला आहे. त्या आनंदाच्या वातावरणनिर्मितीकरिता ही शोभायात्रेची योजना केलेली आहे. राज्यभिषेक सोहळा प्रत्यक्ष दाखवून अत्युच्च आनंदात या नवरात्राची अखेर व्हावी, असे मला वाटते.

प्रश्न– या उत्सवात होमहवन कशाकरिता ठेवलं ?

उत्तर– आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे होमहवनाशिवाय कोणत्याच प्रकारची सांगता पूर्ण होत नाही. लग्न, मुंज ही पवित्र धार्मिक कार्येही अग्नीला साक्षी ठेवूनच पूर्ण होतात. रामायणात खुद्द राम व सुग्रीव यांची मैत्री अग्नीला साक्षी ठेवूनच झालेली आहे असे वर्णन आहे. अग्नि स्वयंप्रकाशित आहे. तोच कलिमलाचे दहन करतो. सीताशुद्धि अग्निदिव्यानेच झालेली आहे. असा हा सर्व शुद्ध करणारा अग्नि असल्यामुळेच त्याला साक्षी ठेवून ही

सांगता करण्याचे ठरविले आहे.

प्रश्न– या अन्नदुर्भिक्षाच्या, दुष्काळाच्या दिवसांत आधीच गरजेपेक्षा कितीतरी कमी व महाग धान्य मिळत आहे. आणि अशा वेळी यज्ञसमारंभाला मदत करणं कठीण नाही कां ? यावेळी मोठ्या स्वरूपात यज्ञ कसा करणार ? पुष्कळांना तर हा अन्ननाश वाटेल. आपलं काय मत आहे मावशी ?

उत्तर– लौकिक यज्ञ ज्यावेळी होतात तेव्हा धान्य किती जमलं, पैसे किती जमले, किती दिवस झाला यावर त्या यज्ञाची महती ठरते. पण हा यज्ञ राष्ट्राच्या आपत्ती निवारणार्थ असल्यामुळे याचे महत्व विशेष आहे. हा यज्ञच मुळी सामूहिक आहे. आणि स्वरूपही सार्वजनिक. स्वतःजवळ भरपूर असल्यावर त्यातला एखादा भाग देणे याला त्याग म्हणत नाहीत. स्वतःजवळ मुळातच कमी असताना त्यातील काही भाग संतोषाने देणे यालाच त्याग म्हणतात. हा त्याग करण्याची तयारी नक्कीच बहुसंख्य लोक दाखवतील अशी मला आशा आहे. श्रद्धेने असा त्याग करून यज्ञनारायणाला जर त्याचा हविर्भाग दिला तर त्याचा फायदा जनतेला संकट-निवारणात होईल असा खरोखरीच विश्वास वाटतो. म्हणूनच या यज्ञाच्या निमित्ताने समाजाकडूनच समाजाकरिता धार्मिक कार्य घडणार आहे. यात स्वतःहून उत्साहाने मदत करण्याची तयारी स्त्रीपुरुष दाखवतील याची मला खात्री आहे. स्वतःचाच उत्सव साजरा करण्याकरता ते कां भाग घेणार नाहीत ?

प्रश्न– आपण इतकी वर्षे आपल्या शक्तीनुसार रामायण सांगितले. हे कार्य पुढंही चालू रहावे अशी योजना आपण आखली आहे का ?

उत्तर– ७-८ स्त्रिया असे प्रवचन करू शकतील अशा तऱ्हेने तयार केलेल्या आहेत. एकसूत्रीपणा हेच सर्वांचे वैशिष्ट्य राहील आणि ते अजमावण्याकरिता चक्री रामायणाचे आयोजन केले आहे. यामुळे हे पवित्र कार्य पुढेही चालू राहील, असा विश्वास वाटतो.

अशा प्रकारे रामचरित्र कथनाच्या मावशींनी अंगिकारलेल्या आणि पुन्हा एकदा समाजाचे मन जिंकून त्यांचेकडून महत्त्वाची सेवा रुजू करवून घेणाऱ्या ह्या कार्यक्रमाचे वंदनीय मावशींच्या जीवनात किती महत्वाचे स्थान आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होण्यासारखे आहे.

• • •

# भारतीय स्त्री-रत्नांची स्मारके :१६

राणी लक्ष्मीबाई, देवी अहल्याबाई होळकर आणि राजमाता जिजाबाई या भारतीय स्त्रीजीवनाच्या अनुक्रमे नेतृत्व, कर्तृत्व आणि मातृत्व या महत्वाच्या तीन अंगांचे प्रतिनिधित्व करतात. यामुळे राष्ट्रसेविका समितीच्या विचारसरणीनुसार त्या आदर्श स्त्रिया होत. म्हणूनच त्यांची स्मारके स्थापून त्याद्वारे विविध समाजोपयोगी कार्यक्रम सुरु करावे असा विचार वंदनीय मावशींच्या मनात काही वर्षांपासून होता. या मागे महत्त्वाची ही एक भूमिका होती की या माध्यमाद्वारे अधिकाधिक भगिनींत भारतीय स्त्री–जीवनाच्या गौरवशाली मूल्यांसंबंधी आस्था निर्माण करता येईल व स्वाभाविकच त्यांस कार्यप्रवृत्त करणे सुकर होईल.

प्रथम १९५३ साली मावशींनी वरील विचार आपल्या सहकाऱ्यांसमोर मांडला. १९५८ साली महाराणी लक्ष्मीबाईंच्या निधनाला १०० वर्षे पूर्ण होणार होती. अर्थात हा सुमार त्यांच्या स्मारकाच्या दृष्टीने सर्वतोपरी योग्य असाच होता. समितीच्या सर्वच सेविकांना ही कल्पना पसंत पडली. त्या प्रमाणे १९५४ मधे महाराणी लक्ष्मीबाईंच्या स्मारकाची योजना आखण्यासाठी मावशींनी राष्ट्र सेविका समितीच्या कार्यकर्त्यांची एक बैठक नाशिक येथे आमंत्रित केली. याच वेळी या कार्यानिमित्त इतर अनेक स्त्री संस्थांना सहकार्यासाठी आवाहन करण्यात आले होते. परन्तु ही कल्पना उचलून धरण्याचा उत्साह कोणीच दाखविला नाही. त्यामुळे 'न याल तर तुमच्याशिवाय' या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सिद्धान्ताप्रमाणे समितीनेच हे कार्य पार पाडावे असे ठरले.

दोन प्रकारे हे कार्य करावे असे ठरले. जेथे शक्य असेल तेथे प्रत्यक्ष रीत्या राष्ट्र सेविका समितीनेच पुढाकार घेऊन राणींचे स्मारक स्थापावे व जेथे हे शक्य नसेल तेथे इतर सामाजिक संस्थांना अगर समाजात कार्य करणाऱ्या स्त्री–पुरुषांना शक्य ते जास्तीत जास्त सहकार्य द्यावयाचे. राष्ट्र सेविका समिती तर्फे किमानपक्षी नाशिक येथे एक मध्यवर्ति स्मारक १९५८ मध्ये स्थापन करावयाचे हा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

नाशिक येथील प्रमुख स्मारक स्थापन करण्यापूर्वी ठरल्या प्रमाणे, वर्धा या आपल्या स्वतःच्या गावी, अर्थात समितीच्या केंद्रस्थानी, राणींचे स्मारक करण्याचा मावशींनी निर्णय घेतला. त्याप्रमाणे १८५७ स्वातंत्र्यसमराच्या शताब्दि वर्षात, १९५७ च्या नोव्हेंबर मध्ये राणींच्या जन्मदिनी त्यांच्या पुतळ्याचे वर्धा येथे अनावरण करावयाचे ठरले. वर्धा येथे झालेल्या या स्मारकाचा इतिहास जितका विचित्र अनुभवांनी परिपूर्ण तितकाच मार्गदर्शकही असल्याने वाचकांना तो वाचनीय वाटेल.

योजनेप्रमाणे खामगाव येथील प्रसिद्ध शिल्पकार पंधे गुरूजी यांना राणीच्या अर्ध पुतळ्याची निर्मिती करण्यास सांगण्यात आले. इतर सर्वच गोष्टी सुरळीत सुरू होत्या. स्वातंत्र्य--युद्धाचे शताब्दि वर्ष असल्याने वर्धा गांवात एकंदर उत्साहाचे वातावरण होते. त्यामुळे मदत मिळाली नाही तरी निदान कोणाकडून विरोध होईल अशी शंकाही येण्याचे कारण नव्हते. तथापि एकाएकी जर मनुष्य स्वभावात सुयोग्य बदल घडून आला तर मग विचित्रपणा हा मनुष्यस्वभावाचा एक स्थायीभाव दुर्मिळच होईल !

त्याचे असे झाले की राणींच्या पुतळ्याची योजना वर्धा नगरीच्या सर्व राजकीय विचाराच्या लोकांनी प्रथम उचलून धरली. परन्तु शहराच्या मध्यवर्ति अशा महत्वाच्या चौकात अगर जागी त्याची स्थापना व्हावी हा विचार मावशींनी समोर मांडला तेव्हा एकेकाच्या उत्साहाचा भर ओसरत आहे असा अनुभव आला. शहरातील काही महत्वाच्या जागांबद्दल मावशींनी सूचना करताच कोणी म्हणू लागले ही जागा तर महात्माजींच्या पुतळ्यासाठी, ती तर जमनालालजींच्या पुतळ्यासाठी, आणि तिसरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी राखून ठेवली आहे. सहकार्याऐवजी आता विरोधाचे वारे वाहू लागले. ठराविक जागा राणींच्या पुतळ्यासाठी मिळू द्यावयाच्याच नाहीत असाही काहींनी निश्चय केल्याचे दिसले.

वरील सर्व प्रकार लक्षात येताच आपल्याच विचारांच्या काही पुरुष मंडळींना भेटून जागा निश्चितीच्या कामी मावशींनी त्यांची मदत मागितली. कारण सार्वजनिक जागी पुतळा बसवावयाचा म्हणजे नगरपालिका आणि सरकार या दोघांचीही संमती आवश्यकच होती. व दोन्ही क्षेत्रांत असहकारच अधिक अपेक्षित होता. कार्यक्रमाचा दिनांक केवळ चार दिवसांवर येऊन ठेपल्यानंतरही पाहिजे ती जागा निश्चित होऊ शकली नव्हती. मदतीसाठी ज्या बंधूकडे मावशी गेल्या होत्या त्यांनी मदत करण्याचे तर दूरच राहो परंतु तेच उलट मावशींना मध्यवर्ती जागेबद्दल आग्रह सोडून द्या असा सल्ला देऊ लागले. एका हित-चिंतकानेतर राममंदिराच्या बंदिस्त आवारातील एक कोपरा आपण ताबडतोब मिळवून देऊ असेहि सांगितले.

ब्रिटिश साम्राज्याचे बलाढ्य गगनचुंबी बांध जी लीलया उल्लंघून गेली तिच्या मूर्तीची

स्थापना कुठे तर म्हणे बंदिस्त आवाराच्या एका कोपऱ्यात ! स्वतःच्या दुर्बलतेपायी आम्ही आमच्या राष्ट्रपुरुषांचीही अवहेलना करू शकतो हे यावरून स्पष्ट दिसते.

आता कार्यक्रम फक्त दोन दिवसांवर आला ! मावशींसमोर एकच पर्याय उरला. तो म्हणजे राममंदिराच्या कोपऱ्यातील जागेस स्वीकृति कळविण्याचा !! मावशींच्या मनाची अवस्थता प्रस्तुत लेखकाला क्षणोक्षणी जाणवत होती. काही झाले तरी एका कोपऱ्यात राणींच्या पुतळ्याची स्थापना होऊ नये असे मलाही वाटत होते. अशा विचित्र परिस्थितीत केवळ दैवयोगाने एक महत्वाची घटना अचानक घडली. त्याचे असे झाले की, वर्धेचे कलेक्टर एकाएकी रजेवर गेले आणि त्यांच्या जागी डेप्युटी कलेक्टर पदी असलेल्या श्री. सप्रे यांची नियुक्ति झाली. श्री सप्रे यांना राणी लक्ष्मीबाईच्या बद्दल नितांत आदर असल्याच आम्हास माहीत होते. वृत्त कळताच वंदनीय मावशी, सौ. माई नागले आणि सौ. कालिंदीताई बापट सप्रे ह्यांच्या भेटीस गेल्या व त्यांना सर्व परिस्थिती समजाऊन सांगितली. 'कार्यक्रमापूर्वी स्टेशनजवळच्या चौकातील जागेची परवानगी आपल्या हाती मिळेल अशी व्यवस्था करतो. आपण त्या प्रमाणे पूर्वतयारीस लागा,' या शब्दांत सप्रे यांनी त्याच भेटीत मावशींना अभिवचन दिले आणि ठरलेल्या ठिकाणी राणी लक्ष्मीबाईंची प्रतिमा समारंभपूर्वक प्रस्थापित करण्यात आली.

वर्धा येथील कार्यक्रमाच्या सुमारासच नाशिक येथील भव्य स्मारकासाठी निधी जमा करण्याचे कार्य देशभर चालू झालेले होते. त्यासाठी राणी लक्ष्मीबाई स्मारक समिती नामक एक वेगळी संस्था निर्माण करून तिचे पंजीयन करण्यात आले. या संस्थेच्या कार्यकारणीत वंदनीय मावशींशिवाय सौ. जान्हवीबाई मोडक नाशिक, सौ. बकुलताई देवकुळे मुंबई, श्रीमती अन्नपूर्णाबाई रानडे सांगली, श्री. राजाभाऊ साठे वकील नाशिक, श्री. काशीनाथपंत लिमये सांगली, खासदार उत्तमराव पाटील धुळे आणि राणींच्या कुटुंबातील एक वंशज नागपूरचे डॉ. एकनाथ गोविंद तांबे या व्यक्ति होत्या.

पूर्वयोजनेप्रमाणे नाशिक येथे आग्रारोडवर, गोळे वसाहतीत सुमारे १२०० चौरस वार जागा त्यावरील दोन इमारतींसकट विकत घेण्यात आली. या जागेचा उपयोग गृहिणी विद्यालय, अनाथांचे संगोपन, बालशिक्षण, साक्षरताप्रसार आदि समाजोपयोगी कार्यासाठी करावयाचा असे ठरले. स्मारकाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम म्हणून दि. २४ मे १९५८ रोजी, म्हणजे त्यांच्या शतसांवत्सरिक स्मृतिदिनाचे दिवशी, ज्येष्ठ षष्ठीला महाराणी लक्ष्मीबाईंच्या पुतळ्याचे तेथे उद्घाटन करावयाचे असेही ठरले.

दिनांक २३, २४ व २५ मे असा तीन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम ठरला. कार्यक्रमापूर्वी सुमारे आठवडाभरापासूनच ठिकठिकाणच्या कार्यकर्त्या नाशिकला गेल्या होत्या.

कार्यक्रमासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजराथ, सिंध, आंध्र आदि प्रदेशांतून ३०० च्या वर सेविका मुद्दाम कार्यक्रमासाठी आल्या होत्या.

दिनांक २३ मे रोजी पंडित श्री. दा. सातवळेकर यांचे हस्ते 'सेविका' वार्षिकाच्या लक्ष्मीबाई विशेषांकाचे प्रकाशन संपन्न झाले. या प्रसंगीच्या भाषणात सातवळेकरांनी राष्ट्र सेविका समितीच्या कार्याचा गौरव करून सांगितले की, 'अबला म्हणजे जिच्या बलास तुलना नाही अशी स्त्री ! आपणात शक्ती असल्याचे स्त्रियांनी आता सिद्ध केले आहे. प्राचीन संस्कृतीत स्त्रीला अबला समजत नसत. हल्ली शस्त्राभावी स्त्री अबला ठरत आहे. ह्याला कारण म्हणजे चुकीची शिक्षणपद्धति ! शरीर, बुद्धि व आत्मा यांना घडविते, विकसित करते तेच खरे शिक्षण !"

याच दिनांकाला रात्री नागपूरचे प्रसिद्ध गायक शरद मुठे यांच्या पोवाड्यांचा कार्यक्रम झाला.

दिनांक २४ ला सकाळी राणी लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेची नाशिक शहरातून मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी रुंठा हायस्कूलमध्ये भरविलेल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रदर्शनाचे आणि पुतळयाचे अनावरण हे दोन प्रमुख कार्यक्रम होते. प्रदर्शनाचे उद्घाटन त्यावेळच्या मध्यप्रदेशाचे आरोग्यमंत्री कै. मा. सा. कन्नमवार यांनी केले. यानंतर राणी लक्ष्मी भवनात साताऱ्च्या राणीसाहेब श्रीमंत छत्रपति सुमित्राराजे भोसले यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले.

या महोत्सवाच्या यशचिंतनानिमित्त राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, जगद्गुरु शंकराचार्य, गोळवलकर गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, यशवंतराव चव्हाण आदिंचे संदेश आले होते.

राणी लक्ष्मीबाईंच्या वंशातील सौ. सुमन तांबे यांचे प्रथम अभिनंदन करून या शुभ प्रसंगीच्या आपल्या भाषणात मावशी म्हणाल्या, "हे स्मारक निर्माण करण्यामागे जनतेचीच तीव्र इच्छा प्रामुख्याने कारणीभूत होती. राष्ट्रसेविका समितीच्या योजनेनुसार सेविकांनी पुढाकार घेऊन आणि अखंड परिश्रम करून कल्पनेला मूर्त स्वरूप दिले आहे. राणी लक्ष्मीबाई स्त्री-शक्तीची मूर्ति होत. स्त्री-शक्ति ही प्रामुख्याने निर्माण आणि संवर्धनशक्ति होय. तथापि आवश्यकतेनुसार ती संहारक शक्तीही आहे, ही गोष्ट लक्ष्मीबाईंच्या जीवनावरून शिकण्यासारखी आहे"

राणी लक्ष्मीबाई भवनाच्या प्रमुख वास्तु समोरील भवनास देवी अहल्याबाईंचे नांव देण्यात आले असून या स्मारकाचा उपयोग विविध समाजोपयोगी कार्यासाठी होत आहे. या स्मारकाचा एक ट्रस्ट असून वंदनीय मावशी त्याच्या प्रमुख आहेत.

नाशिक आणि वर्धा येथील पुतळ्या व्यतिरिक्त नागपूर येथे महानगरपालिकेने राणी लक्ष्मीबाईंचा जो भव्य अश्वारुढ पुतळा उभारला आहे त्याचे बरेच श्रेय राणी लक्ष्मीबाई स्मारक समितीच्या नागपूर शाखेस द्यावे लागेल. कारण महानगरपालिकेकडून हे कार्य करवून घेण्यासाठी आरंभीपासून शेवटपर्यंत त्यांचेच कार्यकर्ते प्रयत्नशील होते. नागपूर प्रमाणेच भंडारा येथेही लक्ष्मीबाईंचा पुतळा उभारण्यात आलेला आहे.

केवळ वास्तु अथवा पुतळे उभारूनच स्मारके करता येतात असे नाही. आणखी एका वेगळ्या प्रकारे वंदनीय मावशींनी राणी लक्ष्मीबाईंच्या स्मारकाची योजना आखली, ती अशी–

१९५७ च्या आरंभी पुण्यास मुक्काम असता श्रीमती आक्का चितळे यांचेकडून मावशींना कळले की, तेथे श्री. मनोहरराव सबनीस नांवाचे गृहस्थ आपल्या ‘ संगीत भजन मंदिर ’ नामक संस्थेमार्फत शास्त्रोक्त भजन म्हणण्याचे वर्ग चालवितात व हा फायदा स्त्रियांनाही मिळतो.

भजन ही कला संस्काराचे आणि प्रचाराचे उत्कृष्ट माध्यम असल्याने तिची पूर्ववत उपासना होणे जरूर आहे, हा विचार मावशींच्या मनात बरेच दिवसापासून होता. शिवाय राष्ट्र-सेविका समितीच्या कार्याला ती पूरक ठरू शकेल हा विचारही प्रामुख्याने होताच. लगेच श्रीमती आक्का चितळे यांच्या समवेत मावशींनी सबनीसांच्या भजनवर्गाला भेट दिली. त्यांची भजनपद्धती योग्य वाटल्याने मावशींनी श्री. सबनीसांना म्हटले, “ नागपूरच्या सेविकांना भजन शिकवायला केव्हा येऊ शकाल ? ”

श्री. सबनीस यावेळी सरकारी नोकरीत असल्याने नागपुरास जाऊन वर्ग घेण्याची मावशींची विनंती त्यांना लगेच स्वीकारता आली नाही. परंतु योग असा की वंदनीय मावशींची इच्छाशक्ती प्रबळ असल्यामुळेच की काय सबनीसांनी त्याच वर्षी स्वखुशीने नोकरीचा राजीनामा दिला आणि मोठ्या प्रमाणावर भजनाचे वर्ग चालविण्याचे ठरविले. राजीनामा दिल्यानंतर पहिले पत्र त्यांनी मावशींनाच लिहिले व वर्ग चालविण्यासाठी नागपुरास येण्याची तयारी दर्शविली. मावशींनी लगेच व्यवस्था करवून १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यात प्रारंभिक स्वरूपाचा वर्ग घडवून आणला. त्यानंतर १९५८ पासून नियमित रीत्या श्री सबनीसांनी नागपूर येथे वर्ग घेतले.

“ जेव्हा मावशींनी स्वतः विद्यार्थिनी म्हणून माझ्या वर्गात नांव दाखल केले तेव्हा माझ्या आईलाच भजन शिकविण्याइतका आनंद मला झाला ”, असे श्री. सबनीस आपल्या पत्रात म्हणतात.

भजनाचे वर्ग नीट सुरू होऊन अधिकाधिक भगिनी त्याकडे आकृष्ट होत आहेत असे दिसताच राणी लक्ष्मीबाईच्याच नांवाने भजन मंडळ चालावे व त्याची जबाबदारी एखाद्या सुयोग्य व्यक्तीवर टाकावी या हेतूने श्री. सबनीसांच्या सल्ल्याने मावशींनी श्रीमती सुशिलाबाई तथा माई मराठे यांच्यावर ही जबाबदारी सोपविली. श्रीमती माईंनी १९७२ आरंभी म्हणजे आपल्या मृत्युपर्यंत, ही जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली. त्यांच्या मृत्यूनंतर सौ. वहिनी गोखले, सौ. विमलताई जोशी, सौ. नलिनीताई काणे, सौ. लीलाताई कुळकर्णी, श्रीमती आक्का सोमण आदि अनेक भगिनींनी हे कार्य उत्तम प्रकारे पुढे चालविले आहे.

समिती–कार्याला राणी लक्ष्मीबाई भजन मंडळाचे कार्यक्रम बरेच पूरक ठरले आहेत. सुशिक्षित, अशिक्षित, तरुण, प्रौढ आणि वृद्ध आदि सर्वच प्रकारच्या भगिनींना भजनवर्गाचे आकर्षण वाटते. चीन आक्रमणाचे वेळी जेव्हा ठिकठिकाणच्या महिलांना संघटित करण्याची आवश्यकता जाणवू लागली तेव्हा या भजनवर्गांचा फार उपयोग झाला.

आता दरवर्षी भजनवर्ग घेण्यासाठी राणी लक्ष्मीबाई भजन मंडळाच्या भगिनी नागपुराहून ठिकठिकाणी जातात. त्यामुळे या संस्थेचाही कार्यवृक्ष बराच फोफावला आहे.

**देवी अहल्या मंदिर, नागपूर**

१९६४ मधे सेविकांच्या इच्छेनुसार वंदनीय मावशींच्या ६१ व्या वाढदिवसाप्रित्यर्थ नागपूर येथे मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम झाला. त्यावेळी त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य सेविकांनी तसेच त्यांच्या अनेक हितचिंतकांनी मावशींना एक थैली अर्पण केली, या पैशातून देवी अहल्याबाईंचे स्मारक व्हावे अशी इच्छा मावशींनी व्यक्त केली. त्याप्रमाणे नागपूरच्या घन्तोली या मध्यवर्ति भागात नागपूर विद्यापीठाची मालकी असलेली एक भव्य वास्तु विकत घेण्यात आली व अहल्यामंदिर हे नांव तिला देण्यात आले.

वास्तु खरेदीसाठी कमी पडलेली रक्कम वंदनीय मावशींनी प्रथम आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर कर्ज उभारून पुरी केली, नंतर कर्जाऊ रक्कम आपल्या रामायण प्रवचनांचे वेळी जमलेल्या निधीतून परतफेड केली.

एखादा मोठा व्यवहार करतांना आवश्यक असणारी धडाडी, योजकता आणि दृढता मावशींचे ठिकाणी पूरेपूर आहे हे यावरून लक्षात येण्यासारखे आहे.

अहल्या मंदिराच्या विस्तृत जागेत बालकमंदिर, बालसांस्कृतिक वर्ग, उद्योगमंदिर, प्रवचने, व्याख्यानमाला, किर्तने आदि समाजोपयोगी कार्यक्रम नियमितरीत्या तर चालतातच परन्तु व्यवहारीदृष्ट्याही ही स्मारक–योजना यशस्वी व्हावी म्हणून जागेचा काही भाग मंगल कार्यासाठी भाड्याने देण्यात येतो. अहल्यामंदिर मंगल कार्यालयाचा आरंभ आमच्याच

कुटुंबातील एका लग्नप्रसंगाने करून मावशींनी त्याला चालना दिली. सौ. नलिनीताई काणे यांच्या देखरेखीखाली हे कार्यही आता उत्तम प्रकारे चालू आहे.

**जिजामाता स्मारक, मुंबई**

राष्ट्र-सेविका समितीच्या मुंबईतील हजारो सेविकांनी परिश्रमपूर्वक घरोघर हिंडून, जिजामाता स्मारकासाठी एक लाख रुपयांचा निधी जमवून तो राष्ट्रमाता जिजाबाई ट्रस्टच्या स्वाधीन केला. या निधीतून ट्रस्टने ठाणे येथे जिजामाता स्मारकाची भव्य इमारत बांधलेली आहे.

दि. ३० एप्रिल १९७२ रोजी वंदनीय मावशींच्या हस्ते या स्मारकाचे उद्घाटन झाले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण मंत्री सौ. प्रतिभा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या वास्तूत बालमंदिर, उद्योगमंदिर आणि मुलींचे वसतीगृह आदि उपक्रम चालू आहेत.

१९७० साली राष्ट्रपती वराहगिरी व्यंकटगिरी यांनी दिल्लीत छत्रपति शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करताना " शिवाजी महाराजांसारखा महान युगपुरुष बनविण्याची किमया मातोश्री जिजाबाईची आहे, " असे उद्गार काढले. यामुळे विशेष प्रेरणा मिळून, शिवाय मावशींच्या प्रोत्साहनामुळे, समितीच्या उत्तर विभाग प्रमुख श्रीमती सिंधुताई फाटक यांनी दिल्लीतही जिजामातेचे स्मारक उभारले आहे. त्यात झोपडपट्टीतील मुलांसाठी बालमंदिर आणि प्राथमिक शाळा सुरु करण्यात आलेली आहे.

**देवी अष्टभुजा मंदिर, वर्धा**

स्त्री अबला नसून सबला आहे या वैचारिक सिद्धांताचे प्रतीक म्हणून वंदनीय मावशींनी अष्टभुजा देवीला आराध्य दैवत मानले हे मागेच सांगितले आहे. वर्धा येथे मध्यवर्ती असे देवीचे एकही मंदिर नाही ही गोष्ट मावशींना नेहमीच जाणवत असे. ही कमतरता दूर करावी याही उद्देशाने त्यांनी वर्धेस अष्टभुजा देवीच्या मंदिराची निर्मिती करण्याचा निश्चय केला.

प्रथम योग्य अशा जागेचा प्रश्न होता. तो हैद्राबाद येथील सौ. नलिनीताई हरदास आणि त्यांचे पति श्री. गोविंदराव हरदास यांच्या देणगीमुळे सुटला. श्री. हरदास यांची वडिलोपार्जित मध्यवर्ति अशी मोकळी जागा वर्धेस होती. सौ. नलिनीताईंना मावशींच्या कार्यासंबंधी विशेष आस्था असल्याने पुढाकार घेऊन त्यांनी आपले श्वशुर कै. नारायणराव हरदास यांच्या नांवाने तिचे अष्टभुजेच्या मंदिरासाठी दान केले.

सौ. नलिनीताई हरदास आपल्या पत्रात लिहितात: " वर्धा सोडून हैद्राबादला रहाव-

यास आल्यानंतर १४ वर्षे समितीचा प्रत्यक्ष संबंध तुटला होता. तरी वंदनीय मावशींचा संक्रांतीचा संदेश व ' सेविका ' चा अंक न चुकता येत असे.

' माझ्या दृष्टीने हैद्राबादचे वातावरण समितीला प्रतिकूल होते. पण मावशींचा दृष्टीकोन नेहमीच आशादायक असे. स्वतः आणि इतर सेविकांमार्फत त्यांनी संबंध कायम ठेवले. त्यामुळे १९६६ साली पुण्याच्या मेळाव्यासाठी मी गेले त्यावेळी मावशींच्या सहवासाने मी विशेष भारली गेले. सध्या पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात समितीसेवा वडत आहे.

' अष्टभुजेच्या मंदिरासाठी जागेचा प्रश्न कानावर येताच त्यासाठी वर्धेच्या आमच्या जागेचे दान देण्याची कल्पना मी सर्वांसमोर मांडली. सर्व कुटुंबियांनी या कल्पनेला आनंदाने मान्यता दिली.

आज समितीच्या जन्मगांवी स्वतःची वास्तु झाली आणि आशिर्वादासाठी अष्टभुजा देवी तेथे अवतरली. हे सर्व वंदनीय मावशींच्या आशिर्वादाचे फळ ! ''

या जागेत एक मोठे सभागृह असून अष्टभुजेचे मंदिर वेगळे बांधण्यात आले आहे. २० नोव्हेंबर १९७२ रोजी धार्मिक–विधीच्या सोहळ्यासह जयपूर येथे घडविलेल्या मूर्तिंची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

मंदिरासाठी लागलेला सर्व खर्च मावशी व सेविकांनी एकत्र केलेल्या निधीतून झालेला आहे. या ठिकाणी राष्ट्र-सेविका समितीचे कार्यक्रम होत असतात. मंदिराची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी सौ. वसुन्धराबाई हरदास यांच्याकडे सोपविलेली आहे.

• • •

# कौटुंबिक जीवनाचा एक अध्याय : १७

१९५७ ते १९५९ ही वर्षे वंदनीय मावशींच्या व्यक्तिगत जीवनातील, एक प्रकारे, अत्यंत कटकटीची वर्षे म्हणता येतील. त्यांच्या कौटुंबिक जीवनातील कटकटींचा सार्वजनिक ऊहापोह फार तपशिलात न शिरता, एवढ्यासाठी आवश्यक वाटतो की एकतर प्रस्तुत ग्रंथ त्यांचा जीवनेतिहासच आहे; आणि दुसरे म्हणजे समाजात काम करणाऱ्या व्यक्तींना कित्येकदा किती विपरित वैयक्तिक परिस्थितीत काम करावे लागते याची थोडी तरी कल्पना सर्वसाधारण वाचकांना असावी असे वाटते.

आमची ज्येष्ठ भगिनी सौ. वत्सला चोळकर ही आम्हा सर्व भावंडांप्रमाणेच मावशीं-चेही 'मन मोकळे करण्याचे स्थान'! उल्लेखित कालखंडात सौ. वत्सलाताईला मावशींनी जी पत्रे लिहिली त्यांचा काही अंश येथे दिल्यास मी उल्लेखिलेल्या विचित्र परिस्थितीची पुरेशी कल्पना येईल.

वंदनीय मावशी आपल्या पत्रात म्हणतात :

"चि. कमलाकरला लग्नाच्या बाबतीत म्हणून पाहिले, पण तो नाही म्हणत आहे. तरी आता या बाबतीत तूच त्याला पत्र पाठवून बघ.

'आज तुला एक खेदजनक गोष्ट कळवावी लागत आहे. सध्या मिनिमम वेजेस ॲक्टमुळे छपाईच्या धंद्यात बऱ्याच कटकटी निर्माण झाल्यामुळे चि. दिनकरला त्याचा प्रेस विकणे भाग पडून, तो त्याने नागपूर येथील एका गृहस्थास विकलाही! अत्यंत उमेदीने सुरू केलेल्या व्यवसायाचा शेवट असा व्हावा ही घटना फारच खेदजनक आहे.

'सध्या आपल्या कुटुंबाची सर्वच घडी मोठी विस्कळीत झालेली आहे. केव्हा स्थैर्य येईल ते खरे! एकंदर माझ्या जीवनात सुख आणि समाधानाच्या दिवसांपेक्षा विवंचनेचेच दिवस अधिक आलेले आहेत. परन्तु कोणतीही गोष्ट मनाला लावून घेऊन रडत बसा-

वयाचे नाही हा स्वभाव असल्यामुळे एकेक पाऊल रेटगे सुरू आहे. याचा एखादेवेळी फारच परिणाम होतो.

'नाशिक येथील राणी लक्ष्मीबाईच्या स्मारकाचा सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. मनावरचे एक ओझे कमी झाले. सगळयांनी माझे अभिनंदन केले. परन्तु मनात असा विचार आला की जरी लोकांना माझे अभिनंदन करावेसे वाटले तरी सध्या घरात किती उलट परिस्थिति आहे ! आणि या विचारासरशी मला जोराने घेरी आली व बराच वेळ मी शुद्धीवर नव्हते. अर्थात, आता माझी प्रकृती उत्तम आहे. काळजी करू नये. मन केव्हातरी कच खाते एवढेच !

* * * *

'यंदा सर्वच बाजूने दिवस कठीण झाले आहेत. तुला आठवत असेल चि दिलीपच्या मुंजीच्या वेळेस ती. काकूंची मैत्रीण आली असता म्हणाली होती लक्ष्मीबाई, तुमचा संसार कसा दृष्ट लागण्यासारखा आहे. परन्तु यामुळे आनंद होण्याऐवजी मनाला फार लागले. कारण वस्तुतः ते खरे नव्हते. आपल्या कुटुंबात प्रवेश केल्यानंतर वडील-कीच्या नात्याने जिने अभिमानपूर्वक सर्वांकडे लक्ष द्यावयाचे तीच कुटुंबाच्या विघटनाचे कारण होऊ पाहत आहे.

'एकेकाचा योगच असा असतो की त्याला मनःस्वास्थ्य लाभत नाही. माझाही योग तसाच आहे. पण हताश न होता कर्तव्य बजावण्याचे माझ्या आई--वडिलांनी शिक्षण दिलेले असल्यामुळे तात्पुरती निराशा वाटते व मन पुन्हा उद्योगात गुंतते. माझ्या पत्राने कदाचित् तुझ्या मनाला त्रास होईल. पण कोणाजवळ तरी मन खुले केले की तेवढेच बरे वाटते.

'माझ्या जीवननाटकाचा तिसरा अंक सध्या चालू असून अजून दोन अंक व्हावयाचे आहेत. ईश्वराने पुढे कायकाय वाढून ठेवले आहे हे त्याचे त्यालाच माहित. असो. सेविकेच्या अंकाबद्दल मत कळले. समितीच्या वर्गासाठी तुझ्या मुलांचे लहानपणचे काही खेळ व पुस्तके, जी आज त्यांना निरुपयोगी असतील, अशी कोणाबरोबर पाठविता आल्यास पाठवावीत.

* * * *

'मी रविवारी पुन्हा नाशिकला जात आहे. कारण अजून तेथील हिशोब होणे आहेत. दहा हजार कर्ज झाले आहे. तो बोजा कमी होईपर्यंत मनाला स्वस्थता लाभणार नाही.

'मी जून अखेर वर्धा येथे जाईन. ति. काकूही जून अखेरच वर्धेस परत जाऊ शकतील. तरी आम्ही येईपर्यंत त्याच्या मुलांनी वर्धेस राहावे असा निरोप चि. बापूस सांगावा. कारण काकू आता ३ वर्षांनी माहेरी गेल्या आहेत व पुढे २।३ वर्षे तरी जाणार नाहीत; व माझ्यावर असलेली जबाबदारी तुम्ही जाणताच. हिशोब झाल्यावर पुढे काम काय सुरू करावयाचे ह्याचा विचार व योजना होणे जरूर आहे. मन दोन्हीकडे ओढल्या जाते. मुलांची जशी नैसर्गिक जबाबदारी आहे त्याचप्रमाणे आज २२ वर्षे ज्या संघटनेचे काम जबाबदारीने केले तेही एकदम झुगारून देता येत नाही. वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत मी ही जबाबदारी सोडणार नाही, हे ज्यावेळी मी ठरवले त्यावेळी अशा काहीही अडचणी नव्हत्या.

'मला वाटते अडचणी निर्माण करून दैव माझी परीक्षाच पाहात आहे. तरी चि. बापूला तसे सांगावे व मुलांची समजूत घालून मी येईपर्यंत नागपूर ऐवजी त्यांना वर्धेस ठेवावे.

उल्लेखित मजकुराशी संबधित घटनात आमच्या कुटुंबात घडलेली घटस्फोटाची घटना प्रमुख म्हणावी लागेल. या घटनेने मावशींना झालेला मनस्ताप अधिक तीव्र होण्याचे कारण म्हणजे समाजातील काही व्यक्तींकडून झालेली बेजबाबदार टीका हे होय. वस्तुतः या सुमारापर्यंत आम्हा सर्वच भावंडाची शिक्षणे व लग्ने या संबंधीची त्यांची बहुतांश जबाबदारी मावशींनी उत्तम प्रकारे पार पाडली होती. त्यामुळे त्यांनी कुटुंबातील जबाबदारीतून स्वतःस पूर्णपणे मोकळे करून घेतले असते तरी मुळीच वावगे ठरण्यासारखे नव्हते. तथापि, आता तशी मुळीच आवश्यकता नसताही, सध्याच्या घटकेपर्यंत त्यांनी स्वतःकडून तरी ही जबाबदारी बाजूला सारलेली नाही. म्हणूनच आम्ही त्यांची मुले, स्वतःला दैववान समजतो.

"मावशी आपल्या प्रवचनातून सीतेचा आदर्श समोर ठेवतात मग त्यांच्याच स्वतःच्या कुटुंबात घटस्फोटाची घटना कशी घडली ?" या आणि अशा स्वरूपाच्या इतर प्रश्नांची चर्चा त्या सुमारास आमच्या कानावर बरीच आली. वस्तुतः ही चर्चा अत्यंत फोल, गैरवाजवी आणि द्वेषमूलक असल्याने त्याचा अनुल्लेखच योग्य ठरता ! परन्तु, कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने जर वडीलधाऱ्या माणसाचा उपदेश न ऐकता त्या विरुद्ध वर्तन केले तर त्यामुळे त्या वडीलधाऱ्या माणसाचा उपदेश करण्याचा हक्क जातो काय ? एवढाच प्रतिप्रश्न करून ही चर्चा येथेच थांबवितो.

सार्वजनिक जीवनात पदार्पण केले की अर्थातच वैयक्तिक जीवन व सार्वजनिक जीवन यांतील जबाबदाऱ्या व कर्तव्ये यात क्वचित संघर्ष निर्माण होतो. परिणामतः दोन्ही क्षेत्रात

गैरसमजूत होण्याचा प्रसंग येतो. मावशींचे बाबतीत असे बरेचदा घडले आहे. काही प्रसंगी घरातील जबाबदारी बाजूला सारून सार्वजनिक जबाबदारीकडे त्यांना लक्ष द्यावे लागले. यामुळे त्यांना बरीच मानसिक ओढाताण सहन करावी लागली आहे. क्वचित प्रसंगी विरोध, गैरसमजूत व एखाद दुसऱ्या व्यक्तीकडून शत्रुत्व सुद्धा त्यांना सहन करावे लागले आहे, पण एकदा निर्णय घेतल्यानंतर त्यानुसार निर्भिडपणे आणि शांततेने त्या पावले टाकीत आल्या आहेत. वस्तुतः त्यांचा स्वभाव मुळात शांत नाही. परन्तु संयम आणि निश्चय हे दोन गुण जोडीस असल्याने अगदि प्रक्षोभक परिस्थितीतही त्या ध्यानस्थ व्यक्ती इतक्या शांत राहिल्याचा आमचा अनुभव आहे.

कौटुंबिक अडचणींना महत्व दिले पाहिजे असा निर्णय ज्यावेळी त्यांनी घेतला तेव्हा संसाराचीच जबाबदारी त्यांनी कणखरपणे पाळली आहे. तथापि दोन्ही क्षेत्रात अत्यंत महत्वाची व पुढारीपणाचीच भूमिका त्यांना करावी लागल्यामुळे दोन्ही ठिकाणी क्वचित प्रसंगी त्यांना विरोध सहन करावा लागला. परन्तु त्यामुळे मनाला क्लेश झाले तरी खंबीरपणे ते दडपून कर्तव्यतत्पर राहण्याची त्यांची हातोटी विशेष उल्लेखनीय वाटते; किंबहुना त्यातच त्यांचे स्वभाववैशिष्ट्य आहे.

आजही आमचे केळकर कुटुंब बरेच मोठे आहे. आम्ही सात भावंडे व आमची कुटुंबे याशिवाय त्यांच्या ९।१० चुलत दीरांची व तेवढ्याच नणंदांची कुटुंबे एवढा मोठा हा परिवार आहे. अर्थात हा परिवार ठिकठिकाणी विखुरलेला आहे. तथापि एखादा अपवाद सोडल्यास या सर्वांशीच मावशींचे अत्यंत सलोख्याचे संबंध आहेत. या सर्वांच्याच कुटुंबात मावशींना एक विशेष स्थान आहे. मोठ्या सार्वजनिक व्यापातूनही वेळ काढून त्यांचेशी संबंध कायम ठेवण्याचा प्रयत्न करणे, आपल्या कार्यासाठी त्यांचे सहाय्य मागणे, आवश्यकतेनुसार यथाशक्ति त्यांनाही आपले सहाय्य देणे या गोष्टींची मावशींनी कटाक्षाने जोपासना केलेली असल्यामुळे त्यांना हे कौटुंबिक यश मिळालेले आहे.

आपल्या माहेरच्या मन्डळींच्या कुटुम्बातही मावशींना असेच महत्वाचे स्थान आहे. आपल्या भगिनी आणि त्यांची मुले, बंधू आणि त्यांची मुले यांच्या कुटुंबातही त्यांचे वरचेवर जाणेयेणे होत असते.

मावशींच्या वरील स्वभाववैशिष्ट्यामुळे त्यांना बरेच वेळा वरीलपैकी काहींच्या कौटुंबिक प्रसंगात पुढाकार घ्यावा लागला आहे. अशावेळी कधीकधी अपेक्षेपेक्षा वेगळेच घडल्याने दोष किंवा वाईटपणाही त्यांच्या पदरी पडला आहे. परन्तु त्यामुळे न डगमगता त्यांनी आपल्यास योग्य वाटते त्याची कास कधीच सोडलेली नाही.

आमच्या एका मावसबहिणीचे लग्न जमविण्याची संपूर्ण जबाबदारी मावशींकडेच आली. म्हणून एक उत्तमपैकी स्थळ त्यांनी तिच्यासाठी निवडले. विवाहाची बोलणी जवळ–पास पूर्ण झाली असताच मुलाच्या प्रकृतिसंबंधी, चिंताजनक असे खात्रीलायक वृत्त कळल्यावरून त्यांच्यावर नकार देण्याची पाळी आली. आता मोठीच पंचाईत झाली. तथापि 'दुसऱ्याची मुलगी असल्याने जास्त जबाबदारी वाटते व अशा परिस्थितीत माझ्या जागी आपण असतात तर काय केले असते ?' हा प्रश्न मावशींनी मुलाच्या वडिलांना केल्यानंतर कळलेली माहिती खोटी आहे हे नाकबूल करणे शक्य नसताही, मुलाचे वडिल मावशींवर जवळजवळ चवताळूनच आले. तथापि मोठ्या खंबीरपणे त्यांनी प्रसंगास तोंड देऊन आपले कर्तव्य चोखपणे बजावले.

अशाप्रकारे वाईटपणा वाट्याला येण्याचे बरेच प्रसंग मावशींच्या जीवनात आले आहेत. पुढाकार घेऊन काही करावयाचे म्हणजे क्वचित असे अनुभव येणारच, या जाणीवे-मुळे हा सर्व कटु प्रकार आता त्यांच्या अंगवळणी पडला आहे.

मावशींच्या कौटुंबिक जीवनाचाही अध्याय बराच प्रसंगप्रचुर, उद्बोधक आणि मोठा आहे. तथापि त्यापेक्षा त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या अध्यायाचे विशेष महत्व असल्याने प्रस्तुत परिच्छेद येथेच आटोपता घेणे योग्य ठरेल.

• • •

## समितीचे २५ वे वर्ष आणि तदनंतर : १८

एका देशव्यापी संघटनेच्या जीवनात २५ वर्षे म्हणजे फार मोठा काल नव्हे. तथापि, आरम्भापासून सुमारे एक तपानंतर स्वतः होऊनच कार्य स्थगित ठेवण्याची विचित्र परिस्थिती ज्या संस्थेच्या जीवनात आली तिने पुढील १२ वर्षांच्या काळात आपले नवे जीवन पुन्हा सुरू केले एवढेच नव्हे तर महत्प्रयासाने पूर्वीपेक्षा सर्व प्रकारची संपन्नता अधिक मिळविली. यास वंदनीय मावशींची आणि देशभर विखुरलेल्या त्यांच्या असंख्य सहकारी अधिकारी आणि सेविकांची निष्ठा, तळमळ आणि कार्यकुशलता कारणीभूत आहे.

१९६१ च्या विजयादशमीला राष्ट्र-सेविका समितीच्या कार्याला २५ वर्षे पूर्ण झाली. आनंदाचे हे पर्व साजरे केल्यास मागील कार्याचा आढावा घेणे, उत्साहजनक वातावरण निर्माण करणे आणि प्रगतीच्या पुढील योजनासंबंधी निर्धार करणे या महत्वाच्या गोष्टी साध्य होऊ शकतील हे लक्षात घेऊन यावर्षी समितीच्या केंद्रस्थानी, वर्धेला एक अखिल भारतीय मेळावा घेण्यात आला. यावेळी झालेल्या प्रमुख सार्वजनिक कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी साहित्यातील प्रथितयश लेखिका श्रीमती मालतीबाई बेडेकर आल्या होत्या.

यावेळी एक अभिनव उपक्रम आयोजण्यात आला होता. जिथे जिथे समितीच्या शाखा आहेत तिथे तिथे, दसऱ्याच्या नवरात्रात सेविकांनी नंदादीप तेवत ठेवला. आणि मेळाव्याच्या कार्यक्रमाला वर्धेस येतांना आपापल्या नंदादीपातील तेल बरोबर आणून वर्धेच्या देवीसमोरील नंदादीपात ते घातले. अशाप्रकारे ठिकठिकाणच्या शाखांनी केंद्राचा दीप अधिक प्रज्वलित केला.

मेळाव्याचे प्रसंगी निरनिराळे असे अनेक कार्यक्रम झाले. वर्षभर आधी परिश्रम करून वंदनीय मावशींनी या मेळाव्याची योजना आखली होती. त्यांच्या इच्छेला मान देऊन, समिती कार्याच्या ओढीने, गृहक्षेत्रातून सायासपूर्वक मिळणारी रजा काढून भारतातील अनेक सेविका वर्धेस उपस्थित झाल्या होत्या. पण तोंडाशी नेलेला घास तोंडात पडेपर्यंत शाश्वती नसते हेच खरे ! कारण या कार्यक्रमाचे सुमारासच आमच्या कुटुंबाचा सर्वप्रकारे आधार असलेल्या आमच्या उमाकाकू एकाएकी आजारी होऊन त्यातच त्यांचा मृत्यू झाला. यामुळे मावशी सर्व सेविकात बसून, मिळूनमिसळून बोलूही शकल्या नाहीत. तथापि मेळाव्याचे सर्वच कार्यक्रम व्यवस्थित आणि वेळेवर पार पडले. भारावलेल्या मनःस्थितीतच मेळाव्याच्या जाहीर समारोप समारंभास मावशी उपस्थित राहिल्या.

या मेळाव्याचा इष्ट परिणाम होऊन ठिकठिकाणी कार्यास चालना मिळाली. त्या वर्षीच्या उन्हाळ्यात (१९६२) कोल्हापूर, नागपूर व दिल्ली येथे शिबिरे घेण्यात आली.

१९६१ च्या डिसेंबर मध्ये भारत सरकारने लष्करी हालचालींच्या सहाय्याने पोर्तुगीजांना गोव्याबाहेर हाकलून भारताचा ३०० वर्षे पारतंत्र्यात राहिलेला तो भाग स्वतंत्र केला. ही कारवाई करणे सरकारला भाग पाडावे म्हणून जनतेने जे निःशस्त्र आंदोलन यापूर्वी केले होते त्यात समितीच्याही सेविकांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. मुक्तीनंतरच्या काळात मावशींनी गोव्यास भेट देऊन तेथे समिती कार्याची मुहूर्तमेढ केली.

१९६२ हे वर्ष भारतीय इतिहासाचे काळे पृष्ठ म्हणून संबोधावे लागेल. हिंदी-चिनी भाई भाई या माओत्से तुंग यांच्या घोषवाक्याने भुरळ पडलेल्या पंडित नेहरूंना चीनच्या विस्तारवादी शासनाने यावर्षी चांगलेच तोंडघशी पाडले. दिवाळीच्या ऐन आनंदपर्वाचे सुमारास, आपल्या सोजिरांच्या गोळ्यांनी यमसदनी पाठविलेल्या ९ भारतीय सैनिकांची प्रेते चीनने पंडित नेहरूंना भेट म्हणून पाठविली. यावेळी आपली अक्षम्य चूक लक्षात आल्याने पंडित नेहरूंना जो जबरदस्त धक्का बसला तोच त्यांच्या शेवटास कारणीभूत ठरला. कारण त्यानंतर त्यांची प्रकृति जी ढासळली ती बिघडतच गेली.

परन्तु वाईटातूनही कधीकधी चांगले निष्पन्न होते ते असे. परकीय आक्रमणामुळे भारत जागा झाला. देशातील सर्व पक्ष, जातीजमाती, प्रांत एकत्रित येण्याचे मोठे अभिमानास्पद दृश्य त्यावेळी दिसून आले. राष्ट्र-सेविका समितीनेही आपली 'माजघरातील आघाडी' उघडून सर्वतोपरी सहाय्य केले. देवळादेवळातून, मोहल्ल्यामोहल्ल्यातून प्रार्थना केंद्रे उघडली. समिती सेविकांनी दर मंगळवारी उपवास करावयाचा व प्रत्येकीने किमान २५ पैसे युद्धनिधी जमवून केंद्रप्रमुख भगिनीच्या हवाली करावयाचा अशी योजना आखली. शुश्रुषा पथकात काम करण्यास आवश्यक प्रथमोपचाराचे शिक्षण, तसेच स्त्रियांसाठी नेमबाजी व कवायतीचे वर्ग सुरू करण्यात राष्ट्र-सेविका समितीने बराच पुढाकार घेतला.

वंदनीय मावशींच्या सुचनेवरून समितीच्या उत्तर विभागीय प्रमुख श्रीमती सिंधुताई फाटक यांनी त्यावेळी संरक्षण मंत्री म्हणून नियुक्त झालेल्या यशवंतराव चव्हाणांची दिल्लीत भेट घेतली. संरक्षण प्रयत्नासाठी राष्ट्र-सेविका समितीच्या किमान १०० सेविकांची योजना करण्याचे आश्वासन यावेळी त्यांना देण्यात आले.

अपेक्षेविपरीत अशी भारताची एकजूट लक्षात आल्यानेच चीनने आपला पवित्रा बदलला हे पुढील इतिहासावरून स्पष्ट झाले.

पुढाऱ्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून निर्धास्तपणे जी जनता निद्राधीन झाली होती ती चीनच्या आक्रमणामुळे खडबडून जागी झाली. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही जागरुक राहणे जरूर आहे हा विचार अधिकाधिक प्रबल होऊ लागला. समितीच्या कार्यवाढीच्या दृष्टीने ही परिस्थिती अत्यंत अनुकूल अशीच होती.

उत्तर हिंदुस्थानात यापूर्वीच समितीचे कार्य आरंभ झालेले होते. त्याप्रमाणे १९५९ मध्ये जालंदर येथे समितीचा पंजाबमधील पहिला उन्हाळी वर्ग घेण्यात आला होता. १९६० पासून दिल्ली येथेही नियमित वर्ग घेण्यात येत आहेच. जमेल तेव्हा मावशींनी ह्या वर्गांनाही भेटी देऊन मार्गदर्शन केले. उल्लेखित कालखंडानतर श्रीमती सिंधुताई फाटक यांची उत्तर विभाग प्रमुख म्हणून दिल्ली येथे नेमणूक झाल्यामुळे वरील परिस्थितीच्या अनुषंगाने तिकडे कार्यविस्तार होणे बरेच सुकर झाले.

१९६३ च्या उन्हाळ्यात पुणे, नाशिक, नागपूर, दिल्ली आणि ग्वाल्हेर येथे अधिकारी शिक्षण वर्ग घेण्यात आले. या वर्गांना मावशींनी भेटी दिल्या.

पंचवीस वर्षांपेक्षा जास्त काल सतत समिती कार्यात मग्न असूनही या सुमारापर्यंत मावशींचे एकंदर प्रकृतिस्वास्थ्य समाधानकारक राहिले. तथापि एकसारखे दौरे, व्याख्याने आणि संघटनेची जबाबदारी या गोष्टींमुळे त्यांना बराच शारीरिक व मानसिक ताण सोसावा लागतो. अशाही परिस्थितीत वेळ मिळेल तसे वाचनही चालू असते. यामुळे त्यांच्या डोळ्यांवर विशेष ताण पडून या वर्षात त्यांना डोळ्यांचा त्रास सुरु झाला. गुडघे दुखणे आणि पाय वळणे हा जुनाच मधून मधून बळावणारा त्रास या वर्षात बराच वाढला. आवश्यकता असूनही त्या कधी बिछान्यावर पडून राहिल्या नाहीत. तथापि जात्याच व्यवस्थितपणा स्वभावात असल्यामुळे डॉक्टरांनी सांगितलेली औषधे अथवा उपचार त्या न चुकता आणि नीटपणे करतात. यामुळेही कदाचित त्या आपल्या प्रकृतिवर नियंत्रण ठेवू शकतात असे वाटते.

मधेमधे त्यांना पोट दुखण्याचाही त्रास झाला. तेव्हा त्यांना कुणीतरी योगासनांचा सल्ला दिला. लगेच त्यांनी योगमहर्षी जनार्दन स्वामींकडून योगासनांची व्यवस्थित माहिती करून घेतली व त्यानुसार मग त्या स्वतः आसने करू लागल्या. स्त्रियांचे दृष्टीने योगासनांचा अभ्यास किती महत्वाचा आहे ही जाणीव त्यांना स्वानुभवावरून झाली. त्यामुळे समिती-सेविकांनाही योगासनांचे शिक्षण देण्याची त्यांनी योजना आखली. बिलासपूर निवासी सेविका कुमारी सुमती जोशी यांचा विशेष अभ्यास लक्षात घेता देशात ठिकठिकाणी होणाऱ्या समिती-वर्गात योगासनांचे प्रशिक्षण देण्यासाठी त्यांना पाठविण्यास मावशींनी सुरवात केली.

याच वर्षात स्वामी विवेकानंदांची जन्म शताब्दि येत होती. समाजाला आपल्या विचारांकडे आकृष्ट करण्यासाठी निरनिराळ्या योजना आखावयाच्या हा मावशींचा स्वभाव. प्रकृतिस्वास्थ्य ठीक नसताही शताब्दीच्या प्रसंगाचा फायदा घेऊन एक भव्य प्रदर्शन नागपुरास आयोजित करावयाचे असे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे नागपूर विद्यापीठाच्या भव्य दीक्षांत सभागृहात स्वामीजींच्या जीवनावरील प्रदर्शन भरविण्यात आले. एका भागात विवेकानंदांचे संपूर्ण चरित्र चित्रांच्या व फलकांच्या द्वारे दाखविले होते. तर दुसऱ्या भागात चीन–आक्रमणाचा साद्यंत इतिहास फलकांवर लिहिलेला होता.

एका भव्य मॉडेलद्वारे भारताच्या उत्तर सरहद्दीची परिस्थिती स्पष्ट करण्यात आलेली होती. श्रीमती अन्नपूर्णाबाई तथा काकू रानडे यांनी पिंजलेल्या कापसापासून परिश्रमपूर्वक बनविलेले भव्य पुतळे हे प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण होते. एका दृष्यात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला ' तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ' हा संदेश देत आहेत असे दर्शविले होते,तर दुसऱ्यात कालीमाता नरमुंडामाला धारण करून असुराला पदाघाताने तुडविताना दिसत होती. आजपर्यंत झालेल्या आक्रमणांचा भारताने कसा कसा प्रतिकार केला हे देखील दाखविण्यात आले होते.

हे प्रदर्शन अत्यंत यशस्वी आणि परिणामकारी झाले. त्यामुळे पुढील काळात निरनिराळ्या प्रसंगी अशाच प्रकारची प्रदर्शने नागपूर आणि अनेक ठिकाणी श्रीमती काकू रानडे यांच्या सहाय्याने आयोजित केली गेली.

## साठावा वाढदिवसः–

वंदनीय मावशींच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यामुळे १९६४ साली विजयादमीच्या सुमारास त्यांचा साठावा वाढदिवस साजरा करण्यासाची समिती सेविकांनी योजना आखली. त्यानिमित्त नागपूर येथे एक प्रमुख सार्वजनिक समारंभ करावयाचा हे ठरले. या प्रसंगाचे निमित्ताने समितीकार्यास पोषक आणि कार्यवाढील सहाय्यभूत ठरतील असे काही अभिनव कार्यक्रमही सेविकांनी योजले. या दृष्टीने व्यक्तिशः व संघटितपणे खालील गोष्टी कराव्यात असे ठरले.

१) प्रत्येक सेविकेने ६१ नाण्यांच्या रूपात श्रद्धानिधीला हातभार लावावा, म्हणजे यथाशक्ति ६१ पैशापासून ६१ नोटांपर्यंत निधी द्यावा.

२) प्रौढ सेविकांनी वर्षभरात निदान ६१ दिवस तरी समितीच्या कोणत्याही शाखेत उपस्थित राहण्याचा नियम पाळावा.

३) समितीच्या विचारसरणीला पोषक अशा कमीतकमी ६१ पुस्तकांचे वाचन करून त्यांची संक्षिप्त टिपणे काढावी.

४) कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, शिवण, भरतकाम, चित्रकला, भजन यापैकी जी कला अवगत असेल तिचा वर्षभरात ६१ वेळा उपयोग करून समाज-संघटन करण्याचा उपक्रम करावा.

५) वाचनीय पुस्तकातील ६१ उत्कृष्ट उताऱ्यांचा, बोधपटांचा अथवा राष्ट्र-गीतांचा स्वतःजवळ संग्रह करावा.

६) दर महिन्याला वरीलपैकी योजलेल्या संकल्पाची माहिती वंदनीय मावशींना पत्ररूपाने कळवावी.

वरील व्यक्तिगत उपक्रमाशिवाय निरनिराळ्या प्रदेशांत शाखांची संख्या वाढविणे,

समितीची विचारसरणी समाजात प्रसृत करण्यासाठी किमान आठ दिवसांचे सांस्कृतिक वर्ग घेणे आदि उपक्रमही करावेत असे ठरले.

ठरलेला उपक्रम ठिकठिकाणच्या सेविकांनी अपेक्षेबाहेर यशस्वी केला.

मावशींच्या एकसष्टीनिमित्त प्रमुख कार्यक्रम म्हणजे समिती-सेविकांचा नागपूर येथील अखिल भारतीय मेळावा.

या निमीत्ताने मावशींचा गौरव करण्यासाठी 'राष्ट्र-सेविका' वार्षिकाने एक विशेष गौरवांक प्रसिद्ध केला. त्यात मावशींना समिती सेविकांतर्फे जी मानवन्दना प्रकाशित करण्यात आली तिचा काही अंश असा:-

'वंदनीय मावशी,

आम्हा सेविकांच्या दृष्टीने परममंगल असा हा दिवस प्राप्त झाला आहे. वास्तविक आपला गौरव करणाऱ्या आम्ही कोण ? आपला गौरव आपल्या कार्यगौरवानेच केला आहे.

आपण आजवर आम्हा सेविकांचे कौतुक करीत आलात. जिच्यात जे गुण आढळले ते नेमके हेरून एखाद्या कुशल बागवानाप्रमाणे त्यांची निगा राखलीत. जगासमोर ते आणण्याची धडपड केलीत. सेविकेचे जे सुखदुःख ते आपले सुखदुःख, सेविकेच्या आशाआकांक्षा त्या आपल्या आशाआकांक्षा अशी समरसता अधिकाधिक उत्पन्न करून आपण कार्याचा व्याप वाढवला.

सूक्ष्म निरीक्षण आणि स्मरण या दोन अमोघशक्ती आपण संपादन केल्या आहेत. योजकत्व आणि प्रयोगशीलता ह्या गुणांनी तर आपल्या जीवनात नवोन्मेष आणला. आपण ध्येयाबद्दल अत्यंत आग्रही आणि मार्गाबद्दल अनाग्रही आहात.

मातृत्व आणि नेतृत्व या परस्पर पूरक गुणांनी आपल्या कर्तृत्वाला आकार दिला आहे. ध्येय आणि व्यवहार या दोन ध्रुवांनाही आपण आपल्या कर्तृत्वाने जवळजवळ आणलं आहे.

या आपल्या गुणांमुळेच राष्ट्र-सेविका समितीचे कार्य हे स्वप्नाळू ध्येयाकांक्षी मनाने अंतराळात बांधलेला किल्ला न ठरता सामान्य गृहिणींना कर्तृत्वाच्या मनोऱ्यावर चढविणारा सोपान ठरला आहे. आपल्या सर्व सर्व गुणांचा गौरव वाढविणारा आपला सर्वात मोठा गुण म्हणजे आपली हिंदुराष्ट्र निष्ठा !

जिजामाता, देवी अहल्या नि राणी लक्ष्मीबाई यांनी आपणास स्फूर्ति दिली. आणि ज्या देवी अष्टभुजेच्या तेजाच्या प्राप्तीमुळे या भारतकन्या दिव्य जीवन जगू शकल्या तिने आज आपणावर व आपल्या हिंदुसंघटन कार्यावर वरदहस्त ठेवला आहे. ती जगन्माता आपणास दीर्घायुष्य, आरोग्य आणि अपूर्व कार्यशक्ती देवो हीच प्रार्थना !'

❖ ❖ ❖ ❖

१९६५ पर्यंत भारतातील ११ प्रांतात समितीच्या सुमारे २५० नियमित शाखा होत्या. याशिवाय प्रौढ स्त्रियांसाठी चालणाऱ्या अनेक साप्ताहिक शाखाही ठिकठिकाणी होत्याच. एकच वर्षात या सर्व शाखांना भेटी देणे मावशींना शक्य होत नाही. तथापि वार्षिक बैठकी अथवा वासंतिक शिबिरांचे वेळी या सर्व प्रांतातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या भेटीचा योग जुळून येतो. अशावेळी कार्यप्रसाराचे दृष्टीने महत्वाची चर्चा होतच असते. परंतु याही पेक्षा सर्व भारतभर पसरलेल्या शाखा आणि त्यातील कार्यकर्त्या यांचेशी त्यांचा जो अखंड पत्रव्यवहार चालू असतो त्यामुळे प्रत्यक्ष भेट देता न येणे ही उणीव भरून निघते.

दैनंदिन कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कोणते कार्यक्रम आयोजावे या संबंधीच्या सूचना अथवा मार्गदर्शन मावशींच्या पत्रव्यवहाराद्वारे अखंड रीत्या होत असते.

१९६५ साली सप्टेंबर मधे पाकने भारतावर दुसऱ्यांदा आक्रमण केले. सुदैवाने त्यावेळी स्वर्गीय लालबहादुर शास्त्री यांच्या सारख्या देशाभिमानी आणि धडाडीच्या पंतप्रधानांचे आम्हास नेतृत्व लाभल्याने भारतद्वेषी मनोवृत्तीचा आणि शस्त्रसामर्थ्याचा नाश करण्यासाठी भारताने प्रत्यक्ष शत्रूच्या हद्दीत शिरून त्याचेवर प्रहार केला, व आपली मान उंच ठेवली. वस्तुतः यावेळी अन्नधान्य टंचाई आणि आर्थिक चणचण या दोन अति गंभीर समस्या दूर करण्यात देशाची सर्व शक्ति लागलेली होती. त्यात आकस्मिक रीत्या झालेल्या पाक आक्रमणामुळे तर परिस्थितीची गंभीरता अधिकच वाढली. परंतु याहीवेळी पुनः एकदा भारतीय जनता आपल्या कर्तव्याला पुरतेपणी जागली. शत्रुसमोरील आणि देशातील अशा दोन्ही आघाड्या भारतीयांनी अत्यंत यशस्वी रीत्या लढविल्या.

राष्ट्र-सेविका समितीच्या सेविकांनीही आपल्या कर्तव्याचा वाटा उचलला. जवानांना भेटी पाठविणे, स्टेशनवर त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करणे, प्रथमोपचाराचे वर्ग चालविणे, आदि अनेक कार्यक्रम ठिकठिकाणी त्यांनी सुरु केले. विशेषतः कर्नाटकात बेळगांव आणि धारवाड येथील सेविकांनी अति प्रशंसनीय कामगिरी केली असे मावशी सांगतात.

भारत-पाक युद्ध समाप्तीनंतर वंदनीय मावशींच्या सूचनेप्रमाणे उत्तर-विभागीय प्रमुख श्रीमती सिंधुताई फाटक आणि त्यांच्या सहकारी श्रीमती आशा शर्मा आणि शांतीदेवी यांनी राष्ट्र-सेविका समितीच्या प्रतिनिधी या नात्याने, ताश्कंद करारासाठी प्रयाण करण्यापूर्वी स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री यांची भेट घेतली. युद्धामुळे होरपळलेल्या स्त्रियांची नीट व्यवस्था होऊन त्यांना न्याय मिळण्यासाठी पाक सरकारवर दडपण आणावे अशी २५,००० स्त्रियांच्या सह्या असलेली कैफियत समितीच्या प्रतिनिधींनी यावेळी शास्त्रीजींना सादर केली.

समितीच्या कामासंबंधी शास्त्रीजींनी समाधान व्यक्त करून ताश्कंद येथे होऊ घातलेल्या वाटाघाटी संबंधी प्रतिनिधींना दिलासा दिला–

" बहनों, आपका जैसा आशिर्वाद है वैसाही होगा "

त्यानंतर ताश्कंद येथे प्रत्यक्षात काय घडले हा इतिहास सर्वांस माहीतच आहे.

यावेळी श्रीमती सिंधुताई फाटक यांनी जैसलमेर, बारमीर, जोधपूर आदि युद्ध-आघाडीवरील केंद्रांना भेटी देवून तेथील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली होती. मावशींच्या सूचनेप्रमाणे त्यांनी महाराष्ट्राचा दौरा करून 'जम्मू ते जोधपूर' या विषयावर व्याख्याने देवून तेथील स्त्रियांना कशा स्वरूपाची मदत आवश्यक आहे या संबंधी ठिकठिकाणी माहिती दिली.

या वर्षी जसे राष्ट्रीय आघाडीवर समितीय भगिनींनी कार्य केले तसे सामाजिक क्षेत्रातही त्यांनी विविध स्वरूपाची कार्ये केली. मुंबई येथील सेविकांनी विद्यार्थिनींच्या उत्तान पोषाख करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसावा म्हणून शिक्षणसंस्थांच्या चालकांशी बोलणी केली. त्यांच्या प्रयत्नांना यश येवून काही शाळांनी ११ वीच्या विद्यार्थिनींना साडी नेसणे आवश्यक केले.

या शिवाय गोवधबंदी, अश्लील जाहिरातींना पायबंद, क्रमिक अगर अन्य पुस्तकांतून आदरणीय व्यक्तींबद्दल प्रकाशित झालेली अनुदार मते त्यातून काढून टाकणे आदि विषय घेऊनही ठिकठिकाणी समिती सेविकांनी कार्य केले.

राष्ट्र–सेविका समितीचा १९६६ चा उल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे त्या वर्षीच्या मे महिन्यात नाशिक येथे झालेले वासंतिक शिबीर ! महिनाभर वंदनीय मावशी या शिबिरातच राहिल्या. शिबिराचे उद्घाटन ७ मे रोजी तेथील शारदा मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ. लीलाबाई ठकार यांचे हस्ते झाले.

या शिबीरासाठी २४ गांवाहून ६५ कार्यकर्त्या आल्या होत्या. कलकत्ता ते कच्छ-मांडवी पासून दिल्ली ते रत्नागिरी पर्यंत दूरदूरच्या गांवाहून प्रौढ स्त्रिया आपआपल्या सांसारिक अडचणी बाजूस सारून आल्या होत्या. यात जशा ६० किंवा अधिक वयाच्या वृद्धा होत्या तसेच पंचविशीच्या आतील युवतीही होत्या. यावेळी सेविकांना आपल्याबरोबर मुलांनाही आणण्याची परवानगी होती. त्यामुळे ४ महिन्यापासून आठ वर्षाच्या वयापर्यंतची मुले शिबिरात होती. यामुळे एखाद्या नवख्याला हे शिबिर म्हणजे एखादा भव्य कौटुंबिकच कार्यक्रम आहे असे वाटले असते. स्त्रियांच्या अडचणी लक्षात घेवून त्यातून मार्ग काढावयाचा हा उद्देश सतत डोळ्यासमोर असल्याने ही योजना केली होती.

शिवाय मुलांवर संस्कार करणे हेच स्त्रीचे प्रमुख कर्तव्य असल्याने तर मुलांवरही उत्तम संस्कार करण्याचे कार्य अनायसेच साधले गेले व हा एक अभिनव उपक्रम ठरला.

शिबिरात वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ञ व्यक्तींची बौद्धिके ठेवण्यात आली होती. विद्यावाचस्पति विष्णूजी क्षिरसागर, प्राचार्य सोनोपंत दांडेकर, श्री. आप्पासाहेब पेंडसे, मेजर जनरल दवंडे ही नांवे उल्लेखनीय आहेत. याशिवाय यावेळी मानसशास्त्रदृष्ट्या एक प्रयोग करण्यात आला. त्यासाठी पुण्याच्या एस्. एन्. डी. टी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोहोनी व त्यांच्या पत्नी प्रा. सौ. लीलाताई सोहोनी यांनी संस्कार व संवयी या दोन विषयांवर प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात तीन दिवस अभ्यासपूर्ण चर्चा घेतली.

शारिरिक शिक्षणासाठी नागपुराहून जनार्दन स्वामी आले होते. हस्तव्यवसायाचे शिक्षण कल्याण येथील सेविका कुमारी सुशीला सहस्त्रबुद्धे व स्वर्गीय काकू रानडे यांनी दिले तर प्रथमोपचाराची माहिती ईश्वरपूरच्या डॉ. शांताबाई आठवले यांनी दिली. आहारशास्त्रासंबधी माहिती सौ. बकुलताई देवकुळे यांनी दिली.

या शिबिरात एक विशेष उपक्रम करून पाहण्यात आला. नाशिक जवळील १४ गावी प्रत्येकी दोन दोन सेविकांना प्रचारासाठी पाठवून तेथूनच ५ दिवसांच्या वर्गासाठी तरुण व बालसेविकांना आणणे हा तो कार्यक्रम होता. कार्यक्रम कितपत यशस्वी होतो ही शंकाच होती. म्हणून तो घ्यावा की नाही असा विचार समोर आला. तथापि या बाबतीत मावशींची आग्रहाची भूमिका असल्यामुळे तो घेण्यात आला. शेवटी कार्यक्रम अपेक्षेबाहेर यशस्वी ठरला. तरुण व बाल मिळून एकंदर ७० सेविका या उपवर्गाला आल्या होत्या. अशा प्रकारे सेविकांना प्रचाराचे प्रशिक्षण देणारा हा अभिनव कार्यक्रम ठरला.

शेवटी शिबिराच्या समारोपाचा सार्वजनिक कार्यक्रम सोलापूर येथील श्राविकाश्रम विद्यालयाच्या संचालिका श्रीमती सुमतिबाई शहा यांच्या उपस्थितीत झाला. समितीचे कार्य पाहून आनंद व्यक्त करताना श्रीमती शहा म्हणाल्या, "संस्कृति व धर्म स्त्रियांनीच टिकवून ठेवला आहे; आणि समिती हेच कार्य करते ही फार समाधानाची गोष्ट आहे."

## भगिनी निवेदिता जन्मशताब्दि

"हिन्दु स्त्रीला लाभणारे सौख्य, तिचे असलेले समाजातील महत्व आणि तिचे श्रेष्ठ चारित्र्य या गोष्टी आपल्या राष्ट्रीय जीवनातील एक श्रेष्ठ ठेवा आहे. आता आमच्या हे लक्षात येऊन चुकले आहे की धर्माच्या बाबतीत पश्चिमेकडून आम्हास काही घेण्यासारखे नाही; उलट आम्हीच त्यांना पुष्कळ देऊ शकतो. जो सामाजिक बदल होणे जरूर आहे तो आम्हास कळतो. शिवाय तो घडवून आणण्याची पात्रताही आमची आम्हाजवळ आहे."

वरील विचार अखिल मानव जाती समोर मोठ्या निर्भिडपणे मांडणारी भगिनी निवेदिता किती थोर असेल हे सांगण्याची गरज आहे असे नाही. १९६७ साली या महान महिलेची जन्मशताब्दि राष्ट्र-सेविका समितीने देशभर साजरी केली.

आपला संसार आणि आजकाल तर बऱ्याच जणींचे बाबतीत नोकरी, अशी दुहेरी जबाबदारी स्त्रीला सांभाळावी लागते. त्यातून वेळ काढून सामाजिक कार्य करावयाचे म्हणजे अति दुष्करच! तथापि अशाही परिस्थितीत अनेक सेविका काही दिवस, किंवा महिने समितीच्या प्रसारकार्यासाठी देतात ही अभिमानास्पद गोष्ट आहे. १९६८ मध्ये या संबंधात विशेष कार्य झाले. मराठवाड्यात नांदेड व परभणी, गुजराथेत पाटण व जामनगर, मध्यप्रदेशात मोरेना, श्योपूर, डबरा व शिवपुरी; आणि कर्नाटकात म्हैसर, पुत्तूर, मंगळूर, अुडुपी, शिमोगा व बागलकोट या दूरदूरच्या ठिकाणी जाऊन समिति सेविकांनी नवीन शाखा स्थापन करण्याचे अगर जुन्या शाखेस चालना देण्याचे कार्य केले.

उल्लेखित प्रचारकार्यामुळे ठिकठिकाणच्या उन्हाळी शिबिरांसाठी नेहमीपेक्षा जास्त सेविका आल्या. या वर्षी मध्यप्रदेशात ग्वाल्हेर, उत्तर प्रदेशात गाझीयाबाद, गुजराथेत भावनगर, आंध्रप्रदेशात हैदराबाद व भागानगर, कर्नाटकात शिमोगा व पुत्तुर आणि महाराष्ट्रात नागपूर आणि कोल्हापूर या ९ ठिकाणी ही शिबिरे घेतली गेली. या सर्व शिबिरांना भेट देऊन वंदनीय मावशींनी योग्य ते मार्गदर्शन केले.

वरीलपैकी कोल्हापूरचे शिबीर सर्वात मोठे असून वैशिष्ट्यपूर्ण झाले. शिबीरात समितीच्या नेहमीच्या शारीरिक कार्यक्रमाबरोबरच पोहणे व सायकल शिकविण्याचा उपक्रम केला गेला. तसेच समितीच्या बौद्धिक कार्यक्रमाबरोबरच जीवनोपयोगी असे ३५ लघु उद्योग सेविकांना शिकविले. या शिवाय पन्हाळगडची सहल आणि शिवभक्त भालजी पेंढारकर यांचे बौद्धिक हे आणखी काही विशेष होत.

शिबिराच्या समारोप प्रसंगी स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांना विशेष रीत्या निमंत्रित केले होते. समितीचे कार्य जवळून अवलोकन करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

१९६८ सालची एक महत्त्वाची घटना म्हणजे दिनांक २५ ते २८ ऑक्टोबर पर्यंत पुणे येथे भरलेला समितीचा सप्तम त्रैवार्षिक मेळावा. त्यात पंजाबपासून मंगलोरपर्यंत आणि गुजराथपासून कलकत्त्यापर्यंतच्या २००० सेविकांनी भाग घेतला.

अनेक गावाहून आलेल्या सेविका अनेक भाषी होत्या. परन्तु समितीने रूढ केलेल्या परंपरेनुसार समिति स्थानावर ओरिसातील उडिया, कर्नाटकातील कानडी, गुजराथेतील

गुजराथी, आंध्राची तेलगू, दिल्लीची हिंदी तर महाराष्ट्रातील मराठी सेविका गुलदस्त्या-प्रमाणे एकजीव दिसू लागल्या. एकमेकींशी बोलताना मोडकीतोडकी हिंदी, मराठी-मिश्रित हिंदी, गुजराथी आवरण असलेले हिंदी आणि शुद्ध हिंदीचाच वापर तेथे झाला त्यामुळे प्रथम एकमेकींची मुळीच ओळख नसलेल्या व ज्यांची वस्ती एकमेकींपासून शेकडो मैल दूर आहे अशा सेविकांनाही आपली आप्त भेटल्यागत आनंद झाला.

राष्ट्र-सेविका समितीने वरील प्रकारचे वातावरण अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेले आहे. ' एक हृदय एक जननी ' या तत्वाचे प्रत्यक्ष-प्रमाण जेवढे समिती–स्थानावर दिसते तेवढे क्वचितच दुसऱ्या एखाद्या स्त्री-संस्थेत दिसत असेल !

दिनांक २५ मे रोजी वंदनीय मावशींनी पुण्याच्या पत्रकारांना मुलाखत दिली. या प्रसंगी त्यांनी खालील विचार प्रगट केले.

" बल, शीलयुक्त, चारित्र्यवान हिंदु स्त्रियांची संघटना हे समितीने स्वीकारलेले स्थायी स्वरूपाचे कार्य होय. धर्माधिष्ठित मुसलमान राष्ट्र-पाकिस्तान भारतातून वेगळे काढल्या-नंतर हिंदुराष्ट्रच उरते, हे अगदी स्पष्ट आहे. हिंदुत्त्व विशाल आहे. सर्व मानव जातीला स्वतःत सामावून घेणारे आहे. त्याच्या पुढे जात, धर्म, पंथ या कल्पना थिट्या आहेत. फार प्राचीन काळीच हिंदु संस्कृति पसरली, नांदली. मानव जातीस सुसंस्कृत करण्यास झटली. आणि जगाच्या निरनिराळ्या भागातील लोकांनी स्वयंशासनाची सिद्धता दाख-विताच त्यांचे भाग्य त्यांच्या स्वाधीन करून उदारपणे दूर सरली. हिंदु संस्कृतीचे हे वैभव, हे औदार्य आज आम्ही विसरलो. त्यामुळे १९४७ साली स्वतंत्र झाला तेवढाच भारत आणि त्यात नांदते तीच भारतीय संस्कृति अशा न्यूनगंडदर्शक विचारातच आम्ही बुडालो आहोत. म्हणूनच आपले प्राचीन वैभव, विशालता, औदार्य आणि सर्वंकष विचारसरणी यांचे संस्कार हिंदु स्त्रीच्या मनात जागृत ठेवणे हे समितीचे आद्यकर्तव्य आहे, असे आम्ही मानतो.

अर्थार्जनासाठी शिक्षण ही आजची प्रवृत्ति बदलविणे जरूर आहे. ज्ञानोपासना ज्ञानासाठी व आत्मोन्नति साठीच झाली पाहिजे. अशा ज्ञानार्जनाची सुरवात करून देणाऱ्या मौंजीबन्धन संस्काराचे महत्व समाजाला पटवून द्यावयाचे आहे. यासाठी मुलींचेही मौंजी-बंधन करावे हा विचार समितीला ग्राह्य वाटतो."

मेळाव्याचे दुसरे दिवशी म्हणजे दिनांक २६ ला सकाळी पुणे शहरातून अष्टभुजा देवीची भव्य मिरणूक काढण्यात आली. त्याच दिवशी सायंकाळी वंदनीय मावशींच्या ' रामायणावरील प्रवचने ' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ साताऱ्च्या भोसले वंशातील राजमाता श्रीमती सुमित्राराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

श्रीमती सुमित्राराजे भोसले आपल्या भाषणात म्हणाल्या : "कोणत्याही राष्ट्राच्या संस्कृतीचे संवर्धन तेथील स्त्रियाच करीत असतात. म्हणूनच स्त्रीला संस्कृति-रक्षक म्हटले जाते. गृहलक्ष्मीची जबाबदारी फार मोठी असते. पुरुषाचा पराक्रम, कर्तबगारी आणि तेज यांना खरी धार चढते ती धर्मपत्नीच्या प्रोत्साहनानेच !

श्रीमती मावशींनी स्त्रीचे हे स्थान अचूक ओळखले व राष्ट्र-सेविका समितीद्वारे त्यांच्यात जागृति करून उद्याच्या समाजास आदर्श वळण लावणाऱ्या सुकन्या व सुभार्या निर्माण केल्या.

रामायण हा भारताचा मानबिंदु आहे. सामान्य जनतेला श्रीरामांच्या जीवनातून कितितरी घेता येण्यासारखे आहे. रामायणाचे हे महत्त्व जाणून मावशींनी रामायणावरील प्रवचनांचा उपक्रम आरंभिला. ती पुस्तक रूपाने प्रकाशित होत आहेत ही फारच आनंदाची गोष्ट आहे. श्रीमती मावशींची निवेदन पद्धति शांत, प्रवाही व भावनाप्रधान असली तरी तर्कनिष्ठ आहे. त्यांच्या प्रवचनात विद्वत्तेचा अभिनिवेश नाही पण बहुश्रुतपणा, चिकित्सक वृत्ति व सूक्ष्म निरीक्षण यांचा प्रत्यय जागोजागी येतो. श्रीमती मावशींची प्रवचने ऐकण्याचा योग आला तेव्हाच ही सारी वैशिष्ट्ये मी अनुभवली."

तिसरे दिवशी म्हणजे दिनांक २७ ला सायंकाळी मेळाव्यातील प्रकट सभा रमण बागेतील मैदानावर झाली. प्रमुख पाहुण्या म्हणून ग्वाल्हेरच्या राजमाता विजयाराजे शिंदे आल्या होत्या. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या "चहूकडे अंधार, निराशा, आणि कठीण परिस्थिति असताना राष्ट्र-सेविका समितीच्या स्त्री संघटनेचे हे आकर्षक रूप पाहून माझ्या मनात आशावेल फुलली. भारतीय स्त्री निष्ठेने राष्ट्रसेवेसाठी कटिबद्ध आहे, ती मागे हटणार नाही, असा हे कार्य पाहून विश्वास वाटतो.

"दुर्गामाता हा आपला आदर्श आहे. मावशींची लहानशीच मर्ति प्रत्यक्ष देवीस्वरूप वाटते."

शेवटच्या दिवशी म्हणजे दिनांक २८ ला वंदनीय मावशींचे समारोपाचे भाषण झाले. सेविकांशी मनमोकळेपणाने वार्तालापच करीत असल्याचे वाटावे अशा आपल्या भाषणात मावशी म्हणाल्याः "राष्ट्र सुस्थिर असले तरच व्यक्ति सुस्थिर राहू शकते. या दृष्टीने राष्ट्रीय संस्कारांचा आदर आवश्यक आहे. पूर्वी मुली भोंडला, भुलाबाई वगैरे खेळ खेळत असत. तेव्हा पारंपारिक गाणी म्हटली जात. 'सासरच्या वाटे कुचुकुचु काटे, माहेरच्या वाटे हळद-कुंकु दाटे' अशा सारख्या गाण्यांतील तालामुळे ती प्रिय वाटत. त्यातील अर्थाने होणाऱ्या अनर्थाकडे कोणी लक्ष दिले नाही. परन्तु बालपणापासूनच सासरच्या मंडळींविषयी, गाण्यात

सांगितल्या प्रमाणे, न कळतही भावना होणे किती धोक्याचे आहे ! म्हणूनच भुलाबाईच्या गाण्यांची नवीन प्रकारची पुस्तके समितीने प्रकाशित केली.

रक्षाबन्धनाचे वेळी दुकानदारांच्याकडे जाऊन स्त्रियांच्या 'वस्त्रांचे प्रदर्शन' बंद करण्याची त्यांना विनंति केली. त्याहीपेक्षा वेगळी उपाययोजना म्हणून कलेक्टरांची भेट घेतली. त्यांना राखी बांधून आपल्या अधिकाराचा उपयोग करून अशा प्रकारे स्त्रीच्या शालीनतेची होणारी विटंबना थांबविण्याची विनंति केली. ते कलेक्टर त्या गांवी असेपर्यंत तसा बंदोबस्त झाला. परन्तु पुन्हा स्थिति पूर्ववत झाली. याचा अर्थ असा की आजच्या युगात संस्कारासाठीही सातत्याची गरज आहे. त्या शिवाय लहानसहान गोष्टीतही पुरेसे यश मिळत नाही. आज कोणतीही गोष्ट चिकाटीने होत नाही. म्हणूनच केवळ क्षणिक परिणाम ही आजची वस्तुस्थिति आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत देत काही सेविका जेव्हा चिकाटीने समितीकार्य करतांना दिसतात तेव्हा समाजातील काही लोक त्यांच्याकडे 'वेगळ्या' भावनेने पाहतात. परन्तु अशा सेविकांचे कौतुक करावे तेवढे थोडे असा माझ्या मनात विचार येतो. कोणत्याही प्रकारच्या टीकेची पर्वा न करता अखंड रीत्या कार्य करणाऱ्या अनेक सेविका आज ठिकठिकाणी आहेत यातच समितीचे खरे यश सामावलेले आहे."

## गांधी जन्म-शताब्दि

'स्त्रियांसाठी कार्य सुरू करण्याची प्रेरणा आपण महात्माजींच्या अेका वाक्यातून घेतली' असे मावशी नेहमी सांगतात. गांधीजींचे स्त्री-समाजावर विशेष ऋण आहे. भारतातील स्त्रिया पुन्हा एकदा राजकारणात अहमहमिकेने पुढे आल्या त्या त्यांच्याच प्रेरणने. स्त्रीस्वातंत्र्य केवळ शब्दात न राहता प्रत्यक्षात आले ते त्यांच्याच राजकीय आंदोलनातून ! श्रीमती इंदिरा गांधी-पंतप्रधानपद भूषवू शकल्या हे त्यांनीच निर्माण केलेल्या वातावरणाचे फळ; ही गांधीजींसंबंधी समितीची भावना असल्याने त्यांची जन्मशताब्दि या वर्षात ठिकठिकाणी साजरी केली. सेविकांनी महात्माजींच्या विचारांचा सूक्ष्म अभ्यास करावा असे आवाहन यावेळी मावशींनी केले.

नोव्हेंबर मधे मावशींना धक्का देणारी एक घटना घडली. श्रीमति काकू रानडे मावशींच्या भेटीसाठी वर्धा येथे येत असता गाडीत पडून त्यांच्या पायाचे हाड मोडले. आमच्या घरी त्या ज्या आल्या ते लंगडतच. त्यांची अवस्था पाहून मावशींनी त्यांना मातृसेवासंघाच्या रुग्णालयात दाखल केले. तेथे सुमारे महिनाभर राहून थोडे बरे वाटल्यानंतर त्या पुण्यास परत गेल्या. त्यांना बरे वाटेल अशी मावशींची भावना झाली. परन्तु ते अखेरचे दुखणे ठरून ६९ च्या वर्षप्रतिपदेला त्या स्वर्गवासी झाल्या.

काकू रानडे यांच्या मृत्यूमुळे किती मोठी हानी झाली हे वंदनीय मावशींच्याच शब्दात देण्यासारखे आहे. कै. काकूंना श्रद्धांजली वाहताना त्या म्हणतात–

"जीवनाचा अभ्यास मी कधी पुस्तकाद्वारे केला नाही. माणसांच्या सहवासात आलेल्या अनुभवांना गुरु करून मी शिकले. माझ्या जीवनात ज्या चार काकू आल्या त्यापैकी काकू रानडे एक होत. त्यांच्या सहवासातून मला बरेच घेता आले. आधीच अडचणींसंबंधी विचार करण्यापेक्षा एखादी गोष्ट करावयाची असे ठरले की लगेच ती गोष्ट सुरू करावयाची आणि मग प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणींना तोंड देऊन वाट काढायची या त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याची माझ्यावर बरीच छाप पडली आहे."

• • •

# ध्येय-मार्गावरील आगेकूच : १९

वंदनीय मावशींनी सुरू केलेल्या कार्याचा राजकारणाशी मुळीच संबंध नाही. राष्ट्र-सेविका समितीच्या ध्येयधोरणानुसार, ही गोष्ट नेहमीच भर देवून सांगण्यात येते. भारतीय परंपरेने घालून दिलेल्या आदर्शानुसार, हिंदु स्त्री सदैव सशक्त, निरभिमान आणि कार्यप्रवण रहावी या उद्देशास्तव तिला संघटनेच्या सूत्रात बद्ध करणे, हे थोडक्यात समितीचे कार्य आहे.

'जिचे हाती पाळण्याची दोरी ती राष्ट्राते उद्धारी', हे त्रिकालाबाधित सत्य असून, राष्ट्राचे उत्थान साधावयाचे असेल तर प्रथम 'स्त्री-शक्तीला' आवाहन करण्याची आवश्यकता आहे. ज्या राष्ट्रातील स्त्री दुर्बल आणि मागासलेली असते ते राष्ट्रही तसेच झाल्याचे दिसून येते. अर्थात स्त्री ही राष्ट्र सबल की दुर्बल हे जाणण्याचे सूत्र आहे. म्हणूनच 'पिंडी ते ब्रह्मांडी' हे तत्व स्त्री-समाज आणि राष्ट्र या संबंधातही तंतोतंत जुळते.

स्त्री ही राष्ट्राची जननी आहे. प्रेम आणि संस्कार करण्याची क्षमता या आपल्यातील दोन मौलिक गुणांचे सहाय्याने आपली संतति, म्हणजेच पर्यायाने समाज घडविणे हे तिचे आद्य कर्तव्य आहे. थोडक्यात, स्त्री ही समाजरूपी वाहतुकीची नियंत्रक आहे. जिच्यावर एवढी मोठी जबाबदारी आहे ती विशेष कर्तव्यदक्ष आणि कार्यकुशल असावयास हवी, हे सहज स्पष्ट आहे. म्हणूनच राजकारण, आर्थिक व्यवहार आदि क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने प्रगति करणे याही पेक्षा राष्ट्र घडविण्याचे महत्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण असे जे तिचे क्षेत्र आहे ते अधिक महत्वाचे आहे, ही जाणीव स्त्रीने बाळगणे जरूर आहे.

वस्तुतः स्त्रीच्या या वैशिष्ट्यपूर्ण स्थानास सदा आणि सर्वदूर मान्यता मिळत आलेली असली तरी वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या कारणास्तव, वेगवेगळ्या ठिकाणी स्त्रीची पदावनती झाली, असे दिसून येते. कधीकधी तर आपल्या अनहिताकडे ती स्वतःच चालत गेल्याचेही आढळते.

स्त्री-शक्तीलाही सर्वसाधारण शक्तीचे जवळजवळ सर्वच नियम लागू पडतात. अविनाशित्वाच्या गुणामुळे, एकतर जागृतावस्थेत अन्यथा सुप्तावस्थेत ती आढळते. तिचा अमर्याद संग्रह करता येऊ शकतो. जशी ती हितकारक असते तशी ती अनहितकारक सुद्धा होऊ शकते. म्हणूनच तिच्यावर योग्य अशा नियंत्रणाची योजना आवश्यक ठरते. आकाशातील वीज बंधनमुक्त झाली तर संहारक ठरते हा आपला अनुभव आहेच !

वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने वंदनीय मावशी । विचार मांडतात की, राष्ट्र-सेविका समिति ही ज्याप्रमाणे स्त्री-शक्ती जागृतिसाठी ` त्याचप्रमाणे जागृत स्त्रीला स्वतःच्या मर्यादेची सतत जाणीव रहावी या साठीही आहे.

स्त्री ही शारिरिक आणि मानसिकदृष्ट्या कमकुवत असते, हा विचार शास्त्राने चूक मानला आहे एवढेच नव्हे तर गेल्या काही वर्षात, जगात ठिकठिकाणच्या स्त्रियांनी, निरनिराळ्या क्षेत्रात आश्चर्यजनक प्रगति दाखवून हें सिद्धही केले आहे. परन्तु हे जरी खरे असले तरी स्त्रीने 'घरा'ला मुळीच विसरता कामा नये !

वरील विचारसरणीस अनुसरून समितीच्या सेविकांनी संस्काराच्या क्षेत्राकडे अधिक लक्ष द्यावे, हे वंदनीय मावशी १९६८ पासून भर देवून सांगू लागल्याचे दिसते. म्हणूनच या सुमारापासून भारतीय संस्कृति, इतिहास, धर्म, कला आणि शास्त्रे यावरील माहितीपूर्ण व्याख्यान सत्रे आणि विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम वाढत्या प्रमाणात योजण्यास त्यांनी चालना दिली.

वरील दृष्टीकोनातूनच मावशींच्या सूचनेप्रमाणे ठिकठिकाणी विद्यावाचस्पति विष्णूजी क्षीरसागर (नाशिक), इतिहास संशोधक पु. ना. ओक (दिल्ली) व बाबासाहेब ठकार (पुणे) सुप्रसिद्ध विचारवंत श्री. शांताराम आठवले (पुणे), प्राध्यापक शिवाजीराव भोसले (कोल्हापूर) आदिंच्या व्याख्यानांची सत्रे योजण्यात आली.

मध्यंतरीच्या काळात समिती-कार्यक्रमावर एकांगीपणा, विशाल दृष्टिकोणाचा अभाव, जुन्या बुरसट विचारांनाच चिकटून राहण्याच्या वृत्तीचा पगडा आदि स्वरूपाची टीका नियमितरीत्या होत असल्याचे मावशींच्या लक्षात आले. वास्तविक, समिती जरी आपला धर्म, आपली संस्कृति हे अत्यंत महत्वाचे विषय मानते तरी कार्यक्रमविषयक कालबाह्यता नजरेआड करण्याइतके अदूरदर्शित्व अथवा मागासपणा नसावा या संबंधीची जागरुकता पूर्वीपासूनच आहे. समितीची सेविका एकांगी राहू नये ह्या दृष्टीकोनातूनच निरनिराळ्या आर्थिक वा वैज्ञानिक विषयांवरील तज्ञ अशा व्यक्तिंना पाचारण करून त्यांचे माहितीपूर्ण विचार सेविकांना ऐकण्याची संधी प्राप्त करून देण्यासाठी समिती-व्यासपीठाचा वेळोवेळी उपयोग केला

जातो. आणि या संबंधात केवळ सैद्धांतिक माहितीवरच समाधान न मानता शक्य होईल तेव्हा आणि शक्य होईल तेवढ्या प्रमाणात प्रात्यक्षिकाचे स्वरूपातही कार्यक्रम घेण्यास मावशींनी प्रोत्साहन दिले. या संबंधात कराड येथील प्रसिद्ध समाज-सेवक आणि कॉंग्रेसचे कार्यकर्ते श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले यांचा अभिप्राय देण्यासारखा आहे. समिती कार्याचे जवळून निरीक्षण केल्यानंतर ते म्हणतात–

"कला, शौर्य, दूरदृष्टी, संघटना चातुर्य आणि कालपरीक्षक धोरण यांच्यावर उन्नतीने कृपाकटाक्ष फेकून भारताला जगात सदैव उत्कटतेने प्रगत ठेवावे, असे स्वप्नरंजन जे जनतेत चालले असते, ते साकार झाल्याचे जनतेला पहावयास मिळावे; कुठल्याही संकटास न डगमगणारी अशी सत्यव्रत, सत्वशील आणि परस्पर गुणग्राहकतेने सहजीवन साधीत राहणारी जनता भारतात नांदावी, अशी प्रबळ इच्छा समितीच्या कार्यप्रणालीतून प्रकट होताना आढळते... समिती वर्षातून ठिकठिकाणी घेत असलेली शिबिरे आणि त्यातून खेळ, कला, विज्ञान, शिस्त, सहकार, समाजसन्मुखता व संस्कृतिसंगोपन यांच्यासंबंधी चालणारी बौद्धिके आणि व्यवहारी शिक्षण यांचा ताळेबंद साखळरीतीने काढावयाचा म्हटल्यास खाडीलकरांची रुक्मिणी म्हणते त्याप्रमाणे–जी कन्या चांगली असते, तीच चांगली पत्नि व गृहिणी होते. आणि जी चांगली गृहिणी असते तीच चांगली माता होते, हा धडा सगळ्या लहान थोर स्त्रियांनी घ्यावा अशी वंदनीय मावशी केळकरांच्या कार्याची आखणीच होय, असे दिसते."

१९६८ नंतर राष्ट्र सेविका समितीने प्रगतीच्या दिशेने बरेच आगेकूच केले याचे प्रत्यंतर येते. प्रामुख्याने राजस्थान, बंगाल, आसाम आणि उत्तर प्रदेश या प्रांतांत, यावेळी, जोराची चालना दिली गेली. या दृष्टीने उन्हाळी व हिवाळी शिबिरे बरीच सहाय्यभूत ठरली. साधारणपणे ६ ते ३० दिवसांची ही शिबिरे झाली.

१९६९ मध्ये पुणे, औरंगाबाद आणि ग्वाल्हेर या तीन ठिकाणी १० दिवसांची स्थानिक शिबिरे झाली. या शिवाय निरनिराळ्या प्रांतात एकूण दहा ठिकाणी प्रांतिक शिबिरेही घेण्यात आली. महाराष्ट्रात सातारा, चेंबूर आणि वर्धा; पंजाब आणि दिल्ली प्रदेशांसाठी दिल्ली; गुजराथसाठी–राजकोट येथे; बंगाल आणि आसामसाठी–कलकत्ता, राजस्थानसाठी–अजमेर; मध्यप्रदेशसाठी–जबलपूर आणि उत्तर प्रदेशसाठी–लखनौ या ठिकाणी ही शिबिरे झाली. प्रत्येक ठिकाणी साधारणपणे २० ठिकाणाहून प्रतिनिधी–सेविका आल्या होत्या. म्हणजे, देशातील सुमारे २०० गावच्या सेविकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या शिबिरांचे संचालन हिंदी आणि प्रांतीय भाषांतून झाले.

जवळजवळ सर्वच ठिकाणी समितीच्या ठरीव कार्यक्रमा व्यतिरिक्त असे उपयुक्त

कार्यक्रम घेतले गेले. राजकोट येथील वर्गात प्लास्टिकची फुले, आणि नारळाच्या दोरी पासून विविध वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण दिले गेले. वर्धा, जबलपूर व कलकत्ता या ठिकाणी घोष (Chorus) म्हणण्याच्या तर सातारा येथे पोहण्याच्या शिक्षणाची योजना होती. या शिवाय काही ठिकाणी चित्रकलेचाही अभ्यास करवून घेतला गेला. या शिवाय सर्वच ठिकाणी सहली आणि मनोरंजनाचे विविध कार्यक्रम झाले. सर्वच ठिकाणी प्रामुख्याने तरुण सेविकांनीच उत्साहाने भाग घेतला.

अशा प्रकारे, दैनंदिन कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर शैक्षणिक महत्वाच्या कार्यक्रमांना स्थान दिल्याने तरुण वर्गास समिती-कार्याकडे आकृष्ट करण्यात बरेच यश मिळाले. समिती सेविकेला जीवनाची विविध दालने परिचित असावी हा या मागील हेतु आहे. पुढील काळात या दृष्टीने मावशींनी आणखी काही योजना कार्यान्वित केल्या.

दिल्ली येथील वर्गात 'स्त्रियांची वेषभूषा' या विषयावरील चर्चा आयोजित करण्यात आली. या चर्चेचा परिणाम असा दिसून आला की उत्तर भारतीय सेविकांचे साडी नेसण्याचे प्रमाण आपोआपच वाढले.

कलकत्ता येथे सेविकांनी 'स्वयंविक्री केंद्राचा' (Honesty stall) चा यशस्वी प्रयोग केला. जबलपूर येथे कापसापासून पुतळे बनविण्याचे प्रशिक्षण दिले गेले.

हे सर्व वर्ग यशस्वी करण्यासाठी ठिकठिकाणच्या अनेक शिक्षिका आणि स्थानिक सेविकांनी अपार परिश्रम घेतले. स्वयंस्फूर्तिने आणि झीज सोसूनही इतक्या प्रौढ आणि तरुण भगिनी आपला वेळ देतात; आणि ज्या निष्ठेने आणि शिस्तबद्ध प्रकारे विविध कार्यक्रम पार पाडतात ते पाहून असे वाटते की असे उदाहरण निदान भारतात तरी क्वचितच् आढळेल !

भारतात सर्वदूर झालेल्या या सर्वच वर्गांना भेटी देऊन मावशींनी प्रत्येक ठिकाणी काही काल सेविकांच्या सान्निध्यात घालविला.

वंदनीय मावशींनी विविध प्रकारच्या अनेक उपक्रमांना जे प्रोत्साहन दिले त्या संबंधीचा उल्लेख पूर्वी येऊन गेलेलाच आहे. तथापि, या वर्षी कोल्हापूर येथील एक ज्येष्ठ सेविका सौ. कृष्णाताई ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तेथे ज्या उपक्रमाला चालना दिली गेली तो विशेष उल्लेखनीय आहे. सौ. ठाकूर यांनी कोल्हापूर येथे एक लघुउद्योग अत्यंत यशस्वी रीत्या चालविला आहे. या उद्योगाद्वारे साबण, कापूर, चॉकोलेटस्, हलवा मसाले आदि अनेक गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन केले जाते. या उद्योगाने कित्येक गरजू भगिनींना उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून दिले आहे एवढेच नव्हे तर शिवाय खर्चवजा जाता राहणाऱ्या नफ्याचा काही भाग समिती-कार्यासाठी खर्च होतो. ठिकठिकाणी असे लघुउद्योग भगिनींनी स्थापावेत यासाठी मावशी प्रयत्नशील आहेत.

धर्मानुसार प्रचलित असलेले नेमधर्म व कुळाचार स्त्रियांनी पाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे याबाबत मावशींचा आग्रह असतो. त्यांचे एक विशेष महत्व आहे, अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे त्यांना धरून असलेले कार्यक्रमही समिती-सेविका आयोजित करतात. जसे–१९६९ च्या अधिक मासात पुणे येथील सेविकांनी पार पाडलेला योजनाबद्ध कार्यक्रम. या कार्यक्रमानुसार कुणी ३३ तुळशीची रोपे वाढवून ती दान केली, कुणी ३३ बोधपर कथांचे कथन केले, तर कुणी ३३ पाट्या, पेन्सिली अथवा पुस्तके यांचे दान केले. ज्ञानदान आणि संपत्तिदान यांचे विशेष महत्व असून वरील प्रकारच्या उपक्रमामुळे स्त्रीची दातृत्वशक्ती वाढीस लागते असे मावशींचे प्रतिपादन आहे.

या वर्षातील आणखी एक महत्वाची घटना म्हणजे भावनगर येथून गुजराथी भाषेतील ‘सेविका’ वार्षिकाचे प्रकाशन. श्रीमती इंदिराबाई काणे, कुसुमबेन त्रिवेदी, शरयुबाला परिख आणि भागिरथीबेन मेहता या गुजराथ निवासी सेविकांनी पुढाकार घेऊन याचे प्रकाशन आरंभ केले. प्रकाशन प्रसंगी शुभाशीर्वाद देण्यासाठी मावशी गुजराथेत गेल्या होत्या.

कोणतीही राष्ट्रीय वा सामाजिक आपत्ती उद्भवल्यास त्रयस्थाची भूमिका न ठेवता ती स्वतःवरील आपत्ती आहे असे मानून प्रत्येकीने आपली जबाबदारी यथाशक्ती पार पाडली पाहिजे, हा संस्कार समितीत कटाक्षाने केला जातो. याचे प्रत्यंतर जसे ठिकठिकाणी वेळोवेळी दिसून आले तसेच ते यावर्षी नाशिकला आलेल्या महापुराचे संकटाचे वेळी दिसून आले. स्वयंस्फूर्तीने नाशिक येथील सेविका कामास लागल्या. इतर सहाय्यासोबतच पूरग्रस्त बांधवांसाठी कपडे शिवून वाटण्याचा उपक्रम त्यांनी केला.

आपला धर्म व आपली संस्कृति यांची आग्रहपूर्वक जोपासना केलेल्या नेपाळ भूमिचे एकदा प्रत्यक्ष अवलोकन करावे व तेथील प्राचीन पशुपतीनाथाचे दर्शन घ्यावे ही वंदनीय मावशींची बरेच दिवसांपासूनची इच्छा होती. हा योग १९४७ च्या आरंभी घडून आला. सौ. यमुताई सरंजामे, सिंधुताई फाटक, प्राध्यापिका सिंधुताई नावलेकर आणि प्रमिलाताई आदि काही सहकाऱ्यांसमवेत मावशी नेपाळ-दर्शनास गेल्या. पवित्र पशुपतीनाथाच्या दर्शनासोबतच तेथील एकंदर जीवनाचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले.

नेपाळचे राज्यकर्ते स्वतःस हिन्दुधर्माचे रक्षक मानीत आले आहेत. ‘मलाई हिंदु हुनमा गौरव छ.’ असे उद्गार नेपाळ नरेश विरेन्द्रवीर विक्रम शाह यांनी काढले ते याचेच द्योतक होय. महर्षि विश्वामित्र, भृगु, वात्स्यायन, कपिल, बुद्ध, भरत आणि जनक आदि भारतभूच्या अनेक श्रेष्ठ पुत्रांचे जन्मस्थान असलेली ही भूमि आपला धर्म आणि संस्कृति यांनी दिलेला वारसा वर्षानुवर्षे मोठ्या दिमाखाने टिकवून आहे, हा अनुभव फारच स्फूर्तिदायी वाटला, असे मावशी म्हणाल्या. तथापि, काही राजकीय स्वरूपाच्या

कारणावरून नेपाळचे आणि भारताचे संबंध पाहिजे तितके चांगले राहिले नाहीत ही वस्तुस्थिती त्यांना निराशाजनक वाटली.

नेपाळ हे जरी हिंदुराष्ट्र असले तरी हिन्दुधर्म परंपरेनुसार इतर अनेक धर्मीय लोक तेथील हिन्दुराज्याच्या छत्र–छायेत सुखासमाधानाने रहात असल्याचे दृष्य दिसते.

नेपाळ मधील प्रत्येक लहान सहान गोष्ट, आपल्या संस्कृतीची किती कटाक्षाने जोपासना केलेली आहे, याची साक्ष पटविते. अगदी प्रथम प्रकर्षाने जाणवते ती गोष्ट म्हणजे नेपाळी भाषा. तिचे संस्कृतोद्भव शद्ब आणि तिची नागरी लीपि! सर्व दूर फलक नागरी लिपीत रंगविल्याचे दिसते. पत्रपेट्यांवर Letter Box या आंग्लभाषीय शद्ब–प्रयोगाऐवजी 'पत्रमंजुषा' लिहिल्याचे दिसते. रस्त्यांची नावेही आपल्याकडील नांवांपेक्षा भिन्न, इंद्रपथ' धर्मपथ, शुक्रपथ अशी आढळतात.

तेथील साधारण लोकांच्या वागण्यातूनही याच गोष्टीचा प्रत्यय येतो. यःकश्चित टॅक्सी-वाहक तो काय, पण दिवसाचा प्रारंभ करताना 'लोकमाता' मानल्या गेलेल्या बाग-मती नदीच्या पुलावरून जाताना गाडी थांबवून तेथे फुले वाहिल्याशिवाय पुढे जात नाही. नेपाळ नरेशांचे या संबंधातील धोरण तर विशेष उल्लेखनीय वाटते. परदेशगमना-पूर्वी आणि नंतर नरेशांनी देवदर्शन घेण्याची प्रथा येथे कटाक्षाने पाळण्यात येते.

नेपाळ हे अगदी लहानसे राष्ट्र असून एका बाजूने चीन व इतर बाजूंनी भारताच्या भूभागाने ते वेढले गेलेले आहे. असे असताही आपला धर्म, आपली संस्कृति, यांच्या अभिमानाने, आपली मान उंच ठेवूनच तो आपला सर्वांगीण विकास साधण्यात मग्न आहे, हे पाहून कमालीचे समाधान होते. धर्म आणि संस्कृति यांची जोपासना करीत असताही प्रगतीशील राहता येते याचे जीतेजागते चित्र तेथे कुणासही अवलोकन करता घेण्यासारखे आहे, या शब्दात मावशींनी नेपाळ–दर्शना संबंधीच्या आपल्या अभिप्रायाचा समारोप केला.

१९७० ची एक उल्लेखनीय घटना म्हणजे 'सेविका' या हिन्दी वार्षिकाचे प्रकाशन-मराठी आणि गुजराथी या दोन भाषांतून या पूर्वीच प्रकाशन सुरू झाले हा उल्लेख आलेला आहे. हिन्दी आवृत्ती मध्यप्रदेशातील उज्जैन येथून सुरू करण्यात आली. समितीच्या एक जुन्या आणि कर्तबगार सेविका सौ. लक्ष्मी वाकणकर यांनी सम्पादनाची जबाबदारी स्विकारली. सहाय्यक संपादिका सौ. सुशीला नामजोशी असून प्रकाशिका सौ. सरलाताई दातार या आहेत.

राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या दृष्टीने जे कार्यक्रम वेळोवेळी घेण्यात येतात त्यात या-वर्षी काही शाखांनी जे नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केले ते असे–

पुणे येथील सेविकांनी गोवा आणि विजापूर या प्रदेशात जाऊन रामायण कथनाचा

उपक्रम केला. अमरावती शाखेने संक्रमणोत्सवाचे वेळी कानडी, बंगाली व गुजराथी भगिनींना आमंत्रित केले होते. त्यांनी त्यांच्या प्रांतात हा उत्सव कसा साजरा करतात ही माहिती यावेळी दिली. अदिलाबाद शाखेने रामरक्षेचे तेलगु भाषांतर मुद्रित करवून घेतले व तेलगु भाषिक भगिनींना त्या प्रती भेट दिल्या.

१९७१ च्या ऑक्टोबरमध्ये समितीचा त्रैवार्षिक मेळावा मध्यप्रदेशात ग्वाल्हेर येथे ठरला होता. त्याच्या पूर्वतयारीचे दृष्टीने वंदनीय मावशींनी भारतीय अधिकाऱ्यांची एक बैठक ऑगस्ट महिन्यात नागपूर येथे आमंत्रित केली. भारताच्या निरनिराळ्या प्रांतांतील अधिकारी–भगिनी या बैठकीस उपस्थित होत्या.

बैठकीत ठरल्या प्रमाणे दिनांक १० ते १२ ऑक्टोबर हे तीन दिवस ग्वाल्हेर येथे समिती कार्यकर्त्यांचा प्रचंड मेळावा संपन्न झाला. परगावाहून सहाशेच्या वर प्रतिनिधी उपस्थित होत्या. यापूर्वी मिरज, मुंबई, पुणे, नाशिक, वर्धा आणि नागपूर येथे अशा स्वरूपाचे त्रैवार्षिक मेळावे होऊन गेल्याची माहिती मागे दिलीच आहे. या मेळाव्यांना दोन ते तीन हजारच्या दरम्यान उपस्थिती होती. परंतु महाराष्ट्राबाहेर घेतलेला हा पहिलाच मेळावा असल्याने त्यांच्या तुलनेत ग्वाल्हेर येथे जरी उपस्थिती कमी होती तरी तो फारच यशस्वी झाला.

ग्वाल्हेर येथील मराठा बोर्डिंगच्या भव्य वास्तूत दिनांक १० पूर्वीच आंध्र, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, गुजराथ, राजस्थान, माळवा, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या प्रांतातून आलेल्या प्रतिनिधी एकत्र झाल्या होत्या. प्रथम देवी अष्टभुजेच्या स्थापनेने कार्यारंभ झाला. यावेळी ग्वाल्हेरच्या सौ. माधवीराजे शिंदे यांचे हस्ते देवीचे पूजन झाले. या नंतर राजमाता विजयाराजे शिंदे यांच्या हस्ते 'स्वतन्त्रता का मूल्य' नामक प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्या संबंधी बोलताना राजमाता म्हणाल्या: 'हे प्रदर्शन लहानशा जागेत सीमित असले तरी त्यात भारतव्यापी प्रेरणेच्या खुणा जागोजागी दिसून येतात.'

दिनांक १० रोजीच रात्री नागपूरच्या युवती क्रीडा मंदिराने स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित 'पानिपतची उत्तर–क्रिया' या नाटकातील काही प्रवेश सादर केले.

दिनांक ११ ला देवी अष्टभुजेची ग्वाल्हेर शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेच्या आघाडीवर गजराज डौलाने पथक्रमण करीत होते. गजराजावर आरुढ होती एक भगवा ध्वज घेतलेली सेविका. मागोमाग घोषपथक चालले होते. त्यामागे संचलन करणाऱ्या सेविकांचा एक मोठा गट घोषवाद्यांच्या तालावर पावले टाकीत चालत होता. नंतर होती श्रीअष्टभुजेची प्रतिमा. त्या मागे वंदनीय मावशींच्या नेतृत्वाखाली समिती अधिकाऱ्यांचा गट धीर–गंभीरपणे चालत होता.

शिस्तबद्ध रीत्या चाललेले भगिनींचे हे संचलन म्हणजे ग्वाल्हेरकरांना एक आगळाच अनुभव होता. पुरुषवर्ग हजारोंच्या संख्येत काहीशा कुतुहलाने आणि कौतुकाने ते दृष्य

पहात होता, तर स्त्री–समाज स्वयंस्फूर्तिने भगवतीच्या प्रतिमेची पूजा आरती करण्यास पुढे सरसावत होता. राणी लक्ष्मीबाईच्या सहवासाने पुनित झालेल्या त्या नगरीला पुन्हा एकदा उत्साहाचे आणि अभिमानाचे उधाण यावे असाच परिणामकारी प्रसंग होता तो !

वाटेत राणी लक्ष्मीबाईच्या समाधीवर पुष्पमाला अर्पण करून वंदनीय मावशींनी त्यांच्या स्मृतीला वंदन केले.

मेळाव्यात महाराष्ट्रातील, एक थोर तत्वचिंतक म्हणून गणले जाणारे कोल्हापूर येथील श्री दत्ताजी बाळ यांचे बौद्धिक मावशींनी घडवून आणले. आपल्या विवेचनात श्री बाळ म्हणाले:

"समितीचे कार्य अवलोकन केल्यानंतर मला महिलांमध्ये वास करणाऱ्या अलौकिक शक्तीचे अभूतपूर्व दर्शन घडले.

मध्ययुगीन भारतात स्त्री विषयी, विकासमार्गाच्या आड येणारी व पुरुषाला मोह पाडणारी शक्ति, अशी भावना झाली होती. वास्तविक ती चूक होती. स्त्रीला देवता म्हणणं हे त्या कल्पनेचं दुसर टोक आहे. मी स्त्रीला प्रेरणा समजतो. मार्क्सचा पक्का विरोधक असूनही प्रेरणेतून प्रेरणा उद्‌भवते हे हेगेल या तत्वचिंतकाचे मत मी मान्य करतो. स्त्रीच्या द्वारे भगवन्ताचा आविष्कार होऊ शकतो. ज्याप्रमाणे धन आणि ऋण अशा दोन शक्ती असतात त्याच प्रमाणे शिव आणि शक्ति या दोन प्रेरणा आहेत. पुरुष आणि स्त्री दोघंही मानव आहेत. माझ्या जीवनात एका महान शक्तीचं वास्तव्य आहे हा प्रत्यय मनुष्याला आला पाहिजे. वंदनीय मावशींनी आरंभलेले कार्य या दृष्टीने फारच योगदायक आहे हे निःस्संशय."

मेळाव्यात सर्व प्रांतीय भगिनींनी आपआपले सांस्कृतिक कार्यक्रम सादर केल्यानंतर हा मेळावा समाप्त झाला.

१९७१ च्या शेवटी पंतप्रधान इंदिरा गांधींनी योग्य प्रकारची खंबीर उपाययोजना केल्याने त्यावेळी गणल्या जाणाऱ्या पूर्व पाकिस्तानचे स्वतंत्र अशा बंगला देशमध्ये रूपांतर झाले हा इतिहास सर्व परिचित आहे. यावेळी इंदिरा गांधींनी ज्या प्रकारचे दूरदर्शित्व, योजकता आणि मुत्सद्दीपणा यांचा परिचय दिला त्याने केवळ भारतातच नव्हे तर सर्व जगभर भारताची प्रतिष्ठा व वचक वाढीस लागले. वंदनीय मावशींनी त्यांचे अभिनंदन केले एवढेच नव्हे तर या विजयानंदाप्रीत्यर्थ दिनांक १९ जानेवारी ७२ रोजी (माघ शुद्ध चतुर्थी) अथर्वशीर्षाच्या सहस्त्रावर्तनाचा कार्यक्रम नागपुरास आयोजित केला. ह्या कार्यक्रमात शहराच्या सर्व स्तरातील स्त्रिया सम्मिलित झाल्या होत्या. या प्रसंगी वंदनीय मावशींनी नरान्तक आणि देवान्तक या दैत्यांचा संहार करणाऱ्या बाल विनायकाची कथा सांगितली.

• • •

# राष्ट्र--सेविका समिती : स्त्री--धर्माची कार्यशाळा : २०

दुरिताचे तिमिर जावो
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिमात्र । —संत ज्ञानेश्वर

स्त्री--धर्मानुसार, समिती--कार्याद्वारे, स्वतःचा सर्वतोपरी विकास करून घेऊन स्त्रीने पुन्हा एकदा वैभवाने जगू लागावे, ही वंदनीय मावशींची आकांक्षा ! त्या साठीच सर्व शक्तिनिशी गेली कित्येक वर्षे त्या अविश्रांतपणे प्रयत्नशील आहेत.

सुमारे अर्धशतकाच्या या वाटचालीत मावशींचे कार्य पूर्वीपेक्षा काहीशा वेगळ्या स्वरूपात आता समाजा समोर येत आहे, असा जो अभिप्राय समिति बाहेरील आणि समितील सुद्धा व्यक्तींकडून आजकाल व्यक्त केला जातो तो विचारात घेण्यासारखा आहे.

समितीच्या आरंभीच्या काळात स्वराज्य ही गरज होती. ते आले पण दुसरी गरज निर्माण झाली. सुराज्याची ! तिच्या पूर्तिसाठी कुणाशी लढावयाची आवश्यकता नाही. प्रत्येकाने स्वधर्माचे पालन केले तर सर्वदूर दाटलेला अंधार नाहीसा होऊन इच्छित उद्दीष्ट प्राप्त होईल.

म्हणूनच स्त्री--धर्माचे पालन ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. स्त्री--धर्म पालन सुरू झाले की राष्ट्र--धर्म पालनासाठी वेगळा प्रयत्न करावा लागणार नाही. स्त्री ही पुरुषाचीही जननी आहे. त्यामुळे समस्त समाजात धर्माचे अधिराज्य तीच उत्तम प्रकारे प्रस्थापित करू शकते.

वरील विचारांच्या अनुषंगानेच बहुदा वंदनीय मावशींच्या कार्याचा कल धार्मिकतेकडे बराच झुकलेला दिसतो.

धार्मिकता म्हणजे केवळ तात्विक चिंतन नव्हे. विचारांप्रमाणेच ते आचारांचेही शास्त्र आहे, आणि त्याची प्रात्यक्षिके करून समाजासमोर ठेवण्यासाठी समितीची आवश्यकता आहे.

समाजातील दुःखी कष्टी लोकांचे दुःख ते आपले दुःख मानून त्यांच्या सहाय्यार्थ

धावून जाणे ही आपल्या धर्माची एक महत्वाची बाजू आहे. १९७२--७३ मध्ये अवर्षणा-मुळे पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग दुष्काळग्रस्त झाला. पुण्याजवळीलही काही भाग यात होता. दुष्काळाचे वृत्त हृदय हालवून सोडणारे होते. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना कोणत्या प्रकारे मदत करता येईल या संबंधी समितीच्या पुणे शाखेतील सेविकांची एक बैठक अधिकाऱ्यांनी आमंत्रित केली.

बैठकीत असे ठरले का थोडे थोडे अनेकांना देण्यापेक्षा एखाद्या खेड्याचीच जबाबदारी संपूर्णपणे उचलावयाची. त्या प्रमाणे पुणे जिल्ह्यातील राऊतवाडी या खेड्याची दुष्काळ संपेपर्यंतची जबाबदारी घ्यावयाची असे ठरले.

दुष्काळी व्रत म्हणून सेविकांनी रोज मूठभर धान्य आणि एक पैसा बाजूला काढून ठेवावयाचा; तसेच जुने कपडेही गोळा करावयाचे असे ठरले. दर १५ दिवसांनी राऊतवाडीस जावून गरजू व्यक्तींना त्या त्या वस्तू नियमित पुरविल्या गेल्या.

ठरलेला कार्यक्रम अगदी शिस्तबद्ध प्रकारे अमलात आणल्यामुळे फारच यशस्वी झाला. राऊतवाडी येथील ग्रामस्थांनी समिती सेविकांचे मनःपूर्वक आभार मानले.

वाढत्या वयोमानानुसार विश्रांतीची गरज वाढत जाते. तथापि, देशभर चालणारे दौरे आणि व्याख्याने यांचे प्रमाण अजूनही कमी न झाल्याने वंदनीय मावशींची प्रकृति बरीच ढासळली. म्हणूनच, उपचाराच्या परिणामापेक्षाही किमानपक्षी काही काळ विश्रांती मिळेल या उद्देशाने, आपल्या सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव त्या १९७३ च्या जानेवारीत पुण्या-जवळील उरळी कांचन येथे निसर्गोपचाराश्रमात जाऊन राहिल्या. त्यांच्या समवेत नाशिक येथील सौ. इंदिराबाई मेहेंदळे या होत्या. तेथील निसर्गोपचारामुळे आणि कठीण अशा आहारविषयक निर्बंधामुळे त्यांना किती लाभ झाला हे सांगता येणे कठीण आहे. परंतु तेथे आवश्यक अशी विश्रांती त्यांना मिळाली हे मात्र खरे !

त्र्यहात्तर सालच्या आरंभी संघाचे सरसंघचालक गुरुजी गोळवलकर हे कॅन्सरच्या विकाराने बरेच आजारी झाले. यावेळी वंदनीय मावशी २-३ वेळा त्यांच्या भेटीस्तव गेल्या. जीवनाच्या अशा अति गंभीर अवस्थेतही त्यांची स्थितप्रज्ञता आणि चिंतनशीलता किंचितही कमी झालेली नव्हती. मानवी जीवनाचा वास्तविक अर्थ आणि संघटन कार्या-संबंधी विचार याही वेळी या दोघांच्या संभाषणात आल्याशिवाय राहिला नाही.

पूजनीय गुरुजी दिनांक ५ जून १९७३ रोजी नागपूर येथे देवरूप झाले. मावशी त्यावेळी तेथेच होत्या. हेडगेवार भवनात जाऊन मावशींनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

स्त्री-धर्म-व्रत पालनाचे राजमाता जिजाबाई हे अत्यंत आदर्श उदाहरण आहे, असे मावशी म्हणतात. पति परकीयांच्या सेवेत असताही स्वधर्म आणि स्वत्वाची स्पष्ट जाणीव ठेवून त्यानुसार बाल शिवरायांना घडविण्याची जबाबदारी त्यांनी किती योग्य प्रकारे

पार पाडली ! अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतील संकटांमुळे त्या डगमगल्या नाहीत. सदसद्‌विवेक बुद्धीने जो मार्ग दाखविला तोच अनुसरण्याचा निग्रह त्यांनी सोडला नाही. परंतु यामुळेच त्या यशस्वीही झाल्या.

आजकाल, काही कारणांमुळे जर संकटे दिसू लागली; यशाबद्दल अशाश्वती वाटू लागली तर ध्येयपूर्तिसाठी अवलंबिलेल्या मार्गापासून दूर सरण्याची प्रवृत्ति दिसून येते. हे धोरण योग्य नव्हे; शिवाय कधी कधी संकटांना सामोरे जाणेही आवश्यक असते, हे जिजाबाईंच्या जीवनाचे सार आहे, असे मावशींचे प्रतिपादन आहे.

राजमाता जिजाबाईंच्या संबंधी असलेल्या वरील आदरयुक्त भावामुळेच या वर्षात येणारी त्यांची ३००वी पुण्यतिथी साजरी करण्यासाठी वंदनीय मावशींनी वर्षभराच्या देशव्यापी कार्यक्रमाची योजना आखली. नोव्हेंबर १९७३ ते ऑक्टोबर ७४ या वर्ष-भरात ठिकठिकाणी अनेक कार्यक्रम योजले गेले. त्यात जिजाबाईंचे जन्मस्थान सिंदखेड-राजा, पुणे, नागपूर, ठाणे आणि समारोपाचा दिल्लीतील भव्य कार्यक्रम हे विशेष उल्लेखनीय आहेत.

सिंदखेड येथील शोभायात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि वंदनीय मावशींचे बौध्दिक आदि कार्यक्रमामुळे जिजाबाईंची ती जन्मभूमि पुनः जागृत झाली !

पुणे, नागपूर, ठाणे येथेही अशाच स्वरूपाचे कार्यक्रम झाले.

दिल्ली यथील समारोप हा देशव्यापी स्वरूपाचा भव्य प्रमाणावरील कार्यक्रम होता. दिनांक २ ते ५ ऑक्टोबर १९७४ हे चार दिवस भारताच्या राजधानीत राष्ट्र-सेविका समितीचा त्रैवार्षिक मेळावाही घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी बिहार, आंध्र, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक आदि देशाच्या सर्वच भागांतून सुमारे ५०० प्रतिनिधी आल्या होत्या.

दिनांक २ रोजी गुजरायच्या प्रसिद्ध धर्मप्रसारक श्रीमती गीताबेन शहा यांनी जिजा-बाई पुण्यतिथी समारोहाच्या सांगता समारंभाचे आणि समितीच्या त्रैवार्षिक मेळाव्याचे उद्‌घाटन केले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, "आपल्या महान संस्कृतीची जी जोपासना आणि वाढ करते तीच खरी माता ! कर्मवीर पुत्रामुळेच मातेला सन्मान प्राप्त होतो. मातृत्वाच्या ह्या आवश्यकतांची पूर्ति करण्यानेच जिजाबाईंना योग्य श्रध्दां-जलि वाहता येईल. वंदनीय मावशींनी आरंभिलेल्या समिती-कार्याद्वारे हेच कार्य होत आहे, ही फार समाधानाची गोष्ट आहे."

या प्रसंगी वेगवेगळ्या दिवशी, जिजाबाईंच्या प्रतिमेची शोभायात्रा; 'मनोरंजनाची प्रचलित साधने राष्ट्राला अधःपतनाकडे नेत आहेत' या विषयावर वादविवाद; 'राष्ट्रीय उत्थानाच्या कार्यात आम्ही आपला सहयोग या प्रकारे देऊ शकतो,' या विषयावर

परिसंवाद; योगासने, शारीरिक शिक्षण आणि घोष यांची प्रात्यक्षिके; वंदनीय मावशी, संघाचे सर संघचालक बाळासाहेब देवरस आणि इंदूरच्या राजमाता मृणालिनी होळकर यांची बौध्दिके, आदि अनेक कार्यक्रम झाले. कार्यक्रमाचा समारोप साध्वी माँ योगशक्ती यांच्या भाषणाने झाला. माँ योगशक्ती आपल्या भाषणात म्हणाल्या, "भारतीय समाजाला आत्मविस्मृतीकडून आत्मजागृतीकडे नेणे ही आजची गरज आहे. या दृष्टीने स्त्रिया फार मोठी कामगिरी करू शकतात. राष्ट्र–सेविका समितीचे कार्य या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे यात शंकाच नाही.'

देशाच्या सर्वच भागातून आलेल्या भगिनींना राजधानीत सम्पन्न झालेल्या या भव्य सोहळ्यामुळे नवी आशा, नवी स्फूर्ति मिळाली असल्यास नवल कोणते !

अशा प्रकारे, स्त्री–शक्ती जागृतीचा वंदनीय मावशींनी आरंभिलेला हा यज्ञ अगणित अशा सेविकांच्या श्रद्धायुक्त श्रम आणि अजोड त्यागाच्या आहुतींनी सदोदित प्रज्वलित ठेवला आहे. नियतीचा हा नियमच आहे की काय न कळे की कोणत्याही यज्ञयागावर संकटे ही यायचीच! यापूर्वीही मावशींच्या कार्य-मार्गात संकटे येऊन गेली, सध्याही संकटाचे सावट आहेच; आणि भविष्यातही ती येतील. तथापि आदर्श माता, आदर्श भगिनी, आदर्श गृहिणी निर्माण व्हाव्यात म्हणून आरंभिलेले धर्माधिष्टीत असे हे परम पवित्र कार्य असल्याने कशाही परिस्थितीत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात ते चालू राहीलच अशी मावशींची श्रद्धा आहे.

वंदनीय मावशींचा कार्येतिहास कथन करीत असता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या असंख्य पैलूंचे असाधारणत्व यात येऊ शकले नाही ही जाणीव होत आहे. वरवर शांत भासणारे परंतु अंतर्यामी ज्वलंत असणारे त्यांचे जीवन सांगण्यापेक्षा अनुभवण्यासारखे अधिक आहे. ध्येयाबद्दल नितांत श्रध्दा, कार्यवाढीची कळकळ आणि कशाही परिस्थितीत कार्य करीत राहण्याची जिद्द ही त्यांच्या विशेषत्वाची त्रिसूत्री आहे. संबंधात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस त्या कमी लेखीत नाहीत. एखादी कमतरता प्रयत्नांच्या उपचाराने नाहीशी करता येते हे उदाहरण त्यांनीच घालून दिलेले आहे. अधिकाधिक व्यक्तींवर मातृतुल्य प्रेम करण्याची सहृदयता त्यांचे ठिकाणी आहे. म्हणूनच निरनिराळ्या प्रकारे श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीही मोठ्या आदराने त्यांचे अनुयायित्व स्वीकारतात असा अनुभव आहे. धडाडी, योग्य दिशेने प्रयत्न करण्याची हातोटी आणि कामाचा उरक हे गुणही विशेषत्वाने असल्याने अशा व्यक्तींचा त्यांच्या संबंधीचा आदर द्विगुणित होतो. सामाजिक व वैयक्तिक कर्तव्य आणि निष्ठा याबाबत संघर्ष न येऊ देता दोहोसही यथायोग्य महत्व देऊन ती उत्तम प्रकारे पार पाडण्याची हातोटी ही त्यांना लाभलेली ईश्वरी देणगीच होय! थोडक्यात, त्यांचे जीवन म्हणजे साधारणत्वाकडून असाधारणत्वाकडे उंचावलेला आलेख होय!!

• • •

# सूचि


अगस्ती जानकीबाई–६५
अफझूलपूरकर कुमुदिनीबाई–६८,८१,८३,९३
अभ्यंकर (बॅ.) मोरुभाऊ–४,१७,१८,१९,२६,३६
अभ्यंकर (केळकर) कुशामाई–२२
अभ्यंकर श्रीमती वहिनी–८३
अत्रे श्रीमती कमलाताई–८५
अत्रे आचार्य प्र. के.–१११,११२
अय्यर (देव–कल्याण सुंदरम्) इंदूताई-११९,१२०,१२१,१२२,१२५
अहल्या (देवी) मंदिर–१३५,१३६,१४७
अहल्या मंदिर मंगल कार्यालय–१४७
अष्टभुजादेवी मंदिर–१३५,१४८
ॲटली मि. क्लेमंट–१०७
आठवले सौ. मालिनी–७३
आठवले सौ. वनिता–९३
आठवले सौ. अक्काताई–१२२
आपटे महादेवराव (वकील)-३२
आपटे हरि नारायण–४९
आपटे बाबासाहेब–८२
आपटे सरस्वतीबाई (ताई)–६८,६९,८३,९३,१२६
आपटे विनायकराव–७०,७१
आपटे सौ. कुमुदताई–१२२
ओगले कै. गोपाळराव–१०,१४
ओक (केळकर) रमाबाई–२२
ओक पु. ना.–१६९
अंबर्डेकर श्री. सुशीलाबाई (ताई)–८७,८८,९३
कमतनूरकर सौ. सरोजिनी–१२५
कन्नमवार मा. सां.–१५०
करकरे सौ. शान्ता–१२९
करोडे लक्ष्मीबाई (ताई)–९,६१
करंदीकर सौ. शांतादुर्गा–७१
करंदीकर श्री. बाळूताई–८१
करंदीकर येसूताई–८५
कर्वे (महर्षी) धोंडो केशव–३१,११५,११७,११८,१४५
कळमकर श्रीमती मालतीबाई–५५,५६,५९,६५, ८३, ८९,९३
काटदरे सौ. मीरा–१२९
काणे श्रीमती यमुताई–८०
काणे सौ. नलिनीताई–१४७
काणे इंदिराबाई–९३,१७२
काणे विमल–९४
कानडे सौ. दुर्गा–६१
कायरकर दादाशास्त्री–१६
कासखेडीकर कै. बाळकृष्णपंत–९८
काळे अनसूयाबाई–३७,६५,११५
काळे (डॉ.) यादव माधव–५९
काळे प्रमिलाताई–८८
काळे माधवी–९३
काळे सौ. विजया–१२७,१२९
कावळे केशवराव (वकील)–२१
कॉम्युनल अवॉर्ड–१६
कॉंग्रेस इंडियन नॅशनल–२१,३०,३७
किचलू (डॉक्टर)–१९
कुसुममाला प्रकरण –५१,५२

कुळकर्णी सदाशिव नारायण–४६
कुळकर्णी श्रीमती काशीताई–६८,८१,८३,
८७,९३,९४
केतकर सरस्वतिबाई (जिजी)–६९,८३
केतकर सौ. गीतादेवी–१२२
केतकर सौ. कुमुदताई–१२६
केदार डॉ. तु. ज.–१७
केदार रमाबाई–३३
केळकर वामनराव–२१,२२
केळकर गणेश वामन–२१,२२
केळकर हरी वामन–२१,२२,२३,२९
केळकर नारायण वामन–२१,२२
केळकर चिंतामण वामन–२१
केळकर सदाशिव हरी–२२,२३,२४
केळकर पुरुषोत्तम हरी–२२,२४,३२,३९,
४०,४१
केळकर लक्ष्मण हरी–२२
केळकर यशवंत हरी–२२,३१,४९
केळकर (साठे) उमाबाई–२३,३१,३३,४०,
१५२,१५५
केळकर (गाडगीळ) सुंदराताई–२५
केळकर (देव) सावित्रीबाई–२६,२८,२९
केळकर (आपटे) शांताबाई–३२,४९
केळकर (केतकर) अन्नपूर्णाबाई–२६,२८,३१
केळकर शांता (अक्का)–२८,४१
केळकर रमाबाई–३८
केळकर नरसिंह चिंतामण–६७
केळकर मनोहर पुरुषोत्तम–२९,१०१,१०६,
१०७,१५२
केळकर पद्माकर पुरुषोत्तम–३२,१०६,१३४
केळकर दिनकर पुरुषोत्तम (लेखक)–३३,
४६,८९,१०१,१०६,१११,१५०
केळकर रत्नाकर पुरुषोत्तम–३५,३६,१०९
केळकर कमलाकर पुरुषोत्तम ३८,१०९,१५०
केळकर आनंद पुरुषोत्तम–३८,१०९
केळकर (कासखेडीकर) सौ. कुमुदिनी–९८
केळकर दिलीप दिनकर–१५१
कोंडेवार चंद्राबाई–३५
कोंडेवार यमुनाबाई–३६
कोलते बाबासाहेब–६३
कोलते नानीबाई–६३,६४
कोलते कुसुमबाई–६४
कोल्हटकर श्रीमती वेणूताई-७१
कोल्हटकर वा. शि.–१३४
खरे (डॉ.) नारायण भास्कर–४, १७,२६,
३५,३८
खाडीलकर कृष्णाजी प्रभाकर–६
खानखोजे (डॉ.) पां. स.–२३
खिलाफत चळवळ–३४
खोब्रागडे राजाभाऊ १११,११२
खैर (डॉ.) ग. श्री-११५
गद्रे (केळकर) वेणूताई–२२
गनगोत्रा सुशीला–९४
गरवारे (डॉ.) मालती १२९
गाडगीळ कृष्णाजीपंत–६
गाडगीळ विष्णूपंत–२५
गाडगीळ रोहिणीताई–९३
गाडगीळ अमरेंद्र–११५
गिरी (डॉ.) वराहगिरी १४८
गांधी (महात्मा) मो. क.–१२,१९,३०,३७
३८,५४,९७,१३१,१६६
गांधी इंदिरा–१६६, १७५
गृहिणी विद्यालय–११४,१२१,१२५,१२७
गृहिणी-विद्या वार्षिक-१२७


गोखले कै. गोपाळ कृष्ण–१४
गोखले बळवंतराव–३४
गोखले विश्वनाथ रामचंद्र–५
गोखले (दाते) मैनाताई ५,६३,६५,८५,९३
गोखले (डॉ.) व्ही. बी.–३२
गोखले इंदूताई (नागपूर)–७३
गोखले इंदूताई (मुंबई)–१२०,१२५
गोखले निर्मलाताई–९३
गोखले मनोरमाबाई (वहिनी)–९३
गोडबोले श्रीमती माई–७१,८३
गोरेगावकर सौ. गुलाब–८५
गोळवलकर (गुरुजी) मा. स.–२३,९७,१०६,१४५,१७७
गौर (डॉक्टर) हरिसिंग–२२
घटाटे बाबासाहेब–८४
घाणेकर (डॉक्टर) कुसुम–९३,९५
चर्चिल मि. विन्स्टन–१०७
चव्हाण यशवंतराव–१४५,१५६
चाटी सौ. उषाताई–६४,९३
चितळे श्रीमती कमलाबाई–८५
चितळे श्रीमती अक्का–१४६
चोळकर (डॉक्टर) मो. रा.–१७,१८,८२
चोळकर बा. मो.–८२,९०
चोळकर सौ. वत्सला–२५,२८,४१,४२,५५,६९,९०,१५०
चोरघडे वामनराव–१०९
चौंडे महाराज–१३,१४
छत्रे सावित्रीबाई–६५
जनार्दन स्वामी–१३७,१५७,१६२
जयप्रकाश नारायण–९०
जालियनवाला बाग–१९
जिगजिनी कमलाबाई–८५
जिजाबाई (राजमाता)–१४२,१७७,१७८
जिजामाता स्मारक–१३०,१४८
जीना (बॅ.) महंमद अली–१६,३०
जोगळेकर योगिनी–८५
जोशी हरि कृष्ण–४८,६८
जोशी सौ. विमल–६०
जोशीराव (प्रा.) नीलाताई–६४
जोशी सौ. इंदुकला–६६
जोशी कु. सुमति–८५
जोशी सौ. मालती–१२१
जोशी (अगाशे) सुधाताई–१३४
टागोर रविंद्रनाथ–१९
टिळक लोकमान्य बा. गं.–१४,१६
टिळक ज. श्री.–१२६
टोपले (डॉक्टर) प्रमिला–६६
टोपले सौ. लीलाताई–७३
डांगे श्रीपाद अमृत–११२
डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट–१५
डेव्हिड (डॉक्टर)–३९
ठकार बाबासाहेब–१६९
ठाकूर कृष्णाताई–१७१
तरुण-भारत दैनिक–१११
ताश्कंद करार–१६०
तांबे रमाबाई–५०,११५
तांबे (डॉ. ए. गो.)–१४४
तांबे सौ. सुमन–६०,१४५
त्रिवेदी कुसुमबेन–९३,९४,१७२
तेलंग सौ. सुंदर–६०
थत्ते मालतीबाई–३१
दातार सरलाबाई–८५
दाते (डॉ.) रामचंद्रपंत–३

दाते सीताबाई–३
दाते यशोदाबाई–३,४,५
दाते भास्करराव–३,४,५,१३
दाते लक्ष्मीबाई (दाई)–४,६,१३
दाते महादेव भास्कर–४,
दाते नीळकंठ भास्कर–४,४३
दाते पुरुषोत्तम भास्कर–४
दाते (डॉ.) वामन भास्कर–४
दाते मधुकर भास्कर–५
दाते प्रभाकर भास्कर–५
दाते सौ. सुशीला–६०
दावके कुसुमताई–८५
दावके आजीबाई–९४
दास (बॅ.) चित्तरंजन–१८,३०
दांडी यात्रा–३७,३८
दांडेकर प्रा. सोनोपंत–१६२
दिग्रसकर कुसुमताई–८५
दिवेकर महादेवशास्त्री–६७
दिवेकर सौ. इंदिराबाई (ताई)–६८,७०,८३, ९३,९७,१२१
देव शंकर श्रीकृष्ण–२६,२८
देवकुळे सौ. बकुल–६८,८५,८९,९२,९३, ९५,९६,११६,११८,११९,१२१,१२६, १२९,१४४,१६२
देवकुळे जयंतराव–८९,९५,११६
देवरस बाळासाहेब–१०७,१३७,१७९
देवानी कुमारी जेठी–८८,८९
देशपांडे मनोहरपंत–५६
देशपांडे सौ. तारा–६०,१०३
देशपांडे सौ. कमलाताई–६३
देशपांडे सौ. प्रभाताई–६६,९३
देशपांडे (डॉक्टर) कमलाबाई–११५,११६, ११८, १२०
देशपांडे सौ. विमलाताई–१३४
देशमुख बळवंतराव–१७
देशमुख (डॉक्टर) गोपाळराव–३२
देसाई मोरारजीभाई–९९
द्रवीड नटेश आप्पाजी–१४
द्रवीड मथुराबाई–१४
धबाब जानकीबाई–६६
धर्माधिकारी दादासाहेब–१०९
धाराशिवकर भागिरथीबाई–९
धोत्रे शरयुताई–३१
नागले बाबासाहेब–८६
नागले सौ. कमलाबाई (माई) ८६,९३, १२१,१४४
नावलेकर (प्रा.) सिंधुताई–८७, १२२, १२६,१७२
नायडू रा. ब. नारायणस्वामी–२२
निमकर सौ. मोहिनी–१२७,१२९
नियोगी (डॉ.) भवानी शंकर–१७
निवेदिता (मार्गारेट)–५३,१६३
नेहरू पंडित मोतीलाल–३०
नेहरू पंडित जवाहरलाल–३६,९८,१०७, १४५,१५६
पटवर्धन चंद्रभागाबाई–५९
पटवर्धन रमाबाई–८५
पतकी शंकर देविदास–४८
परमार्थ दादाराव–८२
परांजपे (डॉ.) ल. वा.–७,१७
परांजपे उमाबाई–५,७२
परांजपे लक्ष्मीबाई (काकू)–५,६८,७२,८३ ९३,९६,१०२,१०३

परिख शरयुबाला–१७२
पळशीकर लीलाताई–८५
पाटणकर सौ. कालिंदीताई–५५,५६,६९,८०
पाटणकर सौ. सिंधुताई–६६,८५,९३
पाटील (खासदार) उत्तमराव–१४४
पाटील सौ. प्रतिभा–१४८
पाठक (वकील) गजाननराव–६०
पाठक उमाबाई–५
पांगारकर (हरिभक्त) ल. रा.–२८
पारनाईक सौ. नलिनी–६०,६१
पाल बिपिनचंद्र–३०
पुरोहित सौ. सुशिलाताई–१२२
पंचम जॉर्ज (राजे)–८
पंढरपूर नारायणराव–१०
प्रकाशवति–९४
प्रमिलाताई–१७२
फळणीकर सौ. लीला–८७
फाटक श्रीमती सिंधुताई–६८,८०,८५,९३,
१४८,१५६,१५७,१६०,१६१
बजाज जमनालालजी–१७,२५,३०,३१
बजाज जानकीबाई–३१,३२
बस्तीकर ताराबाई–१२०
बाकरे मनोरमाबाई–१३४
बापट (सेनापति)–४
बापट सौ. कालिंदीताई–१४४
बाळ दत्ताजी–१७५
बुटी कै. गोपाळराव–४
बडकर सौ. मालतीबाई–१२५,१५५
बेहेरे विमलाबाई–३३
बोस सर विपिनचंद्र–१६
बोस नेताजी सुभाषचंद्र–८४
भाटे सौ. कमलाताई–९२,९३
भावे सौ. प्रतिभा–७३
भावे सौ. इंदूताई–१२२
भोपटकर ल. ब.–६७
भोसले (छत्रपति) सुमित्रा राजे–१३६,१६४
भोसले प्रा. शिवाजीराव–१६९
'मराठा' दैनिक–११२,१२६
मराठे सुशीलाबाई (माई)–१४७
मराठे सौ. कुसुमताई–७३
मसूरकर धर्मभास्कर विनायक महाराज–६८
'महाराष्ट्र' दैनिक–१०,१७
महाजन सौ. सुशीला–८५,९३
मंगेशकर लता–१६३
माओत्से तुंग–१५६
माडखोलकर सौ. उमा–१३७
मांधले सुशीलाबाई–८५
मांगलिक विमल–९३
मॉट–फोर्ड जाहीरनामा–१७,१८
माँ योगशक्ति–१७९
मुठे शरद–१४५
मुळशीपेठा सत्याग्रह–४
मुंजे (डॉ.) बा. शि.–१६,१७,५२
मुंजे सौ. प्रमिलाताई–७३,९३
मेहेंदळे इंदिराबाई–८७,९३
मोडक श्रीमती जान्हवीबाई–८७,१४४
मोदी हंसाबेन–९४
मोहनी सौ. सुशीलाबाई–३३
मोहरीर सत्यभामाबाई–६५
मोहरीर कृ. नी.–८२
मौलाना महंमदअली–३०
म्हस्कर (डॉ.) कृ. श्री.–११५,११७,११८,
१२०
रॅशनल आर्ट अँड प्रेस लि.–१२८
राजेंद्रप्रसाद (डॉक्टर)–१०८,१४५

रानडे अन्नपूर्णाबाई (काकू) –९२,९३,९४,
१२६,१४४,१५८,१६२,१६६
रानडे सौ. कुसुम–६०
'राष्ट्र सेविका' वार्षिक–३
राष्ट्रसेविका समिती–२४,५४,५८,५९,६२,
६३,७०,७३,७४,११९,१३०,१३५,१४२
१५५,१५६,१६०,१६३,१७१
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ–३५,४८,६१,९७,
१०२,१०६
रिस्ले सर्क्युलर–१६
रुक्मिणी के.–९३
रौलट बिल–१८,१९
लक्ष्मीबाई (राणी)–१४२,१४४,१४५
लक्ष्मीबाई (राणी) स्मारक–१३५,१४४,
१४६,१५१
लक्ष्मीबाई (राणी) भजन मंडळ–१४७
लाला लजपतराय–३०,३६
लॉरेन्स (लॉर्ड) पेथिक–१०७
लिमये का. भा. (काकासाहेब)–८३,८४,
१४४
लेले कमलाबाई–३१
लेले सौ. शीला–१२९
वर्मा जगन्नाथप्रसाद–५२
वॅव्हेल (लॉर्ड)–१०७
वाकणकर सौ. लक्ष्मी–८०,९२,९३,१२६
वाकणकर (डॉ.) हरिभाऊ–८७
वारदेकर (डॉ.) रा. वि.–११६
वारदेकर (डॉ.) प्रमिला–११६
वालावलकर कु. कृष्णा–८५
विजय राघवाचारियर सी.–३०
विदर्भ स्त्री सम्मेलन–५०
विवेकानंद (स्वामी)–४९,५३
विंझे श्रीमती माई–९
विद्यावती (डॉक्टर)–९३
वीरकर सौ. प्रज्ञा–१२७
वैशंपायन दत्तात्रय अनंत–४३,४६,४९
वैद्य नारायणराव (वकील)–१६,१८
शर्मा आशादेवी–९३,१६०
शर्मा शारदा–९४
शर्मा शक्ती–९४
शहा सुमतीबाई–१६२
शहा गीता बेन–१७८
शास्त्री लालबहादुर–१६०,१६१
शांतिदेवी–१६०
शिरास द्वारकाताई–६८
शिंदे (राजमाता) विजयाराजे–१३६,१३७
शुक्ला (पंडित) रविशंकर–९९
शेरे सौ. लीला–८५
शेवडे सौ. विजया–१२९
शंकराचार्य जगद्गुरु–१६०
'सकाळ' दैनिक–५०,१०९
सबनीस अनसूयाबाई–६६
सबनीस मनोहरराव–१४६,१४७
सरंजामे सौ. यमूताई–१३६,१७२
सहस्त्रबुद्धे यमुनाबाई–४
सर्व्हेंटस् ऑफ इंडिया सोसायटी–१४
साठे सुशीलाबाई–६६
साठे सौ. कुसुमताई–६८,७२,७३,९३,९६,
१०३,१२०
साठे कु. चंदुताई–१२२
साठे राजाभाऊ (वकील)–१४४
सातवळेकर (वेदपंडित)–४८,१३०,१४५
साने सुंदराताई–१०
साने सौ. विजया–६५

सायमन कमीशन–३६,३७
सावरकर स्वातंत्र्यवीर वि. दा.–६७,९१
१४५
'सावधान' साप्ताहिक–५२
सुशीलादेवी धर्मवीर–९५
सुळे अंबूताई–९
'सेविका' प्रकाशन–११७,१३५,१४९,१५९
सेन्यामारुती प्रकरण–६६
सोहोनी कमलाताई–८०,९७
'संकल्प' साप्ताहिक–१७
संयुक्त महाराष्ट्र समिती–११२
स्त्री-जीवन विकास परिषद–११६,११९
स्नेहलता प्रकरण–१३
श्रद्धानंद (स्वामी)–३४
हरदास बाळशास्त्री–१३५
हरदास गोविंद नारायण–१४८
हरदास सौ. नलिनीबाई–१४८
हरदास सौ. वसुंधराबाई–१४९
'हरिजन' साप्ताहिक–१३१
'हितवाद' दैनिक–१४,१७
हिंदु युवक परिषद–६८
हिंदु धर्म भगिनी मंडळ–७१
हिंदु महासभा–९७
'हिंदुस्थान' साप्ताहिक–१०९
हिंदु मुलींची शाळा–१०
हिर्लेकर यमुनाबाई–५०,१२०
हुद्दार बाळासाहेब–१०९
हेडगेवार (डॉ.) के. ब.–१७,३५,५२,५६,
५७,५८,६३,६४,६७,६८,८२,८३,८४
होमरूल लीग–१६
होळकर (देवी) अहल्याबाई–१३६,१४२,
१४६
होळकर (राजमाता) मृणालिनी–१७९
क्षीरसागर विष्णूजी–१६२,१६९
ज्ञानेश्वर (संत)–१७२



**दिनकर पुरुषोत्तम केळकर :** वंदनीय लक्ष्मीबाई तथा मावशी केळकरांचे चिरंजीव असून पत्रकार आहेत.

१९४७ मध्ये स्नातकीय परीक्षा उत्तीर्ण झाल्या-नंतर वर्धा येथे स्वतःचे मुद्रणालय आणि 'विद्या' नामक (हिन्दी व मराठी) पत्रिकेचे प्रकाशन आरंभ केले.

१९५८–५९ या वर्षी नागपूर येथील दैनिक 'मराठा'त जाहिरात विभाग प्रमुख आणि स्तंभ लेखक.

१९६०–७२ या काळात शैक्षणिक पुस्तकांचे लेखन आणि प्रकाशन यवसाय. मध्यंतरी १९६७–६८ या वर्षात दैनिक तरुण भारत, नागपूर येथे मुद्रणालय अधीक्षक.

१९७३ पासून दैनिक 'नागपूर टाईम्स' मध्ये उपसंपादक.

यापूर्वी त्यांचे चार चरित्रात्मक ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. याशिवाय इंग्रजी, मराठी आणि हिन्दी या तिन्ही माध्यमातून निरनिराळ्या विषयांवर लेखन.

शिक्षण : बी. ए., एल्एल्. बी., बी. जे.
जन्म : ऑगस्ट १९२५.